इ स पहिल्या/दुसऱ्या शतकातील गंधार शैलीतील (इंडो/ग्रीक शैलीतील) भग्नावशेषात सम्यक संबुध्द, बोद्धीसत्व, महामाया आणि यांचे शिल्प.... ठिकाण नागपूर वस्तुसंग्रहालय!

सूरज रतन जगताप, मुक्त लेणी अभ्यासक, घणसोली नवी मुंबई ९३२०२१३४१४ ४/११/२०२२



☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸ *सविनय जयभीम*

╭══════════════╮ ☬🌑☸ *रोजच धम्म प्रसार*☸🌑☬ ╰══════════════╯

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय।

लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं।

परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।

●●●●●●●●●●●

आज दि. 12 डिसेंबर, 2022, बुद्धाब्द 2566, अशोकाब्द 2326, भिमाब्द 132, सोमवार, माघसिरो, चन्दवारो, मार्गशीर्ष माहे. *12 डिसेंबर 1927, रोजी विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे महाडच्या मंडळीनी चवदार तळे खाजगी आहे, असा दावा केला.*

●●●●●●●●●●●

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🌷 *12 डिसेंबर 1912, सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर जयंती.* 🌷

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवित एकुलते एक सुपुत्र यशवंत उर्फ भैय्यासासाहेब आंबेडकर यांचा जन्म दिवस 12 डिसेंबर 1912 असुन त्यांच्या उपेक्षित जिवनपटाचा संक्षिप्त अहवाल, माहीती. *दि. 12-12-1912 बि. आय. टि. चाळ 1/50, मुंबई, येथे जन्म.* *दि. 27-5-1935 आई रमाई यांचे निधन.* *1942- जनता पत्राचे संपादकत्व* *1952-प्रबुद्ध भारताचे संपादकत्व* *1952-मानगांव (रायगड) मतदार संघातुन विधानसभेची निवडणुक लढविली.* *दि. 19-4-1953- विठ्ठल महादेव साळवी यांच्या मिरा या मुलीशी मंगल परिणय विवाह.* *दि. 28-4-1954-डॉ. बाबासाहेब आंबेडकर हिरक महोत्सवी समितीचे खजिनदार (समितीने बाबासाहेबांना एक लाखाची थैली अर्पण केली.)* *दि. 5-5-1955-पत्रकार संमेलन संपन्न.* *दि. 6-12-1956-पित्याचे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) यांचे छत्र हरपले.* *दि. 6-12-1956-भारतीय बौद्ध महासभेच्या अध्यक्षपदी निवड करण्याबाबत प्रमुख कार्यकर्त्यांत बहुमत.* *दि. 20-3-1957-डॉ. बाबासाहेबांच्या स्मारका साठी मुंबई महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार.* *1958 ते 1960-बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष.* *दि. 2-4-1958- डॉ. बाबासाहेबांच्या पहिल्या (डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, पंचायत भोईवडा) स्मारकाचे भूमिपूजन.* *1957 ते 1963 धम्मदिक्षेचे देशभर कार्यक्रम.* *दि. 22-6-1958-पहिल्या स्मारकाचे अनावरण.* *दि. 14-7-1958 ते दि. 30-12-1958 रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याचा पहिला यशस्वी प्रयोग.* *1959-भूमिहीनांचा सत्याग्रह.* *1961 ते 1966 विधान परिषदेचे सदस्य.* *1962-मुळगाव आंबडवेलाला प्रथम भेट.* *1963-म्यूनिसिपल कामगार संघाचे अध्यक्ष.* *दि. 10-2-1964 ते दि. 17-2-1964-स्मारकनिधी संकलन प्रचार सप्ताह.* *1964-रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेशाचे अध्यक्ष.* *दि. 3-1-1965-वरळी, मुंबई येथे आव्हान सभा.* *दि. 14-4-1966-भिमज्योत (महू-मुंबईची) सांगता.* *दि. 14-12-1966 - पन्नाशी निमित्त

दयानंद बांदोडकर यांच्या हस्ते सत्कार.* *1967-10 दिवसीय श्रामनेरची दिक्षा-नाव 'पंडित काश्यप'.* *दि. 23-11-1968-मुंबईत बौद्धधम्म परिषद संपन्न, प्रमुख पाहुणे दलाई लामा.* *दि. 5-7-1970-पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या गव्हर्निंग बॉडीचे सदस्य.* *दि. 18-4-1971-जगन्नाथरावं भातणकर मार्गाचे उदघाटण.* *1971 ते 1975 - मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य.* *दि. 22-5-1972-श्रीलंका येथे दहाव्या जागतिक बौद्ध परिषदेला भारतीय बौद्धांचे प्रतिनिधित्व केले.* *दि. 9-10-1972-लंडनला भेट.* *दि. 26-1-1974-रिपब्लिकन ऐक्याचा तिसरा प्रयोग.* *दि. 23-2-1974-रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मंत्रालयावरील मोर्चाचे नेतृत्व.* *दि. 1-11-1974-तिसऱ्या आशियाई बौद्ध परिषदेला दिल्ली येथे उपस्थित.* *दि. 9-3-1975-बौद्धजन पंचायत समितीच्या प्रथम परिषदेचे उदघाटण.* *दि. 5-3-1976-शेड्युल्ड कास्ट इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या विश्वस्तपदी नियुक्ती.* *दि. 3-4-1976- एकशस्टी निमित्त सत्कार.* *1977-ईशान्य मुंबई, मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढविली.* *दि. 10-1-1977-लोखंडाचे चणे पचविणारी चळवळ या विषयावर भाषण.* *दि. 1-5-1977- महाड येथे क्रांतिस्तंभाचे उदघाटण.* *दि. 19-5-1977-बौद्ध महासभेची पुणरबांधणी.* *दि. 23-5-1977- मोरारजी देसाई समोर मुंबई येथे सवलती संदर्भात निदर्शने.* *दि. 17-8-1977-बौद्धांच्या सवलती संदर्भात दिल्ली येथे मोरारजी देसाई यांच्या सोबत भेट.* *1977-तुम्हाला बौद्ध व्हायला कोणी सांगितले ही पुस्तिका प्रकाशित.* *दि. 17-9-1977-मुंबईच्या के. इ. एम. रुग्णालयात निधन.* *दि. 2-10-1977-चैत्यभूमीवर शोकसभा.*

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🥀🥀🥀🌷💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

प्रत्येक रविवारी बुद्धविहारात बुद्धलेनिस गेलेच पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐💐

सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसंपदा| सचितपरियोदपनं में एतं बुद्धानं सासनं|

बौद्धांच्या #सवलती काय आहेत? हे नीट समजून घ्या. #खास_बौद्धांसाठी #अनिल_वैद्य

महाराष्ट्रात बौद्धांना 1960 पासुन अनुसूचित जातीच्या सवलती आहेत, परंतु केंद्र सरकारने सूचित समावेश केला नाही.

बौद्धांचा समावेश अनुसूचित झाल्याशिवाय अनुसूचित जातीची घटनेतील व्याख्या पूर्ण होत नाही. ती कलम 366(24) मध्ये आहे.

कलम 341अन्वये एखादया जातीला किंवा त्यातील गटाला अनुसूचित समाविष्ट करता येते.

धर्मांतरीत बौद्ध हा महार जातीतून धर्मांतरीत झालेला गट आहे.

केंद्र सरकारने अनुसूचित जातीची यादी केली आहे, ते अधिकार फक्त केंद्र सरकारला आहेत राज्य सरकारला नाहीत.

आपल्या विद्यार्थांचे UPSC ने बौद्ध नमूद केलेले जातीचे प्रमाणपत्र नाकारले.

जनगणना आयोगाने बौद्धांना अनुसूचित जाती मध्ये गणले नाही. यांचे म्हणणे असे की, बौद्ध अनुसूचित नाहीत म्हणून त्यांना एस.सी. समजत नाहीत. तसे त्यांनी आम्हाला लेखी कळविले आहे.

त्यांचे म्हणणे कायद्यास धरून आहे. आपण कायदेशीर त्रुटी पूर्ण केल्याच पाहिजेत व दुष्परिणाम नष्ट केले पाहिजेत. कायद्यास अपेक्षित ते पूर्ण केले पाहिजे.

1990 ला धार्मिक पात्रता मिळाली पण सूची मध्ये समावेश केला नाही म्हणून पूर्ण काम झाले नाही, अर्धेच झाले.

राज्य सरकारने शिफारस केली पाहिजे व केंद्र सरकारने ती स्विकारली पहिजे.

यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा. सध्या पहिल्यांदा सामाजिक न्याय मंत्र्यांनी दखल घेतली आहे.

पूर्वी कुणी समस्या आहे हे सुद्धा समजून घेत नव्हते. मी आणि माझे सहकारी गेल्या अनेक वर्षा पासून ही लढाई लढत आहोत.

अनेक सभा घेतल्या जनजागृती केली, लेख व पुस्तक लिहून पाठपुरावा करीत आहोत, आपणही करावे, ही अपेक्षा!

अन्यथा, बौद्ध नमूद केलेली पिढी तुम्हाला माफ करणार नाही, यादी मध्ये बौद्ध नमूद करण्याशिवाय दुसरा कायदेशीर उपाय उपलब्ध नाही.

अनिल वैद्य (माजी न्यायाधीश व आंबेडकरी अभ्यासक) नाशिक, नागपूर.

||नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासमबुद्धस्स||

🌹 भारतातील बुद्ध धम्माचा इतिहास 🌹

प्रकरण १ ले बौद्ध संस्कृती श्रमण संस्कृती

साधारणपणे इसवी सनापूर्वी १५०० वर्षापासून आर्य, टोळ्या-टोळ्यांनी भारतात येऊ लागले. आर्य भारतात येण्यापूर्वी उत्तर भारतात तसेच राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रात श्रमण संस्कृतीचे अस्तित्व होते. मोहेंजोदारो, हरप्पा प्रमाणेच गुजरात मधील लोथल येथे आणि महाराष्ट्रातील भोकरदन येथे पुराण वस्तू संशोधन खात्याने आणि

डेक्कन कॉलेजने केलेल्या उत्खननात श्रमण संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. नुकतेच इन्स्टिटट्यूट फॉर ह्युमॅनिटी ऑफ नेचर, क्योटो, जपान, तसेच डेक्कन कॉलेज, पुणे आणि महर्षी दयानंद युनिव्हर्सिटी रोहतक यांनी रोहतक येथे केलेल्या उत्खननात इसवी सनापूर्वी ३००० ते ३५०० काळातील ७० सांगाडे असलेली एक स्मशानभूमी आणि १८.५ हेक्टर वर पसरलेली हरप्पा सारखी संस्कृती असलेली वसाहत शोधून काढली आहे.

हरप्पा आणि मोहेंजोदारो येथे उत्खननात सापडलेल्या कलात्मक वस्तूंत हरीण, सिंह, घोडा, हत्ती, बैल, गेंडा आणि नाग ह्या पवित्र प्राण्यांचे छाप शंखजिऱ्याच्या (सोपस्टोन) दगडासारख्या मऊ दगडावर कोरलेले आहेत. त्याचप्रमाणे पिंपळाचे झाड सुद्धा दगडावर कोरलेले दिसते. पिंपळाच्या झाडाला आणि उपरोल्लिखित सर्व प्राण्यांना बौद्ध साहित्यात आणि स्मारकात महत्त्वाचे स्थान दिले आहे. मोहेंजोदारो हरप्पा येथील उत्खननात ध्यानस्थ मुनींचे शंखजिऱ्याच्या दगडावर (सोपस्टोनवर) कोरलेले चार पुतळे सापडले आहेत. ई. मॅके यांना मोहेंजोदारो येथे सापडलेल्या एका ध्यानस्थ मुनींच्या पुतळ्याला ऐतिहासिक 'शिव' त्रिमूर्ती आणि पशुपती असे म्हटले गेले आहे. वास्तविक शिव महादेव त्रिमूर्ती आणि पशुपती ह्या संकल्पना ब्राम्हणी धर्मात आणि हिंदू धर्मात येण्याअगोदर अनेक शतकांपासून श्रमण संस्कृतीत आणि श्रीमंत संस्कृतीतून निर्माण झालेल्या बौद्ध आणि जैन संस्कृतीत मुनी, यती, आणि श्रमण हे निर्विवादपणे अस्तित्वात होते. श्रमण संस्कृतीचा तो एक अविभाज्य भाग आहे. मोहेंजोदारो, हरप्पा येथे सापडलेल्या कोरीव पुतळ्यांकडे वैदिक संस्कृतीच्या पूर्वीच्या श्रमण संस्कृतीचे प्रतिक म्हणून पाहिले पाहिजे.

त्या पुतळ्यातील ध्यानस्थ मुनी, एका आसणावर आसन मांडून बसला असून त्याच्या उजव्या बाजूस सिंहाचे आणि हत्तीचे चित्र कोरलेले आहे, तर डाव्या बाजूस रेडा आणि गेंडा यांचे चित्र कोरलेले आहे. त्याचा आसणाच्या खालच्या बाजूस दोन हरणांचे चित्र कोरलेले आहे. सांचि आणि भरहुत येथील शिल्पाप्रमाणे त्या मुनींच्या डोक्यावर त्रिरत्नाची निशाणी आहे. ह्या मुनीला कदाचित सारनाथ येथील अशोकाच्या स्तंभाप्रमाणे चार दिशांकडे असणारी चार तोंडे असावीत असे वाटते. मोहेंजोदारो येथे सापडलेल्या दुसऱ्या एका ठशावर एक चित्र कोरलेले आहे. त्याला पुरोहिताचे चित्र असे म्हणतात. त्या चित्रात माणसाच्या शरीराचा वरचा भाग कोरलेला आहे. त्याचे डोळे ध्यानस्थ मुणीसारखे अर्धवट उघडलेले आहेत. त्याला दाढी असून लांब केस आहेत. बौद्ध भिक्खूसारखे त्याच्या अंगावर वस्त्र आहेत, उजवा खांदा उघडा आहे. एखाद्या ध्यानस्थ मुनींचे ते कोरलेले चित्र असावे असे ते वाटते. दगडावर कोरलेला तिसरा एक पुतळा सापडलेला आहे. तोसुद्धा ध्यानस्थ मुनिसारखा वाटतो. त्याचा काळ साधारणपने इ. स. पू. 2000 वर्षांचा असावा असे तज्ञांचे मत आहे. शंखजिऱ्या (सोपस्टोन) सारख्या मऊ दगडावर कोरलेल्या ध्यानस्थ मुनींचा आणखी एक पुतळा मोहेंजोदारो येथे सापडलेला आहे. त्याच्यापुढे त्याला आदरांजली देणारी हात जोडून उभी असलेली दोन माणसे आहेत. त्याच्या पाठीमागे दोन नाग फणा काढून उभे आहेत. अशाच प्रकारचे अनेक मऊ दगडावर कोरलेले अनेक पुतळे हरप्पा येथेसुद्धा सापडलेले आहेत. ध्यान करणारे मुनी श्रमण संस्कृतीत होते, वैदिक संस्कृतीत नव्हते.

वैदिक संस्कृतीतील भारतीय आर्यांचे सर्वात महत्वाचे एकच कार्य होते, आणि ते म्हणजे यज्ञात प्राण्यांना बळी देणे. डॉ. जी. सी. पांडे म्हणतात की, वैदिक पुरोहितांनी एकच सर्वात महत्वाची गोष्ट वारंवार सांगितली आहे, आणि ती

म्हणजे यज्ञात बळी देणे. यज्ञात बळी देण्याच्या कार्यामुळे बळी देणाऱ्याला मृत्युनंतर स्वर्गात जागा तर मिळतेच शिवाय जिवंतपणी त्याला संरक्षण, दीर्घायुष्य, अपत्यफळ, भरभराट आणि कीर्ती मिळते.

ऋग्वेदातील पुरोहित, हे अग्नी, प्रज्योत्पत्ती करून अमरत्वाला प्राप्त हो, अशी प्रार्थणा करित असत. (प्रजभिअग्णे अमृतत्त्व- मस्यम) वैदिक संस्कृतीनुसार ब्राम्हण हा आपल्या पित्याचे ऋण घेऊन जन्माला येत असतो. त्याला मुले विशेषतः मुलगे झाल्यावरच तो आपल्या पित्याचे ऋण फेडू शकत असे. घर सोडून अनगारिक होऊन तत्वचिंतन करणे हे वैदिक संस्कृतीला मान्य नव्हते.

ऋग्वेदात ध्यान करणाऱ्या मुनींचे वर्णन आले आहे. तो खडतर जीवन जगणारा असून त्याला दाढी आणि लांब केस आहेत. मुनी कदाचित नग्न असावा किंवा अत्यंत तोकडे मलिन कपडे अंगावर असलेला असावा, असे तेथे मुनींचे वर्णन आहे. कर्मकांड (ढोंगीपणा) करणाऱ्या आणि एहिक गोष्टीत, विशेषतः मुलात आणि दान दक्षिणेत रस घेणाऱ्या वैदिक पुरोहिताला मुनींचे आदर्श आवडत नसावेत, असे वाटते. वेदात एके ठिकाणी इंद्राला मुनींचा मित्र असे म्हटले आहे तर दुसऱ्या ठिकाणी इंद्र हा यतींचा शत्रू असे म्हटले आहे. दुसऱ्या एके ठिकाणी इंद्राने यतींना मारून त्यांना लांडग्यांना आणि तरसांना खाऊ घातले असे म्हटले हे मुनींच्या सारखेच अनार्य, वैदिक नसलेले लोक होते. यजुर्वेदात मनुष्यबळी (पुरुषमेध) देण्यास योग्य असलेल्यांत समावेश केला आहे.

हिंदू धर्मात चार आश्रम फार नंतरच्या काळात आले. त्यापूर्वी वैदिक धर्मात आणि ब्राम्हणी धर्मात आश्रमाला महत्व दिले होते. तो आश्रम म्हणजे गृहस्थाश्रम. बौधायन म्हणतो, दुसरे तीन आश्रम प्रजननात आणि संततच्या अपत्य प्राप्तीत अडथळा आणणारे आहेत. तो पुढे म्हणतो, कपिल नावाचा एक असूर होता. त्याने गृहस्थाश्रमाशिवाय इतर आश्रम निर्माण केले कारण तो देवांचा हेवा करणारा होता. शहाण्या माणसांनी त्याच्या कारस्थानात पडू नये.

यावरून असे दिसून येते की संन्यासी किंवा परिव्राजक हे वैदिक धर्मातून किंवा आर्य संस्कृतीतून निर्माण झाले नसून ते आर्येत्तरांच्या संस्कृतीतून निर्माण झाले आहेत. फक्त कपिलालाच नव्हे तर बुद्धांना सुद्धा ब्राम्हणी ग्रंथात असूर असे म्हटले आहे. भगवान बुद्धांच्या काळातील श्रमणांची किंवा भिक्षुंची जीवनपद्धती ही वैदिक जीवनपद्धती पेक्षा वेगळी जीवनपद्धती होती. माणसाच्या जीवनात परमोच्च शांती ही तृष्णा नष्ट करून मिळविता येते. तृष्णा नष्ट करण्यासाठी एहिक संसारापासून अलिप्त राहणे आवश्यक आहे. ध्यानाच्या सहाय्याने तृष्णा नष्ट करून प्रज्ञा प्राप्त करता येते. हे वैदिक किंवा आर्य संस्कृतीत बसत नव्हते. ही धारणा श्रमण संस्कृतीची होती; आर्य किंवा वैदिक संस्कृतीची नव्हती. मोहेंजोदारो हरप्पा येथे सापडलेल्या ध्यानी मुनींच्या प्रतिमा ह्या श्रमण संस्कृतीची प्रतिके आहेत, आर्य संस्कृतीची नाहीत.

🌷 श्रमण संस्कृती सांख्य तत्ववेत्ता कपिल 🌷

सांख्य तत्वप्रणालीचे तत्ववेत्ते कपिलमुनी यांचा काळ साधारणपणे इ. स. पू. 900 वर्षांच्या आसपासचा असावा. ते श्रमण संस्कृतीतून निर्माण झाले होते. श्याक्यांच्या कपिलवस्तूचे नाव कदाचित कपिल मुनींच्या नावावरून पडले असावे. सत्याला पुराव्याचा आधार असला पाहिजे हे सांख्य तत्वज्ञानाचे पाहिले तत्व आहे. सत्य सिद्ध करण्यासाठी प्रत्यक्ष ज्ञान आणि अनुमान हे दोनच मार्ग कपिलांनी मानले. त्यांचे दुसरे तत्व सृष्टीच्या उत्पत्ती संबंधी होते. हे विश्व निर्माण करणारा कोणीतरी निर्माता आहे हा सिद्धांत कपिलांनी अमान्य केला. ज्याप्रमाणे मातीतून मडके तयार होते किंवा सुतापासून कापडं तयार होते त्याप्रमाने उत्पन्न वस्तूंचे अस्तित्व पहिल्यापासूनच कारणात असते, असे त्यांचे मत होते.

कपिल म्हणतात की, अनुत्क्रांत वस्तूंच्या विकासाची प्रक्रिया सत्व, रजस आणि तमस या तिच्या तीन घटकांमुळे घडत असते. यांना तीन गुण असे म्हणतात. माणसाच्या सुखाचे कारण होणाऱ्या आणि त्यांचा आविष्कार करणाऱ्या नैसर्गिक प्रकाशाशी यापैकि पहिल्या घटकाचे सादृश्य आहे. दुसरा घटक प्रवृत्ती किंवा क्रियाशीलता निर्माण करतो. तिसरा घटक जड असून तो नियमन करतो आणि निष्क्रिय व अपेक्षेची स्थिती निर्माण करतो. या तीन घटकांचे परस्परांशी असलेले संबंध मुलताच अत्यंत निकटचे असतात. ते एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करतात. एकमेकांना आधारही देतात आणि परस्परात मिसळूनही जातात. हे घटक ज्योत, तेल आणि वात या दिव्याच्या घटकांप्रमाणे असतात. जेव्हा या तीन गुणात समतोल असतो आणि एक दुसऱ्यापेक्षा वरचढ होत नाही, तेव्हा हे विश्व अचेतन होते व त्याची उत्क्रांती होते तेव्हा हे विश्व सचेतन होते आणि त्याची उत्क्रांती सुरु होते. गुणांचा समतोल का जातो या प्रश्नाला उत्तर देतांना कपिल म्हणतात की, दुःखाच्या अस्तित्वामुळे या तीन गुणांचा समतोल बिघडतो.

अशा तऱ्हेने कपिल मुनींची शिकवण ही तर्कशास्त्रावर आणि वास्तवतेवर आधारलेली आहे. भगवान बुद्धांवर कपिल मुनींच्या तत्वज्ञाचा फार मोठा प्रभाव पडला होता. सत्य हे पुराव्यांनी सिद्ध झाले पाहिजे व कार्याला बुद्धीवादाचा आधार असला पाहिजे हे भगवान बुद्धांनी मान्य केले. देव अस्तित्वात आहे किंवा त्याने विश्व निर्माण केले हे गृहीत धरण्यास तर्कशास्त्राचा किंवा वस्तुस्थितीचा कोणताही आधार नाही, हे त्यांनी मान्य केले. जगात दुःख आहे हे त्यांनी मान्य केले.

🌹 भारतिय संस्कृतीचा उगम 🌹

सांख्य, चार्वाक, योग, जैन, जटील, आजीवक अगदी सुरुवातीचे शैव, बौद्ध धम्म इत्यादी धर्म श्रमण संस्कृतीतून झाले आहेत. त्यांची विचारसरणी ब्राम्हणी धर्मापासून अगदी वेगळी होती. श्रमन संस्कृतीत आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांचे श्रवण केले जाईल, म्हणून त्यांना श्रमण असे म्हणतात. श्रमन संस्कृतीत अध्यात्मिक आणि नैतिक मूल्य फार महत्वाची होती. त्यांच्या धर्मात गुरूंना श्रमण किंवा मुनी असे म्हटले जाई. त्यांचा नैतिक कर्मांवर विश्वास होता. आपली आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी ते ध्यान करित असत आणि अत्यंत साधेपणाने राहत असत. नंतरच्या काळात बौद्ध संस्कृतिसह श्रमण संस्कृती ब्राम्हण संस्कृतीत मिसळून हिंदू संस्कृती निर्माण झाली.

तिलाच आत्ताची भारतीय संस्कृती असे म्हटले जाते. अशा तऱ्हेने बौद्ध, जैन, सांख्य, योग आणि हिंदू संस्कृती मिळून आत्ताची भारतीय संस्कृती झाली आहे. भारतीय संस्कृती ही केवळ एका धर्माची संस्कृती नाही.

🌷 श्रमण संस्कृतीतील विचार प्रवाह 🌷

भगवान बुद्धांच्या काळात श्रमण संस्कृतीत अनेक विचार प्रवाह होते. दिघणिकायातील ब्रम्हजाल सुत्तात अशा 62 विचार प्रवाहांची माहिती दिली आहे. ढोबळ मानाने त्यांचे शास्वत वाद आणि उच्छेद वाद असे वर्गीकरण केले जाते. भगवान बुद्धांनी हे दोन अंत सोडून मध्यम मार्गाची शिकवण दिली आहे.

🌷 सहा आचार्य 🌷

भगवान बुद्धांच्या काळात जी निरनिराळी मते भारतात प्रचलित होती, त्यापैकी सहा आचार्यांची मते बौद्ध ग्रंथात प्रसिद्ध आहे. या सहांचेही वेगवेगळे पंथ असून त्यांचे आपापल्या अनुयायांवर बरेच वजन होते. त्यांच्या मतांवरून इसवी सनापूर्वीच्या पाचव्या शतकात कोणती मते विशेष करून प्रचलित होती याविषयी बरीच माहिती मिळते.

दिघणिकायाच्या सामत्रफलसुत्तात या सहा आचार्यांच्या विचारसरणीची माहिती दिली जाते.

🌷 पुरण कस्सप 🌷

पुरण कस्सपाच्या मताला आक्रियावाद असे म्हटले आहे. या वादानुसार एखाद्याने काही केले अथवा करविले, कापले अथवा कापविले, त्रास दिला अथवा देवविला, शोक केला, त्रास झाला अथवा दिला, एखाद्याला भय वाटले किंवा त्याने दुसऱ्यास भीती दाखविली, प्राण्यांस ठार मारले, चोरी केली, घरफोडी केली, दरोडा घातला; एखाद्या घरातील काही चोरले, किंवा वाटमारी केली, परदारागमन केले, असत्य भाषण केले, तरी त्यास पाप लागत नाही. तिक्शण धारेच्या चक्राने जरी एखाद्याने या पृथ्वीवरील प्राण्यांच्या मांसाची एक रास केली अथवा ढीग केला, तरी त्यात मुळीच पाप लागत नाही. त्यापासून काहीच पाप लागत नाही. गंगा नदीच्या दक्षिण तिरावर जाऊन जशी एखाद्याने हाणामारी केली, कापले अथवा कपविले, त्रास दिला अथवा देवविला, तरी त्यात मुळीच पाप लागत नाही. गंगा नदीच्या उत्तर तिरावर जाऊन जरी एकदा त्याने दान दिले अथवा देवविले, यज्ञ केले अथवा करविले, तरी त्यापासून मुळीच पुण्य लागत नाही. दान, धर्म, संयम, सत्य भाषण यांच्या योगाने पुण्य लागत नाही. त्यात मुळीच पुण्य नाही.

🌷 मक्खलि गोसाल 🌷

मक्खलि गोसालाच्या मताला अहेतुवाद असे म्हटले आहे. या वादानुसार, प्राण्यांच्या अपवित्रतेस काहीही हेतू नाही, काहीही कारण नाही. हेतुशिवाय कारणाशिवाय प्राणी अपवित्र होतात. प्राण्यांच्या शुद्धतेस काहीही हेतू नाही, काहीही कारण नाही. हेतू शिवाय कारणाशिवायच प्राणी शुद्ध होतात. स्वतःच्या सामर्थ्याने काही होत नाही. दुसऱ्याच्या सामर्थ्याने काही होत नाही. पुरुषाच्या सामर्थ्याने काही होत नाही, बल नाही, वीर्य नाही, पुरुषाची शक्ती किंवा

पराक्रमही काहीही नाहीत. सर्व सत्वे, सर्व प्राणी, सर्व भुते, सर्व जीव, अवश्य दुर्बल व निर्विर्य आहेत. ते नशीब, जाती वैशिष्ट्य व स्वभाव यांच्या योगाने बदलत असतात व सहांपैकी कोणत्यातरी जातीत राहून सुख दुःखाचा उपयोग घेत असतात.

मुख्य योनी चौदा लक्ष आहेत व आणखी सहा हजार सहाशे आहेत. कर्मे पाचशे आहेत व आणखी पाच आहेत आणि शिवाय तीन आहेत. त्याचप्रमाणे पूर्ण कर्म व अर्ध कर्म असे निराळी आहेतच. 62 मार्ग आहेत 62 अंतर्कल्प आहेत, सहा जाती, आठ पुरुषभूमी एकूण पन्नासशे परिव्राजक, पन्नासशे नागभुवने, 2000 इंद्रीये, 3000 निरय, 36 धुळीने भरलेली स्थाने सात संज्ञावान गर्भ, सात विसज्ञ गर्भ, सात निर्गंथी गर्भ, सात देव, सात मनुष्य, सात पिशाच्च, सात सरोवर, सात मोठे पतुवा व आणखी सातशे पतुवा, सात मोठमोठे धबधबे व आणखी सातशे लहानलहान धबधबे, सात मुख्य स्वप्ने व सातशे लहानलाहन स्वप्न आहेत.

शहाणे व मूर्ख दोघेही 84 लक्ष महाकल्पांच्या फेऱ्यांतून गेल्यावर मग त्यांचा नाश होतो. या शिलाने, वृत्ताने, तपाने अथवा ब्रम्हचर्याने मी अपरिपक्व कर्म पक्व करिन, किंवा परिपक्व झालेल्या कर्मांची फळे भोगून ते नाहीसे करून टाकीन, असे जरी एखाद्याने म्हटले तरी ते व्हावयाचे नाही. या संसारात सुखदुःखे परिमित द्रोणांनी मोजण्यासारखी ठराविक आहेत, व ती कमी जास्त किंवा अधिक उणी करता येणार नाहीत. ज्याप्रमाणे सुताची गुंडी फेकली असता पूर्ण उलगडेपर्यंतच ती जाते त्याप्रमाणे शहाणे व मूर्ख (संसाराच्या) फेऱ्यातून गेल्यावरच त्यांच्या दुःखांचा नाश होतो.

🌷 अजित केसकंबली 🌷

अजित केसकंबलीच्या मते प्रणालीला उच्छेदवाद असे म्हटले आहे. या मत प्रणालीनुसार दान, यज्ञ, होम ही काहीही नाहीत. चांगल्या वाईट कर्मांचे फळ अथवा परिणामही नाहीत. इहलोक, परलोक, माता, पिता किंवा ओपपातीक सत्वेही नाहीत. इहलोक, परलोक जाणून व नीट ओळखून दुसऱ्या शिकविनारे सर्व जाणणारे व योग्य मार्गाने जाणारे श्रमण व ब्राम्हणही या जगात नाहीत. मनुष्य चार महाभूतांचा बनलेला आहे. जेव्हा तो बोलतो तेव्हा त्याच्यामध्ये पृथ्वी धातू पृथ्विस, आपो धातू पाण्यास, तेजो धातू तेजस व वायू धातू वायू जाऊन मिळतो आणि इंद्रिये आकाशाकडे जातात. मेलेल्या माणसास चार पुरुष तिरडीवर घालून वाटेत त्याचे गुणगान गात स्मशानात घेऊन जातात. तेथे त्याच्या अस्थी पांढऱ्या होतात व आहे की भस्मरूप होऊन जातात. दानाचे हे खुळ मूर्ख माणसांनी काढले आहेत. जे कोणी आस्तिकवाद सांगतात, त्यांचे ते बोलणे निव्वळ खोटे आणि व्यर्थ बडबड आहे. शहाणे व मूर्ख दोघांचही शरीर भेदनंतर उच्चेद व विनाश होतो. मारणानंतर त्यांचे काहीही उरत नाही.

🌷 पकुध कच्चायन 🌷

पुढील सात गोष्टी केलेल्या किंवा करविलेल्या किंवा निर्माण करविलेल्या निर्मिलेल्या किंवा निर्माण केलेल्या नसून विंध्य पर्वत शिखराप्रमाणे स्थिर व स्तंभाप्रमाणे अचल आहेत. त्या हालत नाहीत. एकमेकास त्रासदायक होत नाहीत,

व एकमेकांचे सुख दुःख अथवातूनही घडवून आणण्यास समर्थ नाहित. कोणत्या सात? पृथ्वी, आप, तेज, वायू, सुख, दुःख व जीव ह्या त्या आहेत. त्यांना मारणारा, मारविणारा, त्या ऐकणारा, सांगणारा, जागणारा अथवा वर्णन करणारा, कोणीही नाही. जो तीक्श्न शस्त्राने एखाद्याचे डोके कापतो तो कोणाचेही जीवित हरण करित नाही. या सात गोष्टींच्या मधल्या जागेत शस्त्राने प्रवेश केला इतकेच काय ते!

🌷 संजय बेलट्ठीपुत्त 🌷

संजय बेलट्ठीपुत्त यांच्या संप्रदायाच्या तत्व विचारास अनिश्चितता वाद असे नाव देणे योग्य होईल. त्याचे मत विलक्षण आहे. ते देवता, परलोक, पाप पुण्य आधी कुठल्याच मुद्द्याबद्दल ठाम मत प्रतिपादन करित नाहीत. स्वर्ग नर्क आहे का? असे विचारल्यास तो आहे असे उत्तर देतो. स्वर्गलोक नाही का? असे विचारल्यास तो नाही असे उत्तर देतो. देवता आहेसुद्धा आणि नाहीसुद्धा, पाप पुण्य आहेसुद्धा आणि नाहीसुद्धा, कुशल अकुशल कर्माचे फळ आहेसुद्धा नाहीसुद्धा, तथागत मृत्युनंतर असतात सुद्धा आणि नसतात सुद्धा असे मत तो प्रतिपादन करतो. त्याचे हे मत अनिश्चितता वाद किंवा अनेकांतवाद म्हटले जाऊ शकते.

🌷 निगंठ नाथपुत्त 🌷

निगंठ नाथपुत्त चार तारखेच्या संवराने संवृत्त असतो. सर्व प्राण्यांपासून तो अलिप्त असतो. सर्व पापापासून तो अलिप्त असतो. त्याने सर्व पाप धुऊन टाकले आहे व तो सर्व पापणाशाने भरलेला असतो. अशा चार तऱ्हेच्या संवराने तो संवृत्त असतो व त्यामुळेच त्यास निगंठ, गतत्त, यतत्त, ठीठत्त म्हणतात.

धर्माची कल्पना निरनिराळ्या काळात जरी निरनिराळी असली तरी आजच्या युगात देवावर श्रद्धा, आत्म्याच्या अस्तित्वासंबंधी विश्वास, ईश्वर पूजा, चुकणाऱ्या आत्म्याला शिक्षा, प्रार्थना विधी, यज्ञयाग, पूजा अर्चा इत्यादींनी देवाला प्रसन्न करणे म्हणजे धर्म. धर्म हा वैयक्तिक असून ज्याने त्याने तो स्वतः पुरताच मर्यादित ठेवावा. सार्वजनिक जीवनात धर्माचे प्रयोजन नाही. याउलट धम्म हा समाजिक आहे. धम्म म्हणजे सदाचार; म्हणजे जीवनाचा सर्व क्षेत्रात माणसामाणसातील व्यवहार उचित करणे. मनुष्य एकटाच असला तर त्याला धम्माची आवश्यकता नाही. दोन किंवा अधिक माणसे एकत्र आली म्हणजे धम्माची आवश्यकता असते. सुसंस्कृत समाज धम्माशिवाय असूच शकत नाही. जो समाज शासनासाठी धम्माचा स्वीकार करणार नाही तो अराजकांचा मार्ग स्वीकारेल किंवा हुकूमशाहीचा स्वीकार करेल. अराजक्ता आणि हुकूमशाही या दोन्हींमध्ये स्वतंत्र्याचा नाश होतो.

🌷 धम्म आणि तत्वज्ञान 🌷

धम्म जे वास्तविक सत्य आहे आणि ज्या गोष्टींची सत्यता स्वतःच्या अनुभवाने पडताळून पाहता येतात या गोष्टी संबंधीचे मार्गदर्शन करतो. धम्म म्हणजे केवळ कल्पनांचा विलास नाही. कल्पना आणि तत्वज्ञान काही काळापर्यंत स्वीकारल्या जातात, पण समाजाची विचारसरणी बदलली म्हणजे कालांतराने त्या टाकून दिल्या जातात, असा

केवळ बौद्धिक कल्पनांचा विलास म्हणजे धम्म नाही. धम्माच्या शिकवणीप्रमाणे आचरण केल्यास माणसाचे दुःख कमी होते किंवा नष्ट होते, हे धम्म सांगतो. धम्मानुसार स्वतः आचरण करून प्रत्यक्ष अनुभव घेता येतो. केवळ पुस्तकी ज्ञानाला धम्मात फारसे महत्व नाही. धम्मपदात म्हटले आहे.

न तावता धम्मधरो यावता बहुभासति| योच अप्प्यम्पि सुत्वानं धम्मं कायेन पस्सति| सवे धम्मधरो होती यो धम्मं नप्पमज्जति|

(ज्या अध्ययनामुळे मनुष्य फार बोलत असतो, त्यामुळे तो धम्मधर होऊ शकत नाही. जो विद्वान थोडेच ऐकून धम्माचे यथार्थ आचरण करित असतो आणि आपल्या कर्तव्य कार्याला विसरत नाही, निश्चितपणे तोच धम्मधर होत असतो.)

भगवान बुद्धांचा धम्म म्हणजे पोकळ तत्वज्ञान नाही, तर तो दुःख मुक्तीचा मार्ग आहे.

🌷 चार आर्यसत्य 🌷

मनुष्यप्राणी दुःखात, दैन्यात, दारिद्र्यात राहत नाही. हे सर्व जग दुःखाने भरले आहे. दुःखाचे कारण तथागतांनी शोधले आहे आणि भगवान बुद्धानी सांगितलेल्या धम्मानुसार शिलाचा मार्ग अनुसरला तरच दुःखाचा निरोध होईल. दुःखाचा निरोध करणे हा भगवान बुद्धांच्या धम्माचा एकमेव उद्देश आहे. धम्मचक्र प्रवर्तन सुत्तात भगवान बुद्ध म्हणतात -

भिक्खूंनो, दुःख नावाचे पहिले आर्यसत्य आहे. जन्म दुःखकारक आहे. म्हातारपण दुःखकारक आहे. व्याधी दुःखकारक आहे. मरण दुःखकारक आहे. अप्रियांचा सहवास दुःखकारक आहे. प्रियांचा वियोग दुःखकारक आहे. एखाद्या वस्तूची इच्छा करून ती मिळाली नाही म्हणजे त्यापासूनही दुःख होते. संक्षेपात पाच उपादांनस्कंध दुःखकारक आहेत.

भिक्खूंनो, पुन्हा पुन्हा उत्पन्न होणारी आणि अनेक विषयात रममान होणारी तृष्णा, जिला कामतृष्णा, भवतृष्णा आणि विभव तृष्णा असे म्हणतात, हे दुःख समुदाय नावाचे दुसरे आर्यसत्य आहे.

अपेक्षेने त्या तृष्णेचा पूर्ण निरोध करणे, तिचा त्याग करणे, तिच्यापासून मुक्ती मिळविणे हे दुःख निरोध नावाचे तिसरे आर्यसत्य आहे. आणि आर्य अष्टांगिक मार्ग हे दुःख निरोधगामिनी प्रतिपदा नावाचे चौथे आर्यसत्य आहे.

भगवान बुद्धांचे इतर सर्व उपदेश ह्या चार आर्यसत्यावर आधारलेले आहेत. ज्याप्रमाणे पृथ्वीतलावर चालणाऱ्या प्रत्येक प्राण्याच्या पायाचा ठसा हत्तीच्या पायाच्या ठशात बसू शकतो, त्यांचप्रमाणे बुद्ध धम्मातील सर्व शिकवण चार आर्यसत्यांच्या शिकवणीत सामावली आहे. चार आर्यसत्य नीट समजल्याशिवाय भगवान बुद्धांचा धम्म समजणे शक्य नाही. त्यामुळे भगवान बुद्धांनी आपल्या उपदेशात दुःख आर्यसत्य अनेक प्रकारांनी समजावून

सांगितली आहेत. अलगद्दुपम सुत्तात सांगितल्याप्रमाणे अरिट्ठ नावाचा भिक्खू, तथागत विनाशवादाची शिकवण देतात असा गैरप्रचार करित होता. तथागतांना हे समजल्यावर त्यांनी अरिट्ठाला बोलावून घेतले आणि सर्व भिक्खूंसमोर सांगितले की, काही श्रमण ब्राम्हण गैरसमजूतीने किंवा खोडसाळ पणाने मी विनाशवादी असल्याचा आरोप करतात आणि मी प्राणीमात्रांच्या समोर नाशाची उच्चतवादी शिकवण देतो, असे लोकांना सांगतात. पण ते बरोबर नाही. दुःखाच्या अस्तित्वाची जाणीव आणि त्याचा निरोध कसा करायचा हिच शिकवण मी पहिल्यापासून आतापर्यंत देत आलो आहे.

दुःख आणि दुःख निरोध समजणे म्हणजे धम्म समजणे. चार आर्यसत्य म्हणजेच बुद्ध धम्म. बुद्ध धम्मात आलेली इतर शिकवण म्हणजे ह्या आर्यसत्यांचा केवळ तार्किक विकास आणि त्याचे मुद्देसूद विश्लेषण आहे.

बुद्ध शिकवणीत ह्या चार आर्य सत्य यांचे किती महत्व आहे हे सिंसपवनातील सुत्तावरून स्पष्ट होते. एकदा भगवान बुद्ध कोसंबित (वर्तमांनकाळीन अलाहाबाद जवळ) सिंसपवनात विहार करित होते. त्यावेळी हातात झाडाची काही पाने घेऊन त्यांनी भिक्खूंना विचारले; भिक्खूंनो, माझ्या हातात आलेली झाडाची पाने जास्त आहेत की ह्या आरण्यातील झाडांवर असलेली पाने जास्त आहेत?

भिक्खूंनी उत्तर दिले की, झाडांवर असलेल्या पानांच्या मानाने हातातील पाने अगदीच थोडी आहेत. तेव्हा भगवान बुद्ध म्हणाले, त्याच प्रमाणात मला ज्ञात असलेल्या अनेक गोष्टींपैकी फक्त मोजक्याच गोष्टी मी तुम्हाला सांगितल्या आहेत. कारण इतर गोष्टी शुद्ध जीवनासाठी उपयोगी नाहीत. त्या गोष्टी शांतीकडे, ज्ञान प्राप्तीकडे, आणि निर्वाणाकडे नेण्यासाठी उपयोगी नाहीत. म्हणून भिक्खूंनो, त्या गोष्टी तुम्हाला सांगितल्या नाहीत. मी तुम्हाला कोणत्या गोष्टी सांगितल्या आहेत?

दुःख आहे हे मी तुम्हाला सांगितले आहे. दुःख ज्या कारणामुळे उत्पन्न होते, ते मी तुम्हाला सांगितले आहे. दुःखाचा निरोध करता येतो, हे मी तुम्हाला सांगितले आहे आणि अष्टशील हा मार्ग दुःखाचा निरोध करण्याकडे नेतो, हे मी तुम्हाला सांगितले आहे. ही सत्य मी तुम्हाला का सांगितली आहेत? कारण ती उपयोगी आहेत. शुद्ध जीवनासाठी आवश्यक आहेत. परम शांतीकडे, ज्ञान प्राप्तीकडे आणि निवांकडे नेणारी आहेत. म्हणूनच मी ती तुम्हाला सांगितली आहेत.

जीवनात प्रत्येक माणसाला सोसाव्या लागणाऱ्या दुःखापासून त्याची कशी सुटका करावयाची ह्या प्रश्नावरच तथागतांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे. जग शास्वत आहे की अशास्वत, त्याला अंत आहे की ते अनंत आहे; ह्या असल्या वायफळ प्रश्नांची चर्चा करण्यात त्यांनी वेळ घालवीला नाही. असल्या विषयाची चर्चा कणाऱ्यांची तुलना त्यांनी हत्तीच्या फक्त एखाद्याच अवयवाला स्पर्श करून, हत्ती सुपासारखा आहे की खंबासारखा आहे. असे वर्णन करून वादविवाद करणाऱ्या जन्मांधांशी केला आहे. हा मुद्दा मालुंक्यपुत्रांशी झालेल्या पुढील संवादावरून अधिक स्पष्ट होतो.

एकदा भगवान बुद्ध श्रावस्तीत अनाथपिंडिकाच्या जेतवन आरामात रहात असता मालुंक्यपुत्र नावाचा भिक्खू त्यांच्याजवळ आला आणि नमस्कार करून एका बाजूला बसला. नंतर मालुंक्यपुत्र तथागतांना म्हणाला; भदंत, एकांतात बसलो असता माझे मनात विचार आला की, हे जग शास्वत आहे की अशास्वत, शरीर आणि जीव एक आहेत की भिन्न आहेत, मरणोत्तर तथागतांना पुनर्जन्म आहे की नाही? इत्यादी मुद्द्यांचे भगवंतांनी विवरण केले नाही. तेव्हा मी आपल्या जवळ येऊन या मुद्द्या संबंधाने प्रश्न विचारीन. जर आपल्याला या मुद्द्यांचा निकाल लावता आला तरच मी आपला शिष्य होईल. जर आपल्याला या गोष्टी माहित नसतील तर त्या माहित नाहीत, असे म्हणणे हाच सरळ मार्ग आहे.

भगवान बुद्ध म्हणाले, मालुंक्यपुत्रा, तु माझा शिष्य झालास तर या मुद्द्यांचे मी स्पष्टीकरण करिन असे मी तुला कधी म्हटले होते काय?

नाही भंते, मालुंक्यपुत्राने उत्तर दिले.

बरे, तु तरी मला म्हणालास काय की जर तुम्ही मला या सर्व मुद्द्यांचे स्पष्टीकरण करून सांगितले तरच मी तुमच्या भिक्खू संघात येईन?

नाही भंते, मालुंक्यपुत्र म्हणाला.

तर मग आता हे मुद्दे स्पष्ट करून सांगितल्याशिवाय मी तुमचा शिष्य होणार नाही; या म्हणण्यात काय अर्थ आहे?

तथागतांनी विचारले, मालुंक्यपुत्रा, एखाद्या मनुष्याच्या अंगात विषारी बाण शिरून तो तळमळत असता त्याचे अपेष्ठ शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्याला बोलावून आणतील. परंतु तो रोगी त्या वैद्याला म्हणेल की हा बाण कोणी मारला? तो ब्राम्हण होता की क्षत्रिय होता? वैश्य होता की शूद्र होता? काळा होता की गोरा होता? त्याचे धनुष्य कोणत्या प्रकारचे होते? धनुष्याची दोरी कशाची केली होती? इत्यादी सर्व गोष्टी जोपर्यंत तुम्ही मला सांगणार नाही, तोपर्यंत मी या रुतलेल्या बाणाला हात लावू देणार नाही. मालुंक्यपुत्रा, अशा प्रसंगी त्या माणसाला या सर्व गोष्टींना समजताच मरण येईल. त्याचप्रमाणे जो असा हट्ट धरेल की मला हे जग शास्वत आहे की अशास्वत आहे, इत्यादी सर्व मुद्दे समजल्यावाचून मी सदाचाराचा मार्ग स्विकारणार नाही, तर त्याला हे मुद्दे समजल्याशिवायचं मारण येईल....

पण मालुंक्यपुत्र, हे दुःख आहे, हा दुःखाचा समुदाय आहे, हा दुःखाचा निरोध आहे, आणि अष्टांगिक मार्ग हा दुःख निरोधाचा मार्ग आहे हे मी स्पष्ट करून सांगितले आहे. कारण ही चार आर्यसत्य बोधीचर्येला स्थैर्य आणणारी आहेत. त्यामुळे उपेक्षा उत्पन्न होते, दुःखाचा निरोध होतो, शांतीचा, प्रज्ञेचा, संबोधीचा आणि निर्वाणाचा लाभ होतो. म्हणून हे मालुंक्यपुत्र, ज्या गोष्टींची मी चर्चा केली नाही, त्या गोष्टींची चर्चा करू नका व ज्या गोष्टींचे मी स्पष्टीकरण केले आहे त्या गोष्टी स्पष्टीकरणाला योग्य आहेत असे समजा.

🌷 आर्य सत्य 🌷

सुरुवातीला आर्यांची वैदिक संस्कृती आणि श्रमणांची श्रमण संस्कृती वेगवेगळी आहे असे म्हटले आहे. बौद्ध धम्म हा श्रमण संस्कृतीतून निर्माण झाला आहे असेही म्हटले आहे. मग चार आर्य सत्यातील आर्य हा शब्द वैदिक संस्कृतीतून घेतला आहे का? असा प्रश्न कुणीही विचारू शकेल. शब्दांच्या सारखेपणामुळे तशी शंका मनात येणे शक्य आहे. पाली त्रिपिटकातील अरिय शब्दांचे संस्कृत मधील रूपांतर आर्य असे आहे. बौद्ध धम्मातील आर्य म्हणजे ज्याचे सर्व अकुशल पापधर्म दूर झाले आहेत. तो असी मज्झिमनिकायात व्याक्ख्या केली आहे. तर जो पापकर्मापासून अत्यंत दूर गेला आहे तो आर्य असे अभिधम्मकोष भाष्यात म्हटले आहे. ज्या बौद्ध ग्रंथात जे सकृदागामी, अनागामी किंवा अरहंत आहेत त्यांना आर्यजन आणि इतरांना पृथकजण असे म्हटले आहे. धम्मपदात म्हटल्याप्रमाणे जटा वाढविल्याने, गोत्राने किंवा जातीने मनुष्य ब्राम्हण होत नाही तर जो ध्यानी, निर्मळ, स्थिर, कृत-कृत्य, आश्वरहित व सिद्धार्थ आहे तोच ब्राम्हण किंवा आर्य होय. जो सर्व संयोजनांना छेदून टाकतो व त्यामुळे दुःखी नसतो, जो संग आणि आसक्तीपासून मुक्त आहे, त्याची तृष्णा नष्ट झालेली आहे, तो संशयरहित झालेला आहे व ज्याने अमृतपद म्हणजे निर्वाण प्राप्त केले आहे; अशाला धम्मपदात ब्राम्हण किंवा आर्य म्हटले आहे.

बौद्धांप्रमाणेच श्रमण संस्कृतीत वाढलेल्या जैन धर्माच्या ग्रंथातसुद्धा आर्य शब्दाची व्याक्ख्या जवळजवळ वरील प्रमाणेच केलेली आहे. यावरून लक्षात येते की आर्यसत्यातील आर्य या शब्दाचा अर्थ आर्य-अणार्य असा मानव वंश भेद दाखविणाऱ्या शब्दाशी अर्था-अर्थी काहीही संबंध नाही. माणसामाणसांमध्ये वंशभेद, वर्णभेद, किंवा जातीभेद करणे हे बौद्ध संस्कृतीच्या अगदी विरुद्ध आहे. म्हणून आर्य सत्यातील आर्य हा शब्द एका विशिष्ट मानव जातीच्या संदर्भात वापरला नसून तो निर्वाण मार्गाकडे प्रगत करणाऱ्या श्रेष्ठ मानवांच्या संदर्भात वापरला आहे.

आर्यसत्य म्हणजे आर्यांचे किंवा अरहंतांचे सत्य अशी आर्यसत्याची व्याक्ख्या वसुबंधू आणि बुद्धघोष यांनी केली आहे. अरहंतच आर्यसत्यांना यथार्थपणे जाणू शकतात. याचा अर्थ असा नाही की आर्यसत्य दुसरे कुणी समजू शकत नाहीत. पण वसुबंधूनी म्हटल्याप्रमाणे आर्यच आर्यसत्यांना यथार्थपणे जाणू शकतात आणि अनुभवू शकतात. आर्यसत्य म्हणजे पवित्र सत्य, श्रेष्ठ सत्य, निव्वळ सत्य, केवळ सत्य; ज्याच्यामध्ये सत्याशिवाय दुसरे काहीही नाही असाही अर्थ वाक्यप्रचारामध्ये सर्वसाधारणपणे केले जातात. पण ह्या वाक्यप्रचारातील पवित्रपणा किंवा श्रेष्ठपना हे अरहंतांचे गुणनिर्देशक आहेत. त्याचा संबंध कोणत्याही जातीशी किंवा वंशासी नाही.

🌷 दुःखनिरोधगामिनि प्रतिपदा 🌷

दुःख निरोधाकडे घेऊन जाणारा मार्ग म्हणजे दुःखनिरोधगामिनि प्रतिपदा. अभिधम्मकोष भाष्यात म्हटल्याप्रमाणे हा मार्ग सम्यक रीतीने प्रतिपादन केला असल्यामुळे त्याला प्रतिपद असे म्हटले आहे. (सम्यक प्रतिपादन प्रतिपद) मार्गालाच निर्वाणाचे प्रतिपादन केल्यामुळे प्रतिपद असे म्हटले गेले आहे. गमनार्थाने मार्ग अभिप्रेत आहे. आचार्य बुध्दघोष म्हणतात, या मार्गाने निर्वानाकडे वाटचाल केल्यावर दुःख निरोध होऊ शकतो. म्हणून त्याला दुःख

निरोधाच्या दिशेने घेऊन जाणारा दुःखनिरोधगामिनि प्रतिपद असे म्हटले आहे. या मार्गानेच निर्वानाकडे जाता येते. या मार्गाने गेल्याने दुःख निरोधाचा लाभ होतो.

हा मार्ग विशुद्धीची, सदाचाराची आणि शिलाची शिकवण देतो. सदाचाराची शिकवण देणारा मार्ग म्हणजे अष्टांगिक मार्ग. त्याचे पुढे दिल्याप्रमाणे शील, समाधी आणि प्रज्ञा असे विभाग केले जातात.

प्रज्ञा__(1) संम्यक दृष्टी (2) संम्यक संकल्प; शिल__(3) संम्यक वाचा (4) संम्यक कर्मांत (5) संम्यक आजीविका; समाधी__(6) संम्यक व्यायाम (7) संम्यक स्मृती (8) संम्यक समाधी

आर्य अष्टांगिक मार्गाचे बहुतेक ठिकाणी शिल, समाधी आणि प्रज्ञा असे भाग केले असले तरी काही ठिकाणी विमुक्ती धरून त्याचे चार भाग केले आहेत तर संयुक्त निकाय यात 'विमुत्तिज्ञान दर्शन' या भागाला वाढवून त्याचे पाच भाग केले आहेत.

जो मनुष्य प्रज्ञावान आहे, वीर्यवान आहे, पंडित आहे, भिक्खू आहे तो शिलांचे आचरण केले असता चित्त (समाधी) आणि प्रज्ञा यांची भावना करून जगातील दुःखाच्या प्रश्नाला सोडवू शकतो असे भगवान बुद्ध म्हणतात.

🌷 बौद्ध संस्कृति 🌷

बौद्ध धम्म हा श्रमण संस्कृतीतून उदयास आला आहे. भगवान बुद्धांच्या काळात जरी काही आर्य ब्राम्हण दक्षिणेकडे आणि पूर्वेकडे सरकू लागले होते, तरी पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे त्यांची संख्या फार मोठी नव्हती. भगवान बुद्धांच्या संपर्कात आल्यावर बऱ्याच ब्राम्हणांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला होता. यज्ञयागात पशुनां मोठ्या प्रमाणात बळी दिले जात होते. म्हणून त्याच्या विरोधात भगवान बुद्धांनी बौद्ध धम्म स्थापन केला असे जे वारंवार सांगितले जाते त्यात लवमात्र तथ्य नाही. श्रमण संस्कृतीत कुणालाही बळी दिले जात नव्हते; आणि ब्राम्हणी धर्म अजूनही उत्तर पूर्वेकडे मोठ्या संख्येने पसरला नव्हता.

माणसाच्या मनातील लोभ, मोह, द्वेष नष्ट करून त्याला संस्कृत बनविणे हा बौद्ध धम्माचा उद्देश होता. लोभामुळे, द्वेषामुळे किंवा मोहामुळे कुणाचाही प्राण घेऊ नये असी बौद्ध धम्माची शिकवण आहे. बौद्ध धम्मात पर्यावरणाला जितके महत्व दिले आहे तितके कदाचित दुसऱ्या कोणत्याही धर्मात दिले नसेल. प्राणीमात्रांकडे मैत्री करुणेच्या भावनेने पाहावे; जसा आपला प्राण आपल्याला प्रिय आहे, तसाच इतरांना सुद्धा त्यांचा प्राण प्रिय आहे; आपल्यात आणि त्यांच्यात काहीच फरक नाही असी शिकवण देणाऱ्या बौद्ध धम्मात वनस्पतींचीसुद्धा काळजी घेतली आहे. विहार निर्माण करतांना भिक्खूंनी विहाराबाहेरचे गवत सुद्धा नष्ट होऊ नये असी काळजी घेतली पाहिजे असे नियम विनयपिटकात आहेत.

धर्माची तत्वे सामाजिक हिताची नसतील तर तो धर्म फार काळ टिकू शकत नाही. समाजिक हिताची धार्मिक तत्वे राज्य कर्त्यांनी आपल्या कायद्यांत कलमे आणली पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अँनिहिलेशन ऑफ कास्ट मधे म्हणतात की, सदधम्म समाजाचा पाया पाहिजे. समाजाची जडनघडण कसी असावी, थोडक्यात बौद्ध संस्कृति कसी आहे, हे पुढील विवेचनावरून दिसून येतइल.

🌹 बौद्ध संस्कृतीतील आदर्श राज्यकर्त्यांची उदाहरणे 🌹

भगवान बुद्धांच्या काळात इसवी सणापूर्वी सहाव्या शतकात उत्तर भारतात सार्वभौम असे एकही राज्य नव्हते. संबंध देश निरनिराळ्या अनेक लहानमोठ्या राज्यात विभागला गेला होता. राजाची सत्ता असलेली एकूण सोळा राज्ये होती; ती असी अंग, मगध, काशी, कोसल, वज्जी, मल्ल, चेदि, वत्स, कुरु, पांचाळ, मत्स्य, सौरसेन, अश्मक, अवंती, गांधार आणि कंबोज. या राज्यांना जनपद म्हणत. ज्या राज्यांवर राजाची सत्ता नव्हती अशा राज्यांना संघ किंवा गणराज्य असे म्हणतात. त्याकाळी कपिलवस्तूचे शाक्य, पावा आणि कुशिणारा येथील मल्ल, वैशालीचे लीच्छवी, मिथिलीचे विदेह, राम ग्रामचे कोलीय, अल्लकप्पचे बळी, रेसपुत्तचे कलिंग, पिंपळवळाचे मौर्य आणि सिसुमारगिरीचे भग्ग, ही संघराज्य किंवा गणराज्य होती.

🌹 वज्जींचे सामर्थ्य 🌹

एकदा भगवान बुद्ध राजगृहाजवळ गृधकुट पर्वतःवर राहत होते. त्यावेळी मगध देशाचा राजा अजातशत्रू वैदेहिपुत्र याला वज्जींवर स्वारी करण्याची इच्छा झाली. तो असे म्हणाला कि, हे वज्जी इतके प्रतापी व पराक्रमी आहेत, त्यांचा मी उच्छेद करिन, विनाश करिन समूळ नाश करिन. त्याने मगधमहामात्य वस्सकार ब्राम्हण याला सांगितले की, हे ब्राम्हणा, भगवंताकडे जाऊन माझ्या आज्ञेने त्यांच्या पायाचे वंदन करून, कुशल विचारून असे सांग की, मगध देशाचा राजा अजातशत्रू वैदेहिपुत्र याला वज्जींवर चाल करण्याची इच्छा झाली आहे. तो असे म्हणतो की, हे वज्जी इतके प्रतापी व पराक्रमी आहेत, त्यांचा मी उच्छेद करिन, विनाश करिन, समूळ नाश करिन आणि भगवान जे सांगतील ते नीट ध्यान धरून मला सांग. कारण तथागत कधीही खोटे बोलत नाहीत.

ठीक आहे, असे अजातशत्रू राजास उत्तर देऊन वस्सकार ब्राम्हण रथात बसून राजगृहातून बाहेर पडून गृधकुट पर्वतःकडे निघाला. जोपर्यंत रथातून जाने शक्य होते, तिथपर्यंत रथातून जाऊन पुढे रथातून उतरून तो पायीच भगवान बुद्धांकडे गेला व त्यांना कुशल प्रश्न विचारून एका बाजूस बसला आणि राजाचा निरोप त्यांना सांगितला.

त्यावेळी आयुष्यमान आनंद भगवानांच्या पाठीमागे उभे राहून त्यांना वारा घालीत होते. त्यांना भगवान म्हणाले, आनंदा, वज्जी नेहमी पुष्कळदा, एके ठिकाणी जमतात, हे तु ऐकले आहे काय?

"होय भगवान."

(1) "जोपर्यंत आनंदा वज्जी नेहमी, पुष्कळदा एके ठिकाणी जमतील, तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हानी होणार नाही, असेच समजले पाहिजे.

(2) आनंदा वज्जी एकमताने जमतात, एकमताने उठतात आणि एकमताने आपली सर्व कामे करतात हे तु ऐकले आहेस काय?"

"होय भगवान."

"तर मग ते असे करतील तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हाणी होणार नाही, असे समजले पाहिजे.

(3) आनंदा, वज्जी जे पूर्वीच्या लोकांनी सांगितलेले नाही ते सांगत नाहीत. जे सांगितले आहे, ते सोडून देत नाहीत व पूर्वीच्या लोकांनी सांगितलेल्या वज्जींच्या धर्माप्रमाणे चालतात, हे तु ऐकले आहेस काय?"

"होय भगवान."

"तर मग असे ते करतील तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हाणी होणार नाही, असेच समजले पाहिजे.

(4) आनंदा, वज्जी त्यांच्यातील वृद्धांचा सत्कार करतात, मान देतात, पूजा करतात, त्यांनी सांगितलेले ऐकतात, हे तु ऐकले आहेस काय?"

"होय भगवान."

"तर मग असे ते करतील तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हाणी होणार नाही, असेच समजले पाहिजे.

(5) आनंदा, वज्जी कुल स्त्रिया व कुमारिका ह्यांना ओढून बळजबरीने घरात ठेवीत नाहीत. हे तु ऐकले आहेस काय?"

"होय भगवान."

"तर मग ते असे करतील तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हाणी होणार नाही, असेच समजले पाहिजे.

(6) "आनंदा, वज्जी नगरात व नगराबाहेर जे चैत्य असतील त्यांचा सत्कार करतात, गौरव करतात, त्यांना माण देतात, त्यांची पूजा करतात, आणि पूर्वी दिल्याप्रमाणे, पूर्वी केल्याप्रमाणे धार्मिक प्रसाद काढून घेत नाहीत, हे तु ऐकले आहेस काय?"

"होय भगवान."

"तर मग ते असे करतील तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हाणी होणार नाही, असेच समजले पाहिजे.

(7) आनंदा, न आलेल्या अरहंतांनी देशात यावे व आलेल्या अरहंतांनी देशात सुखाने राहावे म्हणून वज्जी त्यांचे धार्मिक रक्षण, आवरण व गोपन करतात, हे तु ऐकले आहेस काय?"

"होय भगवान."

"तर मग ते असे करतील तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हाणी होणार नाही, असेच समजले पाहिजे."

नंतर भगवान वस्सकार ब्राम्हणास म्हणाले, "ब्राम्हण, एके समई मी वैशाली नगरीत सारदंद चैत्यात राहत असता वज्जींना हे सात वृद्धिकारक धम्म सांगितले होते. ब्राम्हणा, जोपर्यंत हे सात वृद्धिकारक धम्म वज्जींच्या ठिकाणी राहतील व नेहमी दृष्टोत्पत्तीस येतील तोपर्यंत त्यांची भरभराट होईल, हाणी होणार नाही, असेच समजले पाहिजे." असे भगवान बोलल्यावर वस्सकार ब्राम्हण त्यांना म्हणाला, "गौतम, वज्जींच्या ठिकाणी यातील एकेकच जरी धम्म असला तरी त्यांची भरभराट होईल, हानी होणार नाही, असेच समजले पाहिजे. मग सातही धम्म असल्यावर असल्यावर कसली शंका? लाच दिल्याशिवाय आणि भेद केल्याशिवाय अजातशत्रू राजाला त्यांचा पराभव करणे शक्य नाही. गौतम, मी आता जातो, मला बरीच कामे आहेत."

बुद्धघोषचार्यांनि अशी गोष्ट सांगितली आहे की, तेथून गेल्यावर वस्सकार ब्राम्हणाने अजातशत्रू राजास असा सल्ला दिला की, आपण सभेत वज्जीसंबंधी बोलत असता मी त्यांच्या बाजूने बोलेन. मग आपण मला हाकलून द्या. त्यावेळी मी खूप रागावून व मला नगराच्या तटबंदीची गुप्त स्थाने माहित आहेत असे म्हणून वज्जींकडे जाईन. त्याप्रमाणे राजाने केले. वस्सकार ब्राम्हणास वज्जींनी न्यायाधीशाच्या जागेवर नेमून त्यास कुमारांना शिकविण्याचे काम दिले. तेथे त्याने एका लिच्छवी विरुद्ध दुसऱ्यास सांगून त्यांच्यामध्ये फुट पाडली. वस्सकार ब्राम्हणाने बोलाविल्यावर राजाने येऊन वज्जींचे नगर गस्तगत केले. राज्य कितीही प्रबळ असले तरीही फुट पाडून आणि लाच देऊन ते आतून पोखरले जाऊ शकते असेच वस्सकार ब्राम्हणाच्या बोलण्यावरून आणि कृतिवरून दिसून येते.

🌷 महाविजित राजाचा यज्ञ 🌷

राज्यात शांती सुव्यवस्था कसी ठेवता येते हे भगवान बुद्धांनी महाविजित राजाचे उदाहरण देऊन सांगितले आहे.

मगध राज्यात खानुमत नावाचे एक ब्राम्हणांचे गाव होते. भगवान बुद्ध त्या गावाशेजारील अंबलट्ठीका नावाच्या उद्यानात राहिले होते. त्यावेळी कुटदंत ब्राम्हणाच्या येथे महा यज्ञाची तयारी चालली होती. सातशे बैल, सातशे गोऱ्हे, सातशे काळवडी, सातशे बोकड व सातशे मेंढे यज्ञात बळी देण्याकरिता खांबाशी बांधून ठेवले होते.

तेव्हा कुटदंत ब्राम्हणाने असा विचार केला की, 'श्रमण गौतमाला षोडशपरिश्कार युक्त असे तीन प्रकारचे यज्ञ माहित आहेत. ते मला माहित नाहीत. परंतु महायज्ञ करण्याची मला फारच इच्छा आहे. तर षोडशपरिश्कार युक्त अशा तीन प्रकारच्या यज्ञानविषयी श्रमण गौतमाला विचारावे.'

तेव्हा कुटदंत ब्राम्हण अंबलट्ठीका उद्यानात भगवंतांच्याकडे जाऊन एका बाजूला बसून भगवंतांना म्हणाला, "गौतम, मी असे ऐकले आहे की, आपणांस षोडशपरिश्कार युक्त असे तीन प्रकारचे यज्ञ माहित आहेत. मला ते माहित नाहीत. परंतु महायज्ञ करण्याची तर मला फारच इच्छा आहे. तर षोडशपरिश्कार युक्त असे हे तीन यज्ञ आपण मला सांगावे."

भगवान बुद्ध म्हणाले, "हे ब्राम्हणा, प्राचिनकाळी महाविजित नावाचा एक राजा होऊन गेला. तो श्रीमंत असून त्याच्याजवळ धनसंपत्ती, सोनेरूपे, हिरे माणके, धन धान्य, यांची समृद्धी होती. त्याच्या तिजोऱ्या आणि कोठारे नेहमी भरलेली असत. तो महाविजित राजा एकदा एकांतात बसलेला असता त्याच्या मनात असा विचार आला की, मी पुष्कळ मनुष्यभोग्य सुखांचा उपयोग घेतला आहे व ही मोठी पृथ्वी जिंकून राहिलो आहे. तर आता महायज्ञ करावा, म्हणजे ते माझ्या चिरकाळ हितास आणि सुखास कारण होईल.

तेव्हा हे ब्राम्हणा, त्या महाविजित राजाने आपल्या पुरोहित ब्राम्हणास बोलावून त्यास म्हटले, हे ब्राम्हणा, 'मी एकांतात असता माझ्या मनात असा विचार आला की, मी पुष्कळ मनुष्यभोग्य सुखांचा उपयोग घेतला आहे व ही मोठी पृथ्वी जिंकून राहिलो आहे. आता महायज्ञ करावा म्हणजे ते चिरकाळ माझ्या हितास आणि सुखास कारण होईल. हे ब्राम्हणा, महायज्ञ करण्याची माझी इच्छा आहे. तो कोणत्या रीतीने केला असता चिरकाळ माझ्या हितास आणि सुखास कारण होईल ते सांगा.'

महाविजित राजा असे बोलल्यावर पुरोहित ब्राम्हण त्यास म्हणाला, 'महाराजांच्या राज्यात अजूनही चोऱ्यामाऱ्या होत आहेत व उपद्रव आहेत. गावांवर, नगरांवर व रस्त्यांवर अजूनही दरोडे पडतात. अशा तऱ्हेने उपद्रव असता महाराज जर यज्ञासाठी कर बसवतील तर महाराजांनी प्रजेचे अहित केल्यासारखे होईल. कदाचित महाराजांच्या मनात येईल की वध, बंधन, हानी, निंदा, हकालपट्टी वगैरे उपायांनी त्या चोरांचा हा उपद्रव बंद पाडता येईल. परंतु अशा रीतीने या उपद्रवाचा बंदोबस्त व्हावयाचा नाही. या शिक्षेतून जे सुटतील ते नंतर महाराजांच्या प्रजेस त्रास देतील. हा उपाय बंद करण्याचा खरा उपाय म्हणजे महाराजांच्या राज्यात शेती व जनावरे पाळणारे जे लोक आहेत, त्यांना महाराजांनी बी बियाणे व अन्नधान्य पुरवावे, जे व्यापार करू इच्छितात त्यांना भांडवलं द्यावे, जे महाराजांची नौकरी करू इच्छितात त्यांना अन्न व वेतन द्यावे. म्हणजे ते लोक आपापली कामे करित राहून राज्यात त्रास देणार नाहीत. महाराजांची कर वसुलीही पुष्कळ वाढेल, राज्यात शांतता होऊन चोऱ्यामाऱ्या इत्यादी त्रास नाहीसा होईल व सर्व लोक आनंदात राहून छातीवर मुले खेळवीत दरवाजे (न घाबरता) उघडे ठेऊन काळक्रमणा करतील.'

ठीक आहे, असे पुरोहित ब्राम्हणास उत्तर देऊन महाविजित राजाने शेती करणाऱ्या व जनावरे पाळणाऱ्यास बी बियाणे व अन्न पुरविले, व्यापार करू इच्छिणाऱ्यास भांडवल दिले, नौकरी करू इच्छिणाऱ्यास अन्न व वेतन दिले. तेव्हा ती आपापली कामे करित राहून राज्यस त्रास देईनासे झाले. राज्याच्या वसुलीतही पुष्कळ वाढ झाली व राज्यात शांतता

होऊन चोऱ्यामाऱ्या इत्यादी त्रास नाहीसा झाला. सर्व लोक आनंदात राहून छातीवर मुले खेळवीत निर्भयपणे दरवाजे उघडे ठेऊन काळक्रमणा करू लागले.'

राज्यात शांतता नांदावी, सुबत्ता यावी, चोऱ्यामाऱ्या, दरोडे आणि इतर उपद्रव होऊ नये म्हणून भगवान बुद्धांनी सुचविलेला उपाय आजच्या परिस्थितीतही लागू पडतो. जे शेती करणार आहेत सुधारित बी बियाणे पूरविने, शेतीसाठी आणि जणावरांच्या पाण्याची व्यवस्था करणे, व्यापाऱ्यांना भांडवल पुरवीने, गरजूयुक्त माणसांना नौकऱ्या देणे ही कामे सरकारची आहेत. सरकारणे तसे केले म्हणजे राज्याची भरभराट होईल. राज्यात शांतता नांदेल. सम्राट अशोकाने अशीच कामे केली. त्याने रस्ते बांधले, रस्त्यांच्या दोन्ही बाजूस वाटसरुंना सावलीसाठी झाडे लावली, माणसांच्या साठी आणि जनावरांच्यासाठी दवाखाने काढले, औषधांसाठी औषधी झाडे लावली, पाण्यासाठी विहिरी खोदल्या, इत्यादी अनेक लोकोपयोगी कामे केली. म्हणून सम्राट अशोकाच्या काळाला सुवर्णयुग असे म्हणतात. अजूनही सम्राट अशोकाच्या राज्यपद्धतीची जगभर स्तुती होते. त्याचे कारण म्हणजे त्याने बौद्ध संस्कृतीनुसार राज्य केले. त्याने युद्ध नव्हे तर बुद्ध स्वीकारला, त्यामुळे त्याच्या राज्यात शांतता आणि सुबत्ता आली.

🌷 बौद्ध संस्कृतीतील व्यक्तीतील आचरण 🌷

मुलांचे कर्तव्य:- बौद्ध संस्कृतीत मुलाने आई-वडिलांशी कसे वागावे याबद्दल सिगालोवाद सुत्तात भगवान बुद्धांनी सांगितले आहे की, मुलाने असे समजले पाहिजे की, मला त्यांनी पोसले आहेत तर मी त्यांचे पोषण करिन. त्यांचे काम करिन. कुळाचार चालू ठेवीन, त्यांच्या संपत्तीचा वाटेकरी होईन व ते मरण पावल्यावर जलदान विधी करिन.

आई-वडिलांचे मुलांवरील प्रेम:- सिगालोवाद सुत्तात आई-वडील पाच प्रकारांनी पुत्रावर अनुग्रह करतात असे म्हटले आहे. ते त्याला पाप कर्मापासून निवृत्त करतात; कल्याणकारक मार्गास लावतात; कला शिकवितात; योग्य स्त्रीशी विवाह करून देतात व योग्य वेळी आपली मालमत्ता त्याच्या स्वाधीन करतात. अशा तऱ्हेने ढोबळ मनाने मुलांची जन्मदात्यांच्या विषयीची कर्तव्य आणि जन्मदात्यांचे मुलांविषयी प्रेम आणि कर्तव्य या सुत्तात थोडक्यात सांगितली आहेत.

गुरु शिष्य:- शिष्याने गुरूंचा आदर सत्कार करावा; त्यांची सेवा करावी; त्यांचे म्हणणे श्रद्धापुर्वक एकूण घ्यावे; त्यांची कामे करावीत आणि आदरपूर्वक शिकून घ्यावे. अशा तऱ्हेने शिष्याने गुरूशी वर्तन करावे. गुरु पाच प्रकारांनी शिष्यावर अनुग्रह करतात. ते शिष्याला चांगले आचरण शिकवितात; चांगल्या रीतीने कला कौशल्य शिकवितात; सर्व ज्ञान उत्तम रीतीने देतात; आपल्या आप्त मित्रात त्यांची स्तुती करतात व तो कोठेही गेला तरी त्याचे रक्षण करतात.

पती पत्नी:- पतीने पत्नीला मान दिला पाहिजे; तिचा अपमान नाही केला पाहिजे; व्यभिचार नाही केला पाहिजे; एश्वर्य व अलंकार देउन तिला सुखाने ठेवले पाहिजे. पत्नीने आपली कामे चांगल्या प्रकारे करावीत; नौकरचाकरांना

सांभाळावे; पतिव्रता राहणे; संपत्तीचे रक्षण करणे; सर्व कृत्यात उद्योगी व दक्ष राहणे; या गोष्टी थोडक्यात पती-पत्नी विषयी सिगालोवाद सुत्तात सांगितल्या आहेत.

आप्त मित्र:- कुलपुत्राने आप्त मित्रांना दान (भेट) द्यावे; त्यांच्याशी गोड बोलावे; त्यांचे काम करावे; आपणांसारखेच त्यांना मानावे व त्यांच्याशी भांडू नये. अशाप्रकारे कुलपुत्राने आपल्या आप्त मित्रांशी वागावे. त्याचे आप्त मित्रसुद्धा तो बेसावध असता, त्याच्यावर एकाकी जर काही जर संकट आले तर त्यावेळी ते त्याचे रक्षण करतात. अशा प्रसंगी ते त्याच्या संपत्तीचेही रक्षण करतात; संकटामुळे तो घाबरून गेला असल्यास ते त्याला धीर देतात; संकट आले तरी ते त्याला सोडत नाहीत आणि त्यांच्या संततीवर सुद्धा ते उपकार करतात.

मालक सेवक:- मालकाने सेवकाचे सामर्थ्य पाहून त्याला काम द्यावे; त्याला योग्य वेतन द्यावे; आजारी पडला तर त्याची देखाभल करावी; त्याला वारंवार उत्तम भोजन द्यावे; चांगल्या कामाकरिता त्यांना बक्षीस द्यावे. सेवक मालक उठण्यापूर्वी उठत असतो; मालक निजल्यावर निजत असतो; मालकाच्या मालाची चोरी करित नाही; चांगल्या तऱ्हेने काम करित असतो आणि मालकाची सर्वत्र कीर्ती पसरवीत असतो.

साधू संत:- साधू संतांचा देहाने आदर करावा; वाणीने आदर करावा; मनाने आदर करावा; काही लागल्यास त्यांना द्यावे आणि भिक्षेला आले तर त्यांना आडकाठी करू नये. साधूसंत गृहस्थांचे पापमय कृत्यापासून निवारण करतात; कल्याणकारक मार्गाला लावतात; प्रेमपूर्वक अनुग्रह करतात; उत्तम धम्म शिकवितात आणि शंका समाधान करून मनाचे समाधान करतात.

भगवान बुद्ध सिगालोवाद सुत्तात म्हणतात, "हे गृहपतीपुत्र, दान, प्रिय वचन, अर्थचर्या (अर्थार्जन), समानात्मा म्हणजे दुसऱ्याला आपल्यासारखे लेखणे; अशी ही चार संग्रहाची साधने आहेत. ही साधने जर आई-वडिलांपाशी नसती तर केवळ जन्म दिला म्हणून मुलाने आईचा किंवा वडिलांचा गौरव केला नसता. ज्याला ही चार साधने सापडली तोच प्रपंचात यशस्वी होतो.

🌷 रुग्णांची सेवा 🌷

एकदा एक भिक्खू अतिसाराने आजारी होता. आपल्या मलमुत्रात तो पडून होता. भगवान बुद्ध आनंदाच्या बरोबर त्या भिक्खूच्या विहारात आले. आपल्या मलमूत्रात पडलेल्या त्या भिक्खुला भगवान बुद्धांनी विचारले, "भिक्खू तुला काय होते आहे?"

"भगवान, मी अतिसाराने आजारी आहे."

"तुझी सेवा करण्यास कोणी आहे काय?"

"भगवान, कुणी नाही."

"भिक्खू, दुसरे कोणी भिक्खू तुझी सेवा करीत नाहीत, असे का?"

"भगवान, मी कुणाच्या उपयोगी पडत नाही म्हणून कुणी माझी देखभाल करित नाही."

भगवान आनंदाला म्हणाले, "आनंदा, जा पाणी घेऊन ये. ह्या भिक्खुला मी स्वच्छ करतो, आनंदाने पाणी आणल्यावर भगवान बुद्धांनी पाणी ओतले आणि आनंदाने त्या भिक्खूचा देह स्वच्छ केला. नंतर भगवान बुद्धांनी त्या रुग्णाचे डोके धरून आणि आनंदाने पाय धरून त्याला बिछाण्यावर ठेवले.

नंतर भगवान बुद्धांनी भिक्खूंना संबोधित केले आणि सांगितले की भिक्खूंनी परस्परांची सेवा केली पाहिजे. भिक्खूंनो जो रुग्णांची सेवा करतो तो माझी सेवा करतो.

🌷 बौद्ध संस्कृतीतील शिल 🌷

शिल म्हणजे विशुद्धी मार्ग. या मार्गानुसार विशुद्ध जीवनाची पाच तत्वे आहेत. (1) कोणत्याही प्राण्यांची हिंसा न करणे. (2) चोरी न करणे. (3) व्यभिचार न करणे. (4) खोटे न बोलणे. (5) मादक पेय ग्रहण न करणे. यांनाच वारीत्तशील किंवा निशिद्धशील असे म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, प्रत्येक माणसाने ही तत्वे मान्य करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण एखादा मनुष्य जे काही करतो त्याचे मूल्यमापण करण्यासाठी त्याच्याजवळ काहीतरी मोजमाप असले पाहिजे. त्यामुळे तो आपल्या चांगल्या किंवा वाईट वर्तणुकीचे मोजमाप करू शकेल. भगवान बुद्धांच्या शिकवणुकीप्रमाणे हिच तत्वे किंवा शिल माणसाच्या चांगल्या किंवा वाईट कृतीचे मोजमाप करण्याचा मापदंड आहे. जगात पतीत त्यांचे दोन वर्ग असतात. यांच्यासमोर काही आदर्श आहेत असे पतीत आणि ज्यांच्यासमोर कोणताच आदर्श नाही असा पतीत. जयंच्यासमोर कोणताच आदर्श नाही अशा पतिताला आपण पतीत आहोत हेच कळत नाही. त्यामुळे तो नेहमीच पतीत राहतो. उलट ज्याच्यासमोर एखादा आदर्श आहे असा पतीत आपल्या पतीत अवस्थेतून वर येण्याचा प्रयत्न करीत असतो. कारण आपण पतीत आहोत हे त्याला माहित असते. वर दिलेली पंचशील ही वैयक्तिक आणि सामाजिक हित साधनारी आहेत.

शिल (पाली सिल) हा शब्द एका अर्थाने स्वभावधर्म वाचक असा आहे. पण धम्मामध्ये शिल शब्दाचा अर्थ नितिमत्ता असा होतो. ज्याची नितिमत्ता चांगली आहे, जो नेहमीच नितिने चालतो. ज्याचे बोलणे, चालणे, नितीला धरून चांगले आहे, अशा माणसाला आपण शिलवान असे म्हणतो. थोडक्यात शिल म्हणजे माणसाच्या मनाची असी घडण की ज्यामुळे मनुष्य पापकर्म (अकुशलकर्म) करित नाही, पुण्य कर्म करतो. पटीसंभिदामग्गामधे, चेतना सिल चेतसिकं सिलं संवारो सिलं अणितकम्मो सिलंच असी शिलाची व्याक्ख्या केली आहे. चेतना आणि चेतसिका ह्या मनाच्या स्थिती निर्देशक आहेत. संवर म्हणजे आवर किंवा आळा घालणे आणि अणितकम्म म्हणजे उल्लंघण न करणे किंवा पाप न करणे, म्हणजेच कुशलकर्म करणे.

बुद्ध धम्मामधे सम्मावाचा, सम्माकम्मांत आणि सम्मा आजीविका म्हणजे शिल. थोडक्यात शिलवान मनुष्य मनाने, वाणीने आणि शरिराने कुशल कर्म करतो, अकुशल कर्म करत नाही. शिलांचे गुणधर्म काय आहेत? आचार्य बुध्दघोष म्हणतात की, शरीराची, वाणीची आणि मनाची शुद्धता हे शिलाचे स्वरूप आहे, तर विमुत्तिमग्गाचे लेखक आचार्य उपत्तिस म्हणतात की, पश्चाताप करण्याची वेळच न येणे हा शिलाचा गुणधर्म आहे.

शील पालन केल्याने फायदा काय होतो? सर्वात मोठा फायदा म्हणजे शिलवान माणसाला पश्चाताप करावयाची वेळ येत नाही. (अविपत्ती सारत्थानी खो आसंद कुसलानी सिलानी अविप्पती सारनिसंनीती) शिवाय शिलवान मनुष्य आपल्या धंद्याकडे दुर्लक्ष करित नसल्यामुळे खूप संपत्ती मिळवितो. त्याची कीर्ती सर्वत्र पसरते. राज्यकर्त्यांच्या, श्रमणांच्या, ब्राम्हणांच्या आणि गृहस्थांच्या बैठकीत, मनात कमीपणाची भावना बिल्कुल न ठेवता, तो धीटपणे बसून उठू शकतो. त्याला समाधानाचे मरण येते. मरणाच्या वेळी सुद्धा त्याचा स्वतःवर ताबा असतो. असेही म्हटले आहे की, जो शिलांचे पालन करतो तो आर्य अष्टांगिक मार्गांचे पालन करतो. जशी सूर्योदय होण्यापूर्वी पहाट येते त्याचप्रमाणे शिल पालन केल्याने आर्य अष्टांगिक मार्गांचे पालन होण्यास सुरुवात होते.

शिलांचे पालन न केल्याने काय तोटा होतो? अंगुत्तर निकायात आणि दिग्घनिकायातील महापरिणीब्बानसुत्तात शिलाचे पालन न केल्याने पुढील पाच तोटे होतात असे सांगितले आहे. (1) काम धंद्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे संपत्तीचा नाश होतो. (2) स्वतः विषयिची आपकीर्ती ऐकावयास मिळते. (3) राज्यकर्त्यांच्या, श्रमणांच्या, ब्राम्हणांच्या आणि गृहस्थांच्या बैठकीत विश्वास पात्रता गमावली गेल्यामुळे निसंकोचपणे भाग घेता येत नाही. (4) मरताना मनाची अवस्था गोंधळलेलि असते. आणि (5) मेल्यानंतर दुर्गती मिळते.

शिलाचे चरित शिल म्हणजे आचरणीय शिल आणि वारित्त शिल म्हणजे निशिद्ध शिल असे दोन भेद केले आहेत.

महामंगल सुत्त, सिगालोवाद सुत्त, पराभव सुत्त, व्याग्गहपज्जा सुत्त इत्यादी सुत्तातून गृहस्थ, गृहिणी, मुले वगैरेंनी पाळावयाची आचार शिले दिली आहेत. सिगालोवाद सुत्तातिल आचरण शिले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथात गृहस्थांसाठी विनय या शिर्शकाखाली दिली आहे. खाली महामंगल सुत्तातील आचरणशीले दिली आहेत.

(1) मुर्खांच्या संगतीपासून दूर राहणे. (2) पंडितांची संगत धरणे. (3) पूज्य जनांची पूजा करणे. (4) योग्य ठिकाणी वास्तव्य करणे. (5) पदरी पुण्याचा साठा करणे. (6) सन्मार्गात मन दृढ करणे. (7) पुष्कळशी विद्या संपादन करणे. (8) अनेक कला शिकणे. (9) सद्वर्तनाची सवय लावणे. (10) समयोचित भाषण करणे. (11) आई-वडिलांची सेवा करणे. (12) बायको मुलांचे योग्य रीतीने पालन करणे. (13) व्यवस्थितपणे काम करणे. (14) दान देणे. (15) धाम्मिक आचरण करणे. (16) नातलगांना मदत करणे. (17) प्रशस्त कर्मे आचरणे. (18) पापकर्मापासून दूर राहणे. (19) पाप न करणे. (20) मद्यापासून दूर राहणे. (21) कुशल कर्मात दक्ष असणे. (22) सत्पुरुषांचा गौरव करणे. (23) नम्र भावाने वागणे. (24) संतुष्ट असणे. (25) कृतज्ञ असणे. (26) वेळोवेळी धम्मोपदेश ऐकणे. (27) शांती आचरणे म्हणजेच

सहणशील असणे. (28) मधुर भाषण करणे. (29) श्रमणांची भेट घेणे. (30) धाम्मिक विषयावर योग्य वेळी चर्चा करणे. (31) तपश्चर्या करणे. (32) ब्रम्हचर्याचे पालन करणे. म्हणजेच पावित्र्याचे जीवन जगणे. (33) चार अरीय (आर्य) सत्य जाणणे. (34) निर्वाणाचा साक्षात्कार घेणे. (35) लाभ आणि हानी, यश आणि अपयश, निंदा आणि स्तुती, सुख आणि दुःख या आठ लोक धम्माशी संबंध आला असता चित्त विचलित न करता, शोकरहित, निर्मळ आणि सुखरूप राहणे हे उत्तम मंगल आहे.

वर सांगितलेल्या मंगलांचे आचरण करून, कोठेही पराभव न पावता, जे सुख मिळवितात त्यांचे ते कृत्य उत्तम मंगल जाणावे.

🌷 गृहस्थांसाठी उपदेश 🌷

एकदा भगवान बुद्ध कोळ्यांच्या प्रदेशामध्ये, कक्करपत्त नावाच्या कोळ्यांच्या गावात विहार करित होते. तेव्हा जेथे भगवान बुद्ध होते तेथे कोलियपुत्र दीर्घजानू गेला आणि तथागतांना अभिवादन करून एका बाजूला बसला. एका बाजुला बसलेल्या कोलियपुत्र दीर्घजानुने भगवंतांना म्हटले;

"भंते, आम्ही गृहस्थ कामभोगी आहोत. बायका मुलांच्या बंधनासहित घरात राहतो. काशीच्या चंदनाचा लेप लावतो. माळा, गंध, लेप धारण करतो. सोन्या चांदीचा उपयोग करतो. भंते भगवान, आम्हाला अशा तऱ्हेच्या धर्माचा उपदेश करा की जो आमच्या सारख्यांना ह्या जगात हितकर सुखकर होईल आणि परलोकातही हितकर सुखकर होईल."

"हे व्याघ्रपाद, हे चार धर्म असे आहेत की जे कुलपूत्रांच्या इहलौकींच्या सुखाला कारण होतात. कोणत्या चार? उत्थानसंपदा, आरक्षासंपदा, कल्याण मित्रता आणि समजीविका."

पुरुषार्थ_उत्थानसंपदा:- व्याघ्रपाद, उत्थानसंपदा कशाला म्हणतात? कुलपुत्र जीविकेच्या कोणत्याही साधनांचा उपयोग करणारा असो_वाटल्यास शेती असो, वाटल्यास व्यापार उद्योग असो, वाटल्यास गाई पाळणे असो, धनुर्विद्या असो, वाटल्यास राजाच्या सेवेत असो किंवा एखादी कला असो, त्याच्यामध्ये तो निपुण असतो. आळस रहित असतो. त्याच्या साधनसामुग्रीच्या योग्यायोग्यतेविषयी तो जाणकार असतो. ते करण्यामध्ये आणि करुण घेण्यामध्ये तो समर्थ असतो. व्याघ्रपाद, याला उत्थानसंपदा (पुरुषार्थ करुण मिळविणे) असे म्हणतात.

जागरूक पणाची संपदा_आरक्षा संपदा:- "व्याघ्रपाद, आरक्षासंपदा कशाला म्हणतात? कुळपुत्राने पुरुषार्थ करून, बाहुबलाचा उपयोग करुण, निढळाचा घाम गाळून, धर्मानुसार योग्यप्रकारे धनसंपत्ती प्राप्त केलेली असते. तो तिची अशा तऱ्हेने काळजी घेतो की राजाचे लोक तिला जप्त करू शकणार नाहीत; अग्नीने ती नष्ट होणार नाही; पाण्यात ती वाहून जाणार नाही; अप्रिय वारस ती वारसा हक्काने घेऊन जाणार नाही. याला आरक्षासंपदा असे म्हणतात."

कल्याण मित्रता:- "व्याघ्रपाद, कल्याण मित्रता कशाला म्हणतात? कोणत्याही गावांत किंवा शहरात कुळपुत्र राहत असो, त्यास त्यात गृहपती आणि गृहपतीपुत्र वयाने लहान किंवा मोठे असोत, ते शिलवान, श्रद्धावान, सदाचारी, त्यागी, प्रज्ञावान असतात. ते जसे श्रद्धावान असतात, त्यांच्यासारखा तो श्रद्धावान होतो; शिलवाणांच्या सारखा शिलवान होतो; सदाचारी लोकांच्या सारखा सदाचारी होतो; त्यागी लोकांसारखा त्यागी होतो आणि प्रज्ञा वाल्यांसारखा प्रज्ञावान होतो. तो त्यांच्याबरोबर बसतो, उठतो, गप्पागोष्टी करतो, चर्चा करतो, व्याघ्रपाद, याला कल्याण मित्रता असे म्हणतात."

समजीविका:- "व्याघ्रपाद, समजीविका कशाला म्हणतात? कुळपुत्र आपल्या भोगसंपत्तीची आवक आणि खर्च यांना जाणून जास्त उच्च स्तरावरील नाही आणि अगदीच खालच्या स्तरावरील नाही असे समजीवन व्यतित करित असतो. त्याची आवक खर्चापेक्षा जास्त असते. तो मिळकतिपेक्षा जास्त खर्च करित नाही. व्याघ्रपाद, जसे एखादा तराजू तोलणारा किंवा तराजू तोलणाऱ्याचा शिष्य तराजू हातात पकडून जाणतो की ही बाजू कमी आहे किंवा ही बाजू अधिक आहे, त्याचप्रमाणे व्याघ्रपाद, कुळपुत्र आपल्या जमाखर्चाच्या अनुसार समजीवन व्यतित करित असतो. याप्रमाणे माझी मिळकत खर्चापेक्षा अधिक असेल, ह्याप्रमाणे माझा खर्च मिळकतिपेक्षा अधिक नसेल."

नाशाचे चार रस्ते:- "व्याघ्रपाद, याप्रमाणे धनसंपत्तीच्या नाशाचे चार रस्ते आहेत. कोणते चार? रंडीबाज होणे, दारुड्या होणे, जुगारी होणे आणि वाईट लोकांच्या संगतीत राहणे."

निती आणि धर्म:- धर्माचे विषय म्हणजे देव, आत्मा, प्रार्थना, पूजा, कर्मकांड (खोटेपणा), विधी, समारंभ, आणि यज्ञ. म्हणून धर्मात नितीला स्थान नाही. प्रत्येक धर्म निती शिकवितो परंतु निती ही काही प्रत्येक धर्माचे मूळ नाही. तो त्याला जोडलेला एक डब्बा आहे, वेळ पडेल त्याप्रमाणे तो त्याला जोडता येतो किंवा त्यापासून सोडविता येतो.

धम्म आणि निती:- निती म्हणजे धम्म आणि धम्म म्हणजे निती. धम्मात प्रार्थना, तीर्थयात्रा, कर्मकांड (खोटेपणा), विधी अथवा यज्ञ यांना स्थान नाही. निती हे धम्माचे सार आहे. त्याशिवाय धम्म नाही. माणसाने देवाला संतुष्ट करण्यासाठी काही नीतिमान व्हावयाचे नाही तर स्वहितासाठीच माणसाने माणसांवर प्रेम केले पाहिजे.

बंधुता:- बंधुता म्हणजे मानवा मानवातील भ्रातृभाव म्हणजेच निती. म्हणूनच भगवान बुद्धांनी शिकविले धम्म म्हणजे निती. आणि धम्म पवित्र आहे तशीच नितीही पवित्र आहे.

शिलाचे तीन भेद_शिल पालनाचे कनिष्ठ, मध्यम, उत्तम असे तीन भेद केले आहेत. कीर्तीच्या आशेने पाळलेले शिल कनिष्ठ, पुण्य कमविण्याच्या आशेने पाळलेले शिल मध्यम आणि हे माझे कर्तव्यच आहे अशा भावनेने प्रज्ञापूर्वक पाळलेले शिल उत्तम.

समाधी:- समाधी म्हणजे चित्ताची एकाग्रता. तांत्रिकदृष्ट्या समाधी या शब्दात मनाची विशिष्ट स्थिती आणि ती प्राप्त करण्याची पद्धत हे दोन्ही अर्थ अभिप्रेत आहेत. असे म्हटले जाते की ज्याने सम्यक समाधी प्राप्त केली आहे,

तो वस्तू मात्र जसे आहेत तसे पाहू शकतो. गोष्टी जशा आहेत तशः पाहणे याला बौद्ध धम्मात फार महत्व आहे. गोष्टी जशा आहेत तशः पाहिल्याने, अनित्यता, दुःख आणि अनात्मता यांच्या विषयींचा अनुभव येतो आणि ज्ञान मिळते. हे ज्ञान असल्याने प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांताप्रमाने आपोआपच दुःख नष्ट होते.

माणसाचे मन स्थिर नसते. ते सहा इंद्रियांविषयांत नेहमी रममान झालेले असते. गोष्टी आहेत तशः पाहण्यासाठी आणि त्यांचा अनुभव घेण्यासाठी मन ऐककेंद्रित करण्याचे 40 निरनिराळे प्रकार आहेत. त्यांना कर्मस्थाने असे म्हणतात.

अकुशल मनोवृत्तीचा पूर्ण निरोध करून कुशल मनोवृत्तीचा अत्यंत विकास करणे ही बौद्ध धम्माची शिकवण आहे. परंतु जर समाधीने सावधानता आणण्याचे आणि स्मृतीने पाहारेकऱ्यांचे काम केले नाही तर अकुशल मनोवृत्तींना आत घुसण्याचा अवसर मिळतो. सम्यक समाधीमुळे आणि सम्यक स्मृतीमुळे कुशल मनोवृत्तीचे एकीकरण केले जाते.

प्रज्ञा:- प्रज्ञा म्हणजे कुशल विचारांसहित आलेले पूर्ण ज्ञान की ज्याच्या योगे दुःख आर्य (अरिय) सत्य, प्रतित्यसमुत्पाद, आर्य अष्टांगिक मार्ग, वगैरेच्या प्रयत्नाने यथार्थ ज्ञान होते. म्हणून संमादिट्ठी आणि संमासंकल्प यांचा प्रज्ञेत म्हणजे अंतर ज्ञानात समावेश केला जातो. वस्तू मात्र जशा आहेत तसे पाहणे म्हणजे प्रज्ञा (यथा भूत ज्ञान दस्सन) अरहंतपद मिळविण्यासाठी, निर्वाण प्राप्त करण्यासाठी किंवा दुःख नष्ट करण्यासाठी आवश्यक असलेल्या शिल, समाधी आणि प्रज्ञा ही शेवटची आणि सर्वांत महत्वाची पायरी आहे.

शिल, समाधी आणि प्रज्ञा ही बौद्ध संस्कृतीची अविभाज्य अंग आहेत. ज्या संस्कृतीत शिल, समाधी आणि प्रज्ञा यांचा विकास केला जात नाहि ती बौद्ध सांस्कृती नाही.

ब्रम्ह विहार:- ब्रम्ह म्हणजे उदात्त आणि विहार म्हणजे आचरण. उदात्त आचरणाला ब्रम्ह विहार असे म्हणतात. उदात्त आचरण अप्रमाणित आहे. त्याला कसल्याही प्रकारच्या मर्यादा नाहीत. उदात्त आचरणातील विचार कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्व दिशांना पसरत असतात. मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चार भावनांना ब्रम्ह विहार असे म्हणतात. धम्माचा प्रसार करतांना अमर्याद प्रेमाने, अगाध करुणेने, सज्जनांच्या विषयी वाटत असलेल्या मुदितेने आणि जे कोणी त्यांचे ऐकणार नाही किंवा अकारण शत्रू झाले, अशांच्या उपेक्षेने भिक्खूंनी धम्माचा प्रसार जगभर केला आणि अशा तऱ्हेने बौद्ध संस्कृती जगभर पसरली.

मैत्री:- संस्कृत भाषेतील मैत्री म्हणजेच पाली भाषेतील मेत्ता, निज्जती सिनिरहतीती मेत्ता म्हणजेच स्नेह करण्यास लावणाऱ्या वृत्तीला मैत्री असे म्हणतात. सर्व सजीव प्राण्यांवर, कोणताही भेदभाव न करता मैत्री केली जाते. मैत्री भावनेचे विशेष कार्य म्हणजे द्वेष भावना समूळ उपटून काढणे. मैत्रीचा प्रत्यक्ष शत्रू क्रोध आणि दूरचा बुरख्यातला शत्रू म्हणजे स्वार्थी शारीरिक प्रेम (पाली पेम) स्वार्थी शारीरिक प्रेम म्हणजे मैत्री नव्हे. मैत्री भावना ही अगदी शुद्ध

आणि उदात्त अशी मनाची अवस्था आहे. ती शांत आहे, शुद्ध आहे, सर्वांचे हित करणारी आहे. सर्व प्राणीमात्रांवर सारखीच मैत्री करणारा योगी सर्व प्राणीमात्रांना स्वतःच्या सारखेच मनात असल्यामुळे त्याचा अहंपणा नष्ट झालेला असतो.

सुत्तनिपातातील 'मेत्त सुत्त' मैत्री भावना असी करावी याविषयीं पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करते.

(143) शांत पदाचे ज्ञान मिळवून निर्वाण पद प्राप्त करू पाहणाऱ्या आत्महितदक्ष माणसाने आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी समर्थ, सरळात सरळ, गोड बोलणारे, मृदू आणि निर्गर्वी व्हावे.

(144) त्याने संतुष्ट, पोसण्यास सुलभ, भानगडी न करणारा, साधेपनाने वागणारा शांतींद्रीय, हुशार, अधृष्ट आणि कुटुंबाविषयी जास्त लोभ न बाळगणारा असे व्हावे.

(145) ज्याच्यामुळे सुज्ञ लोक इतरांस दोष देतात असे शूद्र आचरण करू नये. सर्व प्राणी सुखी आणि आनंदित होवोत अशी भावना करावीत.

(146) जो कोणी चर किंवा स्थावर, लांब किंवा मोठे, मध्यम, लहान, अणू सारखे सुक्ष्म किंवा स्थूल ते सर्व प्राणी आनंदीत होवो.

(147) दिसणारे, उत्पन्न झालेले किंवा उत्पन्न होणारे ते सर्व प्राणी आनंदीत होवोत.

(148) त्यापैकी एक दुसऱ्याला न फसवो, एक दुसऱ्याची अवज्ञा न करो, रागावून आणि किंवा द्वेष बुद्धीने एक दुसऱ्याला दुःख देण्याची इच्छा न धरो.

(149) आई जशी एकुलता एक औरस पुत्राचे, आपले आयुष्य खर्चूनसुद्धा, रक्षण करते, त्याचप्रमाणे सर्व प्राण्यांविषयी अमर्याद प्रेम बाळगावे.

(150) सर्व लोकांविषयी वर, खाली आणि चहुकडे, कुठलेही बंधन न ठेवता अवैर आणि कुठलाही भेदभाव न राखता मैत्रीची भावना अमर्याद वाढवावी.

(151) उभे असतांना, चालत असता, बसले असता अथवा अंथरुणात असता जोपर्यंत झोप आली नाही, तोपर्यंत मैत्री भावनेची स्मृती कायम ठेवावी, हिलाच इहलोकी ब्रम्ह विहार असे म्हणतात.

धम्मपदात म्हटले आहे___न हि वेरेण वेराणी संमंतीध कुदाचनं अवेरेण च संमंती एस धम्मो संतंतनो ||5||

(वैराणे वैर कधीच समाप्त होत नसते. मैत्री भावनेचे वैर नष्ट होत असते. हा सनातन धर्म आहे.)

करुणा:- करुणा म्हणजे सर्व मानवाविषयींची प्रेमपूर्ण दयाशीलता करुणेमुळे दुसऱ्यांचे दुःख सहन होत नाही. करुणाशील मनुष्य दुसऱ्यांचा द्वेष करित नाही, द्वेष करू शकत नाही. करुणा आणि द्वेष एकत्र असू शकत नाहीत.

महाकारुणिक गौतम बुद्धांचे जीवन आणि उपदेश म्हणजेच करुणा. भगवान बुद्धांच्या उपदेशातून करुणा काढली तर त्यांच्या उपदेशांचे सारच काढून टाकल्यासारखे होईल. कारण सगळ्या सद्गुणांची, सगळ्या चांगुलपणाची, सगळ्या सात्विक स्वभावाची जननी म्हणजेच करुणा होय. (करुणा निधानं ही सीलं) करुणा म्हणजे मनाचा कमकुवतपणा नाही. मनाने कमकुवत मनुष्य असहाय्य होऊन नुसता रडत बसेल, पण करुणाशील मनुष्य दुःखीतांचे दुःख निवारण करण्यासाठी धावून जाईल.

मुदिता:- मुदिता म्हणजे दुसऱ्यांच्या आनंदात आनंदीत होणे. ज्यावेळी माणसांच्या जीवनात सुखाचे क्षण येतात त्यावेळी आपण त्यांच्या आनंदात सहभागी होऊन त्यांचा आनंद वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण माणसांना सुख उपभोगण्यास शिकविले पाहिजे. भगवान बुद्धांचा धम्म म्हणजे दुःखाचा प्रसार करणारा धम्म आहे असे काही लोक म्हणतात गैरसमजूतीने म्हणतात. ते बरोबर नाही. वास्तविक भगवान बुद्धांचा धम्म म्हणजे पायरी पायरीने वाढत जाणारे शुद्ध, निर्भर सुख प्राप्त करून देणारा धम्म आहे. निर्वाण म्हणजेच परम सुखाची अचल अवस्था, दुःख नष्ट करण्याच्या मार्गांवर प्रगती करण्यास मुदिता ही मनाची अवस्था मदत करते. जो मनाने दुःखी आहे, त्रासलेला आहे, गांजलेला आहे त्याला आपले मन एक केंद्रित करून कोणतेही काम नीट करता येणे शक्य नाही. पण जयची मनोवृत्ती प्रसन्न आहे, मुदीत आहे, तो ती कामे व्यवस्थित करू शकतो. मुदित अंतःकरणाचा मनुष्य अज्ञान नष्ट करून मुक्ती देणारी प्रज्ञा प्राप्त करू शकतो.

उपेक्षा:- उपेक्षा म्हणजे ज्ञानाने प्राप्त होणारी स्थिर अवस्था. या अवस्थेत असलेला मनुष्य आनंदाने बेहोष होत नाही किंवा दुःखाने दुःखी होत नाही. जीवनाचा प्रवाह अव्याहतपणे चालला आहे. प्रवाहात उठणाऱ्या लाटांप्रमाणे जीवनात सुखादुःखाचे प्रसंग येत असतात. अणात्मतत्व नीट समजल्यामुळे ते सुख किंवा दुःख म्हणजे मी नाही, माझे नाही, हे तो यथार्थपणे जाणतो. प्रवाहांच्या तटावर बसलेल्या योग्याप्रमाणे त्याची मनोवृत्ती तटस्थ झालेली असते. म्हणूनच जीवनातील सुखादुःखाकडे तो तटस्थ मनोवृत्तीने बघतो. यालाच उपेक्षा असे म्हणतात. उपेक्षा ही ज्ञानी माणसाची तटस्थता आहे. अज्ञानी किंवा आळशी माणसाच्या निष्क्रियेला बौद्ध धम्मात समजली जाणारी उपेक्षा म्हणत नाहीत. धम्माचा खूप अभ्यास केल्यानंतर म्हणजे धम्माच्या शिकवणिकीनुसार तंतोतंत आचरण करण्यात अनेक वर्षे घालविल्यानंतर माणसात उपेक्षा वृत्तीचा आविष्कार सहजपणे होत असतो. जीवनाचे यथार्थ ज्ञान आल्यावर उपेक्षावृत्ती माणसात सहजपणे येते.

समाजात वागतांना निर्माण होणाऱ्या सर्व समस्यांवर सर्वोत्तम तोडगा मैत्रि, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या ब्रम्हविहारांच्या चार मानसिक अवस्थांनी मिळू शकतो. म्हणूनच त्यांना प्राणीमात्रांची व्यवहार करण्याचा सर्वोत्तम मार्ग (सत्तेसुसम्म पटीपत्ती) असे म्हटले आहे. या मानसिक अवस्थेमुळे तणावं नष्ट होतो, भांडणतंटा मिटून शांती

प्रस्थापित होते, जीवनाच्या संघर्षात निर्माण झालेल्या जखमा भरून जातात आणि समाजात भ्रातृभाव निर्माण होतो. कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांवर समभावाने या चार भावना केल्यामुळे माणसाचे मन बंदमुक्त होऊन त्याच्या मनात जात, धर्म, वंश, राष्ट्र किंवा वर्ग यांच्या विषयी द्वेष भावना येत नाही. ही बौद्ध संस्कृती आहे.

🌹 समता, स्वातंत्र्य, बंधुभाव म्हणजेच बौद्ध संस्कृती 🌹

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला (बी. बी. सी. ला) दिलेल्या मुलाखतीत समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव ही आपल्या जीवनाची तत्वे आहेत; आणि ते माझे गुरु भगवान बुद्ध यांच्या शिकवणिकीतून मी घेतले आहेत, असे सांगितले होते. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही तत्वे भारताच्या घटनेत नागरिकांचे मूलभूत हक्क म्हणून प्रतिपादली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार होते. मैत्री, करुणा, मुदिता या ब्रह्म विहाराच्या भावना कसलाही भेदभाव न करता सर्वांवर समानतेच्या तत्वानुसार सारख्या करावयाच्या आहेत. येथे समानतेचे तत्व येते. समाजिक दृष्ट्या भगवान बुद्धांनी आपल्या भिक्खू संघाची स्थापना समानतेच्या तत्वावरच केली होती. ज्याप्रमाणे गंगा, यमुना, सरस्वती, अचिरावती आणि मही या नद्या समुद्राला मिळाल्यावर, समुद्राचे पाणी गंगेचे आहे की यमुनेचे आहे हे सांगता येणार नाही; नद्या समुद्रात मिळाल्यावर त्या समुद्राच्या पाण्याशी एकजीव होतात; त्याचप्रमाने निरनिराळ्या जातीतून, गोत्रातून, प्रदेशातून संघात आलेल्या भिक्खूंच्या हा भिक्खू अमुक जातीचा किंवा गोत्राचा आहे असे सांगता येणार नाही. सर्वच भिक्खू शाक्यपुत्रीय भिक्खू असे ओळखले जातात. भगवान बुद्धांनी संघाची स्थापना करून समतेचे तत्व प्रत्यक्षात आणले होते. भिक्खूंची जेष्ठता सोडल्यास सर्व भिक्खूंना सारखाच अधिकार होता. संघाच्या बैठकीत प्रत्येक भिक्खुला भाग घेता येत होता प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार होता.

स्वातंत्र्यः- अंगुत्तर निकायातील कालाम सुत्त हे स्वतंत्र विचारसरणीचा जगातील पहिला जाहीरनामा आहे. एकदा भगवान बुद्ध कोशल जनपदात विशाल भिक्खू संघाबरोबर चारिका करित केशपुत्र नावाच्या कालामांच्या निगमात पोहोचले. केशपुत्रिय कालामांनी ऐकले की शाक्यकुळातून प्रवजित झालेले शाक्यपुत्र श्रमण गौतम केशपुत्रांमध्ये आलेले आहेत. त्या भगवान गौतमांची अशी कीर्ती पसरलेली आहे की ते भगवान पूजनीय आहेत, सम्यक संबुद्ध आहेत, विद्या तसेच आचरणाने युक्त आहेत, सुगत आहेत, लोक व्यवहाराचे जाणकार आहेत, सर्वश्रेष्ठ आहेत, मनुष्यांचे दमन करणारे आहेत आणि देव मनुष्यांचे शास्ते आहेत. ते देवासाहित, मारासहित, ब्रह्मासहित लोकांना तसेच श्रमण ब्राम्हणयुक्त देव मनुष्य जातीला स्वतः जाणून, अनुभवून धम्माचा उपदेश करित असतात. ते आदी कल्याणकारक, मधे कल्याणकारक, अंती कल्याणकारक, अर्थांनी तसेच व्यंजनांनी युक्त, संपूर्ण परिशुद्ध ब्रम्हचर्येचा उपदेश करित असतात. अशा अरहंतांचे दर्शन कल्याणकारी असते.

त्या समई केशपुत्रिय कालाम जेथे भगवान होते तेथे गेले. काही जवळ जाऊन भगवंतांना नमस्कार करून एका बाजूला बसले, काही क्षेम कुशल विचारून एका बाजूला बसले, काही गुपचूप एका बाजूला बसले. एका बाजूला

बसलेल्या केशपुत्रिय कालामांनी भगवंतांना विचारले, भंते, काही श्रमण ब्राम्हण केशपुत्रांत येतात. ते आपल्याच मताचा गौरव करतात, श्रेष्ठ मानतात. दुसऱ्यांच्या मतांची निंदा करतात, अनादर करतात, तिरस्कार करतात, त्याला हीन लेखतात. भंते, दुसरे सुद्धा काही श्रमण ब्राम्हण केशपूत्रांत येतात. ते सुद्धा आपल्याच मताचा गौरव करतात, श्रेष्ठ मानतात, दुसऱ्यांच्या मतांची निंदा करतात, अनादर करतात, तिरस्कार करतात, त्याला हीन लेखतात. भंते, त्यामुळे आमच्या मनात संदेह उत्पन्न होते, शंका उत्पन्न होते की या श्रमण ब्राम्हणांपैकी कोणी सत्य सांगितले? कोणी खोटे सांगितले?

तेव्हा तथागतांनी त्यांना सांगितले, "हे कालामांनो, संदेह येणे योग्यच आहे, शंका येणे योग्यच आहे. शंका येण्याच्याच जागी संदेह उत्पन्न झाला आहे. हे कालामांनो, तुम्ही एखाद्या गोष्टींचा केवळ ती अनुश्रुत आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट केवळ परंपरागत आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट केवळ अमुक प्रकारे सांगितली गेली आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट आपल्या धर्मग्रंथांना अनुकूल आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट केवळ तर्क हेतू संमत आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट न्यायशास्त्र हेतू संमत आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखाद्या गोष्टींचा केवळ आकार व पद्धती सुंदर आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट केवळ आपल्या मताशी अनुकूल आहे म्हणून तिचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट केवळ सांगणाऱ्याचे व्यक्तिमत्व आकर्षक आहे म्हणून त्याचा स्वीकार करू नका. एखादी गोष्ट केवळ श्रमण व गुरु पूज्य आहेत म्हणून तिचा स्वीकार करू नका.

हे कालामांनो, जेव्हा तुम्ही स्वतःच्या अनुभवाने स्वतःच जाणाल की या गोष्टी अकुशल आहेत, या गोष्टी सदोष आहेत, या गोष्टी विद्वान पुरुषांद्वारे निंदनीय आहेत, या गोष्टींना अनुसरले असता अहित होईल, दुःख होईल. तर हे कालामांनो तुम्ही त्या गोष्टी सोडून द्या.

ज्ञानसार समुच्चयात भगवान बुद्ध म्हणतात, "ज्याप्रमाणे सोनार सोन्याला जाळून, कापून आणि कसोटीच्या दगडावर घासून त्याची पारख करतात त्याप्रमाने तुम्ही माझे म्हणणे तपासून पाहा. केवळ माझ्याबद्दल वाटत असलेल्या आधारामुळे माझे म्हणणे तुम्ही स्वीकारू नका."

लोकांच्या कल्याणासाठी, हितासाठी लोकांना धम्म शिकवा असा आदेश भगवान बुद्धांनी दिला होता. धम्माचा प्रसार करतांना तलवारीच्या जोरावर, लोकांवर जुलूम जबरदस्ती करून किंवा लोकांना फसवून, थापा मारून भिक्खूंनी धम्माचा प्रसार केला नाही. ईश्वर, आत्मा असल्या भुरळ पाडणाऱ्या काल्पनिक गोष्टींचा आधार न घेता धम्म केवळ शुद्ध स्वरूपात सांगितला आहे. लोकांना धम्म पटला म्हणून लोकांनी धम्म स्वीकारला. आजही जगातील विद्वान, बौद्ध धम्माविषयी आदर दाखवितात; त्याचे कारण म्हणजे बौद्ध धम्मातील मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा हे ब्रम्ह विहार आणि कालाम सुत्तात सांगितल्याप्रमाने असलेले विचार स्वातंत्र्य.

मूर्ती पूजा:- बौद्ध धम्मात अंधश्रद्धा किंवा अंधविश्वास नाही. असे असूनसुद्धा बुद्धांच्या मूर्तीची, बोधी वृक्षांची आणि इतर गोष्टीं ची पूजा होत नाही काय? असा प्रश्न विचारला जाऊ शकतो.

बौद्ध स्वतःचा काही फायदा व्हावा म्हणून किंवा दुसऱ्यांचा काही तोटा व्हावा म्हणून मूर्तीची पूजा करित नाहीत. मेल्यानंतर सजा ती मिळावी म्हणून बौद्ध मूर्तीची किंवा झाडांची पूजा करित नाहीत. मूर्तीच्या पुढे जाऊन बौद्ध मनुष्य फुले, अगरबत्ती आणि मेणबत्ती ठेवतो, ते मूर्तीला नव्हे, तर भगवान बुद्धांना आदर दाखविण्यासाठी, कृतज्ञता दाखविण्यासाठी आणि भगवान बुद्धांच्या धम्माचे स्मरण करण्यासाठी तो तसे करतो. भगवान बुद्ध हे एक आदर्श मानव होते. त्या आदर्श मानवाचे अनुकरण करण्याची प्रेरणा मिळावी आणि आपणसुद्धा त्यांच्याप्रमाणे बुद्ध व्हावे म्हणून तो त्यांना आदरांजली वाहत असतो आणि 'इतिपी सो भगवा अरहं... असे भगवान बुद्धांचे गुण स्मरण करित असतो. हे केल्याने त्याला काही पुण्य मिळते अशातला भाग नाही. पण भगवान बुद्धांचे गुण आठवून आपणही त्यांच्याप्रमाणे व्हावे असी प्रेरणा घेण्यासाठी तो भगवान बुद्धांचे गुण आठवतो.

त्याचप्रमाणे ज्ञानप्राप्तीची खून म्हणून आदर दाखविण्यासाठी तो बोधिवृक्षापुडे नतमस्तक होतो. त्या झाडाला काही चमत्कारिक गुण आहेत आणि त्या चमत्काराने आपलेही भले व्हावे म्हणून तो बोधिवृक्षाची पूजा करित नाही; तर त्या वृक्षाखाली बसून भगवान बुद्धांना प्रयत्नाने ज्ञान प्राप्त झाले होते म्हणून आदर दाखविण्यासाठी तो त्या झाडाची पूजा करतो.

बुद्ध देव होते व देवाच्या आगाध शक्तीमुळे आपले भले होईल, निदान वाईट तरी होणार नाही म्हणून बुद्धाची पूजा केली जात नाही. कोणाचेही भले करण्याचे किंवा वाईट करण्याचे बुद्धांच्या हातात नाही.

मार्ग दाता:- भगवान बुद्धांनी अनेक वेळा अनेक प्रकारांनी सांगितले आहे की ते फक्त मार्गदाता आहेत. त्या मार्गाने चालून प्रयत्नपूर्वक आपली प्रगती करून घेणे हे ज्याच्या त्याच्या हातात आहे. धम्मपदात म्हटले आहे

तुम्हेहीं किच्चं आतप्पं अक्खातारों तथागता

तुम्ही स्वतःच आपले कर्तव्य कार्य केले पाहिजे. बौद्ध लोक केवळ मार्गदर्शनच करित असतात.

चार आर्य सत्यांची किंवा आर्य अष्टांगिक मार्गाची नुसत्या बौद्धिक स्तरावरच माहिती करून घेतल्याने निर्वान प्राप्त होत नसते तर त्याप्रमाने प्रत्यक्ष आचरण केल्यानेच निर्वान प्राप्त होते.

एकदा गणक मोग्गलान याने भगवान बुद्धांना विचारले, "भगवान, निर्वान असतांना, निर्वांनाकडे नेणारा मार्ग असतांना आणि आपल्यासारखे मार्गदर्शक असतांना सुद्धा आपल्या शिष्यांपैकी फक्त काहीच शिष्यांना निर्वाणापर्यंत जाता आले तर बाकीच्या शिष्यांना अजूनही निर्वान प्राप्त झाले नाही. असे का?"

भगवान बुद्धांनी गणक मोग्गलानाला प्रतिप्रश्न केला, श्रावस्ती पासून राजगृहापर्यंतचा मार्ग तुला ठाऊक आहे काय? त्यावर गणक मोग्गलायनाने श्रावस्ती पासून राजगृहापर्यंत जाणाऱ्या मार्गाचे ठीक वर्णन केले. त्याने वाटेत कोणकोणती गावे लागतात ती सांगितली, त्याचप्रमाणे वाटेत लागनाऱ्या नद्या नाले, दऱ्या खोऱ्या, जंगले इतकेच काय पण कोणत्या ठिकाणी चोर लुटारू पासून सावध राहिले पाहिजे, हेही सांगितले. तेव्हा भगवान बुद्ध म्हणाले की, एखादा मनुष्य तुझ्याकडे आला आणि त्याने तुला श्रावस्ती पासून राजगृहापर्यंतचा रस्ता विचारला आणि तु त्याला तो मार्ग सविस्तरपणे सांगितलास पण तरीसुद्धा त्याने चुकीच्या मार्गाने वाटचाल केली तर तो राजगृहाला पोहोचल काय?

"अशावेळी भंते, मी काय करणार? मी फक्त मार्ग सांगणारा आहे." मोग्गलायन उत्तरला.

त्याचप्रमाणे ब्राम्हण, निर्वाण असूनसुद्धा आणि निर्वाणाकडे नेणाऱ्या मार्गाचा माझ्यासारखा मार्गदर्शक असूनसुद्धा, माझ्या काही शिष्यांना निर्वाण मिळाले आणि काहींना मिळाले नाही. कारण निर्वाणाच्या मार्गाप्रमाणे काही शिष्यांनी योग्य आचरण केले नाही. याबाबतीत मी काय करणार? तथागत केवळ मार्ग दाखविणारे आहेत.

🌹 बौद्ध संस्कृतीत स्त्रियांचे स्थान 🌹

बौद्ध संस्कृतीत स्त्रियांचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचे आहे. भगवान बुद्धांनी स्त्रियांना समाजात मानाचे स्थान दिले आहे. भगवान बुद्धांच्या पूर्वी स्त्रियांना मानाचे स्थान नव्हते. त्यांची स्थिती फारच दयनीय अशी होती. आपल्या वडिलोपार्जित धनसंपत्तिला, आपल्याच रक्ताचा वारसा असावा, म्हणून आपली बायको दुसऱ्याच्या नजरेस सुद्धा पडू नये. या करणासाठी आणि इतर कारणांसाठी स्त्रियांवर फार बंधने होती. स्त्रियांना फारच खालच्या स्थराचे लेखले जाई. अगदी कालिदासाच्या काळापर्यंत आणि त्यानंतरसुद्धा ब्राम्हणी स्त्रियांनासुद्धा संस्कृत बोलण्याचा अधिकार नव्हता. आपली बायको दुसऱ्याच्या हातात पडू नये म्हणून सती जाण्याची प्रथा 19 व्या शतकापर्यंत होती. सती जाण्याच्या पद्धतीला धार्मिक स्वरूप देऊन सती जाणाऱ्या स्त्रीचे उत्तपातीकरण केले जाई. ही श्रीची इच्छा या गाजलेल्या नाटकात विसाव्या शतकाच्या शेवटीसुद्धा सती जाण्याच्या प्रथेचे उद्धारिकरण केले आहे. 1950-55 सालापर्यंत नवरा मेल्यानंतर सौंदर्याचे लक्षण असलेले स्त्रीचे केस कापून तिला विद्रुप केले जाई. तिला एका विशिष्ट प्रकारचेच काळपट लाल रंगाचे वस्त्रच वापरण्याचे बंधन असे. तिचे दर्शनही अशुभ मानले जात असे.

अशा परिस्थितीतसुद्धा प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन भगवान बुद्धांनी स्त्रियांना मनाचे स्थान दिले. एकदा भगवान श्रवस्तीत राहत असता कोसल राजा प्रसेनजित त्यांना भेटण्यासाठी आला. राजा भगवंताशी संभाषण करित असता, राजवाड्यातून एक दूत आला आणि राजा जवळ जाऊन त्यांची राणी मल्लिका प्रसूत होऊन तिला कन्या झाल्याचे त्याने वृत्त सांगितले. ते एकूण राजा खिन्न झालेला दिसला. भगवंतांनी राजाला त्याच्या खिन्नतेचे कारण विचारले. राजाने सांगितले की राणी मल्लिका प्रसूत होऊन कन्या झाल्याचे वाईट वृत्त नुकतेच कळले आहे.

यावर भगवान म्हणाले, राजा, पुत्रापेक्षा कन्या ही अधिक चांगली निपजण्याचा संभव आहे. ती शहाणी आणि सद्गुनी कन्या, पत्नी, माता अशा विविध भूमिका करणारी आहे. तिला जो पुत्र होईल तो पराक्रमी कृत्य करेलं, मोठे राज्य करेल. खरोखर अशा थोर पत्नीचा मुलगा आपल्या देशाचा मार्गदाता होईल.

सिगालोवाद सुत्तात भगवान बुद्ध म्हणतात, पतीने आपल्या पत्नीचा सन्मान राखून आदरभाव प्रदर्शित करून तिच्याशी एकनिष्ठेने वागून तिला सत्ता देऊन तिला लागणारे दागदागिने देऊन तिची सेवा करावी. कारण पत्नी त्याच्यावर प्रेम करते. ती सासर माहेरच्या नातलगांचे आदरातिथ्य करून आपले कर्तव्य बजावते. ती पतीव्रताने वागते. आपल्या नवऱ्याच्या धनावर दक्षतापूर्वक लक्ष ठेवते. उद्योग आणि आपली कर्तव्य कुशलतेने पार पाळते.

भगवान बुद्धांनी, इत्थिपि एकच्चिया सेया म्हणजे काही स्त्रिया पुरुषांपेक्षाही श्रेष्ठ असतात. असे उद्गार काढले आहेत. दुसऱ्या कोंत्याही धर्मात विशेषतः भारतात स्त्रियांना असे मनाचे स्थान दिले गेले नाही.

वैशालीतील वज्जीपुत्र आपल्याकडेच भगवान बुद्धांनी भोजनास यावे म्हणून एकमेकांवर चढाओढ करित होते. पण भगवान बुद्धांनी गनिका आम्रपाली हिचेच आमंत्रण स्वीकारले. याला सामाजिकदृष्ट्या फार महत्व आहे. स्त्रिया जरी शारीरिकदृष्टीने पुरुषांपेक्षा कमकुवत असल्या तरी बौद्धिकदृष्ट्या त्या कुणापेक्षाही कमी नाहीत. त्या आपली बौद्धिक आणि आध्यात्मिक प्रगती करून अरहंत्वापर्यंत जाऊ शकतात, हे भगवान बुद्धांना माहित असल्यामुळेच त्यांनी स्त्रियांना उपसंपदा देऊन भिक्खूनी बनण्याची परवानगि दिली. सुरुवातीला व्यवहारी कारणासाठी भगवान बुद्धांनी स्त्रियांना भिक्खूनी बनण्याचे नाकारले होते. पण जेव्हा आनंदाने भगवंतांना विचारले की, तथागतांनी सांगितलेला धम्म आणि विनय यांचा स्वीकार करून निब्बाण प्राप्त करून घेण्यास स्त्रिया समर्थ नाहीत असे तथागतांना वाटते काय?

त्यावर तथागतांनी उत्तर दिले, आनंदा, गैरसमज करून घेऊ नकोस. निब्बाणापर्यंत पोहोचण्यास पुरुषांइतक्याच स्त्रिया समर्थ आहेत, असे माझे मत आहे. आनंदा माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नकोस. स्त्री पुरुषातील विषमतेच्या तत्वांचा मी पुरस्कर्ता नाही. महाप्रजापतीच्या विनंतीला मी दिलेला नकार हा स्त्री पुरुषांतील विषमतेवर आधारलेला नाही. तो व्यवहारी कारणांवर आधारलेला आहे.

भगवान बुद्धांनी स्थापन केलेला भिक्खूनि संघ हा लोकशाही तत्वावर स्त्रियांच्या आध्यात्मिक विकासासाठी स्थापन केलेला जगातील पहिला स्त्रियांचा स्वतंत्र संघ आहे. ज्याप्रमाणे अरहंत सारीपुत्त आणि महामोग्गलायन भिक्खू संघाचे प्रमुख होते; त्याप्रमाने अरहंत खेमा आणि अरहंत उप्पलवंण्णा या भिक्खुनी संघाच्या प्रमुख होत्या. भिक्खुनी संघामध्ये राण्या, राजकुमारिका, सरदार दरबाराच्या मुली, असहाय्य स्त्रिया, गणिका अशा सर्व स्थरातील आणि सर्व जातीतीला स्त्रिया होत्या. संघात आल्यावर त्या एकमेकींची जात, गोत्र, वर्ण, सामाजिक स्थर विसरून एकजीव होऊन केवळ भिक्खुनी म्हणून राहत होत्या. खेमा ही बिंबिसार राजाची राणी होती. पटचाराची दोन मुले,

नवरा, आई-वडील आणि भाऊ दुःखद परिस्थितीत मरण पावले होते. धम्मदिना आणि भद्दा कापिलाणी या दोन भिक्खुनी धम्म प्रवचन देण्यात प्रसिद्ध होत्या. त्या सर्व अरहंत पदापर्यंत पोहोचल्या होत्या.

भगवान बुद्धांनी गृहिणींना मातुगाम म्हणजे आई किंवा आर्या असे म्हटले आहे. पत्नी ही आपल्या नवऱ्याची सगळ्यांत चांगली मैत्रीण परमसखा असे असे म्हटले आहे. गृहिणीत; विशाखा, सप्पिया, नकुलमाता, राणी सामावती, राणी मल्लिका, सेविका खज्जुतारा, पुनब्बसुमाता, सुमना आणि सुभद्रा या उपासिकांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

🌷 बुद्ध धम्म आणि जातीभेद 🌷

भगवान बुद्ध श्रमण संस्कृतीतून निर्माण झाले होते. श्रमण संस्कृतीत क्षत्रिय, ब्राम्हण, वैश्य व शूद्र असे जातीभेद नव्हते. तरी सिद्धार्थ गौतम क्षत्रिय कुळातील कसा? असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. पालीतील खत्तिय या शब्दाचा क्षत्रिय असा संस्कृतमधे शब्द झालेला आहे. शब्दांच्या सारखेपणामुळे क्षत्रिय म्हणजे वर्नाश्रम धर्मातील क्षत्रिय असा सर्वसामान्यांना अर्थ वाटू लागला आणि पुढे तोच प्रचलित झाला. भगवान बुद्ध खत्तिय म्हणजे शेती करणाऱ्या कुळातील होते. लहानपणी वडिलांच्या शेतावर ते जात असत, असा सिद्धार्थ गौतमाच्या जीवन चरित्रात अनेकवेळा उल्लेख आला आहे.

जरी भगवान बुद्धांच्या काळात आर्य लोक प्रामुख्याने यामुना नदीच्या पश्चिमेस होते तरी बरेच ब्राम्हण पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे मोठ्या संख्येने सरकू लागले होते. बोधी प्राप्त झाल्यावर पाचव्या आठवड्यात भगवान बुद्ध अजपाल निग्रोध वृक्षाखाली चिंतन करित बसले असता, एका ब्राम्हणाणे त्यांना विचारले की ब्राम्हण जन्माने ठरत असतो काय? तेव्हा भगवान बुद्ध उत्तरले की, जन्माने नव्हे तर कर्माणे ब्राम्हण होत असतो. धम्मपदाच्या 26 व्या ब्राम्हणवग्गात निती, कर्म, शिल आणि सत्कर्माणे ब्राम्हण होत असतो असे म्हटले आहे या वर्गातील ब्राम्हण म्हणजे वर्णाश्रमातील ब्राम्हण नसून ब्रम्हचर्येचे म्हणजे उदात्त आचरणाचे पालन करून जो साकृदागामी, अनागामी, अरहंत झालेला असतो तो ब्राम्हण असे म्हटले आहे.

भगवान बुद्धांच्या काळात आर्यांचा वर्ण आश्रमधर्म यमुनेच्या पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे पसरत चालला होता, हे मागे सांगितले आहे. पूर्वेकडच्या आणि दक्षिणेकडच्या श्रमण संस्कृतिचा जन्मापेक्षा कर्माला महत्व असल्यामुळे ब्राम्हण जन्माने होतो की कर्माने होतो असले विवाद नेहमीच घडत असत. म्हणूनच बुद्धगया बोधी प्राप्त झाल्यानंतर पाचव्या आठवड्यात ब्राम्हण कोणाला म्हणावयाचा हा प्रश्न एका ब्राम्हणाने भगवान बुद्धांना विचारला होता. सुत्तनिपातातील वसल सुत्तात असाच वाद दोन तरुण ब्राम्हणांच्या मुलांमध्ये चालला होता. एक म्हणत होता की ब्राम्हण जन्माने होतो, तर दुसरा म्हणत होता की ब्राम्हण कर्माने होतो. दोघेही आपला वाद निकालात लावू न शकल्यामुळे ते भगवान बुद्धांच्या जवळ या प्रश्नाची उकल करण्यासाठी आले होते.

भगवान म्हणाले, वृक्षांत, कीटकांत, चतुष्पाद प्राण्यांत, सरपटणाऱ्या प्राण्यांत, मशांत आणि पक्षांत अनेक पोटभेद आहेत आणि त्यांच्या अनेक लक्षणांमुळे त्यांना ओळखता येते. पण मानवात असी पोटभेद आणि निरनिराळे लक्षणें आढळून येत नाहीत. माणसे त्यांच्या रोजगारांप्रमाणे आणि त्यांच्या पोटापाण्याच्या धंद्याप्रमाणे ओळखली जातात. माणसे त्यांच्या जन्माने नाही तर कर्माने ओळखली जातात.

माधुरीय सुत्तात मथुरेचा राजा अवंतीपुत्र महाकच्चानाना म्हणतो; भो कच्चान ब्राम्हण म्हणतात की ब्राम्हण श्रेष्ठ वर्ण आहे. इतर कृष्ण वर्ण आहेत. ब्राम्हण शुद्ध असतात, अब्राम्हण नाही. ब्राम्हण ब्रम्हाचे आवरस पुत्र आहेत. मुखातून उत्पन्न झालेले ब्राम्हणच ब्रम्ह निर्मित ग्रहाचे वारस आहेत.

महा कच्चायन राजाला सांगतात की श्रीमंत मनुष्य आपल्या नौकरीत ब्राम्हणासहित इतर कोणत्याही वर्णातील योग्य आणि लायक माणसास ठेवतात. दुष्ट मनुष्य कोणत्याही जातीत जन्मलेला असतो. त्याचप्रमाणे सद्गुनी मनुष्यसुद्धा कोणत्याही जातीत जन्मलेला असतो? महा कच्चायन पुढे म्हणतात की जगात हा खोटा प्रचार चालला आहे की ब्राम्हण श्रेष्ठ वर्ण आहे... ब्रम्हाचे वारस आहेत. पुढे महा कच्चायन म्हणतात की भिक्खू संघात उपसंपदा घेऊन आल्यावर सर्वत्र वर्णातील लोकांना सारखाच मान आणि आदर दिला जातो तेथे कसलाही भेदभाव केला जात नाही.

मज्झिम निकायातील अस्सलायन सुत्तात अश्वलायन भगवान बुद्धांना म्हणतो भो गौतम ब्राम्हण असे म्हणतात की ब्राम्हण श्रेष्ठ वर्ण आहे दुसरे वर्ण हलके आहेत ब्राम्हण ब्रम्हाचे आवरसपुत्र आहे. मुखातून उत्पन्न झाले आहेत. ब्रम्हज ब्रम्हनिर्मित ब्रम्हाचे वारस आहेत या विषयात गौतम काय म्हणतात?

परंतु अश्वलायन ब्राम्हणांच्या ब्राम्हणी ऋतुमती गर्भिणी बाळंत होणाऱ्या दूध पाजणाऱ्या अशा पाहिल्या जातात योनीतून उत्पन्न होत असूनसुद्धा ते ब्राम्हण असे म्हणतात की ब्राम्हण श्रेष्ठ वर्ण आहेत ब्रम्हाचे अमृतपुत्र आहे मुखातून उत्पन्न झाले आहेत. ब्रम्हच ब्रम्ह निर्मित ब्रह्माचे वारस आहेत.

माणसा माणसातील जातीभेद कृत्रिमरित्या केला गेला असून माणसाचा स्तर त्याच्या सत्कर्मावरून किंवा दुष्कर्मावरून ठरवीला जातो. अशा अर्थाची अनेक सुत्ते सुत्तपिटकात आहेत. भगवान बुद्धांचा धम्म बंधू भावाच्या तत्वावर आधारलेला आहे. त्यात माणसातील अशा तऱ्हेच्या कृत्रिम भेदाला जागा नाही.

सर्व धर्माचे सर्व वर्णाचे संप्रदायाचे जातीचे लोक बौद्ध धम्मात आल्यावर ते केवळ बौद्ध म्हणूनच ओळखले जातात. बौद्ध धम्मात माणसा माणसात कसलाही भेदभाव केला जात नाही.

उपाली हा न्हावी होता, भगवान बुद्धांच्या महापरीनिर्वानानंतर भरलेल्या पहिल्या धम्म संगतीत भिक्खू नियमांच्या विनय पिटकाची रचना करतांना त्याला प्रमुख केले होते. सुनीत भंगी होता, त्याला अरहंत म्हणून राजे आणि राजांचे मंत्रीसुद्धा आदर दाखवीत असत. साथी हा तत्ववेत्ता कोळी होता. गणिका आम्रपाली अरहंत झाली होती. रज्जुमाला

ही गुलाम होती. पूण्णा ही दासी होती. सुभा ही घिसाड्याची मुलगी होती. चापा ही फासे पाध्यांची मुलगी होती. अशा तऱ्हेची अनेक उदाहरणे आहेत. बुद्ध धम्म हा मानवतेचा धम्म असल्यामुळे धम्मात कसलाही भेदभाव केला जात नाही. ही बौद्ध संस्कृती आहे.

गुलामगिरी नष्ट करून सर्व मानवांना मानाने जगण्याचा अधिकार देणारे जगाच्या इतिहासात भगवान बुद्ध हे पहिले समाज क्रांतिकारक होते.

🌹 मानवी हक्क आणि बौद्ध धम्म 🌹

माणूस आणी माणसाचे माणसाशी नाते हा धम्माचा केंद्रबिंदू आहे. धम्मात ईश्वर, आत्मा किंवा मरणोत्तर जीवनाशी कसलाही संबंध नाही. तसेच धम्माचा कर्मकांडाशी (खोटेपणाशी) कसलाही संबंध नाही. धम्मात सर्व प्राणीमात्रांच्या (सब्बे सत्ता) हिता संबंधी सांगितले आहे. अशा तऱ्हेने केवळ माणसांचे नाहीतर सर्व प्राणीमात्रांचे हित जपणारा बौद्ध धम्म हा जगातील पहिला धम्म आहे तर माणसा माणसात सहित सर्व प्राणीमात्रांचे हित जोपसण्यात सांगणारे सम्राट अशोकाचे शिलालेख हे जगातील पहिले लिखित स्वरूपातील लेख आहेत. इंग्लंडच्या इतिहासातील मेघना चार्ट हे इसविसन बाराशे पंधरा सालचे आहेत. मानवी हक्कांच्या या जाहीरनाम्यात माणसांच्या नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि संस्कृतिक हक्कांची घोषणा केली आहे.

बौद्ध धम्मानुसार माणसे ईश्वराणे निर्माण केली नसून जन्मताच ती स्वतंत्र जन्मलेली असतात. त्याचबरोबर प्रतित्यसमुत्पादाच्या नियमानुसार पुढे ती जसी कर्मे करतात त्याप्रमाणे त्यांचे भविष्य ठरत असते. त्यांनी प्रयत्न केला तर बुद्धत्वापर्यंतसुद्धा त्यांची प्रगती होऊ शकते. स्वतःच्या कर्तबगारीने ते आपले भविष्य घडवितात मनुष्य स्वतःच स्वतःचा मालक असतो तंबपदात म्हटले आहे; अत्ताही अत्तनो नाथा कोही नाथो पारोसिया. तुम्ही स्वतःच स्वतःचे नाथ आहात तुमचा दुसरा कोणी नाथ असू शकतो?

स्वतःची भौतिकदृष्ट्या अतृच्छ प्रगती करण्यास बौद्ध धम्मात मनुष्य स्वतंत्र आहे पराधीन आहे. पुत्र माणवाचा असे माणसाला गुलाम बनविणारे तत्वज्ञान बौद्ध धम्माला मान्य नाही.

बौद्ध धम्मातील पंचशील हा मानवी हक्कांची जाणीव करून देणारा प्रत्यक्षात आचरणात आणला जाणारा इतिहासातील सर्वात जुना वचननामा आहे. जगण्याचा हक्क आणि मालमत्तेचा हक्क असे दोन्ही मानवी हक्क पंचशिलात समावेश केलेले आहेत. युनायटेड नेशन्सचा मानवी हक्कासंबंधीचा जाहीरनामा जर बारकाईने वाचाल तर असे दिसून येते की, त्यात प्रामुख्याने माणसाच्या जगण्याच्या हक्कांचा आणि माणसांच्या मालमत्तेच्या हक्कांचा समावेश केला आहे.

बौद्ध धम्म हा सर्व प्राणीमात्रांच्या संबंधी आहे. सर्व प्राणी सुखाची इच्छा करतात. "सुखकामानी भूतानी यो दंडेन न हिंसती" (आत्मसुख इच्छिणारा जीवांची हिंसा करित नाही.) सुत्तनिपातातील मेत्तासुत्तात सर्व प्राणीमात्रांवर

मैत्रीभावना करावी असे म्हटले आहे. केवळ माणसांवरच नव्हे तर यच्चयावत सर्व प्राणीमात्रांवर मैत्री करावयास सांगणारा भगवान बुद्धांचा उपदेश युनायटेड नेशनलच्या मानवी हक्कांच्या उपदेशापेक्षा अधिक विस्तृत आणि अधिक खोल आहे. सम्राट अशोकाने भगवान बुद्धांचा उपदेश प्रत्यक्ष आचरणात आणला. सम्राट अशोकाने माणसांचे आणि जणावरांचेसुद्धा दवाखाने काढले. इतकेच नाही तर ते जेथे योग्य औषधांची झाडे नव्हती तेथे ती दुसरीकडून आणून त्यांची लागवड केली. अशा तऱ्हेने बौद्ध संस्कृतीत मानवी हक्कांची केवळ घोषणाच केली जात नाही तर बौद्ध धम्मात सर्व प्राणीमात्रांचे हित जोपासले जाते हे प्रत्यक्ष कृतीतून आणले गेले आहे. प्राण्यांची जपवणूक करण्याची चळवळ पाश्चिमात्य देशात दहा ते पंधरा वर्षांपूर्वी सुरु झाली. बुद्ध जन्मात प्राण्यांची काळजी घेण्याची मानवतावादी शिकवण २५०० वर्षांपूर्वी दिली गेली मैत्री भावना आली. पाणातीपाता वेरमणी सिक्खापदं समादियामी ही पंचशील याची शिकवण मानवी हक्कांच्या घोषणेपेक्षा जास्त मानवतावादी आहे.

🌹 बौद्ध शिक्षण पद्धती 🌹

अज्ञान नष्ट करून प्रज्ञा विकसित करणे ही बौद्ध धम्माची मुक्ख्य शिकवण आहे. भगवान बुद्धांनी लोकांना धम्म शिकविण्याचे ठरविल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, लोकांना धम्म शिकविण्यासाठी लोकांत जाऊन त्यांना त्यांच्या भाषेत धम्म समजावून सांगणारे प्रशिक्षित शिक्षक पाहिजेत. त्या शिक्षकांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी संघ स्थापन केला. पहिल्याच ६० भिक्खूंना प्रशिक्षित केल्यावर भगवान बुद्धांनी लोकांच्या हितासाठी, लोकांच्या सुखासाठी, माणसांच्या जीवनाच्या अर्थासाठी संचार करून त्यांना सर्वार्थाने कल्याणकारक असा धम्म शिकवा असा त्यांना आदेश दिला.

भिक्खू विहारात राहू लागल्यावर हळूहळू बौद्ध विहार शिक्षणाचे केंद्र बनू लागले ही परंपरा अजूनही बौद्ध देशात प्रचलित आहे बौद्ध देशातील कोणत्याही खेडेगावातील लहान बौद्ध विहार हे प्रामुक्ख्याने शिक्षणाचे केंद्र असते. बौद्ध स्तूपांच्या तोरणांवर, भिंतींवर, दरवाज्यांवर आणि इतर बौद्ध इमारतींवर भगवान बुद्धांच्या जीवनातील प्रसंग आणि जातक कथा कोरलेल्या असतात. निरक्षर माणसांना धम्म शिकविण्याची एक बौद्ध शिक्षण पद्धती आहे.

प्रत्येक बौद्ध विहार शाळा असे आणि मोठे बौद्ध विहार ज्याला ह्यूअनत्संग संघाराम म्हणतो ते कॉलेज असे. अनेक संघाराम इतके मोठे झाले की, त्यांचे पुढे विश्वविद्यालयात रूपांतर झाले. नालंदा, वलभी, विक्रमशीला, जगद्दला, ओदांतपुरी, सोमपूर, तक्षशीला, कान्हेरी, अजिंठा, अमरावती, भट्टप्रोलू, श्रीपर्वत, नागार्जुनकोंडा, कांची इत्यादी काही विश्वविद्यालय इतकी मोठी झाली की, त्यात शेकडोशिक्षक आणि हजारो विद्यार्थी आशियातील निनिराळ्या देशातून शिक्षण घेण्यासाठी येत असत. ब्राम्हणी शिक्षण व्यवस्था विश्वविद्यालय निर्माण करू शकली नाही याचे कारण ब्राम्हणी व्यवस्थेत शिक्षणासाठी आरक्षण एखाद दुसऱ्या विशिष्ट जातीलाच असे. ब्राम्हणी पद्धतीत

शिक्षणासाठी इतर जातीतील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नसे. अशा प्रकारचे आरक्षण ब्राम्हणी पद्धतीत गेली २००० वर्षे चालत आले आहे.

बौद्ध शिक्षणसंस्था सर्वांसाठी खुल्या होत्या. ज्यांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे अशा सर्वांना कसलाही भेदभाव न करता शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळत असे. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे गुरुकुल पद्धतीत घरी राहणार एकच गुरु आपले शिक्षण केंद्र इतके मोठे करू शकत नव्हता की तेथे बौद्ध शिक्षण पद्धतीसारखी शेकडोशिक्षकांची जरुरी पडावी. त्यामुळे ब्राम्हणी शिक्षण पद्धतीत विश्वविद्यालय निर्माण होऊ शकली नाहीत.

इत्सिंग ह्या चिनी भिक्खूने नालंदा येथे इ. स. ६७५ ते ६८५ अशी दहा वर्षे शिकण्यात घालविली त्याच्या म्हणण्यानुसार मगधातील नालंदा आणि गुजरातमधील वलभी अशी भारतातील दोन विश्वविद्यालय चिनमधील प्रसिद्ध विद्यालयांसारखी आहेत. तो स्वतः गुजरातला गेला नव्हता पण त्याने वलभी विश्वविद्यालयाबद्दल जे ऐकले त्यावरून त्याने वलभी विश्वविद्यालय याची तुलना नालंदाच्या विश्वविद्यालयाबरोबर केली आहे.

नालंदा बौद्ध विश्वविद्यालय इसवी सणाच्या पाचव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत जगातील एक महत्वाचे ज्ञान केंद्र होते. जगातील विश्वविद्यालयाच्या दर्जाचे बहुतेक ते सर्वात प्राचीन विश्वविद्यालय असावे. जगाच्या संस्कृतीच्या विकासात नालंदा विश्वविद्यालय हे अत्यंत मोलाचे लेणे बौद्धांनी निर्माण केले होते.

जरी नालंदा हे प्रामुक्ख्याने महायान बौद्धांचे केंद्र होते तरी तेथील अभ्यासक्रम हा फक्त महायानापुरातच किंवा फक्त बौद्धांपुरातच मर्यादित नव्हता.

🌷 आजची भारतीय संस्कृती ही समावेशी भारतीय संस्कृती आहे 🌷

भारतात वैदिक संस्कृतीनंतर ब्राम्हणी संस्कृती आणि त्या संस्कृतीवर बौद्धांचा प्रभाव पडल्यावर हिंदू संस्कृती निर्माण झाली. आजची हिंदू संस्कृती म्हणजे बौद्ध जैन आणि श्रमण संस्कृतीतील इतर विचारप्रवाह तसेच द्रविड संस्कृती मिळून तयार झालेली संस्कृती आहे. भारतातून बौद्ध धम्म नष्ट झाला होता पण भारतातून बौद्ध संस्कृती नष्ट झाली नव्हती. हिंदू धर्माने जशी भगवंतांची मंदिरे आणि इतर पूजास्थाने आपलीशी करून घेतली. भारतातून बौद्ध संस्कृती कधीच नष्ट झाली नाही.

प्रकरण २ रे

🌷 बौद्ध धम्माच्या शाखा 🌷

भगवान बुद्धांच्या नंतर संघाचा मार्गदर्शक धम्म आणि विनय:

भगवान बुद्धांनी आपला शेवटचा वर्षावास वैशाली जवळच्या वेळुवन गावात केला. वर्षावासास राहत असता ते फार आजारी पडले. त्यांना जोराच्या मरणांतिक वेदना होऊ लागल्या, त्या भगवानांनी स्मृती मान व जागृत राहून त्रास होऊ न देता सोसल्या. तेव्हा भगवानांना वाटले की, उपस्थायकास बोलावल्याशिवाय, भिक्खू संघास दर्शन दिल्याशिवाय माझे परिणीर्वाण व्हावे हे मला योग्य नाही. तर मी आबाध वीर्याने घालवून जीवित संस्कार तासाचं चालू ठेवीन.......

नंतर भगवान दुखण्यातून उठून विहारातून बाहेर येऊन, नुकतेच दुखण्यातून उठल्यामुळे विहाराच्या छायेत पसरलेल्या आसणावर बसले. तेव्हा आयुष्यमान आनंद भगवाणांच्याकडे येऊन त्यांना अभिवादन करून एका बाजूस बसला आणि त्यांना म्हणाला, भगवांनांना मी सुखात असतांना पाहिले आहे व आजारी असतांना पाहिले आहे, मला धम्मही सुचत नाहीत. परंतु मला त्यातल्या त्यात एवढे समाधान वाटते की, भिक्खू संघाविषयी काहीतरी सांगितल्याशिवाय भगवानांचे परिणीर्वाण व्हावयाचे नाही.

"पण आनंदा, भिक्खू संघास माझ्याकडून काय हवे आहे? आनंदा नी आता बाहेर काही न ठेवता धम्मोपदेश केला आहे. तथागताने त्यात आश्चर्यमुष्ठी मुलीच ठेवलेला नाही. आनंदा, ज्यास असे वाटते की, मी भिक्खू संघ चालवीन, किंवा भिक्खू संघ माझ्यावर अवलंबून राहील, तो आनंदा, भिक्खू संघाविषयी काहीतरी सांगेल. परंतु आनंदा, तथागतास असे असे वाटत नाही. तर मग आनंदा, तथागत भिक्खू संघाविषयीं काय सांगणार?...........

तेव्हा आनंदा, तुम्हीच आपला आधार व्हा (अत्तदीप विहरत) तुम्हीच आपले शरण व्हा. दुसऱ्या कुणाचाही आधार घेऊ नका. धम्माचा आधार घ्या. धम्मा शरण जा दुसऱ्या कशासही शरण जाऊ नका."

दिघनिकायाच्या महापरीनिब्बाण सुत्तात पुढे भगवान बुद्ध म्हणतात, कदाचित आनंदा, तुम्हास असे वाटेल की, आमच्या धम्माचा प्रवर्तक गेला. आम्हास आता शास्ता नाही. पण आनंदा, असे समजू नका. आनंदा, तुम्हास जो धम्म आणि विनय सांगितला आहे, शिकविला आहे, माझ्या मरणानंतर तोच तुमचा शास्ता.............

आनंदा, जर इच्छा असेल तर, माझ्या मरणानंतर संघाने लहान सहान शिक्षापदे काढून टाकावी.........

भगवान बुद्धांनी त्यांच्या महापरीनिर्वाणानंतर आपला वारस नेमला नाही. त्यांनी सांगितलेला धम्म आणि विनयच भिक्खू संघाचे मार्गदर्शन करेल, असे त्यांनी सांगितले. भगवान बुद्धांचा लोकशाही पद्धतीवर ठाम विश्वास होता, म्हणूनच त्यांनी वारस म्हणून कुणाचीही नियुक्ती केली नाही. भगवान बुद्ध हयात असतांनाच जैन धर्माचे प्रवर्तक भगवान महावीर यांचे महापरीनिर्वाण झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायात कलह निर्माण झाला. याची माहिती दिघनिकायातील पासादिक सुत्तात आली आहे. ती अशी...........

येथे समई भगवान बुद्ध शाक्यांच्या देशात वेधत्र्य नावाच्या शक्यांच्या आम्रवनातील प्रासादात राहत होते. त्या समई निगंठनाथ पुत्त पावा नगरीत नुकताच मरण पावला होता. त्याच्या मरणानंतर निगण्ठांमध्ये फुट पडून त्यांच्यात

दोन गट होऊन ते भांडण कलह, विवाद करित तुला धर्म व नियम कळत नाहीत, मी ते जाणतो. तुला ते कसले कळतात? तुझा मार्गच चुकला आहे, माझा मार्ग बरोबर आहे. माझे म्हणणे मुद्देसूद आहे, तुझे तसे नाही. तु आधी म्हणावयाचे ते मागून म्हणतोस, तु जे इतके ज्ञान मिळविले ते सर्व फुकट आहे, तुझा वाद दोषयुक्त आहे, तुला मी वादात पकडले आहे, त्यातून सुटण्याचा प्रयत्न कर आणि तुझ्यात शक्ती असेल तर आत्ताच आपणांस सोडवून घे. असे म्हणूनते एकमेकांस कटू शब्दांनी ताडन करू लागले. जणु काय नाथपुत्तीय निगंण्ठांमध्ये मरणच उत्पन्न झाले आहे. निगंण्ठनाथपुत्ताचे पांढरी वस्त्रे परिधान करणारे जे गृहस्थ श्रावक होते त्यांनाही ज्याप्रमाणे वाईट रीतीने सांगितलेल्या, वाईट रितीने उपदेशिलेल्या, न तारणाऱ्या, उपशमाप्रत न नेणाऱ्या, सम्यक संबुद्धाने न उपदेशिलेल्या, प्रतिष्ठा, आसरा नसलेल्या धर्म विनयामध्ये व्हावे त्याप्रमाणे नाथपुत्तिय निगंण्ठांचा विट आला, तिटकारा आला, त्रास आला.........

चुंद श्रमणोद्देश पावानगरीत वर्षावास करून सामगामात येऊन त्याने ही बातमी आयुष्यमान आनंदांना सांगितली. आनंदांनी ती भगवान बुद्धांना सांगितली............

मूळ धर्मातच जर काही मोठे दोष असतील, तर काही अनुयायांचा तरी तिकडे कानाडोळा होणे शक्य नाही. त्यांच्या मनात ती गोष्ट खटकतच राहणार व त्यामुळे केव्हा ना केव्हातरी भांडणांचा प्रसंग येणारच. म्हणून संघात ऐक्य असण्यासाठी धम्म निर्दोष असणे आवश्यक आहे आणि ते निर्दोषत्व तीन गोष्टींवर अवलंबून आहे. (1) शास्ता सम्यक संबुद्ध असला पाहिजे. (2) धम्म उत्तम रीतीने उपदेशीलेला आणि निर्वानापर्यंत नेणारा असला पाहिजे. आणि (3) श्रावक योग्य मार्गाने चालणारे व धम्माचे अतिक्रमण न करणारे असले पाहिजेत. या तिनही गोष्टी बौद्ध धम्मात असल्यामुळे तो सर्वांन परिपूर्ण आहे..........

म्हणून चुंदा, जे धम्म म्हणून तुम्हास उपदेशिलेले आहेत ते सर्वांनी मिळून अर्थास अर्थ आणि शब्दास शब्द असे गावे (त्यांचे संगायन करावे), भांडू नये, म्हणजे ब्रम्हचर्या चांगल्या रीतीने चालून चिरकाळ टिकेल. ते बहुजनांच्या हितास, बहुजनांच्या सुखास, लोकांवरील अनुकंपेस, देव आणि मनुष्य यांच्या अर्थास, हितास, सुखास कारण होईल. ते कोणते धम्म? चार स्मृती उपस्थाने, चार सम्यक प्रधाने, चार ऋद्धिपाद, पाच इंद्रिये, पाच बळे, सात बोध्यंगे, आर्य अष्टांगिक मार्ग, हे चुंदा, ते धम्म.....

त्याच सुत्तामध्ये भगवान बुद्ध पुढे म्हणतात............

आता चुंदा, कदाचित असेही होईल की, अन्य धर्मीय परिवार म्हणतील की मित्रहो, श्रमण गौतमाने काय सांगितले आहे? चुंदा, असे म्हणणाऱ्या अन्य धर्मीय परिवाचकांना असे म्हणावे की मित्रहो हे दुःख आहे, हे दुःखाचे कारण आहे, हा दुःखाचा नाश आहे आणि हा दुःखाच्या नाशाचा मार्ग आहे, हे भगवंतांनी सांगितले आहे.......

आता चुंदा, कदाचित असेही होईल की, अन्य धर्मीय परिवाचक म्हणतील कि मित्रहो श्रमण गौतमाने काय सांगितले आहे? चुंदा, असे म्हणणाऱ्या अन्य धर्मियांस असे म्हणावे कि मित्रहो हे दुःख आहे, हे दुःखाचे कारण आहे, हा दुःखाचा नाश आहे आणि हा दुःखाच्या नाशाचा मार्ग आहे, हे भगवंतांनी सांगितले आहे...........

आता चुंदा, कदाचित असेही होईल की, अन्य धर्मीय म्हणतील की मित्रहो श्रमण गौतमाने हे का सांगितले आहे. चुंदा असे म्हणणाऱ्या अन्य धर्मीय परिवारास असे म्हणावे की, मित्रहो हे अर्थयुक्त धम्मयुक्त ब्रम्हचर्यास आवश्यक असून निर्वेद विराग निरोध उपशम अभिज्ञा संबोधी निर्वान याकडे ते नेणारे आहेत म्हणून भगवान बुद्धांनी हे सांगितले आहे...........

🌷 संगिती 🌷

धम्माविषयीं किंवा विनयातील नियमांविषयी उद्भवलेला वाद मिटविण्यासाठी भिक्खू संघाची जी विशेष परिषद भरविली जाते तिला संगिती असे म्हणतात. अलीकडच्या भाषेत तिला संगायन असेही म्हणतात. असल्या विशेष बोलविलेल्या परिषदेत बौद्ध धम्म म्हणजे काय आहे आणि विनयातील नियम काय आहेत हे सर्वांमधे ठरविल्या जाते........

हे संगायन कसे करावे याबद्दल भगवान बुद्धांनी दिघनिकायातील पासादिक सुत्तात मार्गदर्शन केले आहे. त्या सुत्तात भगवान बुद्ध म्हणतात..........

म्हणून चुंदा, जे धम्म म्हणून मी तुम्हास उपदेश केले आहेत ते सर्वांनी मिळून अर्थास अर्थ व शब्दास शब्द असे गावे. भांडू नये, म्हणजे ब्रम्हचर्या चांगल्या रीतीने चालून चिरकाळ टिकेल..........

१) लुंबूनी (नेपाळ) २) बुद्धगया (बिहार) ३) सारनाथ (उत्तर प्रदेश) ४) कुशिनगर (उत्तर प्रदेश) ५) कपिलवस्तु (उत्तर प्रदेश) ६) वैशाली (बिहार) ७) श्रावस्ती (उत्तर प्रदेश) ८) राजगृह (बिहार) ९) नालंदा (बिहार) १०) सांची (मध्य प्रदेश) ११) महू (मध्य प्रदेश) १२) दीक्षाभूमी (नागपूर, महाराष्ट्र) १३) चिंचोली (नागपुर, महाराष्ट्र) १४) अजंठा वेरूळ लेणी (औरंगाबाद, महाराष्ट्र) १५) चैत्यभूमी (मुंबई, महाराष्ट्र) १६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान राजगृह (मुंबई, महाराष्ट्र) १७) चळवळीचे केंद्र, (आंबेडकर भवन, मुंबई, महाराष्ट्र) १८) सिद्धार्थ कॉलेज (मुंबई, महाराष्ट्र) १९) सुप्पारक नगरी (नालासोपारा, ठाणे, महाराष्ट्र) २०) कान्हेरी गुंफा (मुंबई, महाराष्ट्र) २१) चवदार तळे (महाड, महाराष्ट्र) २२) एलिफंटा गुंफा (मुंबई, महाराष्ट्र) २३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक दापोली (रत्नागिरी, महाराष्ट्र) २४) येवला-मुक्ती भुमी (नाशिक, महाराष्ट्र) २५) काळा राम मंदिर (नाशिक, महाराष्ट्र) २६) स्फुर्ती भूमि-आंबवडे (रत्नागिरी, महाराष्ट्र) २७) माता रमाईचे माहेर-वणंद (दापोली, रत्नागिरी, महाराष्ट्र) २८) भीमा कोरेगाव (पुणे, महाराष्ट्र) २९) तक्षशिला विश्वविद्यापीठ (रावळपिंडी, पाकिस्तान) ३०) ओदंतपुरी विश्वविद्यापीठ (नालंदा, बिहार) ३१) विक्रमशिला विश्वविद्यापीठ (भागलपूर, बिहार) ३२) वल्लभी विश्वविद्यापीठ (भावनगर, गुजरात) ३३) जगद्दल विश्वविद्यापीठ (उत्तरप्रदेश) ३४) जयेंद्र विश्वविद्यापीठ (श्रीनगर-जम्मू काश्मीर) ३५) पहिली भगवान मूर्ती स्थापना देहू रोड (पुणे, महाराष्ट्र) ३६) कार्ले भाजे बेडसा लेणी (पुणे, महाराष्ट्र) ३७) जकिंनवाडी लेणी कराड (सातारा, महाराष्ट्र) ३८) माता भिमाई स्मारक (सातारा, महाराष्ट्र) ३९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाव्य स्मारक, तळेगाव, दाभाडे (पुणे, महाराष्ट्र) ४०) नागार्जुन टेकडी, रामटेक (नागपूर, महाराष्ट्र)

ब) मंगल दिन:

१) वैशाखी पौर्णिमा २) जेष्ठ पौर्णिमा ३) आषाढ पौर्णिमा ४) श्रावण पौर्णिमा ५) भाद्रपद पौर्णिमा ६) अश्विन पौर्णिमा ७) कार्तिक पौर्णिमा ८) मार्गशर्ष पौर्णिमा ९) पौष पौर्णिमा १०) माघ पौर्णिमा ११) फाल्गुन पौर्णिमा १२) चैत्र पौर्णिमा १३) १४ एप्रिल-डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस १४) धम्मचक्र प्रवर्तन दिन-अशोका विजयादशमी १५) ७ फेब्रुवारि-माता रमाई यांचा जन्मदिवस १६) १२ डिसेंबर-सूर्यपुत्र भैय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर यांचा जन्मदिवस.

क) स्मृतिदिन:

१) ६ दिसेम्बर-महापरीनर्वाण दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर २) २ फेब्रुवारि- सुभेदार रामजी आंबेडकर यांचा स्मृतिदिन ३) २ फेब्रुवारि- मुकुंदराव आंबेडकर यांचा स्मृतिदिन ४) २७ मे-माता रमाई यांचा स्मृतिदिन ५) १७ सप्टेंबर-सूर्यपुत्र भैय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर यांचा स्मृतिदिन ६) कार्तिक पौर्णिमा-भंते सारिपुत्त यांचा स्मृतिदिन ७) कार्तिक अमावस्या-भंते महामोग्गलायन यांचा स्मृतिदिन.

आयु. राज जाधव.

🦚🦚🦚 #बौद्ध_साहित्य_मै_बुद्ध_के_वर्षावास_से_जुड़े_श्रावस्ती_का_सच्चा_इतिहास..!

श्रावस्ती के जिक्र से सबसे पहले हमें गौतम बुद्ध, अनाथपिंडक और जेतवन की याद आती है। साथ ही ये भी याद आता है, कि श्रावस्ती महाजनपदों में से एक कोसल की राजधानी का दर्जा रखती थी। बौद्ध साहित्य श्रावस्ती का बार-बार जिक्र करता है। सिद्धार्थ से बुद्ध बनने का सफर तय करने के बाद गौतम बुद्ध ने अपने जीवन के अनेक वर्षा काल श्रावस्ती में व्यतीत किए। बुद्ध की चरणरज यहाँ पड़ी इसलिए यह स्थान बौद्ध धम्म और बौद्ध परंपरा में ख़ास माना गया। आज भी बौद्ध धम्म में आस्था रखने वालों के लिए यह जगह ख़ास है। बुद्ध के कदमों के निशान की तलाश में भटकने वाले पुरातत्ववेत्ताओं और इतिहासकारों ने भी इसे तरजीह दी। इस वजह से यह ऐतिहासिक पुरास्थल का भी दर्जा रखता है। सारनाथ में धर्मचक्र प्रवर्तन के पश्चात गौतम बुद्ध ने अपना पूरा जीवन मध्यगंगा घाटी में उपदेश देने में व्यतीत किया। जिन स्थानों पर उनकी उपस्थिति इतिहास में दर्ज है। घूम-घूम कर उपदेश देने की बुद्ध की दिनचर्या बरसात के मौसम में थम जाती थी। बरसात में वह एक स्थान पर टिक कर रहते थे। बौद्ध साहित्य इसका उल्लेख वर्षावास के रूप में करता है। श्रावस्ती गौतम बुद्ध का पसंदीदा वर्षावास का स्थान है। परंपरा से यह माना जाता है, कि उन्होंने यहाँ पर २४ वर्षावास व्यतीत किये। बुद्ध के श्रावस्ती प्रवास से प्रेरित होकर उनके अन्यन्य उपासक/ उपासिका और अनाथपिंडक ने यहाँ पर एक विहार का निर्माण करवाया। इसे हम जेतवन विहार के नाम से जानते हैं। जेत उस राजकुमार का नाम है, जिसके वन की जमीन पर इस विहार का निर्माण करवाया गया।

बौद्धधम्म में वर्षावास का बहुत महत्व है। इसका प्रारम्भ बुद्धत्व प्राप्ति के बाद तथागत बुद्ध ने किया था। वर्षावास के तीन माह में भिक्षु एवं श्रामणेर संघ विहार में रहकर बौद्ध धम्म की बारीकियों का अध्ययन मनन करते हैं। आषाढ पौर्णिमा के दिन वर्षावास शुरू होता है। और यह आश्विनी पुर्णिमा कों समाप्त होता है। बुद्ध के समय काल में बुद्ध ने सभी भिक्षुओं को आदेश दिया की वे धम्म का प्रचार प्रसार करे और सभी बौद्ध भिक्खु इस काम में लग गए लेकीन यह काम करते हुए उन्हें कई संकटो का

सामना करना पड़ा और खास कर बारिश के मौसम में नदियों में बाढ़ के कारण बौद्ध भिक्षु बह जाते थे। और उनके चलने से खेत की फसलों को नुकसान पहुँचता था इसलिए उन्होंने तथागत को यह बात बताई बुद्ध ने आदेश दिया की आषाढ पौर्णिमा से आश्विनी पुर्णिमा तक सभी भिक्षु एक स्थान पर रहे, वे गांवों में भिक्षाटन हेतु न जाए और एक स्थान पर रह कर धम्म का पठन कर धम्म प्रचार प्रसार करे आवश्यकता पड़ने पर भिक्षु अपने गुरु से अधिकतम एक सप्ताह का अवकाश लेकर विहार से बाहर जा सकता है। तो यह वर्षावास बुद्ध के समय काल से ही मौजूद है। तथागत बुद्ध ने अपना पहला वर्षावास इ.स.पूर्व ५२७ में सारनाथ के ऋषीपतन में किया।और सबसे महत्वपूर्ण बुद्ध ने पसंदिता स्थान श्रावस्ती मै सबसे ज्यादा २४ वर्षावास किये। उसके अलावा जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी विहार में वर्षावास किये यह वर्षावास थाईलैंड, म्यांमार, श्रीलंका कम्बोडिया और बांग्लादेश के बौद्ध भी इस का पालन करते है। वर्षावास के समय बौद्ध धम्म के उपासक और उपासिकाओ को भी आष्टांगिक मार्ग का पालन करने की कोशिश करना चाहिए और साथ ही पंचशील के नियम का कड़ाई से पालन करना चाहिए जैसे झूठ न बोलना ,नशा न करना,हिंसा न करना, चोरी न करना, व्यभिचार न करना इस के अलावा रोज बुद्ध वन्दना लेना , बौद्ध भिक्षु को भोजन का दान करना चाहिए।और वर्षावास के समय उपोसथ धारण कर दिन में बौद्ध भिक्षु के समान केवल एक बार भोजन करना आदि महत्वपूर्ण है। इन तीन महिनो में शील ओर विनय को बहुत महत्व कहते हैं।

बौद्ध शिल्पा _

****

🦚🦚🦚 *@ १ जानेवारी @* *मुलींची पहिली शाळा सुरू झाली*

****

महात्मा जोतीबा फुले यांनी १ जानेवारी १८४८ साली पुण्यामध्ये पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली. तसेच अस्पृश्य मुलांसाठी पुण्याच्या वेताळ पेठेत ३ जुलै १८५२ मध्ये त्यांनी शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे. पण जोतीराव आपल्या भूमिकेवर ठाम असत.

समाज सुधारण्याच्या कार्याला गती देण्यासाठी व व्यापक करण्यासाठी १८७३ साली त्यांनी ‘सत्यशोधक समाजा’ची स्थापना केली. ‘कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे’ असे रोखठोकपणे बोलताना मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्यांचा आसूड’ या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि

दारिद्रयाची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणून ही जोतीरावांचे दर्शन होते.

'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्वचिंतक व्यक्तिमत्त्व म्हणूनही आपल्या समोर येतात.

****

💎 "आनंद"

🌼 "आनंद हे सुध्दा सारिपुत्त आणि महामोग्गलायन" यांच्याप्रमाणेच गौतम बुध्दांचे एक अग्रश्रावक होते.

🌼 शाक्य कुळातील सिध्दार्थ गौतमाचे ते लहान चुलतभाऊ होते. शाक्य राजा शुध्दोदन यांचे छोटे भाऊ अमितोदन यांचे पुत्र व आईचे नाव मृगी. सिध्दार्थ गौतमांचा व त्यांचा जन्म एकाच दिवशी झाला. तथागतांनी आनंदला कायम धम्मसेवक व शरीररक्षक म्हणून नेमले होते. गौतम बुध्दांनी संघ स्थापन केल्यानंतर अनुरुध्द, भद्दिय, भुगु, किंम्बिल व देवदत्त यांच्याबरोबर त्यांनी स्वतः भगवंताकडुन प्रव्रज्या घेतली. आनंद हे बहूश्रूत, बुध्दीमान होते म्हणून भिक्खुमध्ये त्यांना अग्रस्थान मिळाले. भगवंताच्या महापरिनिर्वाणानंतर भगवंतांनी दिलेल्या उपदेशांचे संकलन करण्यासाठी महाकाश्यपांना आनंदची फार मदत झाली.

🌼 चार महिन्यांनी राजगृह येथे भरलेल्या पहिल्या संगीतीमध्ये महाकाश्यपाने जी सूत्ते गोळा केली त्या सुत्तांपैकी बहूतेक सुत्ताच्या आरंभी 'एवं मे सुत्त' म्हणजे मी असे ऐकले आहे हे वाक्य आनंदाच्या तोंडी आहे. म्हणजे मी हे प्रवचन भगवान गौतम बुध्दांच्या तोंडून ऐकले आहे व स्मरणात ठेवले आहे ते असे आहे. आनंदाचे महत्व सांगतांना भगवंत म्हणत की, त्यांची बुध्दी व स्मृती तिक्ष्ण आहे, चांगला व्यवहारवादी आहे, त्यांची धारणाशक्ती चांगली आहे, आनंद दृढनिश्चयी आहे. म्हणून भगवंतानी त्यास आपले स्वीय सचिव म्हणून नेमले होते.

🌼 भगवंताची सेवा भिक्खूसंघामध्ये नागसमाल, नागित, उपवाण, सुनक्खत्त, श्रामणेर वर्गामध्ये चुन्द, सागत, राध व मेघिय या सर्वांनी मधून मधून केली. परंतु आनंदासारखा सेवाकरी त्या सर्वामध्ये कोणी नव्हता. गौतम बुध्दांची अखेरची पंचवीस वर्षे त्यांनी सेवा केली. आनंद व सारिपुत्ताची गाढ मैत्री होती. धम्मसिध्दांत, धम्मसूत्रे त्यांना चांगले माहित होते. तथागतांचे प्रत्येक प्रवचन ते लक्ष देऊन ऐकत त्याचे निरुपम, स्पष्टीकरण श्रोत्यांना करून देत असत. तथागतांची प्रत्येक हालचाल व भाव ते अत्यंत काळजीपूर्वक टिपत असत. तथागत नुसते हसले तरी ते का हसले याचे स्पष्टीकरण ते देत असत. एकाचवेळी ते पंधरा हजार श्लोक ते पाठ म्हणून ते दाखवीत असत. पण त्यांना अरहंतपद गौतम बुद्धांच्या महापरीनिर्वाणानंतर प्राप्त झाले.

🌼 आनंद आपली जबाबदारी पूर्ण करण्याच्या कामात कुशल होते. भिक्खूंना नेहमी ते मार्गदर्शन करित. भगवंतांबरोबर ते दुःखनिरोध, लोक (श्रुष्टी, निसर्ग, संसार), शून्यता (समाधी), वेदना, ऋद्धी-सिद्धी, आनापान -

स्मृतीपासून शील, मेत्ता, संघ याबाबत चर्चा करित असत. कधीकधी ते भगवंतांकडे प्रवचन एकूण भिक्खूंना एकवत. आनंदाचे प्रवचन भिक्खूंना फार आवडायचे. कोसलनरेश प्रसेनजित यांनी त्यांना एक हजार चिवर व मगधनरेश उदयन यांनी पाचशे चिवर दिले होते.

🌼 राजघराण्यातील स्त्रियांना उपदेश देण्याची आनंद यांची खायतो होती. आनंद यांनी भगवंतांना केलेल्या विनंतीवरून स्त्रियांना संघात स्थान प्राप्त झाले होते. सारिपुत्त, महामोग्गलायन, महाकाश्यप, अनुरुद्ध आणि कांक्षा रेवत हे आनंदाचे खास मित्र होते. ते सर्व आनंदाचा आदर करीत असत. आजाऱ्यांची सेवा करण्यात ते तत्पर असत. आनंद यांचे जवळजवळ ते एकशेवीस वर्षे वय असतांना वैशाली येथे परिणीर्वान झाले.

🌼 मगध व वैशाली येथे त्यांचे शरीरधातू अवशेषावर स्तूप बांधण्यात आले. आनंदाने संघामधे कधीही प्राविण्याचा अगर श्रेष्ठत्वाचा दावा केला नाही. जन्मभर त्यांनी धम्माची सेवा केली होती. भगवंतांचे धम्मोपदेश ते स्वतः मी भगवंतांच्या तोंडून असे ऐकले आहे असे कथन करित. परंतु, त्यांनी धम्म कथनाचे श्रेय्य स्वतःस घेतले नाही.

धम्माचा प्रसार, प्रचार व धम्माचे प्रकटीकरण लेणी, चैत्यस्तूप, शिळालेख यांचे माध्यमातून देवानाम प्रियदर्शी सम्राट अशोक यांनी त्यांचे राज्य, मुलगा, मुलगी सर्वस्व धम्माकरिता दान करून सर्वोत्कृष्ठ दाता म्हणून जगात अजरामर झाले आहेत.

सर्वांचे मंगल हो! नमो बुध्दाय!! सविनय जय भिम!!!

🦚 🦚 🦚 संभाजी भोसले मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती

संभाजी शहाजी भोसले याच्याशी गल्लत करू नका.

छत्रपती संभाजीराजे शिवाजीराजे भोसले (१४ मे १६५७-११ मार्च १६८९) हे छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी सईबाई यांचे थोरले चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते.

छत्रपती संभाजी महाराज छत्रपती तथा धर्मवीर

संभाजी महाराज व पुत्र शाहु महाराज अधिकारकाळ १६ जानेवारी १६८१–११ मार्च १६८९ अधिकारारोहण

छत्रपती पदाभीषेक राज्याभिषेक जानेवारी १६, इ.स. १६८१

राज्यव्याप्ती पश्चिम महाराष्ट्र, कोकण, सह्याद्री डोंगररांगांपासून नागपूरपर्यंत आणि उत्तर महाराष्ट्र, खानदेशापासून ते दक्षिण भारतात तंजावर पर्यंत

राजधानी रायगड

पूर्ण नाव छत्रपती संभाजीराजे शिवाजीराजे भोसले

जन्म १४ मे १६५७ पुरंदर किल्ला, पुणे जिल्हा, महाराष्ट्र

मृत्यू ११ मार्च, १६८९ तुळापूर, महाराष्ट्र (समाधी: वढू, महाराष्ट्र)

पूर्वाधिकारी छत्रपती शिवाजी महाराज

प्रमूख मंत्री कवी कलश

उत्तराधिकारी छत्रपती राजाराम महाराज

वडील छत्रपती शिवाजी महाराज

आई महाराणी सईबाई

पत्नी महाराणी येसूबाई

संतती भवानीबाई शाहू महाराज

राजघराणे भोसले

राजगीत हिंदू पत पातशाह

राजब्रीदवाक्य श्री शंभो: शिवजातस्य मुद्रा द्यौरीव राजते, यंदकसेविनी लेखा वर्तते कस्य नोपरी

चलन होन व शिवराई

बालपण:

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळाले.

संभाजी महाराजांच्या आई, महाराणी सईबाईंचे निधन महाराज लहान असतानाच झाले. त्यानंतर पुण्याजवळील कापूरहोळ गावची धाराऊ पाटील गाडे ही कुणब्याची स्त्री त्यांची दूध आई बनली. संभाजीं महाराजांचा सांभाळ त्यांची आज्जी राजमाता जिजाबाई यांनी केला.

त्यांच्या सावत्र आई, पुतळाबाई[१] यांनी देखील त्यांच्यावर खूप माया केली. मात्र त्यांची सावत्र आई सोयराबाई[२] यांनी संभाजी महाराजांना पोरकेपणाने वागवले तसेच संभाजी महाराजांच्या राजकीय कारकिर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला.

अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजी महाराज अत्यंत देखणे आणि शूर होते. तसेच ते अनेक भाषांत विद्याविशारद व अत्यंत धुरंदर राजकारणी होते. राजकारणातील बारकावे त्यांनी भराभर आत्मसात केले होते. मुघल दरबारातील घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले तर त्याचा त्यांना भविष्यात उपयोग होईल या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे ९ वर्षाचे होते. शिवाजी महाराज कैदेतून निसटल्यानंतर स्वराज्यापर्यंतची धावपळ संभाजी राजांनी सोसू नये आणि त्यामुळे त्यांना काही काळ सुरक्षित ठिकाणी ठेवणे गरजेचे होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी त्यांना मोरोपंत पेशव्यांच्या मेहुण्याच्या घरी मथुरेला ठेवले. मुघली सैनिकांचा संभाजी राजांच्या मागचा ससेमिरा थांबवण्याच्या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा पसरवून दिली. ते महाराष्ट्रात पोहोचल्यानंतर काही काळाने संभाजी महाराज सुखरूपपणे स्वराज्यात येऊन पोहोचले.

तारुण्य:

इ.स. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तोपर्यंत संभाजीराजे राजकारणातील लहान बारकावे आणि रणांगणातील डावपेचांमध्ये तरबेज झाले होते. त्यांच्या विनम्र स्वभावाने राज्याभिषेकासाठी रायगडावर आलेल्या प्रतिनिधींना त्यांनी आपलेसे केले.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर १२ दिवसात जिजाऊंचे निधन झाले. त्यानंतर संभाजीराजांकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही. शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.

तरुण संभाजीराजांचे शिवाजी महाराजांच्या दरबारातील अनुभवी मानकऱ्यांशी अनेकदा मतभेद होऊ लागले. संभाजी महाराजांचा अमात्य अण्णाजी दत्तोंच्या कारभाराला सक्त विरोध होता. शिवाजी महाराजांनी अण्णाजी हे अनुभवी आणि कुशल प्रशासक असल्यामुळे त्यांच्या भ्रष्ट कारभाराकडे अनेकदा दुर्लक्ष केले. पण संभाजी महाराजांना ते मान्य होणे कठीण होते. अण्णाजी दत्तो आणि इतर अनुभवी मानकरी संभाजी महाराजांच्या विरोधात गेले.

दरबारातील काही मानकरी संभाजी महाराजांना अपमानास्पद वागणूक देऊ लागले; हे केवळ अण्णाजी दत्तोंच्या सांगण्यावरून केले. त्यांच्या विरोधामुळे त्यांना शिवाजी महाराजांबरोबर दक्षिण हिंदुस्थानच्या

मोहिमेवर जाता आले नाही. तसेच शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत संभाजी महाराजांचे हुकूम पाळण्यास अष्टप्रधानमंडळाने नकार दिला. त्यामुळे शिवाजी महाराजांना कोकणातील शृंगारपूरचे सुभेदार म्हणून संभाजी महाराजांना पाठवावे लागले.

मुद्रा व दानपत्र:

श्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते| यदं कसेविनी लेखा वतर्ते कस्यनोपरि||

अर्थ: छत्रपती शिवरायांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांची ही राजमुद्रा जणू काही स्वर्गीय तेजाने तळपत आहे, आकाशाप्रमाणे अमर्याद आहे. या राजमुद्रेच्या आश्रयात प्रत्येक माणूस, प्रत्येक प्राणिमात्र महाराजांच्या छत्रछायेखाली असेल. छत्रपतींच्या या राजमुद्रेपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही.

संभाजी महाराजांना साधुसंतांबद्दल आदरभाव होता. ज्येष्ठ मांत्रिक कुडाळ ग्रामनिवासी नामदेवभट्टपुत्र बाकरेशास्त्री यांना करून दिलेल्या संस्कृतमधील दानपत्रावरून त्यांचा आदरभाव कळतो. छत्रपती संभाजी महाराजांना राजपद महत्प्रयासाने प्राप्त झाले होते. त्यांनी राजपद प्राप्तीसाठी नवस केला होता आणि त्यांना राज्याधिकार मिळाल्यानंतर तो नवस फेडण्याच्या इच्छेने त्यांनी नामदेवभट्टपुत्र बाकरेशास्त्री (ज्यांना संभाजी महाराज स्वामी म्हणतात) यांना दरसाल १०,००० पादशाही होनांचे संस्कृत दानपत्र करून दिले. हे दानपत्र संभाजी महाराजांच्या मंचाकारोहणानंतर एका महिन्याने म्हणजे दि. २४ ऑगस्ट १६८० (भाद्रपद शुद्ध १० सोमवार शके १६०२) रोजी केले आहे. दानपत्र ३०० से. मी. लांब आणि २३.५ से. मी. रुंद आहे. या दानपत्राच्या सर्वात वर मधोमध संभाजी महाराजांची १६ बुरुजी मुद्रा आहे व खाली सुवाच्य अक्षरात संस्कृतमध्ये २ ओळी लिहिल्या आहेत. त्या स्वतः शंभूराजांच्या हस्ताक्षरातील आहेत. त्या ओळी खालीलप्रमाणे:

|| मतं मे श्री शिवराजपुत्रस्य श्रीशंभूराज || || छत्रपतेः यद्त्रोपरिलेखितं || छं || श्री ||

यात ते तत्कालीन दानपत्र लेखन पद्धतीप्रमाणे आपल्या पूर्वजांच्या व स्वतःच्या पराक्रमाचे व सद्गुणांचे वर्णन अतिशय सार्थ अशा शब्दांमध्ये करतात. आपले पणजोबा मालोजीराजे यांना शूरश्रेष्ठ व देवब्राम्हण प्रतिपालक असे संबोधतात तर आपले आजोबा महाराज शाहजीराजांस निशायुद्धप्रवीण, तसेच 'हैन्दवधर्मजीर्णोद्धाकरणघृतमति' म्हणजे स्वतःचा जीव धोक्यात घालून हिंदवी (हिंदू) धर्माचा जीर्णोद्धार करणारा असे संबोधतात. आपले वडील श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख 'म्लेंव्छक्षयदीक्षित' म्हणजे आपल्या तारुण्यातच ज्यांनी म्लेंछ क्षयाची दीक्षा घेतली व अनेक ताम्रांना पराभूत केले असा करतात. यावरून छत्रपती संभाजी महाराजांना आपल्या पराक्रमी पूर्वजांविषयी वाटणाऱ्या भावनेचे यथार्थ दर्शन होते.

धार्मिक धोरण:

दि. ६ जानेवारी १६८१ रोजी छत्रपती संभाजी महाराजांनी गोपळभट अग्निहोत्री महाबलेश्वरकर यांच्या पुत्रास लिहिलेल्या पत्रात एक अतिशय समर्पक असे वाक्य आले आहे. ते वाक्य असे, ..राजश्री आबासाहेबांचे जे संकल्पित आहे ते चालवावे हे आम्हास अगत्य... युवराज शंभू राजे छत्रपती झाल्यानंतर त्यांचे अलौकिक आणि अद्भुत अशा कार्याचा जर कुणी आढावा घेतला तर त्याला पदोपदी या वाक्याची प्रचीती येते. त्यांचे राजकीय धोरण, आर्थिक धोरण, प्रजाहितदक्षता या सर्व बाबींमध्ये त्यांनी आपल्या अद्वितीय अशा वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवलेला दिसतो. या प्रमाणेच त्यांच्या धार्मिक धोरणावरही छत्रपती शिवाजी महाराजांचाच ठसा कोरलेला आढळतो.

संतजनांस राजाश्रयः

१. संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे पुत्र महादोबा गोसावी यांस छत्रपती संभाजी महाराजांनी वर्षासनाची नेमणूक करून दिली. (दि. १९ ऑगस्ट १६८०)

२. शिवकालातील प्रसिद्ध पाटगावचे मौनीबाबा यांच्या पालखीस भोई व वाजंत्रीची कायमची व्यवस्था लावून दिली. त्यासाठी वार्षिक १२५ होनांचे आज्ञापत्र करून दिले. (दि.१३ सप्टेंबर १६८०)

३. समर्थ रामदास स्वामींनी अंगापूरच्या डोहात मिळालेल्या राममूर्तीची चाफळ येथे स्थापना करून मंदिर उभारले. तेथील पूजेअर्चेसाठी व नैवेद्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी चैत्र शु. १ शके १५९७ रोजी सनद करून दिली. तीच पुढे छत्रपती संभाजी महाराजांनी चालू ठेवली. तसेच चाफळच्या यात्रेस जमणाऱ्या भाविकांना लष्करातील लोकांचा अथवा मुसलमानी सैन्याचा त्रास होऊ नये व यात्रा यथासांग पार पडावी म्हणून वासुदेव बाळकृष्ण या आपल्या अधिकाऱ्यास आज्ञापत्र लिहिले. (दि. १८ ऑक्टोबर १६८०)

४. चिंचवडचे श्री मोरया गोसावी यांच्या 'माणसांस, शेतापोतांस तसेच गुरांढोरांस काडीचाही तसविज देऊ नये' यासाठी आपल्या लष्करी अधिकाऱ्यास ताकीदपत्र लिहिले. (दि. ६ नोव्हेंबर १६८०)

५. प्रचंडगडाच्या पायथ्याशी गडाच्या संरक्षणासाठी आलेल्या लोकांच्या गाई व म्हशी यांची चराई (वणी) छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी महाराजांनी पण माफ केली (दि. ३१ मार्च १६८१)

६. श्री समर्थांनी अवतारकार्य पूर्ण केल्यावर त्यांच्या मागे सज्जनगड व चाफळ येथील धर्मादाय ऐवज, उत्सव, देवस्थानांची व्यवस्था, यात्रा, समर्थांच्या निर्वाणस्थळी हनुमानाचे देवालय उभारणे इत्यादी गोष्टींकडे जातीने लक्ष पुरविले. त्या संबंधी आपल्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना, आज्ञा, प्रसंगी ताकीद व कडक शब्दात कानउघाडणी देखील केली आहे. या संबधी एका पत्रात संभाजी महाराजांनी कऱ्हाड प्रांताचा सुभेदार रंगो विश्वनाथ यांस श्रीचे कार्यास हैगै कराया तुम्हास काय गरज?... अशा स्पष्ट शब्दात खडसावले आहे.

७. चिंचवडच्या देवस्थानास आपल्या लष्कराकडून उपद्रव होतो अशी तक्रार आल्यावर छत्रपती संभाजी महाराजांनी पुणे प्रांताच्या सुभेदार व जुमलेदारांना ..जो धामधूम करील त्याला स्वामी जीवेच मारतील... अशी अत्यंत परखड शब्दात समज दिली आहे.

८. वाई प्रांताचा सुभेदार येसाजी मल्हार यास निंब येथील सदानंद गोसावींच्या मठास दरसाल नेमून दिलेला ऐवज पोचता न केल्याचे कळताच संभाजी महाराजांनी धर्मकार्यात खलेल न करणे. अशा शब्दांत ताकीद दिली आहे. व तेथील आनंदगिरी गोसावी यांना पत्र लिहून धर्माच्या कार्यास अंतर पडणार नाही... असे अभिवचन दिले आहे.

सक्तीने धर्मांतरास विरोध:

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतर करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज, व मुसलमान सत्ताधीशांना कडाडून विरोध केलेला दिसतो. छत्रपती संभाजी महाराज व हेनरी ग्यारी यांच्यात इ.स. १६८४ साली झालेल्या तहातील एक कलम आहे, 'That the English shall buy none of my people belonging to my dominion, to make them slaves or Christians'

अंत्रुज परगण्यातील अडकोळण गावचा शिलालेख:

छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत मराठी राज्याचा अंमल गोमंतक परिसरात सुरू झाला. तेव्हापासून व्यापारी माणसांकडून घेण्यात येणारा अंगभाडे कर संभाजी महाराजांच्या आज्ञेने माफ करण्यात आला. या संबंधी फोंड्याजवळ अंत्रुज येथील हडकोळण या गावी एक शिलालेख आहे. या शिलालेखात संभाजी महाराजांनी मुख्याधिकारी मामले फोंडा धर्माजी नागनाथ यास करमाफीसंबंधी आज्ञा करताना मराठी अंमलाला उद्देशून खालील वाक्य कोरले आहे.

'...आता हे हिंदुराज्य जाहलेपासोन...पुढे या प्रमाणे सकळाहि चालवावे सहसा धर्मकृत्यास नाश करू नये करतील त्यांसी महापातक आहे...'

प्रधान मंडळ:

सिंहासनाधीश्वर श्रीमंत छत्रपती-संभाजीराजे शिवाजीराजे भोसले (सेनाधीशांचे सेनाधीश-सर्वोच्च अधिकार असलेले)

श्री सखी राज्ञी जयति छत्रपती येसूबाई संभाजीराजे भोसले (संभाजीराजांच्या गैरहजेरीत राजव्यवस्थेच्या कारभारी)

सरसेनापती - हंबीरराव मोहिते, छांदोगामात्य - कवी कलश, पेशवे - निळो मोरेश्वर पिंगळे, मुख्य न्यायाधीश - प्रल्हाद निराजी, दानाध्यक्ष - मोरेश्वर पंडितराव, चिटणीस - बाळाजी आवजी, सुरनीस - आबाजी सोनदेव, डबीर - जनार्दनपंत, मुजुमदार - अण्णाजी दत्तो, वाकेनवीस - दत्ताजीपंत.

औरंगजेबाची दख्खन मोहीम:

औरंगजेबाने इ.स. १६८२ मध्ये मराठ्यांवर हल्ला केला. औरंगजेबाचे सामर्थ्य सर्वच बाबतीत संभाजी महाराजांपेक्षा जास्त होते. त्याचे सैन्य मराठ्यांच्या सैन्याच्या पाचपटीने जास्त होते तर औरंगजेबाचे साम्राज्य संभाजी महाराजांच्या स्वराज्यापेक्षा कमीतकमी १५ पटींनी मोठे होते. त्याकाळी जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्यांमध्ये औरंगजेबाच्या सैन्याचा समावेश होत होता. तरीही संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी हिमतीने लढा दिला. मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंझारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होय. औरंगजेबाच्या सरदारांची अशी अपेक्षा होती की तो किल्ला काही तासांतच शरणागती पत्करेल. पण मराठ्यांनी असा चिवट प्रतिकार केला की तो किल्ला जिंकण्यासाठी त्यांना तब्बल साडेसहा वर्षे लढावे लागले. संभाजी महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना असा जोरदार धडा शिकवला की त्यांची संभाजी महाराजांविरुद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत झाली नाही. तसेच त्यांपैकी कोणीही त्यांच्याविरुद्ध उलटू शकला नाही. संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी सर्व शत्रूंशी एकहाती झुंज दिली.

इ.स. १६८७-८८ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे परिस्थिती कठीण झाली होती.

दगाफटका:

इ.स. १६८९ च्या सुरुवातीला संभाजी महाराजांनी त्यांच्या महत्त्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणात संगमेश्वर येथे बोलावले. १ फेब्रुवारी, इ.स. १६८९ रोजी बैठक संपवून संभाजी महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला. या कारवाईसाठी गुप्तता बाळगली आणि सर्व कारवाईची आखणी खूपच काळजीपूर्वक केली. मराठ्यांत आणि शत्रूच्या सैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत्नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. शत्रूने संभाजीमहाराजांना व त्यांच्यासोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.

महाराजांना वाचवण्याचे प्रयत्न:

छत्रपती संभाजी महाराज संगमेश्वरी पकडले गेल्यानंतर त्यांना वाचवण्याचे प्रयत्न झाले नाही असे नाही. महाराजांना वाचवण्यासाठी प्रयत्न मावळ्यांनी केले पण ते त्यात यशस्वी झाले नाही. यात सर्वात पहिला प्रयत्न हा

जोत्याजी केसरकर यांनी केला. पुढे जाऊन अप्पा शास्त्री यांनी देखील महाराजांना सोडवण्याचा प्रयत्न केला पण हे दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले.

शारीरिक छळ व मृत्यू:

त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज आणि त्यांचे सल्लागार कवी कलश यांना औरंगजेबापुढे बहादुरगड, आता धर्मवीरगड येथे आणण्यात आले. औरंगजेबाने संभाजी महाराजांना सर्व किल्ले त्याच्या स्वाधीन केल्यास जीवदान देण्याचे मान्य केले. पण संभाजी महाराजांनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. औरंगजेबाने संभाजी महाराज आणि कवी कलश यांची विदूषकाचे कपडे घालून अत्यंत मानहानीकारक अशी धिंड काढण्यात आली. तरीही संभाजी महाराजांनी शरणागती पत्करण्यास नकार दिला. तेव्हा औरंगजेबाने त्यांना क्रूरपणे अत्यंत हालहाल करून ठार मारायचा आदेश दिला. तरीसुद्‌धा संभाजी महाराजांनी हार मनली नाही.

साहित्य:

अफाट मोगली सैन्याशी धैर्याने आणि असामान्य शौर्याने लढा देणारा हा छत्रपती उत्तम साहित्यिक आणि संस्कृत भाषेचा उत्तम जाणकारही होता. संभाजी महाराजांनी वयाच्या चौदाव्या वर्षी बुधभूषण-राजनीती हा संस्कृत ग्रंथ लिहिला.

बुधभूषण या ग्रंथात अतिशय सुंदर आणि अलंकारिक भाषेत आपले वडील शिवाजीराजे यांचा उल्लेख आहे:

'कलिकालभुजंगमावलीढं निखिलं धर्मवेक्ष्य विक्लवं यः । जगत: पतिरंशतोवतापो: (तीर्ण:) स शिवछत्रपतिजयत्यजेयः ॥

अर्थ-"कलिकालरूपी भुजंग घालितो विळखा, करितो धर्माचा ऱ्हास तारण्या वसुधा अवतरला जगत्पाल, त्या शिवप्रभूंची विजयदुंदुभी गर्जू दे खास ॥"

याचबरोबर संभाजी महाराजांनी नायिकाभेद, नखशिखा, सातशतक या तीन ग्रंथांचे लिखाण केले. गागाभट्‌टांनी समयनय हा ग्रंथ लिहून संभाजी महाराजांना अर्पण केला.

संभाजीमहाराजांविषयी इतिहास लेखन:

ज्वलज्वलनतेजस संभाजीराजा - डॉ. सदाशिव शिवदे, अद्‌वितीय छत्रपती श्रीसंभाजी महाराज (संशोधनात्मक ग्रंथ - खंड १ ते ५) - अनंत दारवटकर, राजा शंभूछत्रपती - विजयराव देशमुख, पोर्तुगीज कागदपत्रे - डॉ.पांडुरंग पिसुर्लेकर,

पोर्तुगीज-मराठे संबंध - डॉ.पांडुरंग पिसुर्लेकर, The Portuguese and The Marathas translated by P.R. Kakodkar, फ्रेंच-मराठा संबंध - लेखक?, बिकानेर पुरालेखाभिगार - राजस्थान

संभाजीकालीन पत्रसार संग्रह (शा.१६०२ - शा.१६१०) : संपादक - शंकर नारायण जोशी; प्रकाशक भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे) (पहिली आवृत्ती - १९४९; नवीन आवृत्ती - ऑगस्ट २०१५)

छत्रपती संभाजी महाराजांची पत्रे : डॉ. सदाशिव शिवदे यांच्या या पुस्तकात छत्रपती संभाजीराजांच्या ३१५ पत्रांचा परिचय करून देण्यात आला आहे.

बुधभूषण-राजनीती - संपादक : प्रा. रामकृष्ण आनंदराव कदम (कदंब), राजमयूर प्रकाशन, पुणे

शाक्तवीर संभाजी महाराज (ॲडव्होकेट अनंत दारवटकर)

छत्रपती संभाजी महाराज प्रकाशन यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते (पृष्ठसंख्या ७५०, पहिली आवृत्ती १९६०,पी.पी.एच.बुक स्ट.प्रकाशन १९७१ २री-आवृती,मनोरमा प्रकाशन ३री आवृती २००१, लेखक: वा.सी. बेंद्रे (इ.स.१९१८ ते इ.स.१९५८म्हणजे सुमारे ४० वर्षे अथक मेहनत करून त्यांनी अखेर १९६० मध्ये संभाजी महाराजांचे सत्य चरित्र सर्वांसमोर आणले).

छत्रपती संभाजी महाराजांची राजनीती (डॉ. केदार महादेवराव फाळके)

छ. संभाजी स्मारक ग्रंथ - संपादन- डॉ. जयसिंगराव पवार

रणझुंजार : डॉ. सदाशिव शिवदे

शिवपुत्र संभाजी : डॉ. कमल गोखले

सभासद बखर, चिटणीस बखर, शेडगावकर बखर, पंतप्रतिनिधी बखर, बावडेकर अमात्यांची बखर, न्यायशास्त्री बखर इत्यादी निरनिराळ्या मराठी बखरींमध्येही संभाजीराजांसंबंधी माहिती मिळते. याशिवाय मनुचीसारख्या परकीय फिरस्त्याच्या Storio De mogor मधून सुद्धा माहिती मिळू शकते.

फारसी दस्तावेज -

फुतूहाते आलमगिरी - ईश्वरदास नागर

खुतूते शिवाजी मधील निवडक पत्रे

मुन्तखबुललुबाब महंमदशाही - खाफी खान

तारीखे दिल्कुशा - भीमसेन सक्सेना

मासिरे आलमगिरी - साकी मुस्तैदखान

अहकामे आलमगिरी - इनायतुल्ला खान

मोगल दरबाराची बातमीपत्रे

ललित साहित्य:

(संभाजी महाराजांवरील ऐतिहासिक कथा कथने आणि कादंबऱ्या)

अर्घ्य - नयनतारा देसाई (१९७३), अश्रू ढळले रायगडाचे - अर्जुनराव झेंडे, नाटक., आम्ही यातनांचे स्वामी - वा.ना. देशपांडे, १९७३, इथे ओशाळला मृत्यू - वसंत कानेटकर, नाटक., खरा संभाजी - प्रा. नामदेवराव जाधव, छत्रपती संभाजी - मनमोहन नातू, छत्रपती संभाजी महाराज अथवा राजाचे दुष्कर्म राजाला भोवतेव प्रजेलाही भोवते - ना.वि. बापट, छत्रपती संभाजी राजे - नाटक, वासुदेवशास्त्री खरे, १८८५), छावा - शिवाजी सावंत, छावा (कादंबरी, लेखक - शिवाजी सावंत); (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७९), धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज - अरुण जाखडे (पद्मगंधा प्रकाशन), धर्मवीर संभाजी- ग.कृ. गोडसे, नाटक-१९४१, बेबंदशाही - वि.ह. औंधकर, नाटक-१९२४, मराठी साहित्यातील संभाजी - प्रबंध - डॉ. शालिनी मोहोड, मराठ्यांची धारातीर्थे - प्रवीण व. भोसले (नरसिंह पब्लिकेशन्स), मानी मराठा - नाना कोचरेकर, नाटक-१९५०, मी मृत्युंजय संभाजी (संजय सोनवणी), राजसंन्यास - राम गणेश गडकरी, नाटक-१९२२, राजा शंभू छत्रपती - विजय देशमुख, रायगडाला जेव्हा जाग येते - वसंत कानेटकर, नाटक-१९६३, वज्रदेही संभाजी - ना.ल. मोरे, नाटक-१९८३, शंभूराजे - गावंडे, २०००, शंभूराजे - दशरथ यादव (काव्य), शंभूराजे - प्रा. सु.ग. शेवडे (धर्मसेवा प्रकाशन), शहेनशाह - ना.सं. इनामदार (कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९९८), शापित राजहंस - अनंत तिबिले (रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, १९७८)., शिवतेज संभाजी (त्रिमिती चरित्र, संतोष रासकर), शिवपुत्र - राजकुंवर बोबडे, १९८१, शिवपुत्र संभाजी - डॉ. कमल गोखले (कॉन्टिनेन्टल प्रकाशन), शिवस्नुषा येसूबाई, - सुशीला खेडकर (उन्मेष प्रकाशन, १९९२), संभवामि युगे युगे - मनमोहन नातू, संभाजी - विश्वास पाटील (मेहता पब्लिशिंग हाउस), सह्याद्री सांगे कथा शंभुची - आबासाहेब आचरेकर (नाटक-त्रिदल प्रकाशन, गिरगांव, मुंबई, १९८४), स्वधर्मसूर्य संभाजी - स्वामी धर्मव्रत (नाटक-शुभेच्छा प्रकाशन, डोंबिवली (पश्चिम), १९९५), स्वराज्यावरील संकट - नाथ माधव

नाटके:

संभाजी महाराजांवरील नाटके इथे ओशाळला मृत्यू (लेखक : वसंत कानेटकर), चैतन्यगाथा तेजपुत्राची (लेखक : ?), संगीत छत्रपती संभाजी (लेखक : आत्माराम मोरेश्वर पाठारे), बेबंदशाही (लेखक : वि.ह. औंधकर),

मृत्युंजय अमावस्या (महा-नाट्य : लेखक/दिग्दर्शक : नीलेश भिसे), राजसंन्यास (लेखक : राम गणेश गडकरी), रायगडाला जेव्हा जाग येते (लेखक : वसंत कानेटकर); एप्रिल २०१३पर्यंत २४२५ प्रयोग, शंभुराजे (महानाट्य) : (लेखक : नितीन बानुगडे पाटील), शूर संभाजी (लेखक : ?), शिवपुत्र शंभुराजे (महानाट्य) (दिग्दर्शन/संवादः महेंद्र महाडीक), नरशार्दुल राजा संभाजी (लेखक - इंद्रजित सावंत)

🦚 🦚 🦚 सावित्रीबाई फुले मराठी भारतीय समाजसुधारक

सावित्रीबाई जोतीराव फुले (३ जानेवारी, इ.स. १८३१-१० मार्च, इ.स. १८९७) या एक भारतीय समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि कवयित्री होत्या. त्यांना भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखले जाते. आपले पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत त्यांनी भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. सावित्रीबाई आणि त्यांचे पती यांनी १८४८ मध्ये पुणे येथील भिडेवाड्यात मुलींच्या शाळेची स्थापना केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरुवातीच्या शाळांपैकी एक होती.

सावित्रीबाई फुले

टोपणनाव: ज्ञानज्योती, क्रांतिज्योती

जन्म: ३ जानेवारी, इ.स. १८३१ नायगाव, सातारा, महाराष्ट्र

मृत्यू: मार्च १०, इ.स. १८९७ पुणे, महाराष्ट्र

चळवळ: मुलींची पहिली शाळा सुरू करणे

संघटना: सत्यशोधक समाज

पुरस्कार: क्रांतीज्योती

प्रमुख स्मारके: जन्मभूमी नायगाव

धर्म: हिंदू

वडील: खंडोजी नेवसे (पाटील)

आई: सत्यवती नेवसे

पती: जोतीराव फुले

अपत्ये: यशवंत फुले

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. त्यांनी जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. सावित्रीबाई या लेखिका देखील होत्या. त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले.

१८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

३ जानेवारी हा सावित्रीबाईंची जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. २०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले. ३ जानेवारी, २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या १८६ व्या जन्मदिनानिमित्त त्यांचे गूगल डूडल प्रसिद्ध करून गूगलने त्यांना अभिवादन केले.

चरित्र:

सावित्रीबाईंच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर गावचे पाटील असणाऱ्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. इ.स. १८४० साली जोतीराव फुले यांचेशी सावित्रीबाईंचा विवाह झाला. लग्नाच्या वेळी सावित्रीबाईंचे वय नऊ, तर जोतीरावांचे वय तेरा वर्षांचे होते. सावित्रीबाईचे सासरे गोविंदराव फुले हे मुळचे फुरसुंगीचे गोरे, परंतु पेशव्यांनी त्यांना पुण्यातील फुलबागेची जमीन बक्षीस दिली म्हणून ते पुण्याला येऊन राहिले व फुलांच्या व्यवसायावरून त्यांना "फुले" हे आडनाव मिळाले.

औरंगाबाद येथे जोतीराव आणि सावित्रीबाई फुले यांचे भव्य पुतळे आहेत

सावित्रीबाईंचे पती जोतीराव यांना लहानपणापासूनच मातृप्रेम लाभले नाही. त्यांची मावस आत्या सगुणाऊ यांनीच त्यांचा सांभाळ केला होता. सगुणाऊ एका इंग्रज अधिकाऱ्याच्या मुलाच्या दाई म्हणून काम करायच्या. त्यांना इंग्रजी कळायचे व बोलताही यायचे. त्यांनी आपल्या या ज्ञानाचा उपयोग जोतीरावांना प्रेरित करण्यासाठी केला. जोतीरावही शिक्षणाकडे आकर्षित झाले. सावित्रीबाईंना ख्रिश्चन मिशनऱ्यांनी लग्नापूर्वी दिलेले एक पुस्तक त्या सासरी घेऊन आल्या होत्या. त्यावरून जोतीरावांनाही एक नवा मार्ग सापडला. त्यांनी स्वतः शिकून सावित्रीबाईंना शिकवले. सगुणाऊ तर सोबत होतीच. दोघींनी रीतसर शिक्षण घेतले.

१ मे, इ.स. १८४७ रोजी सावित्रीबाईंनी सगुणाऊला मागासांच्या वस्तीत एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा. गुणाऊंना त्या शाळेत बोलाविण्यात आले. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे ही पहिली शाळा मध्येच बंद पडली. १ जानेवारी, इ.स. १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. साऱ्या कर्मठ मनुवादी समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली.

(यापूर्वी मिशनऱ्यांनी आणि अन्य लोकांनी काढलेल्या १४-१५ शाळा उत्तर भारतात होत्या.) या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागांतही २-३ मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या व काही काळ चालवल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टूडन्ट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीने ’कमळाबाई हायस्कूल’ नावाची मुलींसाठीची शाळा सुरू केली, ती शाळा २०१६ सालीही चालू आहे. (मिशनरी नसलेले पिअरी चरण सरकार यांनी मुलींसाठी पहिली शाळा बारासात टाऊन येथे १८४७ मध्ये काढली. शाळेसाठी नवीन कृष्ण मित्र आणि काली कृष्ण मित्र या दोन भावांनी आर्थिक मदत केली. ही शाळा कालीकृष्ण हायस्कूल या नावाने चालू आहे. मुंबईत पारशी लोकांनी १८४९ मध्ये मुले आणि मुलींसाठी पहिली सहशिक्षण शाळा काढली, पण काही दिवसातच या शाळेच्या मुलांसाठी आणि मुलींसाठी अशा दोन शाखा झाल्या.)

सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला शाळेत सहा मुली होत्या, पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०-४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी "धर्म बुडाला.... जग बुडणार.... कली आला...." असे सांगून केले. मनुवादी सनातन्यांनी विरोध केला. अंगावर शेण फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. पण अनेक संघर्ष करत हा सावित्रीबाईंचा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. त्यासाठी त्यांना घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत.

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. काही क्रूर रूढींनाही त्यांनी आळा घातला. बाल-जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत. गरोदर विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भ्रूणहत्या करत.

जोतिरावांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालवले. फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत. या बालहत्या प्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपलीच मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.

केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीबाईंनी कल्पकतेने पार पाडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर (इ.स. १८९०) सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला. 'काव्यफुले' व 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. पुढील काळात त्यांची भाषणेही प्रकाशित करण्यात आली.

इ.स. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले. त्यांच्या कार्याला हातभार म्हणून पंडिता रमाबाई, गायकवाड सरकार अशा लोकांनी मदतीचा हात पुढे केला.

इ.स. १८९६-९७ सालांदरम्यान पुणे परिसरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. हा रोग संसर्गजन्य आहे हे कळल्यावर ब्रिटिश शासनाने जबरदस्तीने संभाव्य रुग्णांना वेगळे काढून स्थानांतरित करण्याचा खबरदारीचा उपाय योजला. यातून उद्‌भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेग झाला. त्यातून १० मार्च, इ.स. १८९७ रोजी त्यांचे निधन झाले.

सावित्रीबाईनी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला स्त्रियांनी शिकावे हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. अनाथांना आश्रय मिळवा हेही त्याचे कार्यक्षेत्र होते. सामजिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. त्यामुळेच १८७६-७७ च्या दुष्काळात त्यांनी खूप कष्ट केले. पुढे १८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आली असताना त्यांनी आपल्या स्वतःच्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वतःच प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या. प्लेग मुळेच त्यांचे निधन झाले.

शिक्षण:

लग्नाच्या वेळी सावित्रीबाई निरक्षर होत्या. ज्योतिरावांनी सावित्रीबाईंना त्यांच्या घरीच शिक्षण दिले. ज्योतिरावांकडे त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणाची जबाबदारी ज्योतीरावांचे मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर यांच्याकडे होती. त्यांनी स्वतःला दोन शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातही सहभागी करून घेतले. पहिली अहमदनगरमधील अमेरिकन मिशनरी सिंथिया फरार यांनी चालवलेल्या संस्थेत होती. दुसरा अभ्यासक्रम पुण्यातील एका सामान्य शाळेत होता. त्यांचे प्रशिक्षण पाहता, सावित्रीबाई या पहिल्या भारतीय महिला शिक्षिका आणि मुख्याध्यापिका झाल्या असतील. सावित्रीबाईंची जन्मतारीख, म्हणजे ३ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात, विशेषतः मुलींच्या शाळांमध्ये बालिका दिन म्हणून साजरा केला जातो.

सावित्रीबाईंना "क्रांतीज्योती" म्हणूनही ओळखले जाते.

मृत्यू:

सावित्रीबाई आणि त्यांचा दत्तक मुलगा यशवंत यांनी १८९७ मध्ये नालासोपारा परिसरात बुबोनिक प्लेगच्या जगभरातील तिसऱ्या साथीच्या रोगाने प्रभावित झालेल्यांवर उपचार करण्यासाठी एक क्लिनिक उघडले. क्लिनिकची स्थापना पुण्याच्या बाहेरील भागात, संसर्गमुक्त भागात करण्यात आली. पांडुरंग बाबाजी गायकवाड यांच्या मुलाला वाचवताना सावित्रीबाईंचा वीरतापूर्वक मृत्यू झाला. गायकवाड यांच्या मुलाला मुंढव्याबाहेरील महार वस्तीत प्लेग झाला हे कळताच सावित्रीबाई फुले त्यांच्या पाठीशी धावून गेल्या आणि त्यांना पाठीवर घेऊन रुग्णालयात नेले. या प्रक्रियेत, सावित्रीबाई फुले यांना प्लेगची लागण झाली आणि १० मार्च १८९७ रोजी रात्री ९.०० वाजता त्यांचा मृत्यू झाला.

साहित्य:

सावित्रीबाई फुले या लेखिका आणि कवयित्रीसुद्धा होत्या. त्यांनी १८५४ मध्ये काव्यफुले आणि १८९२ मध्ये बावनकाशी सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आणि "जा, शिक्षण मिळवा" नावाची कविता देखील प्रकाशित केली, ज्यामध्ये त्यांनी वंचित लोकांना शिक्षण घेऊन स्वतःला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या अनुभवाचा आणि कामाचा परिणाम म्हणून त्या एक उत्कट स्त्रीवादी बनल्या. महिलांच्या हक्कांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली. त्यांनी महिलांसाठी जातीय भेदभाव किंवा कोणत्याही प्रकारचा भेदभाव मुक्त असलेल्या मेळाव्याचे ठिकाण देखील बोलावले. याचे प्रतिक म्हणजे उपस्थित सर्व महिलांनी एकाच चटईवर बसायचे. त्या भ्रूणहत्या विरोधी कार्यकर्त्यासुद्धा होत्या.

त्यांनी महिलासांठी निवारास्थान उघडले, जेथे ब्राहमण विधवा त्यांच्या मुलांची सुरक्षितपणे प्रसूती करू शकत होत्या आणि त्यांची इच्छा असल्यास त्यांना दत्तक घेण्यासाठी तेथे सोडू शकतात. त्यांनी

बालविवाहाविरुद्धही मोहीम चालवली आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. सावित्रीबाई आणि ज्योतिरावांनी सतीप्रथेला कडाडून विरोध केला आणि त्यांनी विधवा आणि वंचित मुलांसाठी घर सुरू केले.

ज्योतिरावांना लिहिलेल्या पत्रात, सावित्रीबाईंनी मध्यस्थी केल्यावर खालच्या जातीतील एका महिलेशी संबंध ठेवल्याबद्दल एका मुलाची त्याच्या गावकऱ्यांनी मारहाण केल्याची कथा सांगितली. त्यांनी लिहिले, "मला त्यांच्या हत्येच्या योजनेबद्दल कळले. मी घटनास्थळी धाव घेतली आणि त्यांना भिती दाखवली आणि ब्रिटीश कायद्यानुसार प्रेमींना मारण्याचे गंभीर परिणाम दाखवून दिले. माझे ऐकून त्यांनी त्यांचे मत बदलले."

सावित्रीबाईंची प्रकाशित पुस्तके;

काव्यफुले (काव्यसंग्रह), सावित्रीबाईंची गाणी (१८९१), सुबोध रत्नाकर बावनकशी, जोतिबांची भाषणे (संपादक सावित्रीबाई फुले १८५६), असावा.

सावित्रीबाई फुले यांचा वारसा फार मोठा आहे. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य अत्यंत आदरणीय मानले जाते.

बी.आर.आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या सोबतच फुले या मागासवर्गीयांसाठी एक आयकॉन बनल्या आहेत. मानवी हक्क अभियान (मानवी हक्क अभियान, एक मांग-आंबेडकरी संस्था) च्या स्थानिक शाखांमधील महिला त्यांच्या जयंतीला (मराठी आणि इतर भारतीय भाषांमध्ये वाढदिवस) अनेक मिरवणुका काढतात.

पुणे महानगरपालिकेने १९८३ मध्ये त्यांचे स्मारक तयार केले.

१० मार्च १९९८ रोजी फुले यांच्या सन्मानार्थ भारतीय टपाल विभागाने टपाल तिकीट प्रसिद्ध केले.

३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात विशेषतः मुलींच्या शाळांमध्ये अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

२०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले.

३ जानेवारी २०१७ रोजी, सर्च इंजिन गूगलने ने गूगल डूडलद्वारे सावित्रीबाई फुले यांच्या १८६ व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली.

सन्मान:

१९९८ चे टपाल तिकीट

पुणे येथील हे शिक्षण कार्य पाहून १८५२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी सरकारने फुले पतिपत्नींचा मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला आणि शाळांना सरकारी अनुदानही देऊ केले. त्यानंतरही सावित्रीबाई फुल्यांनी, भारतातल्या त्या पहिल्या शिक्षिकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालूच ठेवले. त्यांनी ’गृहिणी’ नावाच्या मासिकात काही लेखही लिहिले आहेत. सावित्रीबाईंच्या सामजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासुन ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन हा “बालिकादिन” म्हणून साजरा केला जातो.

मालिका:

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ही दूरदर्शनच्या 'किसान' वाहिनीवर २८ सप्टेंबर २०१५ पासून सोमवार ते शुक्रवार या काळात सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील हिंदी मालिका दाखविली गेली होती.

सावित्रीजोती ही फुले दाम्पत्यावरील मालिका सोनी मराठी वाहिनीवर ६ जानेवारी २०२० पासून प्रदर्शित होत आहे. ही मालिका दशमी क्रिएशनची निर्मिती आहे. सावित्रीबाई फुले यांची भूमिका अभिनेत्री अश्विनी कासार साकारत असून जोतीराव फुले यांची भूमिका ओंकार गोवर्धन साकारत आहेत. मालिकेचे दिग्दर्शन उमेश नामजोशी यांचे असून नितीन वैद्य यांची निर्मिती आहे. मालिकेच्या अभ्यासपूर्ण संहितेसाठी साहित्यिक व विचारवंत हरी नरके यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.

सावित्रीबाई फुले यांच्यावरचे प्रकाशित साहित्य, कार्यक्रम वगैरे:

Savitribai - Journey of a Trailblazer (Publisher : Azim Premji University), 'हाँ मैं सावित्रीबाई फुले' (हिंदी), (प्रकाशक : अझीम प्रेमजी विद्यापीठ), सावित्रीबाई फुले (लेखक : अभय सदावर्ते), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले (लेखिका उषा पोळ-खंदारे), Savitribai Phule (इंग्रजी, N. K. Ghorpde), कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले (लेखिका डॉ. किरण नागतोडे), सावित्रीबाईचा संघर्ष (के.डी. खुर्द), थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले (केतन भानारकर), पुण्यश्लोक सावित्रीबाई फुले (गौरी पाटील), युगस्त्री सावित्रीबाई फुले (विठ्ठल लांजेवार), सावित्रीबाई फुले (लेखक : जी.ए. उगले), सावित्रीबाई फुले (लेखक : डी.बी. पाटील), जोतिकांता सावित्री (दा.स. गजघाटे), सावित्रीबाई फुले (प्रा. झुंबरलाल कांबळे), Shayera.Savitri Bai Phule (in urdu) Author Dr. Nasreen Ramzan Sayyed, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (लेखक : ना.ग. पवार), सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व (लेखक : ना.ग. पवार), क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (लेखक : नागेश सुरवसे), स्त्री महात्मा सावित्रीबाई फुले (नाना ढाकुलकर), मी जोतीबांची सावित्री (नारायण अतिवाडकर), सावित्रीबाई फुले (लेखिका : निशा डंके), सावित्रीबाई फुले (लेखिका : प्रतिमा इंगोले), सावित्रीबाई फुले (प्रमिला मोडक), थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले (प्रेमा गोरे), साध्वी सावित्रीबाई फुले (लेखिका : फुलवंता झोडगे). - चिनार प्रकाशन, सावित्रीबाई फुले चरित्र (बा.गं. पवार), तेजाचा वारसा सावित्रीबाई फुले (लेखिका : प्रा. मंगला गोखले), क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले (डॉ. मा.गो. माळी) - मॅजेस्टिक प्रकाशन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (डॉ. मा.गो. माळी) - स्नेहवर्धन प्रकाशन, सावित्रीबाई फुले - श्रद्धा (लेखक : मोहम्मद शाकीर),

सावित्रीबाई फुले (लीला शाह), ज्ञान ज्योती माई सावित्री फुले (लेखिका : विजया इंगोले), त्या होत्या म्हणून (लेखिका : डॉ. विजया वाड), Savitribai Phule (इंग्रजी, विठ्ठलराय भट), युगस्त्री : सावित्रीबाई फुले (विठ्ठल लांजेवार), सावित्रीबाई जोतिबा फुले : जीवनकार्य (शांता रानडे), क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (लेखिका : शैलजा मोलक), साध्वी सावित्रीबाई फुले (सविता कुलकर्णी) - भारतीय विचार साधना प्रकाशन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (सौ. सुधा पेठे), 'व्हय मी सावित्रीबाई फुले' (नाटक) (एकपात्री प्रयोगकर्ती आद्य अभिनेत्री : सुषमा देशपांडे) (अन्य सादरकर्त्या - डॉ. वैशाली झगडे), क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (विद्याविकास) (लेखक : ज्ञानेश्वर धानोरकर),

सावित्रीबाई संमेलन/अभ्यासकेंद्र/पुरस्कार:

सावित्रीबाई फुले यांच्या नावाने एक सावित्रीबाई फुले साहित्य संमेलन भरते. याशिवाय, द्वितीय ज्योती-सावित्री साहित्य संमेलन या नावाचे पहिले राज्यस्तरीय संमेलनही नागपूर येथे २-३ जानेवारी २०१२ या तारखांना भरले होते.

पुणे विद्यापीठाच्या नावाचा विस्तार करून ते ‘सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ’ असे करण्यात आले आहे.

पुणे विद्यापीठात ‘क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र' या नावाचे एक अभ्यासकेंद्र आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या नावाने काही संस्थांनी पुरस्कार ठेवले आहेत. ते असे :-

कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने देण्यात येणारा क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय पुरस्कार.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सामाजिक कार्यासाठीचा 'सावित्रीबाई फुले पुरस्कार'. हा पुरस्कार २०११-१२ सालापासून दरवर्षी, महिला-बालकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या एका समाजसेविकेस दिला जातो. ५००१ रुपये रोख, व सन्मानपत्र, शाल व श्रिफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

महाराष्ट्र सरकारचा सावित्रीबाई फुले पुरस्कार

चिंचवडगाव येथील महात्मा फुले मंडळाचे क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले पुरस्कार

महात्मा फुले प्रतिभा संशोधन अकादमी (पुणे) तर्फे सावित्रीबाई तेजस कला राष्ट्रीय पुरस्कार

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले 'आदर्श माता' पुरस्कार

क्रांतिज्योती सावित्रीबाई आदर्श शिक्षिका पुरस्कार

मध्य प्रदेश सरकारचा उत्तम शिक्षिकेसाठीचा एक लाख रुपयांचा वार्षिक सावित्रीबाई पुरस्कार (२०१२ सालापासून)

सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना दिले जाणारे स्त्रीरत्न पुरस्कार : आदर्श माता रत्न, उद्योग रत्न, कला रत्न, क्रीडा रत्न, जिद्द रत्न, पत्रकारिता रत्न, प्रशासकीय रत्न, वीरपत्नी रत्न, शिक्षण रत्न

मराठी पत्रकार परिषदेचा सावित्रीबाई फुले पुरस्कार

महाराष्ट्र नर्सिंग काउन्सिलचा सर्वोत्कृष्ट नर्सला देण्यात येणारा सावित्रीबाई फुले पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सासवडचे शाखेतर्फे सामाजिक/शैक्षणिक कामासाठीचा सावित्रीबाई पुरस्कार

माझी मैत्रीण ट्रस्टतर्फे देण्यात येणारा सावित्रीबाई फुले पुरस्कार : २११६ साली हा पुरस्कार सहेली संस्थेच्या तेजस्वी सेवेकरी यांना देण्यात आला.

युनाइटेड ओबीसी फोरमचा सावित्रीवाई फुले वैचारिक वाङ्मय पुरस्कार.

वसईच्या लोकमत सखी मंच आणि प्रगत सामाजिक शिक्षण संस्था यांच्यातर्फे देण्यात येत असलेला सावित्रीबाई फुले पुरस्कार

सावित्रीवाई फुले यांच्या नावाची दत्तक-पालक योजना आहे.

लोकप्रिय संस्कृतीत:

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ही त्यांच्या जीवनावर आधारित भारतीय नाटक दूरदर्शन मालिका २०१६ मध्ये डीडी नॅशनलवर प्रसारित झाली.

सावित्री ज्योती ही मालिका सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आणि कार्यावर आधारित आहे. ही मराठी नाटक दूरदर्शन मालिका २०१९-२० मध्ये सोनी मराठीवर प्रसारित झाली.

त्यांच्या जीवनावर आधारित २०१८ मध्ये सावित्रीबाई फुले या नावाचा कन्नड भाषेत चरित्रपट तयार करण्यात आला.

२०२१ मध्ये, पुणे विद्यापीठाने फुले यांचा १२.५ फूट आकाराचा कांस्य पुतळा तयार केला, त्याचे उद्घाटन २०२२ मध्ये होणे अपेक्षित आहे.

🦚🦚🦚 जोतिराव फुले जन्म: ११ एप्रिल, इ.स. १८२७ कटगुण, सातारा, महाराष्ट्र. मृत्यू: २८ नोव्हेंबर, इ.स. १८९० पुणे, महाराष्ट्र. वडील: गोविंदराव. आई: चिमणाबाई. पत्नी: सावित्रीबाई फुले.
फुले (११ एप्रिल, इ.स. १८२७-२८ नोव्हेंबर, इ.स. १८९०) हे मराठी, भारतीय समाजसुधारक होते.

त्यांचे मूळ गाव-कटगुण (सातारा) होते. गोऱ्हे हे त्यांचे मूळ आडनाव. कटगुणहून ते पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. तेथे त्यांचे घर असून, त्यांच्या नावे सातबाराचा उतारा आहे. खानवडी येथे फुले व होले आडनावाची बरीच कुटुंबे आहेत. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षणकार्यास प्रवृत्त केले. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई. त्याचप्रमाणे स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले पहिले भारतीय होत. तुकारामाच्या अभंगांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. अभंगांच्या धर्तीवर त्यांनी अनेक 'अखंड' रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते. आपला 'गुलामगिरी' ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांनी समर्पित केला. 'अस्पृश्यांची कैफियत' हा महात्मा फुलेंचा अप्रकाशित ग्रंथ आहे. सार्वजनिक सत्यधर्म हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८९१ मध्ये प्रकाशित झाला. सप्टेंबर २३, इ.स. १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. पुरोहितांकडून होणाऱ्या अन्यायापासून, अत्याचारापासून व गुलामगिरीतून तथाकथित शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. पिंपरी-चिंचवड महापालिका ही फुले आणि आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव साजरा करते.

🦚 🦚 🦚 भारतरत्नं महात्मा ज्योतिबा फुले-सामाजिक क्रांति के पिता: एवं आधुनिक भारत के अग्रणीय.

११ अप्रैल म. फुले जयंती की सभी को मंगलकामनाये!

१. सभी को शिक्षा के आधुनिक भारत में जनक. २. सामाजिक क्रांति के पिता:मह ३. सांस्कृतिक, धार्मिक क्रांति के पिता को सलाम!

उन्होंने जाना के:

१. शिक्षा के नकार से हमारी 'सोचने समझने की क्षमता' क्षीण होकर शूद्र, अतिशूद्र गुलाम हुए. २. शूद्र, अतिशूद्र श्रमिक, किसान एवं महिलाओ के अवनति और शोषण का कारण शेटजी-भटजी-लाटजी है. और वर्ग/जाती/अस्पृश्ता यह आर्य ब्राह्मणो ने हिन्दू धर्म से निर्माण की.

उनका समाधान यही है की:

१. बगैर "शिक्षा एवं आंदोलन" के यह समस्या का समाधान नहीं हो सकता और भारत राष्ट्र की स्थापना व प्रगति भी नहीं. २. इसका स्थाई समाधान सामाजिक, सांस्कृतिक एवं धार्मिक क्रांति ही है. तभी सही स्वतंत्रता, समता, व बंधुता निर्माण होकर 'आधुनिक भारत' निर्माण होगा.

आओ हम सभी भारत के इस रत्न (भारत रत्नं) को उनके कार्य को पूरा कर ऐसा भारत निर्माण करे. क्योकि हम आज यहाँ नहीं होते यदि म. फुले [और सावित्रीबाई फुले] ने 'आधुनिक भारत' के लिए आंदोलन नहीं किया होता.

जय भीम! जय फुले!! जय प्रबुद्ध भारत!!!

विजय मानकर, नॅशनल आर्गेनाइजर, एम्बस

🦚🦚🦚 सावित्रीबाई फुले की जयंती (3 जनवरी) के उपलक्ष्य में:

फुले-दंपत्ति (सावित्रीबाई फुले और जोतीराव फुले) भारत के अब तक के इतिहास के सबसे आदर्श और खूबसूरत दंपति हैं। फुले दंपति ने अपने जीवन के आधार पर यह आदर्श स्थापित किया कि पति-पत्नी का संबंध कैसे होना चाहिए। दोनों ने हर स्तर पर बराबरी का जीवन जिया। उस रूढ़िवादी दमनकारी परम्परा में सही और स्वतंत्र सोच वाले इस दंपति-युगल ने इस अवधारणा को तोड़ दिया कि स्त्री का काम सिर्फ़ घर संभालना, पति व उसके घर वालों की सेवा करना और बच्चे पैदा करना मात्र है। उन्होंने इस बात का भी खंडन किया कि पुरुष सिर्फ़ बाहरी कार्य करेगा। इसका पालन स्वयं जोतीराव फुले और सावित्रीबाई फुले ने भी जीवनभर किया और व्यक्तिगत जीवन और सामाजिक जीवन के संघर्षों में दोनों कन्धे-से-कन्धा मिलाकर चले। दोनों ने एक साथ शिक्षा प्राप्त की; एक साथ मिलकर स्कूल स्थापित किए। दोनों एक साथ घर से बाहर निकाले गए। दोनों ने मिलकर विधवाओं के लिए बाल हत्या प्रतिबंधक गृह खोला। सत्यशोधक समाज की स्थापना दोनों ने मिलकर की। सत्यशोधक विवाह पद्धति के निर्माण में दोनों की भूमिका रही। अकाल पीड़ितों की मदद करने दोनों एक साथ निकले और कौन क्या कहेगा इसकी चिंता किए बिना अलग-अलग जगहों पर मानवसेवा के महान कार्य में पूरी तन्मयता से लगे रहे। यानि जीवन में हर क्षण हर क़दम पर बराबरी की जिम्मेदारियों और कर्तव्यों का पालन करते हुए दोनों एक-दूसरे का साथ देते रहे। शूद्रों-अतिशूद्रों और महिलाओं के लिए दोनों ने अपना जीवन न्योछावर कर दिया। दोनों पूरी तरह आधुनिक चेतना और मानवीय संवेदना से परिपूर्ण महान व्यक्तित्व के धनी थे। स्वतंत्रता, समता और सबके लिए न्याय, ये सब दोनों के जीवन के आदर्श थे। दोनों के सपने एक थे। दोनों का रास्ता एक था और दोनों की मंज़िल भी एक ही थी।

यदि यह देश वर्ण-जातिवादी ने होता और इस पर अपरकॉस्ट मानसिकता के विचारकों-लेखकों का प्रभुत्व न होता, तो इस देश के जन-जन को आदर्श दंपत्ति के रूप में फुले दंपत्ति को पढ़ाया और बताया जाता तथा उनके दिखाए रास्ते पर चलने के लिए प्रेरित किया जाता।

🦚🦚🦚१९२ व्या जयंतीला (बालिका/शिक्षिका दिवस) स्मरण ज्ञानज्योतीचे!!

....

जन्म: ३ जानेवारी, इ.स. १८३१ नायगाव, सातारा, महाराष्ट्र; मृत्यू: मार्च १०, इ.स. १८९७ पुणे, महाराष्ट्र

चळवळ: मुलींची पहिली शाळा सुरू करणे.

ज्ञानबंदीच्या साखळदंडांनी जेरबंद झालेल्या महिलांना ज्ञानसंवर्धनाची आशादायी पहाट प्रदान करणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीआई फुले यांची आज १९२ वी जयंती. या देशातील समस्त महिलांना शिक्षणाचा तिसरा डोळा प्रदान करणारी ही ज्ञानमाता अर्थात विद्येची खरी स्फूर्तीनायिका. धर्माच्या नावाखाली समस्त भारतीय स्त्रियांचे भावविश्व नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्धचा बुलंद आवाज म्हणजे सावित्रीआई. सावित्रीआईने ज्ञानाची उपासना केली नसती तर आज महिलांची अवस्था कशी असती या कल्पनेनेच अंगावर शहारे येतात. मनुचा कायदा स्त्रियांच्या प्रगतीच्या साऱ्याच वाटा नाकारतो, तिला मानसिक गुलामगिरीत ठेवतो. स्त्री हे सृजन नसून ती केवळ उपभोग्य वस्तू आहे असं सांगणाऱ्या व्यवस्थेला धर्माची कवच-कुंडल लाभली होती. स्त्रियांच्या वाट्याला येणार दैन्य, दारिद्र्य, गुलामी पाहून कुणाच्याही काळजाला पाझर फुटला नाही. ही शोषण वादी व्यवस्था उलथून पाडण्यासाठी या देशाला सावित्रीआई फुले यांच्या जन्माची वाट पाहावी लागली. शिक्षणा मध्येच मानवी विकासाचे सूत्र दडले आहे हे ओळखलेल्या सावित्रीआईंनी या देशातील महिलांना ज्ञानाचे नवे आकाश आणि भरारी घेण्यासाठी मजबूत पंख दिलेत. ज्योतिरावांनी पेटविलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या ज्योतीची ज्वाला झाली सावित्री.

सावित्रीआई फुले आद्य शिक्षिका आहेत. या देशातील महिला शिकाव्यात म्हणून त्यांनी अंगावर दगड झेलली म्हणूनच आजच्या मुली स्कूटरवर बसून कॉलेजमध्ये जात आहेत. मात्र शिकून सवरून नोकरीवर लागलेल्या महिलांना त्यातही बहुतांश शिक्षिकांना या माऊलीच्या संघर्षाचा विसर पडलाय. सावित्रीच्या संघर्षामुळेच आपल्या जीवनामध्ये एक नवी पहाट उगवली याचं भान सुद्धा उच्चशिक्षित महिलांना असल्याचे दिसून येत नाही. "उच्च शिक्षित महिलांना सत्यवानाची सावित्री आपला आदर्श वाटतो." शाळेमध्ये शिकविणाऱ्या शिक्षिका विद्येच्या या महानायीकेच्या कार्यापासून मानसिक दृष्ट्या कोसोदूर आहेत. कृतघ्नतेची ही परिसीमा आहे. ज्या समाजाला त्याची प्रेरणा स्थाने माहीत नसतात तो समाज कायम मानसिक गुलामगिरीत असतो. तो समाज कायम चाचपडत असतो अंधारवाटेवरती. सावित्रीआई फुले यांनी दिलेल्या प्रकाश वाटेवरून चालणे हीच या काळाची गरज आहे.

सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष डोळ्यासमोर आणला की ती माऊली काय ताकदीची होती याचा अंदाज येतो. ज्या व्यवस्थेशी लढायचे आहे ती व्यवस्था अत्यंत क्रूरपणे वागत होती. समाज, नातेवाईक कुणीही त्यांच्या पाठीशी नसताना त्यांनी ज्योतिराव फुले यांच्या खांद्याला खांदा लावून व्यवस्था परिवर्तनाची लढाई आयुष्याच्या अंतिम श्वासापर्यंत लढली. ही लढाई लढत असताना आलेली प्रत्येक वादळे त्यांनी यशस्वीपणे परतवून लावलीत. त्यांनी सुरू केलेले कार्य म्हणजे इथल्या प्रस्थापित यंत्रणेला भूकंपाचे धक्के होते. शिक्षणाशिवाय परिवर्तनाची चळवळ पुढे

जाऊच शकत नाही हे सूत्र ज्योतिरावांनी सावित्रीच्या मनात पेरले होते. पशुत्वाकडून मनुष्यत्वाकडे नेणारी शिक्षण व्यवस्था निर्माण व्हावी हा ध्यास त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. खरंतर या अस्वस्थतेतूनच महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाच्या चळवळीचा जन्म झाला. सावित्रीआई फुले त्याच्या जनक झाल्यात. ज्या दिवशी सावित्रीआई फुले यांनी हातात खडू (लेखणी) घेऊन शाळा गाठली त्याच दिवशी इथल्या धर्मवादी व्यवस्थेला हादरे बसायला सुरुवात झाली. स्त्री जर शिकली तर ती विधवा होते, धर्म बुडतो, अक्षरांच्या अळ्या होऊन ताटात पडतात या कुरूप विचारधारेला सावित्रीआईंनी डागण्या देण्यास सुरुवात केली. जोतीरावांच्या मदतीने शेतातील मातीवर त्यांनी अक्षर गिरवली. ही साधीसुधी अक्षरं नव्हती तर मनूच्या कपटी यंत्रणेच्या मृत्यूचा हा जाहीरनामा होता. काळ्याआईच्या हृदयावर अक्षर कोरणारी सावित्री ही महाराष्ट्रातील पहिली प्रशिक्षित शिक्षिका झाली.

स्त्री शिक्षणाचे काम त्यांनी हाती घेतल्याबरोबर धर्ममार्तंडांनी त्यांना प्रचंड विरोध केला. इतकच नव्हे तर सख्या भावाने सुद्धा हे काम सोडून देण्याची तंबी त्यांना दिली. मात्र त्यांनी भावाच्या धमकीला न जुमानता जे उत्तर पत्रातून भावाला दिलं त्यातून त्यांचा दृढनिश्चय स्पष्ट होतो. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील बुधवार पेठेत मुलींची पहिली शाळा काढून या दाम्पत्याने प्रथम स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सन १८४४ ते १८५२ या चार वर्षात फुले दांपत्यांनी १८ शाळा काढून ज्ञान वंचितांच्या पदरात ज्ञान फुले टाकलीत. अन्नपूर्णा जोशी, सुमती मोकाशी, माधवी थत्ते, दुर्गा देशमुख, सोनू पवार, जनी कर्डिले या मुली सावित्रीआईच्या शाळेत क्रांतीची अक्षरं गिरवू लागल्यात. विशेष म्हणजे यातील चार मुली ब्राह्मण जातीतील आहे. फुले दाम्पत्यावर ब्राह्मण द्वेषाचा ठपका ठेवणाऱ्यानी ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. समस्त स्त्रियांना ज्ञानाची वाट दाखवणाऱ्या सावित्रीआई फुले यांना अनेक जीवघेण्या आणि माणूसघाण्या प्रकाराचा सामना करावा लागला. मात्र प्रत्येक संकटांचा त्यांनी समर्थपणे सामना केल्यामुळेच स्त्रीमुक्तीची पहाट उगवली. ज्योतीरावांच्या सामाजिक आंदोलनात सावित्रीआईंचा सक्रिय सहभाग होता. समाजपरिवर्तनाच्या रथाची ही दोन चाके होती.

पेशवाईचा काळ हा सामाजिक अन्याय आणि अत्याचार यांनी भरलेला काळ होता. माणसापेक्षा धर्म आणि जाती श्रेष्ठ ठरत होत्या. स्त्री ही शोषणाचे आणि अत्याचाराचे माध्यम ठरले होते. पतीच्या निधनानंतर बालविधवांवर पेशवाईत अमानुष अत्याचार व्हायचे. अनेक वासनांधांच्या शिकार ठरत या विधवा. ब्राह्मण समाजातील काशीबाई नावाच्या विधवेच्या जीवनातील त्या प्रसंगाने तर जोतिरावांच्या काळजाचा ठोका चुकविला. जीव द्यायला निघालेल्या काशीबाईंचे पालकत्व ज्योतिरावांनी स्वीकारले. एवढेच नव्हे तर तिच्या पोटी जन्माला आलेल्या मुलाला दत्तक घेऊन त्याला डॉक्टर केले. डॉक्टर यशवंत हे त्यांचे नाव. बालविधवाना आपलं निरागस आयुष्य जगता यावे म्हणून फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह तथा प्रसूती गृहाची स्थापना करून एका नव्या क्रांतीकारी चळवळीला जन्म दिला. यावरच ते थांबले नाहीत तर ८ मार्च १८६४ ला विधवा विधुर यांचा पुनर्विवाह लावून मनूच्या व्यवस्थेला आग लावली. देशाच्या सामाजिक इतिहासातील हा क्रांतीक्षण आहे. माणुसकीची विटंबना करणाऱ्या केशवपन सारख्या प्रथेच्या निर्मूलनार्थ फुले दांपत्यांनी पुण्यामध्ये न्हाव्यांचा संप घडवून आणला. आमची रोजीरोटी

गेली तरी चालेल पण आमच्या माय बहिणीच्या डोक्यावरून वस्तरा फिरवणार नाही हा न्हावी बांधवांचा निर्णय मानवतेच्या प्रतिष्ठापनेतील महत्त्वाचे पाऊल आहे.

सावित्रीआई फुले यांच्या मनात जाती व्यवस्थेविरुद्ध प्रचंड चीड होती. या जाती व्यवस्थेचे चटके ही त्यांना बसले होते. मात्र इंग्रजी राजवटीमुळे जाती काही प्रमाणात गळून पडत होत्या. आपला अस्पृश्य बांधवांसाठी पाण्याचा हौद खुला करून त्यांनी जातीय विषमतेविरुद्ध बंड केले होते. महिला सेवा मंडळाच्या माध्यमातून १४ जानेवारी १८५२ रोजी सर्व जाती धर्मातील स्त्रियांसाठी सार्वजनिक तिळगुळ व स्नेहसंमेलनाचे आयोजन करून सावित्रीआई फुले यांनी जातीव्यवस्थेला जबर धक्का दिला. १८७६ च्या दुष्काळात माणसं मृत्यूच्या कराल दाढेत सापडली असताना त्यांच्यासाठी त्यांनी जीवाचा आटापिटा केला. ५२ ठिकाणी अन्नछत्रे उघडून मानवी संवेदनेचा परिचय दिला. प्लेगच्या साथीत माणसं वाचवण्याच्या धडपडीत सावित्रीआईना आपला जीव गमवावा लागला. अखेरच्या क्षणापर्यंतची ही धडपड म्हणजे या देशाचा सोनेरी इतिहास आहे.

सावित्रीआई फुले संवेदनशील मनाच्या कवयित्री होत्या. परिवर्तनाची चळवळ गतिमान व्हावी म्हणून त्यांनी प्रभावी काव्यलेखन केले. आधुनिक मराठी कवितेला एक वेगळा आयाम देणाऱ्या त्यांच्या कविता आहेत. "काव्यफुले" आणि "बावन्नकशी सुबोध रत्नाकर" या काव्यसंग्रहातून त्यांचे हळवे आणि तितकेच कठोर कविमन पुढे येते.

दूर फेकूनी रुढी द्या रे, परंपरेची मोडूनी दारे!

हा परिवर्तनाचा संदेश त्यांनी आपल्या काव्यामधून दिला आहे. जोतीरावांच्या सडेतोड लिखाणाची किनार सावित्रीआईंच्या प्रतिभेला लाभली होती. जोतीरावांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे आपल्या खांद्यावर पेलली. सत्यशोधक समाजाच्या सासवड येथील अधिवेशनात त्यांनी जे विचार मांडले त्या विचाराने परिवर्तनाचे एक नवे वादळ या महाराष्ट्रामध्ये निर्माण झाले. सावित्रीआई खऱ्या अर्थाने सत्यशोधक होत्यात. ज्योतीरावांच्या कलेवरास अग्नी देऊन त्यांनी आपल्यातील सत्यशोधक जिवंत असल्याची साक्ष या महाराष्ट्राला दिली. महाराष्ट्राच्या इतिहासातील या क्रांतिकारी घटनेची नोंद साऱ्या देशाने घेतली. दीन, हतबल, बहुजन समाजाला अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढणाऱ्या सावित्रीआई फुले यांचे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी आजच्या शिकलेल्या व खास करून शिक्षकी पेशातील महिलांवर आहे. शिक्षिकांनी आता विद्येची देवता म्हणून कुणा पुढे नतमस्तक व्हावे एवढे जरी भान सावित्रीआई फुले यांचे स्मरण करताना आलं तरी समाजातील चित्र बदललेले दिसेल.

स्त्रीयांच्या शिक्षणासाठी व उध्दारासाठी सावित्रीआईंनी केलेले कार्य लाखमोलाचे आहे. हे त्यांचे ऋुण फेडणे कठीण आहे. पण सावित्रीआईंच्या या कार्याची आजच्या स्त्रीयांना जाणीव किती? सावित्रीआईंच्या कार्याची व त्यांच्या उपकाराची जाणीव आज जर सर्व वर्गातील स्त्रीयांना असती तर, आज एखाद्या देवीचा जन्मोत्सव जसा गल्लोगल्ली

साजरा केला जातो तसा सावित्रीआईंच्या जन्माचा उत्सव समस्त स्त्री वर्गाकडून साजरा केला गेला असता. ही खुप मोठी शोकांतिका आहे.

याचे कारण म्हणजे, आपल्याकडे समाजसुधारकांना येथील प्रस्थापित समाजव्यवस्थेने जातीच्या व धर्माच्या कक्षेत बंदिस्त केले आहे. असो.... सावित्रीआईंच्या महान कार्याचे उपकार व उत्तरदायित्व समजून घेऊन एक ना एक दिवस सावित्रीआईंची जयंती समस्त स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणावर उत्साहाने साजरी करेल हाच आशावाद.

भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका, स्त्रीयांच्या उध्दारकर्त्या क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या १९२ व्या जयंती दिनी त्यांच्या महान कार्याला व विचारांना शतशः नमन!!

सर्व भारतीयांना क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या जयंतीच्या मंगलमय शुभेच्छा!! 💐

💎 सावित्रीआई फुले यांचे शैक्षणिक कार्य 💎

३ जानेवारी हा सावित्रीआईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. सावित्रीआई फुले यांच्या १९२ व्या जन्मदिनानिमित्त...

१. मुलींसाठी पहिली शाळा:

सावित्रीआई फुले यांचे पती महात्मा ज्योतिबा फुले एक थोर समाज सुधारक होते. महात्मा फुले यांनी समाज सुधारण्यासाठी अनेक सामाजिक कार्य केली ही सामाजिक कार्य करत असताना मुलींना देखील शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु हे कार्य पुढे नेण्यासाठी त्यांना एका महिलेची गरज होती म्हणूनच महात्मा फुले यांनी सर्वप्रथम सावित्रिआई फुले यांना आपल्या घरामध्ये शिक्षण दिले. त्यानंतर सावित्रीआई फुले यांनी पुणे या ठिकाणी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

२. भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका:

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी योगदान दिले आणि समाजाचा प्रचंड करून सावित्रीआई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. एक प्रकारे भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून सावित्रीआई फुले यांचे योगदान खरोखरच खूप उल्लेखनीय आहे.

३. पहिल्या महिला मुख्याध्यापिका:

सावित्रीआई फुले या भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका म्हणून जशा ओळखल्या जातात. अगदी त्याच पद्धतीने पहिल्या महिला मुख्याध्यापिका म्हणून देखील त्यांना ओळखले जाते.

४. भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षण तज्ञ:

शाळेमध्ये अभ्यासक्रम सुनियोजित रित्या शिकवला गेला पाहिजे तर तो विद्यार्थ्यांपर्यंत अतिशय चांगल्या पद्धतीने पोहोचतो असा विचार सावित्रीआई फुले यांनी मांडला या त्यांच्या विचारावरून भारतामधल्या पहिल्या महिला स्त्री शिक्षण तज्ञ याचा मान देखील सावित्रीआई फुले यांनाच द्यावा लागतो.

५. आनंददायी शिक्षणाची सुरुवात:

सावित्रीआई फुले यांनी मुलींना अध्यापण करत असतांना वर्गातील वातावरणाने नेहमी आनंददाई असले पाहिजे. ज्या काळामधे आनंददाई शिक्षण ही संकल्पना स्वीकारली गेली आहे. परंतु सावित्रीआई फुले यांनी आपल्या शिक्षण प्रक्रियेमध्ये आनंददाई शिक्षणाला अग्रक्रम दिला आहे.

६. गणवेश वाटपाची सोय करणाऱ्या पहिल्या शिक्षिका:

विद्यार्थ्यांचा गणवेश एकसारखा असला पाहिजे अशी भूमिका मांडून एकसारखा गणवेश विद्यार्थ्यांना असावा म्हणून शाळेमधेच गणवेशाचे वाटप करणाऱ्या पहिल्या शिक्षिका म्हणून सावित्रीआई फुले यांना ओळखले जाते. ईकडे शासनाने मोफत गणवेश वाटप योजना सुरु केली आहे. या योजनेचे मूळ आपल्याला सावित्रीआई फुले यांच्या गणवेश वाटपाच्या योजनेमधे सापडतो. यावरूनच सावित्रीआई फुले यांचा दूरदृष्टीपणा आपल्याला दिसून येतो.

७. सहशिक्षणाच्या पुरस्कर्त्या:

सावित्रीआई फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरु करीत असतांना पुण्यामधे मुले आणि मुली यांची एकत्र शाळादेखील सुरु करण्याचा प्रयोग केला होता परंतु त्याला पुरोगामी विचारांच्या काही लोकांनी विरोध केला. म्हणून मुला मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरु करण्यात आल्या. परंतु त्यांनी जी सुरुवात केली होती यावरून सहशिक्षणाच्या सावित्रीआई या पुरस्कार करित होत्या जे आपल्याला विसरून चालणार नाही.

८. गोरगरीबांसाठी नेटिव्ह वाचनालयाची स्थापना:

सावित्रीआई फुले यांनी गोरगरीब विद्यार्थ्यांचा जर आपल्याला खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर त्यांना शिक्षणाबरोबर शिक्षणासाठी लागणारे सर्व साहित्य मिळाले पाहिजे म्हणून अशा नेटिव्ह वाचनालयाची त्यांनी स्थापना केली.

९. मुलींच्या उपस्थितीसाठी शैक्षणिक भत्ता:

पूर्वीच्या काळामध्ये महिलांना शिक्षण दिले जात नव्हते. महात्मा फुले आणि सावित्रीआई फुले यांनी महिलांसाठी शाळा सुरु केल्या, परंतु या मुलींना दररोज शाळेत येण्यासाठी भत्ता सुरु करण्याचे काम सावित्रीआई फुले यांनी केले सहाजिकच मुलींचे आई-वडील मुलींना भत्ता मिळतो म्हटल्यावर शाळेमधे पाठवू लागले.

१०. शेतकरी आणि मजूर वर्गाच्या मुलांसाठी रात्रशाळा:

जी मुले किंवा मुली दिवसभर शेतामधे मोलमजुरी करतात. त्या मुलांना किंवा मुलींना शाळेमधे दिवसा उपस्थित राहणे शक्य नसते अशा मुलांसाठी रात्रशाळेचा प्रयोग सावित्रीआई फुले यांनी केला.

११. प्राथमिक शाळेपासूनच इंग्रजी विषय अध्यापण:

सावित्रीआई फुले यांच्यामते मुलांना मातृभाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु त्याच्या जोडीला जर विद्यार्थ्यांना इंग्रजीवरती प्रभुत्व मिळवायचे असेल तर प्राथमिक स्थरापासूनच त्यांना इंग्रजी विषय शिकविला गेला पाहिजे अशी भूमिका मांडली. मधल्या काळामध्ये विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवीपासून इंग्रजी विषय शिकविला जात होता. सावित्रीआई फुले यांनी त्याकाळी मांडलेला विचार हा शासनाला लागू करावा लागत आहे, कारण कोणती भाषा शिकत असतांना ती लहान वयामधेच विद्यार्थी अतिशय चांगल्या पद्धतीने ग्रास्पिंग करू शकतात म्हणूनच आता इंग्रजी विषयांचे महत्व वाढलेले आहे.

अशी कितीतरी शैक्षणिक कार्ये सावित्रीआई फुले यांनी केली. सावित्रीआई फुले यांना ही कार्यें पुढे घेऊन जात असतांना त्यांचे पति थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी अतिशय मोलाचे सहकार्यें केले.

जय ज्योती!! जय सावित्री!!

आपला धम्मबंधू: आयु. राज जाधव.

पंख   कवी: शिलचंद्र

उद्धरला 'बाई' जन्म,   'ज्योत' शिक्षणाची झाली...   ज्योतीरावाची संगिनी,   सोडला ना 'वसा' तरी

'माय' जन्माला गे आली...   सत्यवानाची सावित्री,   सखे 'पंख' तुझे झाली...   आज 'सावित्रीच्या लेकी',

वसा 'ज्ञानाचा' घेतला,   जशी पायातली 'बेडी',   मारा शेणाचा सोसला,   घेई आकाशी भरारी...

🦚🦚🦚 बोधिसत्व श्रमक पुष्कलावती मैं रहकर अपने अंधे माता-पिता की सेवा करते थे।🦚🦚🦚

एक दिन वे अपने अंधे माता-पिता के लिए फल लाने गए थे। तभी एक राजा जो शिकार के लिए निकले श्रमक को अनजाने में विष-बाण मार दिए।

श्रमक बोधिसत्व मरे नहीं बल्कि उनका घाव औषधि से ठीक हो गया।

माता-पिता की सेवा करनेवाले बोधिसत्व श्रमक की स्मृति में पुष्कलावती मैं स्तूप बना था, जिसका जिक्र ह्वेनसांग अपनी यात्रा वृतांत में करते हैं।

यहीं बोधिसत्व श्रमक का इतिहास श्रवण कुमार की कथा के नाम से पुराणों में दर्ज है।

~(ह्वेनसांग के यात्रा) यह नक्काशी चीन बौद्ध स्थल पर बना है।



🌷 समता सैनिक दळ 🌷

महाडचा सत्याग्रह यशस्वी झाला आणि समाजिक चळवळीला संरक्षण देण्याची जबाबदारी समता सैनिक दलावर आली.

सैनिक दळाची उद्दिष्ये

1) विषमतेविरुद्ध लढणे व समता स्थापन करणे. 2) आंबेडकरी जनतेचे संरक्षण करणे. 3) वंश धर्म जात पात लिंगभेद या वर्गावर आधारित विषमता नष्ट करणे. 4) देशात व समाजात समता स्थापन करणे. 5) समता स्वातंत्र्य बंधुत्व या पायावर नवीन समाज रचना करणे. 6) समता सैनिक दळाची पोलादी एकजूट करणे. 7) चळवळीच्या नेत्यांचे संरक्षण करणे. चळवळीचे कवच बनून राहणे. 8) आंबेडकरी परिवाराचे संरक्षण करणे. (संस्थांचे संरक्षण करणे.) 9) व्यसनमुक्त समाज निर्माण करणे. 10) संकट समई सेवेस तत्पर राहणे. 11) तरुणांची पोलादी ताकद निर्माण करणे.

नियम

1) समता सैनिक दळाची घटना 1945 साली तयार करण्यात आली. 2) दी बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेचे चौथे राष्ट्रीय बौद्ध अधिवेशनामध्ये संस्थेच्या संरक्षण विभागाची जबाबदारी समता सैनिक दळाला दिलेली आहे. 3) समता सैनिक दळाची नियमावली (सुधारित) बनऊन संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षा आद. मीराताई आंबेडकरांनी दिनांक 27 डिसेंबर 1998 रोजी मान्यता दिलेली आहे. 4) दलाचा ध्वज दि. 6 मे 1945 साली निर्माण करण्यात आला. 5) दळाच्या ध्वजावर अशोकचक्र राहील त्यामधे 16 आरे असतील. 6) मध्यभागी S.S.D. अशी अक्षरे असतील. 7) खालच्या साईट किनाऱ्याला B.S.I. अशी अक्षरे असतील. 8) समता सैनिक दळ हे दी बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया या धम्म संस्थेच्या अधिपत्याखाली राहील. समता सैनिक दळाला स्वतंत्र अस्तित्व राहणार नाही.

समता सैन्य दळाचे ऐतिहासिक कार्य

1) दि. 20 मार्च 1920 महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह. 2) सन 1930 ते 1935 काळाराम मंदिर सत्याग्रह दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. 3) सन 1932 साली गोलमेज परिषदेवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतात येणार होते तेव्हा काही लोक त्यांना काळे झेंडे दाखविणार होते त्यावेळी दळाने जय्यत तयारी केली आणि मुंबई बंदरावर एम. एम. ससाळेकर यांच्या मार्गदर्शनाने विरोधकांना चोख उत्तर दिले. 4) 1942 नागपूर येथे शेड्युल कास्ट फेडरेशंनच्या अधिवेशनाची व्यवस्था केली. 5) कानपुर येथील दुसरी परिषद यशस्वी केली. 6) दि. 14 ऑक्टोबर 1956 विजयादशमीच्या दिवसी धर्मांतर सोहळा पार पडला. 700000 अनुयायांनी बौद्ध धम्म स्वीकारला. या सोहळ्याची व्यवस्था व संरक्षण समता सैनिक दळाने केले.

सभासदत्व

1) संस्थेचे तथा समता सैनिक दळाचे धेय्य व उद्दिष्ट मान्य करणाऱ्या कोणत्याही 18 वर्षावरील बौद्ध नागरिकास सभासद होता येईल. 2) शिक्षण:- समता सैनिक दलामध्ये सहभागी होणाऱ्या सभासदास शिक्षण/प्रशिक्षण हे बौद्धिक, धाम्मिक, नैतिक, शारीरिक, प्रामुख्याने लष्करी स्वरूपाचे दिले जाईल.

समता सैनिक दलाचे राष्ट्रीय कार्यक्रम

1) 1 जानेवारि भीमा कोरेगाव, पुणे, महाराष्ट्र. 2) 20 मार्च, सत्याग्रह दिन, महाड चवदार तळे, जिल्हा रायगड, महाराष्ट्र. 3) 13 ऑक्टोबर, धर्मांतर घोषणा दिन, येवला, मुक्ती भूमी नाशिक, महाराष्ट्र. 4) 6 डिसेंबर, महपरिणीर्वाण दिन, दादर चैत्यभूमि, मुंबई, महाराष्ट्र. 5) धम्मदीक्षा वर्धापण दिन, अशोका विजयादशमी, दीक्षाभूमी, नागपूर, महाराष्ट्र. 6) 7 फेब्रुवारी, माता रमाई जयंती, वनंद, रत्नागिरी, महाराष्ट्र.

राष्ट्रीय कार्यक्रमाला संपूर्ण देशातील समता सैनिक दळाचे सैनिक व अधिकारी यांचा एकत्रित कार्यक्रम असेल. भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होतील.

समता सैनिक दलास आपण सर्वांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे.

आयु. राज जाधव

🦚 🦚 🦚 अजंठा बुद्ध लेणी जाणून घ्या... 🦚 🦚 🦚

अजंठा लेणी जगप्रसिध्द आहेत. सन १८१९ मध्ये मद्रास आर्मीच्या ब्रिटिश शिपायांना प्रथम ती दिसली. इ. स. १८३६ मध्ये सर जेम्स अलेक्झांडरने त्या लेण्यांबद्दलची थोडक्यात माहिती लंडन येथील रॉयल एशियाटिक सोसायटीला आणि बेंगाल एशियाटिक सोसायटीला दिली. त्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीने मेजर गील यांना तेथील चित्रांच्या प्रतिकृती करण्यास सांगितले. सतत वीस वर्षे अजंठ्याला राहून मेजर गील यांनी काढलेली चित्रे याच्या क्रिस्टल पॅलेसमध्ये प्रदर्शनासाठी ठेवली होती. पण आग लागून ती भस्मसात झाली. आगीतून फक्त पाचच चित्रे वाचली. सन १८७५ मध्ये मुंबईच्या गव्हर्नमेंट आर्ट स्कूलचे प्रिन्सिपॉल ग्रिफिथ यांनी काढलेली चित्रेसुध्दा लंडन येथे प्रदर्शनासाठी ठेवली असता आग लागून ती भस्मसात झाली. त्यातील फक्त ५६ चित्रे वाचली. नंतर लेडी हॅरिंगहॅम ह्यांनी भारतीय कलाकारांकडून काढवून घेतलेली चित्रे १९१५ साली प्रसिध्द केली. १९३३ साली गुलाम याझदानी यांनी चार मोठ्या खंडांत अजंठाच्या चित्रांच्या प्रतिकृती हैदराबाद स्टेटतर्फे प्रसिध्द केल्या.

अजंठा येथे ३० लेणी आहेत. सातमाळा पर्वताच्या निसर्गरम्य परिसरात अर्धवर्तुळाकारात ही लेणी खोदली गेली आहेत. वाघोरा नदीच्या सान्निध्यामुळे, आसपास असलेल्या विपुल झाडीमुळे आणि कमनीय वळण घेतलेल्या पर्वतराजीमुळे येथील वातावरण नैसर्गिकरीत्याच स्वर्गीय असे वाटते. विद्वानांच्या मते अजंठा येथील ८, ९, १०, १३, १२, आणि १५ (अ) नंबरची लेणी इ. स. तीनशे पूर्वीच्या काळातील आहेत. त्याचप्रमाणे अजंठा येथील चित्रांचा काळ खालीलप्रमाणे ठरविला गेला आहे.

(१) ९ आणि १० नंबरच्या लेण्यांतील चित्रे इ. स. पूर्वी २०० ते इ. स. २००. (२) १६, १७, ४, ६, ११, आणि १५ नंबरच्या लेण्यांतील चित्रे इ. स. ३५० ते ५००. (३) १० नंबरच्या लेण्यांतील खांबावरची चित्रे इ. स. ३५० नंतर. (४) १ आणि २ नंबरच्या लेण्यांतील चित्रे इ. स. ६३६ ते इ. स. ७२८. सुरवातीच्या चित्रांमधील विषय जातक कथांतून घेतले आहेत. नंतर महायानांच्या काळात प्राणिमात्रावर करुणा करणाऱ्या बोधिसत्त्वाला मुख्य विषय ठेवून त्यांच्या आणि उपासकांच्या जीवनातील प्रसंगांची चित्रे काढली आहेत. अजंठा येथील चित्रांपैकी मुल्कराज आनंद यांनी खालील चित्रांचा विशेष उल्लेख केला आहे. ९ आणि १० नंबरच्या लेण्यांतील “छदंत" आणि 'शाम' जातकातील चित्रे.

१७ नंबरच्या लेण्यातील बुद्ध आणि "एका डोळ्याचा भिक्खू", तुषीतस्वर्गातून पृथ्वीवर उतरणाच्या भगवान बुद्धाचे चित्र, तसेच Dying Princess नावाने प्रसिध्द असलेले चित्र. डी. मुल्कराज आनंद यांच्या मते

Dying Princess हे नाव असलेल्या चित्राची गणना जगातील उकृष्ट चित्रामध्ये केली जाते. त्याच लेण्यातील Flying Apsara हे नाव असललेले चित्र, इन्द्र आणि अप्सरांचे चित्र, Palace Scene हे नाव असलेले चित्र, Mother and child before the Buddha हे नाव असलेले चित्र, "महाजनक जातक कथाचे चित्र आणि The Pink Elephant" हे नाव असलेले चित्र.

१ नंबरच्या लेण्यातील The golden Geese हे नाव असलेले चित्र, Fighting bulls हे चित्र, dark Princess हे नाव असलेले चित्र, आणि दसरा पुलकेशीन ह्याच्या न पर्शियन वकील असलेले चित्र पर्शियाचा वकील इ. स. ६३० मध्ये दसरा पुकजेशीनकडे आला होता. त्यावेळी भरलेल्या दरबारांचे चित्रण ह्या चित्रात केले गेले आहे. १ नंबरच्या लेण्यात असलेले बोधिसत्त्व पद्मपाणीचे चित्र भारतात सुप्रसिध्द आहे. १ नंबरच्या लेण्यात असलेले बोधिसत्व पद्मापाणीचे चित्र भारतात सुप्रसिद्ध आहे. अजंठा येथील चित्रकलेची उपासना जवळजवळ एक हजार वर्षे अव्याहत चालली होती. तेथूनच मध्य प्रदेशातील बाघ, दक्षिणेतील बदामी, सिग्रिया, सित्तनवसाल, मध्य आशियातील बामीयान, तिबेट आणि चीन देशातील तुन-हुआंग येथे तिचा प्रसार झाला. अजंठा येथे शिल्पकला आणि चित्रकला शिकविण्याचे विद्यालय होते ₹. अजंठा येथील अप्रतिम चित्रांमुळे तेथील शिल्पकलेला दुय्यम महत्त्व दिले गेले आहे. पण अजंठा येथे असलेल्या शिल्पातील कल्पकता, विविधता, भव्यता आणि सौंदर्य इतरत्र क्वचितच पाहावयास मिळते.

४ आणि २४ नंबरच्या लेण्यांचे काम अपूर्ण राहिले आहे. त्यांच्या एकंदरीत डिझाइनवरून तो सर्वांत सुंदर बनविण्याचा देणगीदारांचा विचार असावा असे वाटते. परंतु सातव्या-आठव्या शतकातील उलथापालथीमुळे त्या लेण्यांचे काम पूर्ण होऊ शकले नाही.

अजंठा येथील क्र. १६ चे लेणे वाकाटकांच्या काळात तयार केले गेले. त्या लेण्यातील शिलालेखावरून वाकाटकांचा संस्थापक विद्याशक्ती नावाचा होता. त्याच्यानंतर प्रवरसेन, रुद्रसेन आणि हरिसेन असे पराक्रमी राजे होऊन गेले. हस्तिभोज हा देवसेनाचा प्रधान होता. त्यांचा मुलगा वराहसेन हरिसेनाचा प्रधान. त्याने ही क्र. १६ ची लेणी धम्मदान केली. अजंठापासून काही मैलांच्या अंतरावर गुलवाडी येथे घटोत्कच नावाची बौद्ध लेणी आहेत. तेथील मोठ्या चैत्यगृहातील शिलालेखात हस्तिभोजाचा उल्लेख आहे. पण त्या लेखातील काही भाग नष्ट झाल्यामुळे संपूर्णपणे वाचता येत नाही. हस्तिभोजाच्या वंशजाने ती धम्मदान केली असावी. अजंठा येथील क्र. १७ चे लेणी वाकाटकांचा हरिसेन राजा राज्य करीत असता त्याची माडलिक असलेल्या अश्माकच्या राजाने किंवा त्यांच्या प्रधानाने धम्मदान केल्याची नोंद तेथील शिलालेखात आहे. त्या शिलालेखात धृतराष्ट्र, हरिसांब, सौरिसांब, कच किंवा अज, भिक्खूदास, नीलदास, कच दसरा आणि कृष्णदास ह्या अश्माक राजांची नावे आहेत. उत्तानपातातील पारायणवणातील 'अस्सक देश आणि अश्मक देश एकच आहेत. अजंठा लेणी क्र. २६ चे लेणे अश्माक राजाचा मंत्री भविराज याचा आणि त्याच्या आई-वडिलांचा सन्मान करण्यासाठी खोदले गेले, असा तेथील शिलालेखात उल्लेख आहे.

☸☸☸☸☸☸☸☸☸☸☸

सविनय जयभीम ╭═══════════════╮ 🌷🌕☸ *रोजच धम्म प्रसार*☸🌕🌷 ╰═══════════════╯

आदेश

चरथ भिक्खवे चारिकं, बहूजन हिताय बहुजन सुखाय।

लोकानुकंपाय, अत्थांय, हिताय सूखाय देवमनुस्सानं।

देसेथ भिक्खवे, धम्मं आदि कल्याणं मज्झे कल्याणं।

परियोसान कल्याणं। सात्थं, सव्यज्जनं, केवल परिपुण्णं परिसुद्ध, ब्रह्मचरियं पकासेथ।

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

आज दि. 16 डिसेंबर 2022, बुद्धाब्द 2566, अशोकाब्द 2326, भीमाब्द 132, रविवार, माघसिरो, रविवारो, मार्गशीर्ष माहे.

28 डिसेंबर 1929 विश्वरत्न, बोधिसत्व, प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत वर्गाची पहिली परिषद धारवाड येथे झाली.

16 डिसेंबर, 1939 रोजी विश्वरत्न, बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखली हरेगाव, जि. अहमदनगर, येथे वतनि महारांची सभा व मार्गदर्शन.

🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵🔵

🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹🌹

🌷 *प्राचीन भारतीय ज्ञानपिठे* 🌷

अखंड भाताच्या कानाकोपऱ्यांत शिक्षणाची असंख्य केंद्रे वसलेली होती. अगदी लहान-लहान विद्याकेंद्रे तर किती होती, त्याची गिणतीच नाही. यातील बहुतांशी विद्याकेंद्रे आसुरी वृत्तीच्या तत्कालीन मुसलमान आक्रमकांनी उध्वस्थ करून टाकली. ज्ञान केंद्रांच्या या अपरिमित हानीचे दुष्परिणाम आपण आजही पदोपदी भोगत आहोत. प्राचीन भारत हा शिक्षण क्षेत्रात अग्रेसर होता. भारतीय शिक्षणपद्धत जगमान्य होती. आजसारखी तरुण पिढी तेव्हा उच्च शिक्षण घेण्यास विदेशात तर जात नव्हतीच, उलट विदेशातून असंख्य जिज्ञासू ज्ञानार्जन करण्यासाठी भारतीय विद्यापीठांत येत. या सर्वांविषयींच्या गौरवशाली इतिहासाचे सोनेरी क्षण प्रस्तुत लेखाद्वारे जाणून घेऊयात.

जगातील सर्वांत प्राचीन आणि जगद्विख्यात तक्षशिला विद्यापीठाचे अवशेष! या विद्यापीठाणे तब्बल 1200 वर्षे ज्ञानदानाचे प्रचंड मोठे कार्य केले.

1. तक्षशिला विद्यापीठ: भारताची बौद्धिक राजधानी!

'तक्षशिला' हे जगातील पहिले विश्वाविद्यालय (विद्यापीठ) मानले जाते. आजच्या पाकिस्तानात (रावळपिंडीपासून 18 मैल उत्तरेकडे) असलेले हे विद्यापीठ इ. स. च्या 700 वर्षे पूर्वी स्थापन करण्यात आले आहे. पुढे इ. स. 455 मधे पूर्व युरोपच्या आक्रमकांनी अर्थात हुनांनी ते नष्ट केले. जागतिक स्तरावर ख्याती असलेल्या या विद्यापीठाणे अनुमाने 1200 वर्षे ज्ञानदानाचे प्रचंड मोठे कार्यं केले. श्रेष्ठ आचार्यांची परंपरा निर्माण केली. अनेक जगप्रसिद्ध विद्यार्थी दिले. तक्षशिला विद्यापीठ बंद पडल्यानंतर काही वर्षांतच मगध राज्यात (आजच्या बिहारमध्ये) नालंदा विद्यापीठ स्थापन झाले. ही दोन्हीही नामांकित विद्यापीठें एकाच वेळी कधीही कार्यरत नव्हती.

असे म्हणतात की, तक्षशिला या नगरीची स्थापना भरताने त्याच्या मुलाच्या म्हणजे तक्षाच्या नावावर केली. पुढे येथेच विद्यापीठ स्थापन झाले. जातक कथांमध्ये तक्षशिला विद्यापीठाविषयी बरीच माहिती मिळते. या कथांमध्ये 105 ठिकाणी तक्षशिला विद्यापीठाचे संदर्भ मिळतात. त्या काळात म्हणजे अनुमाने 1 सहस्त्र वर्षे तक्षशिला ही संपूर्ण भरतखंडाची बौद्धिक राजाधानी होती. तिची ही ख्याती ऐकूनच चाण्यक्यासारखी व्यक्ती मगध (बिहार) येथून इतक्या दूर तक्षशिलेला आली. बौद्ध ग्रंथ 'सुमिमजातक' आणि 'तेलपत्त' मधे तक्षशिलेचे अंतर काशीपासून 2 सहस्त्र कोस इतके सांगितले आहे.

1 अ. तक्षशिला विद्यापीठातील चिकित्सा शास्त्राचे प्रगत केंद्र! इ. स. च्या 500 वर्षांपूर्वी, जेव्हा चिकित्सा शास्त्राचे नावही जगात कुठेच नव्हते, तेव्हा तक्षशिला विद्यापीठ हे चिकित्सा शास्त्राचे फार मोठे केंद्र मानले जात होते. येथे 60 हून अधिक विषय शिकविले जात होते. एकाच वेळी 10 सहस्त्र 500 विद्यार्थ्यांना शिकण्याची सोय होती.

1 आ. तक्षशिला विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची उज्ज्वल परंपरा.

1 आ 1. या विद्यापीठाच्या स्थापनेनंतर म्हणजेच इसवी सनापूर्वी 700 वर्षे, येथून शिकून गेलेला पहिला जगप्रसिद्ध विद्यार्थी म्हणजे पाणिनी! त्यांनी पुढे संस्कृत भाषेचे व्याकरण सिद्ध केले!

1 आ 2. इसवी सनापूर्वी 6 व्या शतकात चिकित्सा शास्त्र शिकलेला जिवक (किंवा जिबाका), पुढे जाऊन मगध राजवंशाचा राजवैद्य झाला. त्याने अनेक ग्रंथ लिहिले.

1 आ 3. इसवी सनापूर्वी 4 थ्या शतकातिल अर्थशास्त्राचा विद्यार्थी चाणक्य, जो पुढे 'कौटील्य' नावाने प्रसिद्ध झाला.

1 इ. वाढत्या आक्रमणांमुळे आचार्यांची विद्यापीठाकडे पाठ!

चिनी यात्री आणि विद्यार्थी 'फाहयान' हा वर्षे 405 मधे तक्षशिला विद्यापीठात आला. हा काळ ह्या विद्यापीठाचा पडता काळ होता. पश्चिमेकडून होणाऱ्या आक्रमकांच्या संख्येत वाढ झाली. अनेक आचार्य विद्यापीठ सोडून गेले. अर्थात फाहयानला तेथे फार काही ज्ञानाचा लाभ झाला नाही. त्याने तसे लिहून ठेवले आहे. पुढे 7 व्या शतकात

तक्षशिला विद्यापीठाची महती एकूण आणखी एक चिनी यात्री युवान च्वांग तेथे गेला. त्यावेळी त्याला विद्याभ्यासाची कसलीही खून तेथे आढळली नाही.

अनुमाने 700 वर्षे जगातील सर्वोत्कृष्ठ विद्यापीठ म्हणून ख्याती असलेल्या नालंदा विद्यापीठाचे अवशेष! येथे अनेक दुर्लभ आणि दुर्मिळ ग्रंथांचा प्रचंड मोठा संग्रह होता.

2. अनेक दुर्लभ आणि दुर्मिळ ग्रंथांचा प्रचंड मोठा संग्रह असणारे नालंदा विद्यापीठ!

हुण आक्रमकांनी ज्या काळात तक्षशिला विद्यापीठ उद्धवस्थ केले, जवळपास त्याच काळात मगध साम्राज्यात नालंदा विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली जात होती. मगधचे महाराज शकादित्य (म्हणजेच गुप्त वंशीय सम्राट कुमार गुप्त वर्षे 415 ते 455) यांनी त्यांच्या अल्पकाळात नालंदा येथील जागा विद्यापीठाच्या रूपात विकसित केली. या विद्यापीठाचे आरंभीचे नाव होते, 'नलविहार'! नालंदा विद्यापीठ हे अनेक इमारतींचे एक फार मोठे संकुल होते. यातील प्रमुख भवणे होती - रत्नसागर, रत्नोदधी आणि रत्नरंजक! 'मान मंदिर' हे सर्वांत उंच प्रशासकीय भवन होते. पुढे इ. स. 1197 मधे बख्तियार खिलजीने हे विद्यापीठ जाळून टाकले. तोपर्यंत अनुमाने 700 वर्षे नालंदा विद्यापीठ हे जगातील सर्वोत्कृष्ठ विद्यापीठ होते.

या विद्यापीठात प्रवेशासाठी कठोर परीक्षा द्यावी लागत असे. येथे अनेक दुर्लभ आणि दुर्मिळ ग्रंथ यांचा प्रचंड मोठा संग्रह होता. चिनी यात्री ह्यूएन त्सांग हा येथे 10 वर्षे अध्ययन करत होता. त्याचे गुरु शिलभद्र हे आसामचे होते. ह्यूएन त्सांगने या विद्यापीठाविषयीं भरभरून आणि खूप चांगले लिहून ठेवले आहे.

बौद्ध धम्मातील 'वज्रयान' संप्रदायाच्या अभ्यासाचे अधिकृत केंद्र असलेल्या विक्रमशिला विद्यापीठाचे अवशेष!

3. विक्रमशिला विद्यापीठ, बिहार.

8 व्या शतकातील बांगालचा पाल वंशीय राजा धम्मपाल याने या विद्यापीठाची स्थापना आजच्या बिहार येथे केली होती. या विद्यापीठाच्या अंतर्गत 6 विद्यालये होती. प्रत्येक विद्यालयात 108 शिक्षक होते. 10 व्या शतकातील प्रसिद्ध तिबेटी लेखक तारानाथ यांनी या विद्यापीठाचे विस्तृत वर्णन केलेले आहे. या विद्यापीठात प्रत्येक दाराला एकेक प्रमुख आचार्य नियुक्त होते. नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आचार्य परीक्षा घ्यायचे. त्यांच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच विद्यापीठात प्रवेश मिळत असे. हे आचार्य होते-पूर्व द्वार-पं. रत्नाकर शास्त्री, पश्चिम द्वार-वर्गाश्वर कीर्ती, उत्तर द्वार-नारोपंत आणि दक्षिण द्वार- प्रज्ञाकर मित्रा. यातील नारोपंत हे महाराष्ट्रातून आले होते. आचार्य दीपक हे विक्रमशिला विद्यापीठाचे सर्वाधिक प्रसिद्ध आचार्य झालेले आहेत.

12 व्या षत्कात येथे 3 सहस्त्र विद्यार्थी शिकत होत्र. हा या विद्यापीठाचा पडता काळ होता. पूर्वेत आणि दक्षिणेत मुसलमान आक्रमक पोहोचत होते अन दिसतील ती ज्ञानाची साधने आणि स्थाने उध्वस्थ करीत होते. म्हणूनच

उत्खननात जे अवशेष सापडले आहेत, त्यावरून असे लक्षात येते की, या विद्यापीठाच्या मोठ्या सभागृहात तब्बल 8 सहस्त्र लोकांची बसायची व्यवस्था होती! या विद्यापीठात विदेशी विद्यार्थ्यांमधे तिबेटी विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक होती. त्याचें एक कारण म्हणजे बौद्ध धम्माच्या 'वज्रयान' संप्रदायाच्या अभ्यासाचे हे महत्वाचे आणि अधिकृत केंद्र होते.

नालंदा विद्यापीठ उद्धवस्थ झाल्यानंतर अनुमाने 6 वर्षांनी म्हणजेच वर्ष 1203 मधे नालंदा जाळणाऱ्या बख्तियार खिलजीने हेही विद्यापीठ जाळून टाकले!

सोमपूर महाविहार विद्यापीठात चिन, तिबेट, मलेशिया, जावा आणि सुमात्रा येथील विद्यार्थी शिकण्यासाठी येत असत.

4. उड्डयंतपूर विद्यापीठ, बिहार.

पाल वंशाची स्थापना करणारे राजा गोपाळ यांनी उड्डयंतपूर विद्यापीठाचि स्थापना बौद्ध विहाराच्या रूपात केली होती. त्याच्या विशाल भवनांना बघून बख्तियार खिलजीला वाटले की, हा एखादा किल्लाच आहे. म्हणून त्याने यावर आक्रमन केले. वेळेंवर सैनिकी सहाय्य मिळू शकले नाही. केवळ विद्यार्थी आणि आचार्यांनीच शार्थीने झुंज दिली; पण सर्वच्या सर्व मारले गेले.

5. सुलोटगी विद्यापीठ, कर्नाटक.

कर्नाटकातील विजापूर जिल्हयातील हे महत्वाचे विद्यापीठ 11 व्या शतकाच्या शेवटी उभे राहिले. राष्ट्रकुटांचे शासन असतांना कृष्ण (तृतीय) या राजसाजे मंत्री नारायण यांनी सुलोटगी विद्यापीठ बांधले. मात्र विद्यापीठ म्हणून काही करून दाखविण्याच्या आतच त्यावर मुसलमानांनी आक्रमन करून ते उध्वस्थ केले.

येथील पविट्टागे हे संस्कृत महाविद्यालय अल्पावधीतच संस्कृत शिक्षणासाठी चर्चेत आले होते. देशभरातील निवडक 200 विद्यार्थ्यांना भोजन आणि निवासासह शिक्षण देणारे हे विद्यापीठ वैशिष्ट्यपूर्ण होते.

6. सोमपूर महाविहार, बांगलादेश.

बांगलादेशाच्या नवगाव जिल्हयात बादलगाझी तालुक्यातील पहाडपूर गावात महाविहार म्हणून स्थापन झालेले सोमपूर महाविहार हे शैक्षणिक केंद्र पुढे विद्यापीठ म्हणून नावारूपाला आले. पाल वंशाचे दुसरे राजा धम्मपाल देव यांनी 8 व्या शतकाच्या शेवटी हा महाविहार निर्मिला. जगातील सर्वात मोठे बौद्ध विहार म्हणता येईल, अशी याची रचना होती. चिन, तिबेट, मलेशिया, जावा आणि सुमात्रा येथील विद्यार्थी येथे शिकण्यासाठी येत होते. 10 व्या शतकातील प्रसिद्ध विद्वान अतिश दीपशंकर श्रिज्ञान हे याचं विद्यापीठाचे आचार्य होते.

7. रत्नागिरी विद्यापीठ, ओडिसा.

6 व्या शतकात बौद्ध विहाराच्या रूपात स्थापन झालेले हे स्थान पुढे शिक्षणाचे मोठे केंद्र बनले. तिबेटमधील अनेक विद्यार्थी येथून शिकून गेले. तिबेटीयन इतिहासात या विद्यापीठाचा उल्लेख 'कालचक्र तंत्राचा विकास करणारे विद्यापीठ', असा केला गेला आहे; कारण येथे खगोलशास्त्राचा अभ्यास होत असे.

8. गोलकी मठ अर्थात विद्यापीठ, मध्यप्रदेश.

जबलपूर (मध्यप्रदेश) येथील भेडाघाट येथे 64 योगिनींचे मंदिर आहे. त्याला 'गोलकी मठ' असेही म्हणतात. या 'गोलकी मठाचा' उल्लेख 'मलकापूर पिलर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या खोदकामातही आढळतो. 'मटमायूर वंश' हा कलचुरी वंशापैकीच एक आहे. या वंशाचे युवराजदेव (प्रथम) यांनी या मठाची स्थापना केली. मुळात हे तांत्रिक आणि इतर विषयांचे विद्यापीठ होते. या गोलकी मठाच्या अर्थात विद्यापीठाच्या अधीन अनेक विद्यालयेही आंध्रप्रदेशात होती.

9. भारतात असंख्य ज्ञानमंदिरे!

बंगालमधील जगद्दल, आंध्रप्रदेशातील नागार्जुनकोंडा, काश्मीरमधील शारदापीठ, तामिळनाडूमधील कांचीपूरम, ओडिसामधील पुष्पगिरी, उत्तरप्रदेशातील वाराणसि अशी किती नावे घ्यावीत...? ही सर्व ज्ञानमंदिरे होती, ज्ञानपिथे होती. अगदी वणवासी अन (आजच्या भाषेत) मागास भागांतही आवश्यक ते शिक्षण सर्वांना मिळत होते.

श्री. प्रशांत पोळ. (संदर्भ: मासिक एकता).

🦚 🦚 🦚 *यशोधरेची यशोगाथा अशी आहे की तिचे वर्णन वाचल्यावर मन गलबलून जाते* 🦚 🦚 🦚

बौद्ध धम्माच्या साहित्यामुळे बुद्धसमकालीन श्रावकसंघातील अनेक व्यक्तींचा परिचय होतो. असंख्य महाश्रावक, भिक्षुंणी, उपासक आणि उपासिका यांची माहिती मिळते. त्यातील एका भिक्षूणीची व्यक्तिरेखा अशी आहे की तिचे वर्णन वाचल्यावर मन गलबलून जाते. ही भिक्षूणी दुसरी तिसरी कोणी नसून सिद्धार्थ गौतम यांची पत्नी यशोधरा होय. बौद्ध साहित्यात त्यांच्याबद्दल जास्त कुठे लिहिलेले आढळत नाही. पुत्र राहुल याचे संगोपन करण्यात त्यांचे अर्धे आयुष्य खर्ची झाले असल्याने त्यांच्याबद्दलच्या गाथा जास्त आढळून येत नाहीत. पतीने घेतलेल्या निर्णयाला अनुमोदन देऊन पुढे त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून त्यांनी सुद्धा सर्वसंगपरित्याग केला. दुःख भावनेची कुठेही वाच्यता केली नाही. यावरून त्यांची धैर्यशीलता कळते.

यशोधरेच्या जीवनावर आधारित जगातील पहिला चित्रपट २०१८ मध्ये श्रीलंका येथे तयार झाला.

सिद्धार्थ गौतम ज्ञानप्राप्ती नंतर जेव्हा बुद्धत्व प्राप्त करून कपिलवस्तू येथे आले तेंव्हा यशोधरा यांचा बांध फुटला. त्या सैरभैर झाल्या. त्या प्रसंगाची अनेक लेखकांनी आणि कवींनी वर्णने केली आहेत. पुत्र राहुलला त्यांनी पित्याजवळ जाऊन आपला वारसा मागण्यास सांगितले. राहुल जेव्हा बुद्धांकडे गेला तेव्हा त्याला देखील त्यांनी संघात दाखल करून घेतले. यामुळे यशोधरा मनातून उन्मळून पडल्या असाव्यात. परंतु नंतर बुद्धांचा मावस भाऊ नंद आणि चुलत भाऊ आनंद यांनी देखील संघामध्ये प्रवेश केला. कालांतराने सावत्रमाता व मावशी महाप्रजापती गौतमी यांनीदेखील आनंदला सांगून बुद्धांचे मन वळविले व प्रवर्ज्या घेतली. यशोधरेने सुद्धा त्याच वेळेला प्रवर्ज्या घेतली. अशा तऱ्हेने भिक्षुणी संघ स्थापन झाला. यशोधरा यांनी नंतर उर्वरित आयुष्य ध्यानसाधनेत व्यतित केले. संघाची सेवा केली. पुढे लवकरच त्या ध्यानसाधनेत परिपक्व झाल्या व अरहंत पद प्राप्त केले.

या गांधार कलाकृतीत राहुल याचे मुंडण करतांना दाखविले आहे. थेरी गाथेत यशोधरा यांच्या गाथा नाहीत. परंतु थेरी अपदानात यशोधरेच्या गाथा आढळतात. उपसंपदा घेतल्यानंतर त्यांचे नाव भद्दा कंच्चाना झाले. कठोर ध्यांनसाधनेमुळे त्यांना दिव्यश्रोत, दुसऱ्यांचे चित्त जाणणे, पुनर्जन्म जाणणे, दिव्य चक्षु, आर्य सत्याचे ज्ञान व सिद्धी प्राप्त अशा सहा अभिज्ञा प्राप्त झाल्या. म्हणून त्यांना अभिज्ञालाभिणी असेदेखील म्हटले गेले आहे.

अंतसमय जेव्हा जवळ आला तेंव्हा त्या बुद्धांना भेटावयास गेल्या. त्यांना त्या म्हणाल्या, "तुमच्या पर्वश्रमिची मी स्त्री आहे. मी आता थकून गेली आहे. जीवन थोडेच शिल्लक राहिले आहे. तुम्हास लवकरच मी सोडून जाईन. माझे निब्बान मी प्राप्त केले आहे. आता काही करायचे बाकी नाही. या संसारात जर माझ्याकडून तुम्हाला जर काही त्रास झाला असेल तर मला क्षमा करा." असे बोलून त्यांनी बुद्धांचा निरोप घेतला. त्यानंतर दोनच दिवसात त्यांचे परिनिर्वाण झाले. त्या समई त्या 78 वर्षांच्या म्यानमार.

म्यानमार (ब्रम्हदेश) येथील हे जगप्रसिद्ध चित्र. राहुल हा बुद्धांजवळ आपला वारसा मागत आहे. भगवान बुद्धांच्या महापरीनिर्वाणापूर्वी दोन वर्षे अगोदर यशोधरा यांनी या जगाचा निरोप घेतला. सर्वांवर उपकार करणारी, सुखदुःखात समानतेने राहणारी, दया व अनुकंपा दाखविणारी यशोधरेची मुक कहानी बौद्ध साहित्यात अमर आहे.

संजय सावंत, नवी मुंबई (लेखक-जेष्ठ बौद्ध इतिहास अभ्यासक)

साभार: ऑनलाईन धम्मचक्र वेबपेज.

संकलन: मिलिंद आशा तानाजी धावरे, जय भिम परिवार मैत्री संघ.

🦚 🦚 🦚 *बौध्द सातवाहन सम्राटांची कर्मभूमी–आंध्र प्रदेश व तेलंगणा* 🦚 🦚 🦚

पद्मावती, सुखावती, अमरावती ही नावे बौध्द संस्कृती व परंपरेशी संबंधीत आहे. हिमालयातील अमरनाथ गुहेजवळून वाहणारी अमरावती नदी आहे. विदर्भातील अमरावती हे प्राचिन बौध्द क्षेत्र आहे. येथे प्राचिन अंम्बाबाईचे मंदिर आहे. अंम्बा, पाली ही नावे बौध्द धम्माशी निगडीत आहेत. धम्म उपासिका आम्रपाली ही बौध्द पर्वातील प्रत्यक्ष तथागतांशी संवाद केलेली महत्वाची नाईका होती. तिच्या नावाचा अपभ्रंश होवून अम्ब, अंम्बा ही नावे प्रचलित झाली आहे.

दक्षिण भारतातील आंध्रपदेशमधील अमरावती हे सुध्दा असेच एक बौध्द संस्कृतीशी निगडीत प्राचिन केंद्र आहे. प्राचिन जंम्बुद्विपामध्ये दक्षिणेकडील राज्यांस नागमंडल असे म्हटले जात होते. बौध्द धम्मीय नागराजांची येथे सत्ता होती. मौर्यांचे दक्षिणेकडील सातवाहन हे मांडलीक राजे होते. मौर्याच्या ऱ्हासानंतर नागमंडलममध्ये आंध्र सातवाहन साम्राज्याची सत्ता होती. सातवाहन राज्याची राजधानी अमरावती होती. आंध्र सातवाहनांची सत्ता गेल्यानंतर याचे तीन भाग झाले. 1. चेर-केरळ 2. पांड्य-कर्नाटक 3. चोल-तामिळनाडू. आंध्र प्रदेशचे नुकतेच विभाजन झाले आहे. आंध्रप्रदेश व तेलंगना अशी दोन राज्ये निर्माण झाली आहेत.

आंध्रप्रदेश सरकारने आपल्या राज्याची राजधानीचे नाव अमरावती ठेवले आहे. आंध्रप्रदेश सरकारचे फार कौतुक वाटते की, त्यांनी प्राचिन बौध्द इतिहासाला उजाळा देत आपल्या राज्याच्या राजधानीचे नाव अमरावती ठेवले आहे. येथे जवळच कृष्णा नदीवर नागार्जून सागर नावाचे धरण आहे. नागार्जूनसागर जवळील बुध्दवनम किंवा सिरीपर्वत आराम सारखे हजारो कोटी रुपयांचे बौध्द पर्वाची ओळख निर्माण करणारे आंतरराष्ट्रीय पर्यटनाला चालना देणारे प्रोजेक्ट उभे केले आहे. महाराष्ट्रामधे अशा प्रकारचे काम होत नसल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रामधे बौद्ध संस्कृती, परंपरा प्राचीन काळापासून रुजलेली आहे. पाषांणमध्ये कोरलेल्या हजारो लेण्या, कातळातील शेकडो, चैत्यगृह बांधलेली, विटांची अनेक स्तूप अशी कित्येक प्राचिन बौद्ध संस्कृती, परंपरा दर्शविणाऱ्या प्राचिन वास्तु आहेत. परंतु त्यांचे जतन, अभ्यास व संवर्धन होतांना दिसून येत नाही याची खंत वाटते.

तेलंगणा सरकार नागार्जुनसागरजवळ आशिया खंडातील सर्वांत बुद्धा थीम पार्क उभारले आहे. 'बुद्धवनम' असे या प्रोजेक्टचे नाव ठेवण्यात आले असून त्याचे काही छायाचित्र बौद्ध इतिहास अभ्यासक अनिल जगताप यांनी काढलेले आहेत. आंध्र-ज्या सम्राज्याची ओळख मातृसत्ताक होती. ज्या साम्राज्याचे घोडे तिन्ही समुद्राचे पाणी पित होते, ज्या साम्राज्याची सत्ता समुद्र व भुभाग यांचेवर होती, ज्या साम्राज्याने बौद्ध धम्माच्या प्रसार व प्रचारासाठी दगडामध्ये हजारो लेण्या कोरून तथागतांच्या धम्माची महती जनमानसामध्ये हजारो वर्षे राहील याचा विचार करून धम्म अमर, अमृत केला ते साम्राज्य म्हणजे साम्राज्य म्हणजे आंध्र सातवाहन साम्राज्य होय. प्राचिन भारतातील उत्तरेकडील बलाढ्य मौर्य साम्राज्याचे मध्य व दक्षिण भारतातील मांडलिक राजे म्हणजे आंध्रचे सातवाहन होते.

उत्तरेकडे मौर्याचा पाडाव झाल्यानंतर सातवाहनांनी दक्षिण प्रांतामध्ये आपले साम्राज्य वाढविले. मौर्याप्रमाने त्यांनी बौद्ध धम्मास राजाश्रय दिला.

आंध्र सातवाहन राज्यकर्ते हे बौद्धधम्मीय होते. संपूर्ण महाराष्ट्रामधे सातपुडा, सातमाळा, अजिंठा, सह्याद्रीच्या रांगांमध्ये बौद्ध धम्माच्या प्रचार व प्रसारासाठी बौद्ध लेण्या, संघाराम उभारले. आंध्रप्रदेशामधील विशाखापट्टणम, गुंटुर, अमरावती, जग्गयपेठ, अल्लरु, गुडिवाडा, घंटाशाला, गुटापेल्ली, भट्टीप्रोलू, नागार्जुनकोंडा, अनुपू, उंडावेल्ली, चंदावरम, नडालुरु, इरागुडी, श्रीकाकुलम, रामतीर्थम, कोट्टरु, शंकरम, बाव्हिकोंडा, दंतपूरम, गोपाळपट्टनम अशाप्रकारे अनेक ठिकाणी बौद्ध लेण्या, विटांचे व दगडाचे स्तूप, विहारे, संघाराम बांधून बौद्ध धम्मास दक्षिणेकडे व दक्षिण पूर्व देशांमध्ये प्रचार व प्रसार करण्याकरिता वाट मिळवून दिली आहे.

आंध्रचे सातवाहनांची सत्ता विंद्य पर्वतापासून दक्षिणेकडील तामिळनाडूपर्यंत होती. दक्षिण भागावर त्यांचा एकछत्री अंमल होता. प्रतिष्ठान म्हणजे आत्ताचे पैठण, जुन्नर यासुद्धा त्यांच्या प्रांतिक राजधान्या होत्या. नाशिक-त्रिरश्मी, जुन्नर-कपिचित, मावळ-कार्ला, भाजे तसेच औरंगाबाद येथील लेण्यांच्या निर्मितीसाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे. व्यापाराच्या मार्गावर निरनिराळ्या ठिकाणी पर्वत्तराजीमधे खोडलेल्या लेणी गुंफांच्या विदेशी व्यापारासाठी उपयोग होत होता. जमीन व पाण्यावरील वाहतुकीने चौफेर विदेशी व्यापारामुळे त्यांची समृद्धि वाढत होती. दक्षिणेतील सातवाहन काळापासून जावा, सुमात्रा, चंपा, फुणांन, सयाम, कंबोडिया, बाली, व्हियंतनाम, लाओस, श्रीलंका येथपर्यंत व्यापाराबरोबर बौद्ध धम्म वाढला गेला. तेथील राजांचा व लोकांचा बौद्धधम्म राजधम्म झाला होता व आजही आहे.

आंध्र सातवाहन सम्राट गौतमिपुत्र सातकर्णी हा प्रसिद्ध बौद्ध आचार्य, दार्शनिक, तर्कशास्त्रज्ञ नागार्जुन यांचा मित्र होता. येथे बौद्ध धम्माचे मोठे केंद्र होते. आंध्र प्रदेशातील तिरुपती येथील बालाजी हे प्रसिद्ध मंदिर हेसुद्धा गौतम बुद्धांचे मंदिर, विहार होते. तिरुपती म्हणजे भगवान गौतम बुद्ध. थिरू म्हणजे थेर, भगवान गौतम बुद्धांना विष्णूचा अवतार माणून वौष्णवांनी राजांनी तेथे विष्णूची मूर्ती म्हणून पूजा सुरु केली आहे. भिक्खू, श्रमण संस्कृतिमध्ये फक्त डोक्यावरील केस काढण्याची पद्धत आहे. बौद्ध धम्मामध्ये श्रामनेर, उपसंपदा या बौद्ध संस्कार विधिमधे डोक्यावरील केस काढण्याची पद्धत आहे. बौद्ध भिक्खू डोक्यावरील केस ठेवत नाहीत.

भिक्खू डोक्यावरील केस का कापतात, या भिक्खू नागसेनाच्या प्रश्नाचे उत्तर देतांना नागसेनचे गुरु स्थविर रोहन सांगतात की, डोक्यावर केस असल्याने सोळा प्रकारचे दोष निर्माण होतात.

1. केस शृंगारावे लागतात. 2. तेल लावावे लागते. 3. केस धुवावे लागतात. 4. अत्तर लावावे लागते. 5. सुगंधित ठेवावे लागतात. 6. हिरडा वापरावा लागतो. 7. आवळ्याचे टेल लावावे लागते. 8. रंगवावे लागते. 9. बांधावे लागतात. 10. कांगव्याने विंचरावे लागतात. 11. वेळोवेळी कपावे लागतात. 12. मोकळे करावे लागतात. 13. केसात उवा पडतात. 14. सावरावे लागतात. 15. केला झडू लागल्यानंतर वाईट वाटते.

शरीर सौंदर्यासाठी केसांचा उपयोग होतो. दाढी, मिश्या व डोक्यावरील केस काढणे हे शरीराबद्दल असत्ती नसल्याचे प्रतिक आहे. केस काढणे हे सुंदरता, त्यागाचे प्रतिक आहे. वैदिक संस्कारामध्ये पिंडदानाचे वेळी फक्त दाढी, मिश्या व डोक्यावरील केस काढण्याची पद्धत आहे. तिरुमल भिक्खूच्या स्मरणार्थ बांधलेले ते एक विहार होते. बौद्धकाळी आंध्रप्रदेशात अमरावती, सिरी धन्यकटक, सिरिपर्वत, नागार्जूनकोंडा हे बौद्ध धम्माचे महत्वाचे केंद्र होते. आंध्रचे सातवाहन व विदर्भातील वाकाटक हे नाग बौद्ध राजे होते. त्यांनी गुप्त राजांना साम्राज्य विस्तारासाठी मदत केली होती. नंतर त्यांनी वाकाटक राज्य निर्माण करून त्यांची सत्ता मध्य भारतापासून आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्रापर्यंत वाढविली होती. त्यांनी पाषाणात अनेक शैली, लेण्या, विहारे, चैत्य निर्माण केले होते.

भगवान बुद्धांच्या मूर्ती निर्माण होण्यापूर्वी भगवान बुद्धांचे अस्तित्व दाखविण्यासाठी धम्मचक्र, त्यांचे वज्रासन (आसन), त्यांच्या पायाचे ठसे इत्यादी गोष्टींना भगवान बुद्धांचे प्रतिक समजून आदर दाखविला जात असे. अभय मुद्रेतील मोठी मूर्ती हैद्राबाद येथील लुंबिनी गार्डन, हुसेनसागर येथे मूर्ती उभी केली आहे. आंध्र प्रदेशात थेरवाद, महासांघिक, सर्वास्तिवाद, महिशासक, बहुश्रुतीय, आंध्रक, चैत्यक, शैलक आणि संम्मितीय शाखांचे अस्तित्व होते. त्याचप्रमाणे महायान आणि त्याच्या सर्व शाखा वज्रायन, मंत्रायन, तंत्रायन इ. चे अस्तित्व होते. तिरुपती बालाजी एक प्राचिन बौद्ध क्षेत्र या पुस्तकाचे लेखक डॉ. के. जमनादास यांनी तिरुपती बालाजी बौद्ध क्षेत्र असल्याचे अनेक पुरावे दिले आहेत.

सिरीशैल्यम मंदिर - गुंटूर जिल्हा अमरावती येथे डोंगरामधे अनेक लेण्या, स्तूप आढळतात. सिरी धान्यकटक आणि सिरिपर्वत हे महान महायानी बौद्धभिक्खू बोधिसत्व नागार्जुन यांची ही कर्मभूमी आहे. सातवाहन सम्राट गौतमिपुत्र सातकर्णी आणि यज्ञश्री यांनी त्यांच्यासाठी सिरिपर्वतात एक महाचैत्य आणि महाविहार बांधला होता. अनेक चिनी यात्रेकरूंनी त्यांचे प्रवासवर्णनामध्ये याचा उल्लेख केला आहे. भिक्खू नागार्जुन यांनी महायानातील माध्यमिक तत्वज्ञान येथे लिहिले. भिक्खू नागार्जुन यांना द्वितीय बौद्ध असेही संबोधले जाते. प्रतित्यसमूत्पाद विषयीचा त्यांचा शून्यवादाने येथेच जन्म घेतला.

राजा बिंबिसार मगधातील दशसहस्त्र ब्राम्हण आणि गृहस्थ यांच्यासह भगवान बुद्धांकडे गेला. भगवंतांच्या समोर जाऊन त्यांना अभिवादन केले आणि हात जोडून तथागतासमोर बसले. बुद्धांच्या बरोबर असलेल्या भिक्खुंमध्ये उरुवेला काश्यपदेखील होता.

त्यावेळी उरुवेला काश्यप आपल्या असणावरून उठला. आपले उत्तरीय वस्त्र त्याने एका खांद्यावर नीट ठेवले. भगवंतांच्या चरणी नतमस्तक झाला आणि म्हणाला, "तथागत माझे गुरु आहेत. मी त्यांचा शिष्य आहे."

याचा परिणाम तेथील उपस्थित द्वादश दशसहस्त्र ब्राम्हणांच्या आणि गृहस्थांच्या मनावर झाला. भगवंतांनी त्या सर्वांना धम्माचा उपदेश दिला. त्यावेळी एक हजार लोकांनी बुद्धांचे उपासक असल्याचे जाहीर केले.

भगवान बुद्धांनी प्रतिपादान केलेला धम्म समजल्यावर मगधराज श्रेणीय बिंबिसार भगवंतांना म्हणाला, "भगवान, पूर्वी मी राजपुत्र असतांना माझ्या ज्या पाच इच्छा होत्या त्या आता पूर्ण झाल्या आहेत." त्या पाच इच्छा अशा आहेत;

भगवान, मी पूर्वी राजपुत्र असतांना माझ्या मनात विचार आला, माझा राज्याभिषेक झाला तर किती छान होईल. एखादा अरहंत सम्यक संबुद्ध माझ्या राज्यात आला तर किती चांगली गोष्ट होईल. भगवंतांची सेवा करणे मला शक्य झाले तर किती चांगली गोष्ट होईल. भगवंताने मला आपला धम्म शिकवावा आणि शेवटी भगवंतांचा धम्म मला कळावा. या पाचही इच्छा माझ्या पूर्ण झाल्या आहेत.

या पाचही इच्छा पूर्ण झाल्यावर मगधराज श्रेणीय बिंबिसार म्हणाला, "आश्चर्य, हे भगवान, आश्चर्य! जे विस्कळीत झाले आहे त्याची घडी नीट बसवावी. जे गुप्त होते ते प्रकट करावे. वाट चुकलेल्याला मार्ग दाखवाव. ज्यांना डोळे आहेत त्यांना पाहता यावे. त्याप्रमाणे भगवंतांनी अनेक मार्गांनी धम्माची शिकवण दिली. हे केवढे आश्चर्य!"

असे म्हणून राजा बिंबिसार म्हणाला, "भगवण, मी भगवान बुद्धाला, धम्माला आणि संघाला शरण यवत आहे. भावंतांनी आजपासून मला आपला उपासक शरणागत उपासक म्हणून माझा स्वीकार करावा."

असे म्हणून राजा बिंबिसाराणे तेथेच धम्माची दिक्षा घेतली. तेथे उपस्थित सर्व नागरिकांनीही धम्मदिक्षा घेतली. तो जनतेचा धम्म झाला. राजासह सर्व नागरिक बौद्धधम्माचे उपासक झाले, तो दिवस पौष पौर्णिमेचा होता. इ. स. पू. ५२७.

३) महाराणी खेमा यांची धम्मदिक्षा:

ये रागरत्तानुपतंती सोतं, संयक्तं सयंकतं मक्कटकोव जालं| एतंपी छेत्वान वजंती धीरा अनपेक्खींनो सब्बदुःखं पहाय|| (धम्मपद : ३४७)

अर्थ: जे लोक रागात रत आहेत, जे स्वतः निर्माण केलेल्या जाळ्यात कातीन जशी सापडते तसे सापडतात, पण धीर पुरुष याला छेदून, अपेक्षारहित होऊन, सर्व दुःखांचा त्याग करून वाटचाल करतात.

मगधराज श्रेणीय राजा बिंबिसाराणे भगवान बुद्धांना त्यांच्या भिक्खूसंघासह दुसऱ्या दिवसी भोजनाचे निमंत्रण दिले. भगवंतांनी ते मुक संमती देऊन स्वीकारले. भोजनानंतर राजा बिंबिसाराणे राज्य परिवारातील सदस्यांना धम्मदिक्षा देऊन उपासक करावे, अशी विनंती केली.

भगवंतांच्या सानिध्यात येऊन आणि त्यांच्या मार्गनिदर्शणामुळे महाराजा बिंबिसारचे जीवनच बदलून गेले होते. राजा बिंबिसारावर एवढा परिणाम झाला होता की, राजा बिंबिसारास श्रोतापन्न अवस्था प्राप्त झाली.

परंतु राजा बिंबिसारास एकच चिंता होती की, त्याची राणी खेमा ही भगवान बुद्धांना आदर देत नव्हती. ती अत्यंत देखणी होती. तिचा जन्म महाराष्ट्रात सागल नावाच्या नगरात राजकुळात झाला होता. तिचे लग्न मगध देशाच्या बिंबिसार राजाबरोबर झाले होते.

राजगृहाजवळ वेळुवनात भगवान बुद्ध राहत असता बिंबिसार ताजा वारंवार त्यांच्या दर्शनास जात असे. रूपावर आसक्त होऊ नका, असे वैराग्यावर उपदेश भगवान करित असतो, असे खेमाच्या ऐकण्यात आल्यामुळे ती वेळुवनात जाऊ इच्छित नव्हती.

राजाने आपल्या पदरच्या कविकडून वेळुवनातील वनश्रीवर काव्य रचून ते तिच्या समोर म्हणावयास लाविले. उद्यानश्रींचे ते रसभरीत वर्णन एकूण खेमाला तिकडे जाण्याची उत्कट इच्छा झाली. राजाची तीने परवानगी मागितली. राजा म्हणाला, "वेळुवनात जाऊन भगवंतांचे दर्शन घेतल्याशिवाय येता कामा नये."

खेमा वेळुवणाची शोभा पाहून बुद्धदर्शन घेतल्यावाचून माघारी येऊ लागली. तेव्हा तिला दिलेल्या राजाज्ञेची आठवण आली. त्यामुळेच नाखुशीनेच तिला भगवंताचे दर्शन घेणे भाग पडले.

भगवंताजवळ येऊन पाहते, तर त्यांच्या मागे एक अत्यंत लावण्यवती स्त्री वारा घालीत उभी होती. तिला पाहून खेमा आपल्या मनात म्हणाली, 'अशा दिव्य स्त्रिया ज्या महर्षींच्या सेवेला तत्पर असतात, त्याच्या दर्शनाची मला लाज वाटाविना? धिक्कार असो मला आणि माझ्या आढ्यतेला! ह्या अप्सरेची मी दासीदेखील शोभणार नाही.'

हे विचार खेमेच्या मनात चालले असतांना ती सुंदर स्त्री क्रमाक्रमाणे पालटत चालली. ती प्रौढ, म्हातारी व मरून पडलेली दिसली. हे पाहून आपल्या रूपाविषयी खेमेचा अभिमान नाहीसा झाला.

तेव्हा भगवान म्हणाले, "कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे आपल्याभोवती जाळे विनून त्यात कामासक्त मनुष्य बद्ध होतात. परंतु हेही तोडून आणि कामसुखाचा त्याग करून (सत्पुरुष) निरपेक्षपने परिव्राजक होतात."

हा उपदेश कानी पडल्याबरोबर खेमा तिथल्या तिथे अरहंतपदाला पावली. पुढे राजा बिंबिसाराच्या परवानगिने ती भिक्षुणि झाली. ती केवळ भिक्षुणिच झाली नाही तर प्रज्ञावती भिक्षुणित तिला अग्रस्थान मिळाले.

४) स्तुपाची पूजा:

सद्धो सिलेन संपन्नो, यसोभोगसमप्पितो| यं यं पदेस भजति, तत्थ तत्थैव पूजति|| (धम्मपद : ३०३)

अर्थ: जो श्रद्धावान आहे, जो सदाचारी आहे, जो यशस्वी आहे, जो संपत्तिशाली आहे, तो जिथेजिथे जातो तिथेतिथे तो पूजीत होतो.

श्रीलंकेच्या इतिहासात पौष पौर्णिमेला अतिशय महत्वाचे स्थान आहे. या दिवसी भगवान बुद्धांचे श्रीलंकेत आगमन झाले होते. असी त्यांची मान्यता आहे.

श्रीलंकेच्या 'उवा' भागातील 'महियांगण' या परिसराला बुद्धांच्या प्रथम पादस्पर्शाचे भाग्य लाभले. भगवान बुद्धांच्या केशधातुवर भव्य स्तूपाची निर्मिती झाली. भगवान बुद्धांच्या शारीरिक अवशेषांना अतिशय पवित्र मानले जाते. त्या प्रति पूज्य आदरभाव व्यक्त केला जातो.

दिघनिकायातील 'महापरीनिब्बाण सुत्तात' असा उल्लेख आहे की, भगवान बुद्धांच्या अंत्यसंस्कारानंतर मल्ल राजाने एका स्वर्णपात्रात बुद्धावशेष गोळा करून सन्मानाने अत्यंत आदरपूर्वक कुसीणारा येथे सात दिवस ठेवले. त्यानंतर त्याचे आठ भागात विभाजन करून आठ विभिन्न राज्यांत पाठविले. त्यावर भव्य स्तूप उभारण्यात आले. सम्राट अशोकाने त्यांच्या राज्याभीषकाच्या आठव्या वर्षी या स्तुपांचे उत्खणन करविले आणि त्यात सापडलेल्या बुद्धावशेषांवर चौऱ्यांशी हजार स्तूपांची निर्मिती केली.


सम्राट अशोकपुत्र अरहंत महेंद्र थेरो यांच्या श्रीलंका भेटीने आणि श्रीलंकेतील धार्मिक राजांच्या सहयोगाने बुद्धांचे जवळजवळ सर्व प्रकारचे अवशेष श्रीलंकेने जतन करून ठेवले आहेत.

भगवान बुद्धांच्या पश्चात बौद्धजगत तीन प्रकारच्या चैत्यांची पूजा करते. १) बुद्धांचे शारीरिक अवशेष, २) पारिभोगिका (भगवान बुद्धांनी) वापरलेल्या वस्तू, ३) उद्देशिका, बुद्धावशेष ज्या चैत्यात, स्तूपात ठेवले जातात अशा चैत्याची वा स्तुपाची पूजा केली जाते. बुद्ध प्रतिमास पाहून प्रसिद्ध तत्ववेत्ता काउंट केसलिंग लिहितो;

"बुद्धरूपापेक्षा जगात आणखी काही भव्य असेल असे मला वाटत नाही. डोळ्यांनी पाहता आलेले आध्यात्मिकतेचे ते परिपूर्ण मुर्तरुप आहे."

पौष पौर्णिमेला श्रीलंकेत जशी स्तूपांची पूजा करतात तद्वत भारतात देखी स्तूपाची वा प्रतिमेची पूजा केली जाते.

सर्वांचे मंगल होवो!!! 🙏🙏🙏



🦚 🦚 🦚 *❀ ९ जानेवारी ❀* *पहली मुस्लिम शिक्षिका फातिमा शेख जन्मदिन* 🦚 🦚 🦚

****

जन्म :- ९ जानेवारी १८३१ (पुणे); मृत्यू :- ९ ऑक्टोबर १९००.

पहिली मुस्लिम शिक्षिका फातिमा शेख यांचा आज जन्मदिन, ज्यांनी क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले आणि सावित्रीमाई फुले यांच्या बरोबर मिळून मुलींनमधे १५० वर्षांआधी शिक्षणाची मशाला जाळली. आजपासून बरोबर १५० वर्षांपर्यंत पण शिक्षण बहुसंख्य लोकांपर्यंत पोहोचू शकले नव्हते. जेव्हा जग आधुनिक शिक्षणामध्ये खूप पुढे निघून गेले होते, पण भारतामध्ये बहुसंख्य लोक शिक्षणापासून वंचित होते. मुलींच्या शिक्षणाचे तर विचारूच नका काय हाल होते!

ज्योतीराव फुले पुना (आता पुणे) मधे ११ एप्रिल १८२७ मध्ये जन्मले. त्यांनी बहुजनांच्या दुर्गतिला खूपच जवळून बघितले होते. त्यांनमहीत होते की बहुजनांच्या या पत्नाचे कारण शिक्षणाची कमी आहे. यासाठी त्यांनी विचार केला होता की बहुसंख्य लोकांच्या घरापर्यंत शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हायला पाहिजे.

ज्योतिरावं फुले मुलींच्या शिक्षणाचे जबरदस्त पक्षधर होते. याचा आरंभ त्यांनी आपल्या घरापासून सुरु केला. त्यांनी सर्वांत पहिले आपली संगिनी सावित्रीमाई यांना शिक्षित केले. शिक्षित बनऊन आपल्या कार्याला आणखी पुढे घेऊन जाण्यासाठीच्या तयारीला एकजूट झाले. ही गोष्ट त्या वेळच्या सनातण्यांना बिलकुल पसंत पडली (आली) नाही. त्यांचा चारी बाजूंनी विरोध होऊ लागला. तरी पण आपल्या कार्याला मजबूतीने करत राहिले. ज्योतिरावं मानले नाही तर त्यांच्या वडिल गोविंदराव यांच्यावर दबाव टाकण्यात आला. शेवटी वडिलांना पण प्रस्थापित व्यवस्थेच्या समोर विवश व्हावे लागले.

मजबुरीत ज्योतिरावांना आपले घर सोडावे लागले. त्यांचे एक मित्र उस्मान शेख पुण्यातील गंजपेठेत राहत होते. त्यांनी ज्योतिरावं फुलेंना राहण्यासाठी आपले घर दिले. येथेच ज्योतिरावं फुलेंनी १८४८ मधे आपली पहिली शाळा सुरू केली. उस्मान शेखपण मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणत होते. त्यांची एक बहीण फातिमा होती, तिला ते खूप चाहत होते.

उस्मान शेखने आपल्या बहिणीच्या हृदयात शिक्षणाबद्दल रुची निर्माण केली. सावित्रीमाईच्या बरोबर लिहिणे वाचने शिकू लागली. नंतर त्यांनी शैक्षणिक सनद प्राप्त केली. क्रांतिसूर्य ज्योतिरावं फुले यांनी मुलींसाठी अनेक शाळा कायम केल्या. सावित्रीमाई आणि फातिमाने तेथे शिकविणे सुरु केले. त्या जेव्हापण रसत्यांनी जात असतात तेव्हा लोक त्यांची हसू उडवायचे आणि त्यांना दगड मारायचे. दोघीपण हा अपमान सहन करित राहिल्या परंतु त्यांनी आपले काम बंद नाही केले.

फातिमा शेखच्या काळात मुलींच्या शिक्षणात अनेक अडचणी होत्या. या काळात त्यांनी स्वतः शिक्षण प्राप्त केले. दुसऱ्यांना लिहिणे व वाचणे शिकविले. ती शिक्षण देणारी पहिली मुस्लिम महिला होती ज्यांच्या जवळ शिक्षणाची सनद होती.

फातिमा शेखने मुलींच्या शिक्षणासाठी ज्या सेवा दिल्या त्या विसरल्या जाऊ शकत नाही. घरोघरी जाण, लोकांना अहिक्षणाची आवश्यकता समजाविणे, मुलींना शाळेत पाठविण्यासाठी त्यांच्या आई वडिलांची वाहवा करणे, फातिमा शेखची सवय बनली होती.

शेवटी त्यांची मेहनत रंग घेऊ लागली. लोकांच्या विचारात परिवर्तन आले. ते आपल्या घरच्या मुलींना शाळेत पाठवू लागले. मुलींमध्ये पण शिक्षणाच्या प्रती रुची मिर्माण होऊ लागली. शाळेत त्यांची संख्या वाढू लागली. मुस्लिम मुलीं पण आनंदाने शाळेत जाऊ लागल्या.

विपरीत परिस्थितीत प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात जाऊन शिक्षणाच्या महान कार्यामध्ये ज्योतिराव तसेच सावित्रीमाई फुलेंना मौलिकतेच्या बरोबर सहयोग देणारी एक वीर मानवतावादी शिक्षिका फातिमा शेखला विनम्र अभिवादन.

🦚🦚🦚 फातिमा शेख जन्मदिना निमित्त त्यांना विनम्र अभिवादन! 🦚🦚🦚

फातिमा शेख कोण होत्या :

फातिमा शेख (जन्म-९ जानेवारी १८३१ (पुणे); मृत्यू–९ ऑक्टोबर १९००.) या भारतीय शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारक होत्या, त्या समाजसुधारक ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या सहकारी होत्या. त्यांना भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका मानले जाते. फातिमा शेख या शिक्षक होत्या ज्यांनी ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यासमवेत आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाच्या चळवळीला धार दिली.

प्रारंभिक जीवन :

'मुस्लिम सत्यशोधक' मराठी मासिकाने जुलै-ऑगस्ट २०२० च्या आवृत्तीत लिहिले आहे की, त्यावेळी फातिमा शेख यांचे कुटुंब उत्तर प्रदेशातून स्थलांतरित होऊन महाराष्ट्रातील मालेगाव येथे स्थायिक झाले होते. त्यांचे कुटुंबीय हातमागावर कपड्यांचा व्यवसाय करायचे. पण महाराष्ट्रात कोरड्या आणि हातमागाच्या कपड्यांच्या व्यवसायात मंदी आल्यानंतर त्यांचे कुटुंब मालेगावहून पुण्यात आले.

फातिमा शेख यांचे कुटुंब उच्चभ्रू मुस्लिम कुटुंब होते, परंतु वयाच्या नऊव्या वर्षी तिच्या वडिलांचे निधन झाले. तिच्या पालकांच्या मृत्यूनंतर, फातिमाचे संगोपन तिचा मोठा भाऊ, उस्मान शेख यांनी केले, तर तिचे शेजारी आणि वडिलांचे मित्र, मुन्शी गफ्फार बेग यांनी दोन भावंडांसाठी पालक म्हणून काम केले.

फातिमा आणि उस्मान शेख यांचे पालक मुन्शी गफ्फार बेग हे फुले आणि शेख कुटुंबातील दुवा होते. बेग हे उर्दू आणि पर्शियन भाषेचे प्रभुत्व आणि ज्योतिबा फुले यांचे वडील गोविंद राव यांचे चांगले मित्र होते. दक्षिण भारतीय इतिहासकार धनजय कीर यांनी तर लिहिलं आहे की ज्योतिबा फुले महात्मा ज्योतिबा फुले बनवण्यात गफ्फार बेग हे सर्वात मोठे पात्र आहे.

कीर यांनी लिहिले आहे की, "जोतिबा फुले वयाच्या सातव्या वर्षी मराठी शाळेत शिकत असताना, त्यांचे वडील गोविंदराव यांच्याकडे काम करणाऱ्या ब्राह्मण कर्लकाने त्यांना तिच्या मुलाचे शिक्षण सोडून तिला कामावर ठेवण्यास प्रवृत्त केले होते. त्या ब्राह्मण कारकुनाला शूद्राच्या मुलाने ज्ञान प्राप्त करावे हे मान्य केले नाही.

कीर यांनी लिहिले की, बेग यांनीच नंतर गोविंदरावांना आपल्या मुलाला स्कॉटिश मिशनरी स्कूलमध्ये शिकण्यासाठी पाठवण्यास प्रवृत्त केले. पुढे बेग यांनीही फुले यांना उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणा दिली. बेग यांना फुले यांची क्षमता फार पूर्वीच जाणवली होती.

शिक्षण :

तत्कालीन समाजात मराठी शाळा किंवा ख्रिश्चन मिशनरी शाळांमध्ये संस्कृत शिकवली जात होती. वंचित आणि बहुजनांच्या मुलांना संस्कृत शिकण्यास मनाई होती आणि त्यांना ख्रिश्चन शाळांमध्ये जाण्याची भीती वाटत होती. त्यावेळी मुलींना शाळेत शिकवण्याचा विचारही कोणी केला नाही. उच्चभ्रू मुस्लिम कुटुंबात मौलवींना घरी बोलावून मुलींचे शिक्षण केले जात असे.

तिला फक्त कुराण, अरबी, पर्शियन आणि उर्दूचे प्रशिक्षण घेता आले. मुलींना शिक्षण देण्याची आणि शूद्रांसाठी शाळा उघडण्याची कल्पना ज्योतिबा फुले यांनी आपल्या वडिलांना आणि परिसरातील लोकांशी सांगितल्यावर तेथील ब्राह्मण प्रचंड संतापले.

ब्राह्मणांनी गोविंदरावांना त्या मुलाला पटवून द्या नाहीतर परिणामांना सामोरे जा, अशी धमकी द्यायला सुरुवात केली. फुले शाळा सुरू करण्याच्या आग्रहावर ठाम राहिले, परंतु त्यांचे वडील सरंजामी शक्तींपुढे असहाय्य होते. अखेरीस वडिलांनी फुले आणि त्यांची पत्नी सावित्रीबाई यांना फक्त घालण्यासाठी कपडे देऊन घराबाहेर काढले.

फुले दाम्पत्याने वडिलांचे घर सोडल्यानंतर मुन्शी गफार यांनी दोघांनाही उस्मान शेख यांच्या घरी राहण्यासाठी जागा दिली. शेजारी असल्यामुळे उस्मान आणि फुले एकमेकांना चांगले ओळखत होते. उस्मानने आपल्या घराचा काही भाग फुले यांना राहण्यासाठी व शाळा चालवण्यासाठी दिला आणि ते शाळेत शिकू लागले.

अशा प्रकारे जानेवारी १ जानेवारी १८४८ मध्ये पुण्यात वंचित, बहुजन आणि गरीब मुस्लिम समाजातील मुलींसाठी भारतातील पहिल्या आधुनिक शिक्षण शाळेची पायाभरणी झाली. फातिमा शेख यांना अरबी आणि उर्दू भाषा येत होती, त्यामुळे ती त्यांच्या घरच्या शाळेची पहिली विद्यार्थिनीही ठरली आणि तिने ज्योतिबा फुले आणि त्यांची मुलगी सावित्रीबाई यांच्याकडून मराठी, इंग्रजी आणि आधुनिक विषय घेतले.

पहिली मुस्लिम महिला शिक्षिका :

सोमनाथ देशकर त्यांच्या 'संत, महात्मा, विचारक आणि इस्लाम' या पुस्तकात लिहितात, फातिमा शेख यांनी मराठीसोबतच अनेक विषय लवकरच शिकले होते. ती फुले दाम्पत्यासोबत परिसरात फिरत, वंचित,

बहुजन आणि मुस्लिम कुटुंबांना भेटत आणि मुलींना शाळेत पाठवण्याची विनंती करत. शाळेत शिकणाऱ्या मुलींची संख्याही वाढू लागली.

अशा स्थितीत दोन मास्तरांचे काम चालत नव्हते आणि निःस्वार्थ सेवेने शाळेत शिकवण्यासाठी ब्राह्मणेतर महिला शिक्षिकाही परिसरात उपलब्ध नव्हती. या त्रासातच फातिमा शेख यांनी शाळेच्या तिसऱ्या शिक्षिका म्हणून स्वेच्छेने मुलींना शिकवायला सुरुवात केली.

शाळेत शिकवण्यापूर्वी ज्योतिबा फुले यांनी फातिफा शेख आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई या दोघींना स्वतःहून शिक्षक प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण देण्यापूर्वी ज्योतिबा फुले स्वतः अहमद नगर येथील मिशनरी टीचर्स ट्रेनिंग स्कूलमध्ये काही दिवस जाऊन शिकविण्याचे कौशल्य आणि प्रक्रिया जवळून पाहत होते.

फुलेंच्या शाळेची कार्यपद्धती आणि अभ्यासक्रम या परिसरातील ब्राह्मणांच्या मिशनरी शाळा आणि गुरुकुलांपेक्षा खूपच वेगळा होता. शाळेचा विस्तार होऊ लागला होता. मुलींशिवाय आता वंचित (शुद्ध), बहुजन आणि गरीब मुस्लिमांची मुलेही शाळेत शिक्षणासाठी येऊ लागली.

शिक्षकांच्या प्रशिक्षणानंतरही सावित्रीबाई आणि फातिमा यांना आवश्यक असलेले अध्यापन कौशल्य मिळालेले नाही असे फुले यांना वाटले तेव्हा त्यांनी दोघांनाही योग्य शिक्षक प्रशिक्षणासाठी अहमदनगर येथील मॅडम सिंथिया फेअरर मिशनरी स्कूलमध्ये दाखल केले.

गेल अमवत सारख्या इतिहासकारांच्या लेखांचा संग्रह 'सर्वोत्कृष्ट शिक्षिका आणि नेता' देखील याची साक्ष देतो की फातिमा आणि सावित्रीबाईंनी शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन प्रशिक्षण घेतले.

समाजातील सवर्ण हिंदू आणि धर्मांध मुस्लिमांच्या विरोधानंतर फातिमा फुले दाम्पत्याच्या इतर सामाजिक कार्यातही तितकेच सहकार्य करू लागले. १८४९ मध्ये फुले यांनी फक्त पुण्यात मुलींसाठी पाच शाळा उघडल्या. १८५४ मध्ये कामगार आणि त्यांच्या मुलांसाठी रात्रशाळाही स्थापन करण्यात आली.

या शाळांमध्येही फातिमा फुले दाम्पत्याला आधार देऊ लागल्या. याशिवाय १२ जुलै १८५३ रोजी फुले यांनी 'बाल हत्या प्रतिबंधक गृह' नावाचा आश्रमही उघडला होता. या आश्रमात बालविवाहानंतर विधवा झालेल्या अशा महिलांना आश्रय देण्यात आला.

समाजात अनेकवेळा अशा तरुण विधवा महिलांवरही हल्ले झाले, ज्यांच्यासाठी फुले यांनी पत्नी सावित्रीबाईंसह फातिमा यांना नर्सिंगचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणही दिले होते. या कामात फातिमाही सावित्रीबाईंना आनंदाने मदत करत असे.

फातिमा शेख यांच्यासह सावित्रीबाई, ज्योतिबा फुले यांनी संपूर्ण परिसरात मुलींच्या शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली होती. त्या परिसरातील वंचित (शुद्ध), बहुजन तसेच मुस्लिमांच्या घरी जाऊन मुलींना शाळेत पाठवायला सांगत. लोकांना आधुनिक शिक्षण आणि मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व सांगून ती मुलींना शिकवण्यासाठी तयार करत असे.

सुरुवातीला उच्चवर्णीय हिंदूंबरोबरच मुस्लिमांनीही त्यांच्या प्रयत्नांना विरोध केला. विशेषत: मुलींना आधुनिक शिक्षण देण्याच्या नावाखाली तेथील मुल्ला-मौलवी आणि खुद्द फातिमा यांनाही शिक्षणाचे प्रशिक्षण घेण्यासाठी पुणे ते अहमदनगरला प्रचंड विरोध सहन करावा लागला.

मात्र, फातिमा शेख आणि तिचा भाऊ नेहमी त्याकडे दुर्लक्ष करत आपल्या वाटेवर गेले. नंतर विरोध करणाऱ्या लोकांनीही मुलींना शाळेत पाठवण्याचे मान्य केले. १८५६ पर्यंत ज्योतिबा फुले यांनी पुण्यात आणि बाहेर १५ शाळा स्थापन केल्या होत्या, जिथे वंचित (शुद्ध), बहुजन, गरीब ख्रिश्चन आणि मुस्लिम यांच्या मुला-मुलींना आधुनिक शिक्षण मिळत होते.

मुख्याध्यापिका म्हणून फातिमा शेख :

सावित्रीबाई आता फातिमा शेख यांच्यासोबत त्यांच्या पतीने स्थापन केलेल्या शाळांचे व्यवस्थापन आणि व्यवस्थापन करण्यासाठी काम करत होत्या. सावित्रीबाई एकदा गंभीर आजारी पडल्यानंतर सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे गेल्या. याच गावात त्यांचे मामाचे घर होते.

सावित्री गेल्यानंतर शाळांच्या देखरेखीची आणि प्रशासनाची जबाबदारी फातिमा यांच्याकडे आली होती. याशिवाय ती एका शाळेत मुख्याध्यापकाची भूमिकाही करू लागली. १० ऑक्टोबर १८५६ रोजी सावित्रीबाईंनी आपल्या पतीला लिहिलेल्या पत्रातही याचा उल्लेख आहे. या पत्रात त्यांनी फातिमाच्या कामाचेही खूप कौतुक केले आहे. पत्रात त्यांनी फातिमाच्या कामाची पद्धत, तिची वागणूक आणि क्षमता यांचा तपशीलवार उल्लेख केला आहे.

🦚🦚🦚 *वृद्धत्व पायापासून वरच्या दिशेने सुरू होते!* 🦚🦚🦚

आयुषचे माजी महासंचालक डॉ. जी. डी. लवेकर यांनी पाठवले आहे.

पाय सक्रिय आणि मजबूत ठेवा!!

▪ जसे वर्षे घालवतो तसे रोज म्हातारा होत असतो, पाय नेहमी सक्रिय आणि मजबूत असले पाहिजेत.

जसजसे सतत म्हातारे होत असतो/वृद्ध होत असतो, तस तसे केस राखाडी होण्याची/त्वचा निस्तेज/चेहऱ्यावर सुरकुत्या पडण्याची भीती बाळगू नये.

दीर्घायुष्य प्रदीर्घ तंदुरुस्त आयुष्याच्या लक्षणांपैकी लोकप्रिय यूएस मॅगझिन "प्रिव्हेन्शन" द्वारे सारांशित केले आहे, पायांचे मजबूत स्नायू *सर्वात महत्त्वाचे आणि आवश्यक* म्हणून शीर्षस्थानी सूचीबद्ध आहेत. कृपया दररोज चालत जा.

▪ जर फक्त २ आठवडे पाय हलवले नाही तर पायाची खरी ताकद १० वर्षांनी कमी होईल. *फक्त चाला*

▪ डेन्मार्कमधील कोपनहेगन विद्यापीठाच्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की वृद्ध, तरुण २ आठवड्यांच्या *निष्क्रियता* दरम्यान, पायांच्या स्नायूंची ताकद *एक तृतीयांश* कमकुवत होऊ शकते* जे २०-३० वर्षांच्या वृद्धत्वाच्या समतुल्य आहे!! *म्हणून फक्त चाला*

▪ पायाचे स्नायू कमकुवत झाल्यामुळे नंतर पुनर्वसन व व्यायाम केले तरीही ते बरे होण्यास बराच वेळ लागेल. म्हणून *चालण्यासारखा नियमित व्यायाम खूप महत्त्वाचा आहे*

▪ संपूर्ण शरीराचे वजन/भार शिल्लक राहून पायांवर विश्रांती घ्या.

पाय हे १ प्रकारचे खांब आहेत,जे मानवी शरीराचे संपूर्ण भार सहन करतात. *रोज चाला.*

▪ मजेची गोष्ट म्हणजे, माणसाच्या ५०% हाडे, ५०% स्नायू २ पायांत असतात. *चालत जा*

▪ मानवी शरीरातील सर्वात मोठे व मजबूत सांधे, हाडे देखील पायांमध्ये असतात. *10K पावले/दिवस*

▪ मजबूत हाडे, मजबूत स्नायू, लवचिक सांधे *लोह त्रिकोण* बनवतात जो सर्वात महत्वाचा भार वाहतो. म्हणजेच *मानवी शरीर"*

▪ ७०% मानवी क्रियाकलाप व व्यक्तीच्या जीवनातील ऊर्जा बर्न दोन पायांनी केली जाते.

▪ हे माहित आहे का? जेव्हा एखादी व्यक्ती तरुण असते, तेव्हा तिच्या *मांडीत ८०० किलो वजनाची छोटी गाडी उचलण्याईतकी ताकद असते.*

पाय हे शरीराच्या हालचालीचे केंद्र आहे.

▪ दोन्ही पायांना मिळून मानवी शरीराच्या ५०% नसा, ५०% रक्तवाहिन्या आणि ५०% रक्त त्यामधून वाहत असते.

▪ हे शरीराला जोडणारे सर्वात मोठे रक्ताभिसरणं नेटवर्क आहे. *म्हणून रोज चाला.*

▪ फक्त जेव्हा पाय निरोगी असतात तेव्हाच रक्ताचा प्रवाह सुरळीत होतो. त्यामुळे ज्यांच्या पायाचे स्नायू मजबूत असतात त्यांचे हृदय नक्कीच मजबूत असते. *म्हणून चाला.*

▪ वृद्धत्व पायपासून वरच्या दिशेने सुरु होते.

▪ एखादी व्यक्ती मोठी होते, मेंदू, पाय यांच्यातील सूचनांच्या प्रसारणाची अचूकता व गती कमी होते, ती व्यक्ती तरुण असतांना कमी होते. *कृपया चालत जा.*

▪ याशिवाय, तथाकथित हाडांचे खत कॅल्शियम काळांतराणे लवकर/नंतर नष्ट होते, ज्यामुळे वृद्धांना हाडे फ्रॅक्चर होण्याची अधिक शक्यता असते. वृद्धांमध्ये हाडांचे फ्रॅक्चर सहजपणे अनेक गुंतागुंत निर्माण करू शकतात. विशेषतः मेंदूच्या थ्रोंबोसिस सारखे घातक रोग.

▪ हे माहित आहे काय? साधारणपणे १५% वृद्ध रुग्ण जास्तीत जास्त मारतात. १ वर्षाच्या आत मांडीचे हाड फ्रॅक्चर! *रोज न चुकता चाला.*

पायांचा व्यायाम, वयाच्या ६० वर्षानंतरही कधीही उशीर होत नाही.

▪ पाय काळांतराने हळूहळू म्हातारे होत असले तरी, पाय/पायांचा व्यायाम करणे हे आयुष्यभराचे काम आहे. *१०००० पावले चाला.*

▪ केवळ नियमितपणे पाय बळकट केल्याने पुढील वृद्धत्व टाळता येते/कमी करता येते. *३६५ दिवस चाला.*

▪ पायांना पुरेसा व्यायाम मिळावा, पायाचे स्नायू निरोगी राहतील याची खात्री करण्यासाठी कृपया रोज किमान ३०-४० मिनिटे चाला.

🦚🦚🦚 विठू महाराची कर्तबगारी (खरा इतिहास) 🦚🦚🦚

हंसराज कांबळे (नागपूर), ८६२६०२१५२०. ✍️

दक्षिण भारतात इस्लामि सत्तेचा उदय म्हणजे *बहामनि राज्य* होय. दिल्लीचा बादशहा महमंद तुघलक याचा अस्पृश्य समाजातून मुसलमान झालेला दौलताबादचा एक सुभेदार *झाफरखान* याने आपल्या धन्याविरुद्ध बंड पुकारून एक स्वतंत्र राज्याची स्थापना इ. स. १३४७ मधे केली आणि तो *दुसरा महमदशहा* हा दक्षिणेतील दौलताबाद येथे राज्य करीत असतांना इ. स. १४७५ साली भयंकर *दुष्काळ* पडला. त्यावेळी त्याच्या राज्यातील *मंगळवेढे* गावाचा एक मालगुजार *दामाजीपंत कुलकर्णी* नावाचा सात्विक ब्राम्हण हृहस्थ होता.

मंगळवेढे गावातील दुष्काळात चाऱ्याच्या अभावी जनावरे आणि उपासमारीमुळे माणसे पटापट मरू लागली होती. गावातील कोठारात सरकारी धान्य भरून होते. लोकांचे दुष्काळामुळे होत असलेले हाल *दामाजी पंताला* पाहावले गेले नाही. म्हणून त्याने सुलतानाच्या लष्करातील कोठारात भरून ठेवलेले धान्य लोकांना वाटून दिले. काही दिवसानंतर ही बातमी दौलताबाद येथे सुलतानपर्यंत जाऊन पोहोचली. ह्याचा त्याला भयंकर राग आला. सुलतानाने आपल्या सैन्य अधिकाऱ्यांना चौकशीसाठी पाठविले, त्यांनी चौकशी केली व दामाजिपंत कुलकर्णी यास दोषी ठरवून त्याला अटक केली आणि त्याच्या मुस्क्या बांधून त्याला सुलतानाच्या दरबारात घेऊन गेले.

विठू नावाचा *महार* हा मंगळवेढे गावात राहत होता. या भानगडीच्यावेळी तो सरकारी कामानिमित्त राजधानी दौलताबाद येथे गेला होता. तो आपले सरकारी कोतवालिचे काम आटोपून घरी परत आल्यावर, गावात पसरलेली शांतता व गावातील लोकांचे उतरलेले निराश चेहरे पाहून त्याने आपली बायको *रुख्मा* हिला याबद्दल विचारले. तेव्हा त्याला समजले की, आपल्या गावचा मालगुजार 'दामाजीपंत ब्राम्हण' याला सुलतानाच्या शिपायाने मुस्क्या बांधून पकडून नेले. ही गोष्ट *विठू महाराला* न आवडल्याने रात्री, त्याने आपले स्वतःचे जमिनीत पुरून ठेवलेले कलदार सोन्याचे रुपये खोदून बाहेर काढले आणि ते सर्व पोत्यात भरून, ते पोते पाठीवर घेऊन पायी चालत जाऊन सरळ राजधानीत हजर झाला. दामाजी पंताने मंगळवेढे गावातील लोकांना वाटलेल्या धान्याच्या किंमती इतक्या कालदार सोन्याच्या मोहरा सरकारी अधिकाऱ्याला मोजून देऊन पैसे मिळाल्याची सरकारी पावती *विठू महाराने* प्राप्त केली.

त्यावेळी *विठू महाराचे* रूप असे होते. त्याचे वर्णन कवीने अशा प्रकारे केले आहे.

"फाटक्या चिंध्या रुक्मिणी कांत! मस्तकी बांधोनी मुंडासे त्वरित! कंठी घालून काळे सुताचा दोरा! कानात घातल्या त्याने पगरा!! कांसेसी बांधोनी लंगोटी! हाती सत्वर घेतली काठी!!"

दामाजी पंताच्या काळातील महारांचा वेश म्हणजे डोकीस फाटके मुंडासे, गळ्यात काळा दोरा, कानात पितळेच्या बाऱ्या, कमरेला लंगोटी, पायात फाटका जोडा व हातात काठी असा त्याचा वेश होता. असे वर्णन ब्राम्हण कवीने आपल्या काव्यात केले आहे.

विठू महार ती सरकारी पोचपावती घेऊन सरळ राजधानी दौलताबाद येथील सुल्तान दुसरा महमदशहा याच्या दरबारात हजर झाला. सरकारी पोचपावती पाहून सुल्तानाचे समाधान झाले. त्याने दामाजिपंत कुलकर्णी या मालगुजाराला मुक्त करण्याचे आदेश आपल्या अधिकाऱ्याला दिले. मालगुजार दामाजी पंत मोकळा झाला व तो सर्व गावभर *विठू महाराची* स्तुती करू लागला. विठू महाराची कार्बगारी पाहून संपूर्ण मंगळवेढे गावातील लोक आश्चर्यचकित झाले आणि संपूर्ण बहामणी राज्यातील सर्व गावात याची चर्चा जिकडे-तिकडे होऊ लागली. आपल्याला *विठू महाराने* सुल्तानाच्या कैदेतून मुक्त केल्याबद्दल *दामाजीपंत* ब्राम्हणाने बहामणी राज्याच्या सुल्तानाच्या आदेशाने *५२ हक्कांची सनद* स्वतः लिहून व सुल्ताना कडून शिक्कामोर्तब करून मंगळवेढे गावातील

सर्व लोकांसमक्ष *विठू महार* याला बहाल केली. तत्कालीन महाराष्ट्रातील सर्व अठरा लाख सोमवंशीय *महार लोकांस* *५२ हक्कांची सनद* प्राप्त झाली आहे हे कळावे म्हणून याच सनदेची उजळणी *मुंगी पैठण* येथील ऐकणाथ स्वामींचे देवळात हिजरी सन १०५१ श्रावण शुद्ध शके १५६३ म्हणजे दिनांक १३ रविवार १४७५ रोजी करण्यात आली. विठू महाराचे नाव त्याच्या कर्तबगारीमुळे महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात जिकडे-तिकडे सर्वदूर पसरले. त्याचे कौतुक व वाहवाही सर्वत्र होऊ लागली. अशा प्रकारची एका *महाराची* झालेली प्रसिद्धी काही दुष्ट ब्राम्हणांस आवडली नाही.

काही दिवसांनी तो काळा दिसणारा उदार अंतःकरणाचा कार्बगार विठू महार मरण पावला. महारांची अधिक कीर्ती वाढू नये म्हणून ब्राम्हणांनी एका दगड फोडीचे काम करणाऱ्या वढार जातीच्या गृहस्थाकडून काळ्या दगडाची मूर्ती तयार करून घेतली व तिला विटेवर उभी करून विठू महाराच्या नावाचा विठ्ठल! विठ्ठल! विठ्ठल! असा हजर सुरु केला व त्याच्या नावाची कवणे रचून विठू महाराला *विठ्ठल* या देवाचा अवतार करून टाकला. काही डिवसांनी कुणबी, मराठा व इतर बहुजन समाज शेतकरी वर्गाकडून ब्राम्हणांनी बर्गणी गोळा करून चंद्रभागा नदीचे काठी *पंढरपूरात* एक देऊळ तयार केले आणि त्या देवळात ती काळ्या दगडाची काळी मूर्ती, विठू महारांची बसविण्यात आली. त्या देवळात पूजापाठ सुरु करून पुजारीपण ब्राम्हणांनी आपल्याकडे घेतले. ही मूर्ती आपल्या कमरेवर दोन्ही हात ठेवून मोठ्या आश्चर्यचकित मुद्रेने आपल्या भक्ताकडे पाहत असते. नवीन आख्यायिका पसरविण्यात आल्यामुळे ब्राम्हण वर्गाकडून अशिक्षित, अडाणी आणि भाविक अशा सर्व हिंदू जातीच्या लोकांची पूजेकरिता गर्दी त्या ठिकाणी होऊ लागली. कोणत्याही प्रकारचे शारीरिक कष्ट न करता आयता मलिदा ब्राम्हण पूजारी विठोबाच्या नावाने खाऊ लागले. म्हणून म्हटले गेले आहे की, *काय सांगू देवाची या मात! झाला महार पंढरीनाथ!!*

दौलताबादच्या बहामणी सुल्तानाच्या दरबारात स्वतःच्या मेहनतीने कमावलेल्या सोन्याच्या कलदार मोहरा मोजून देऊन *दामाजी पंत* या ब्राम्हणाची तुरुंगातून सुटका करणारा *विठू महार* नाहीसा झाला आणि विटेवर उभा असलेला काळाकुट्ट *विठ्ठल* नावाचा देव पुढे आला. *विठू महार* बहुजन समाजाचा देव झाला. परंतु त्याच्याच अस्पृश्य समाजाला त्याच्या देवळात जाऊन दर्शन घेण्याचि मनाई करण्यात येते. केवढा हा दैवदुर्विलास! कशी ही विडंबना! दरवर्षी हजारो भाविक विठ्ठल, विठ्ठल करत दर्शनाला जातात. मोठ्या मेहनतीने वर्षभर कमावलेला जवळचा पैसा अडका पंढरपूरातील ब्राम्हण पंडित पुरोहितांना दान-दक्षिणा देऊन कंगाल होऊन परत येतात. परंतु विठू महाराने केलेल्या कर्तबगारीला सर्व लोक विसरून गेले आहेत, असेच म्हणावे लागेल.

सदर लेख हा भारतीय अस्पृश्यांची शौर्यगाथा या पुस्तकातून असून पृष्ठ क्रमांक ९२, ९३ व ९४ चा उतारा आहे.

लेखक: डॉ. कृष्णकांत डोंगरे. मो. क्र. ९७६५३६७६२८.

💎 तथागत भगवान बुद्धांचे नऊ सद्गुण 💎

भगवान बुद्धांचे अमर्यादित सद्गुण आहेत, पण त्यापैकी थोडे म्हणजे नऊ सद्गुण येथे दिले आहेत. आपण दररोज तसेच वेळोवेळी पाली भाषेमध्ये असलेल्या या नऊ गुणांचे पठण करीत असतो पण त्यांचा अर्थ समजावुन घेण्याचा प्रयत्न करीत नाही, कष्ट करीत नाही. म्हणुनच येथे मराठीमध्ये अर्थ देण्याचा प्रयत्न करीत आहे.

१) अरहं

अरहं म्हणजे भगवान बुद्धांनी आपल्या सर्व दुर्गुणांचे समुळ उच्चाटन केले आहे. साध्या भाषेत दुर्गुण म्हणजे वाईट विचार, वाईट प्रतिक्रिया जसे की क्रोध, चंचलता, द्वेष, निराशा, तणाव, औदासिन्य, अज्ञान, मत्सर, अफवा, आवड, दुराग्रहता आणि इतर.भगवान बुद्धांनी या सर्व दुर्गुणांचा नाश केला व म्हणुनच आपल्याला देखिल या दुर्गुणांचा नाश करण्यासाठी प्रेरित करतात. अरहं या शब्दाचा वारंवार उच्चार करतेवेळी आपण या सद्गुणांचे चिंतन केले पाहिजे, या साठी जापमाळ आपल्याला लक्ष केन्द्रित करण्यासाठी उपयोगी होते. अरहंत व अरहत हे दोन्ही शब्द एकाच व्युत्पत्ती शास्त्रावर आधारीत आहेत व दोन्हींचा अर्थ अरहं असाच होतो.

२) सम्मा सम्बुद्ध

सम्मा सम्बुद्ध या शब्दाचा अर्थ चार आर्यसत्य कुणाही गुरु अथवा शिक्षकाची मदत न घेता सर्वस्वी स्वत:हुन शोधले व त्यांचे संपुर्ण आकलन करुन घेतले. चार आर्यसत्ये जी आपण वाचली आहेत ऐकली आहेत व ज्यांच्याबद्दल विचार केला आहे पण अजुनही या चार आर्यसत्यांना समजवुन घेणे आपल्यासाठी अवघड आहे.

३) विज्जा चरण संपन्नो

विज्जा चरण संपन्नो म्हणजे ज्ञान आणि आचरण किंवा सिद्धांत आणि अभ्यास या दोन्ही क्षेत्रामध्ये पारंगत असणे. भगवान बुद्ध ज्या प्रमाणे बोलायचे त्याप्रमाणे वागायचे व जसे वागायचे तसे बोलायचे. जेव्हा आपण असे करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपल्या लक्षात येते की विज्जा चरण संपन्नो हा अतिशय मौल्यवान सद्गुन आहे. काही लोकांना सिद्धांत माहित असतात पण त्याप्रमाणे त्यांचा अभ्यास किंवा सराव करीत नाही.

४) सुगतो

सुगतो म्हणजे महान वक्ता, योग्य वेळी योग्य शब्द वापरणे व त्यामुळे ऐकणारा एकदम लाभ प्राप्त करून शकतो. भगवान बुद्ध या सद्गुणामध्ये पारंगत होते. सुगतो शब्दाचा आणखी एक अर्थ म्हणजे दुःखमुक्तीच्या ध्येय्यापर्यंत

पोहोचण्यासाठी अतिशय उपयुक्त अशा मार्गावर त्यांनी मार्गक्रमण केले. भगवान बुद्‌ध जेव्हा साधना करीत तेव्हा वेदना उत्पन्न झाल्यावर या वेदनांचे निरीक्षण दुःख वाढू न देता ते करीत. पण इतर लोक या वेदनांबद्‌दल गैरसमज निर्माण करून घेतात की, त्या त्यांच्या आहेत आणि त्यांचा संबंध आसक्ती आणि गर्व यांच्याशी करतात. भगवान बुद्‌ध या सर्व गोष्टी योग्य पद्‌धतीने समजून दुःख मुक्त झाले. भगवान बुद्‌धांनी मुक्तीपथावर चालून स्वतःला दुःख मुक्त केले म्हनजे सुगतो.

५) लोकविदू

लोकविदू म्हणजे सर्व लोक जाणणारा. लोक म्हणजे जग, जे सहा असतात. आपण बघतो ते जग, आपण ऐकतो ते जग, आपण गंधाने जाणतो ते जग, आपण चवीने जाणतो ते जग, आपण स्पर्शाने जाणतो ते जग, तसेच विचारांनी जाणतो ते जग. या सहा जगाशिवाय इतर कुठलेही जग नाही. भगवान बुद्‌ध जाणतात या जगात संघर्ष व सुसंवाद कसे होतात, यात लोक कसे फसतात व यामधून लोक कसे बाहेर पडू शकतात. म्हणूनच भगवान बुद्‌धांना लोकविदू म्हटले जाते. तुम्ही या जगाशी सुसंवाद तेव्हा प्रस्थापित करू शकतात जेव्हा तुम्ही या जगाला जाणता व त्याला आहे तसे स्वीकारता.

६) अनुत्तरो पुरीस धम्म सारथी

अनुत्तरो पुरीस धम्म सारथी म्हणजे दुराग्रही, हट्टी व चुकीच्या मार्गांवर असलेले यांना योग्य मार्गावर आणणारे गुरु किंवा शिक्षक. भगवान बुद्‌ध आपल्या एका ओलीच्या प्रवचनाने किंवा प्रवचनांच्या श्रृंखलेने लोकांना मार्गदर्शन करीत जसे त्यांनी आपले पहिले प्रवचन पाच भिक्षुंना दिले जे पाच दिवस चालले. आपल्याला जेव्हा शिकवण्यात समस्या निर्माण झाल्यावर या सद्‌गुणांचे चिंतन केले पाहिजे की भगवान बुद्‌ध या गुणात कसे सक्षम होते.

७) सत्था देव मणुस्सानं

सत्था देव मणुस्सानं म्हणजे देव व मनुष्यांचे गुरु व नेता. भगवान बुद्‌धांनी सांगितलेले आपल्याला माहित आहे, खूप महान भिक्खू आपल्याला ते समजवून देण्याचा प्रयत्न करतात, तरी पण त्यातील यत्किंचित समजवून घेण्यासही आपल्याला बरेच कष्ट घ्यावे लागतात. भगवान बुद्‌ध सत्था देव मणुस्सानं होते म्हणून खूप जण त्यांचे अनुयायी झाले व त्यांच्या महापरीनिर्वाणा नंतर इतक्या वर्षांनी देखील त्यांना महान गुरु व नेता मानतात.

८) बुद्‌धो

बुद्‌धो म्हणजे जो व्यक्ती चार आर्यसत्य जाणतो. याचा अर्थ सम्मा संबुध्दो प्रमाणेच होतो. भगवान बुद्‌धांनी कुणाचीही मदत न घेता स्वतः चार आर्यसत्य शोधून काढली व ती भगवान बुद्‌धांना स्पष्टपणे माहित आहेत या गोष्टीला येथे अधोरेखित केले जाते.

९) भगवा

भगवा म्हणजे विशेष सामर्थ्याने युक्त अशी व्यक्ती. भगवान बुद्धांनी इतर सर्वांपेक्षाही अधिक पारमि पुण्य संपादीत केले होते. म्हणूनच त्यांना भगवा असे म्हटले आहे. पुण्य पुण्य म्हणजे दानशीलता, नैतिकता, संयम, गृहत्याग, प्रज्ञा, मेहनत, सत्यवाद, अधिष्ठान, मैत्री-करुणा आणि समता. हे सर्व गुण अतिशय कठीण परिस्थितीमध्ये देखील अत्युच्च पातळीवर त्यांनी राखले. पूर्वजन्मामध्ये त्यांनी भौतिक वस्तूच नव्हे आपले शरीर अवयव देखील दान केलेले आहेत.

नमो बुध्दाय! सप्रेम जय भिम!!

आपला धम्मबंधू: आयु. राज जाधव.

🦚 🦚 🦚 दिनांक ३० डिसेंबर १९३० रोजी इंग्लंडवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रमाई यांना लिहिलेले पत्र आजही काळजाला पिळून टाकतं... 🦚 🦚 🦚

रमा !

कशी आहेस रमा तु? तुझी, यशवंताची आज माला खूप आठवण आली. तुमच्या आठवणीनं मन खूपच हळवं झालं आहे आज. मागच्या काही दिवसातली माझी भाषणे फारच गाजली. परिषदेतील सर्वोत्कृष्ठ भाषणे, प्रभावी वक्तृत्वाचा सर्वोत्कृष्ट नमुना असे माझ्या भाषणांबद्दल इकडच्या वर्तमाणपत्रांमधून लिहून आले आहे. या पहिल्या गोलमेज परिषदेतील माझ्या भूमिकेचा विचार मी करीत होतो आणि डोळ्यापुढे आपल्या देशातील सर्व पीडितांचे संसार माझ्या डोळ्यासमोर उभे राहिले.

दुःखांच्या डोंगराखाली ही माणसे हजारो वर्षे गाडली गेली आहेत. या गाडलेपणाला पर्यायं नाही हिच त्यांची समजूत आहे. मी हैराण होतो आहे रमा! पण मी झुंज देतो आहे. माझी बौद्धिक शक्ती परमवीर झाली होती जणू! खूप भावना मनात दाटुन आल्या आहेत. खूपच हळवे झाले आहे मन. खूपच व्याकुळ झाले आहे मन! आणि घरातल्या तुम्हा सर्वांची आठवण आली. तुझी आठवण आली. यशवंताची आठवण आली.

मला तु बोटीवर पोहोचवायला आली होतीस. मी नको म्हणत होतो तरी तुझे मन तुला धरवले नाही. तु मला पोहोचवायला आली होतीस. मी गोलमेज परिषदेला जात होतो. माझा सर्वत्र जयजयकार सुरु होता. तु पाहत होतीस. तुझं मन गदगदुन आलं होत. कृतार्थतेन तु ओथंबून आली होतीस. तु शब्दांनी बोलत नव्हतीस; पण तुझे डोळे जे शब्दांना सांगता येत नसते तेही सांगत होते. तुझं मौन शब्दांहून अधिक बोलक झालं होत. तुझ्या गळ्यातील आवढा

तुझ्या ओठापर्यंत येऊन थडकत होता. ओठातील शब्दांच्या भाषेपेक्षा डोळ्यातील आस्वांचीच भाषा त्यावेळी तुझ्या मदतीला धावली होती.

आणि आता इथे लंडनमधे या सऱ्याच गोष्टी मनात उभ्या राहिल्या आहेत. मन नाजूक झाले आहे. जीवात कालवाकालव होत आहे. कशी आहेस रमा तु! आपला यशवंत कसा आहे? माझी आठवण काढतो तो? त्याचे संधिवाताचे दुखणे कसे आहे? त्याला जप रमा! *आपली चार मुल आपल्याला सोडून गेलीत. आता आहे फक्त यशवंत. तोच तुझ्या मातृत्वाचा आधार आहे आता. त्याला आपण जपलं पाहिजे. यशवंताची काळजी घे रमा!* यशवंताला खूप अभ्यास करायला लाव. त्याला रात्री अभ्यासाला उठवीत जा. माझे बाबा मला अभ्यासासाठी रात्री उठवीत असत. तोवर ते जागे राहत. मला ती शिस्तच त्यांनी लावली. मी उठलो, अभ्यास सुरु केला की ते झोपत असत. अगदी प्रारंभी मला, रात्री अभ्यासाला उठण्याचा कंटाळा येई. त्यावेळी अभ्यासापेक्षा झोप महत्वाची वाटे. पुढे तर, *आयुष्यभरासाठी झोपेपेक्षा अभ्यासाचं मोलाचा वाटत राहिला. याचं सर्वात जास्त श्रेय माझ्या बाबांना आहे. माझ्या अभ्यासाची वाट तेवत राहावी म्हणून माझे बाबा तेलासारखे जळत राहत. त्यांनी रात्रीचा दिवस केला. अंधाराचा उजेड केला. माझ्या बाबांच्या कष्टांना आता फळे आली.* फारफार आनंद वाटतो रमा आज. रमा यशवंताच्या मनाला असाच अभ्यासाचा छंद लावला पाहिजे. ग्रंथाचा य्याने ध्यास घेतला पाहिजे.

रमा वैभव, श्रीमंती या गोष्टी निरंर्थक आहेत. तु अवतीभोवती पाहते आहेसच. माणस अश्याच गोष्टींच्या सारखी मागे लागलेली असतात. त्यांची जीवणं जिथून सुरु होतात तिथंच थांबलेली असतात. या लोकांची आयुष्य जागा बदलत नाहीत. *आपल्याला असं जगून चालायचं नाही रमा. आपल्याजवळ दुःखाशिवाय दुसरं काहीच नाही. दारिद्रय, गरिबी यांच्याशिवाय आपल्याला सोबत नाही. अडचणी आणि संकटे आपल्याला सोडीत नाहीत. अपमान, छळ, अव्हेलना या गोष्टी आपल्याला सावलीसारख्या जखडलेल्या आहेत.*

मागे अंधारच आहे, दुःखाचे समुद्रच आहेत. आपला सूर्योदय आपणच झाले पाहिजे रमा. आपणच आपला मार्ग झाले पाहिजे. त्या मार्गांवर दिव्यांची ओळ आपणच झाले पाहिजे. त्या मार्गांवर जिद्दीचा प्रवास आपणच झाले पाहिजे.

आपल्याला दुनिया नाही. आपली दुनिया आपणच निर्माण केली पाहिजे. आपण असे आहोत रमा. म्हणून म्हणतो यशवंताला खूप अभ्यास करायला लाव रमा. त्याच्या कपड्यांची काळजी घे. त्याची समजूत घाल. त्याच्यात जिद्द जागव. मला तुझी सारखी आठवण येते. यशवंताची आठवण येते.

मला कळत नाही असं नाही रमा. मला कळत की, तु दुःखांच्या या वणव्यात स्वतः करपून जात आहेस. पणे गळत जावीत आणि जीव सुकत जावा त्याप्रमाणे तु होते आहेस. पण रमा मी तरी काय करू! एका बाजूने हात धुवून पाठीशी लागलेले दारिद्र्य. दुसऱ्या बाजूने माझ्या जिद्दीने घेतलेला वसा. वसा ज्ञानाचा!

मी ज्ञानाचा सागर उपसतो आहे. मला इतर कशाचजे यावेळी भान नाही; पण ही शक्ती मला मिळविण्यात तुझाही वाटा आहे. तु इथे, *माझा संसार शिवत बसली आहेस. आस्वांचे पाणी घालून माझे मनोबळ वाढवीत आहेस.* म्हणून मी बेभान मनान ज्ञानाच्या तळगर्भाचा वेध घेतो आहे.

खरं सांगू रमा, मी निर्दय नाही. पण जिद्दीचे पंख पसरून आकाशात उडणाऱ्या मला कोणी सादही घातली, तरी यातना होतात. माझ्या मनाला खरचटत आणि माझ्या रागाचा भडका उठतो. मलाही हृदय आहे रमा! मी कळवळतो, पण *मी बांधलो गेलो आहे क्रांतीशी! म्हणून मला माझ्या स्वतःच्या भावना चितेवर चढवाव्या लागतात. त्याचा तुला, उशवंतालाही कधी झळा पोचतात. हे खरं आहे.* पण यावेळी रमा मी हे उजव्या हाताने लिहितो आहे आणि डाव्या हाताने अनावर झालेली आसवे पुसतो आहे. सुडक्याला सांभाळ रमा. त्याला मारू नको. मी त्याला असे मारले होते. त्याची आठवणहि कधी करून देऊ नको. तोच आता तुझ्या काळजाचा एकुलता एक घड आहे.

माणसांच्या धार्मिक गुलामगिरीचा, आर्थिक आणि सामाजिक उचणीचतेचा आणि मानसिक गुलामगिरीचा पत्ता मला शोधायचा आहे. माणसाच्या जिबणात या गोष्टी ठाण मांडून बसलेल्या आहेत. त्यांना पर जाळून पुरून-टाकता आल्या पाहिजे. समाजाच्या स्मर्नातून आणि संस्कारातूनही या गोष्टी नाहीस्या झाल्या पाहिजेत.

रमा! तु हे वाचते आहेस आणि तुझ्या डोळ्यात आसावे आलीत. कंठ दाटला आहे. तुझं काळीज थरथरायला लागलं आहे. ओठ कापू लागले आहेत. मनात उभे राहिलेले शब्द ओठापर्यंत चालतही येऊ शकत नाहीत. इतकी तु व्याकुळ झाली आहेस.

रमा, तु माझ्या आयुष्यात आली नसतीस तर? तु मजसाथी मिळाली नसतीस तर? तर काय झालं असतं? केवळ संसारसुखाला ध्येय समजणारी स्त्री मला सोडून गेली असती. अर्धपोटी राहणे, गवऱ्या वेचायला जाने वा शेण वेचून त्याच्या गोवऱ्या थापने किंवा गोवऱ्या थापायच्या कामावर जाणे कोणाला आवडेल? स्वयंपाकासाठी इंधन गोळा करायला जाणे, मुंबईत कोण पसंत करेल. घराला ठिगळे लावणे, वस्त्रांना शिवत राहणे, एवढ्याच कड्याच्या पेटीत महिना भरला (निभला) पाहिजे, एवढेच धान्य, एवढेच टेलमीठ पुरले पाहिजे, हे माझ्या मुखातून बाहेर पडलेले गरिबीचे आदेश तुला गोड वाटले नसते तर? तर माझे मन फाटून गेले असते. माझ्या जिद्दीला तडे गेले असते. मला भरती येत गेली असती आणि तिला त्या त्या वेळी लगेच ओहोटीही लागली असती. माझ्या स्वप्नांचा खेळच पार विस्कटून गेला असता रमा! माझ्या जीवनाचा सगळा सुरच बेसूर झाला असता, सगळीच मोडतोड झाली असती. सगळाच मनस्ताप झाला असता. मी कदाचित खूरटी वनस्पतीच झालो असतो. जप स्वतःला जसी जपतेस मला. लवकरच यायला निघेन. काळजी करू नकोस.

सर्वांस कुशल सांग.

कळावे तुझा,

भीमराव, लंडन. ३० डिसेंबर १९३०. नमो बुध्दाय.

🦚🦚🦚 * 🙏 *राजमाता जिजाऊ* 🙏 🦚🦚🦚

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उध्दारी उद्धृत केलेल्या ओळी म्हणजे मातृत्वाच्या महन्मंगल अविष्काराच्या परमोच्च क्षणाचा सुंदर रेखीव नमुनाच! युगपुरुष शिवराय घडले, वाढले आणि 'निश्चयाचा महामेरू। बहुता जनांसी आधारू। श्रीमंत योगी।' असे ज्यांचे वर्णन केले जाते, ती सारी कुणाची पुण्याई ध्येयवेड्या आईची, निराग्रही मातेची आणि वीरमाता, माँसाहेब जिजाऊंची! राजमाता जिजाऊसाहेबांनी शिवनेरीच्या अंगाखांदयावर लहानाचा मोठा करताना, सह्याद्रीच्या कुशीत निर्भयपणे वावरायला, शिकविताना शिवरायांना बुद्धांच्या गोष्टींचे बोधामृत पाजताना स्वराज्यस्थापनेचे बाळकडू पाजले. 'हे राज्य व्हावे ही माझी इच्छा आहे' त्याल ा मूलमंत्रच उतरविला, ती मातृत्वशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ. १२ जानेवारी १५९५ मध्ये विदर्भातील सिंदखेडराजा येथे गिरिजाबाई व लखुजी जाधवांच्या पोटी जे अद्वतीय कन्यारत्न जन्माला आले ते म्हणजे जिजाऊ आणि ही गुणी पोर, बाबाजी आणि शहाजी भोसल्यांची अर्धांगिनी झाली ती १६०५ च्या रंगपंचमीला अर्थात फाल्गुन वद्य पंचमीला. त्या भोसले घराण्याला 'पृष्णेश्वर' मंदिराच्या जीर्णोद्धाराचे श्रेय जाते. जिचे वर्णन 'शिवभारत २-४५' मध्ये केले 'गड:गेव गुणगम्भीरा व्यराजत महोदधिन (अर्थात गुणगंभीर अशी गंगा समुद्राला शोभून दिसते, तशी जिजाबाई शहाजीला शोभली.) 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' तद्वतच युगपुरुष घडत असताना ते बीज आणि त्यावर होणारे संस्कार यांचा अन्योन्य संबंध होता. कारण शिवबांच्या जन्माच्या पार्श्वभूमीचा विचार करताना हा गर्भ जिजाऊंच्या उदरी वाढत असताना काय परिस्थिती होती? सभोवताली किंवा उभ्या महाराष्ट्रात. जाधव आणि भोसले या घराण्यांची सोयरीक जुळली खरी; पण मने मात्र जुळली नाहीत, त्यामुळे जिजाबाईंना फार वाईट वाटे. एका अकल्पीत प्रसंगी जाधव व भोसले घराण्यात युद्धही जुंपले. महाराष्ट्रात आणि सर्वत्र मोगल तसेच विजापूरचे सुल्तान यांनी धुमाकूळ घातला होता. हे जिजाबाईंना असह्य होई. विरांच्या संसाराची, प्रदेशांची आणि तीर्थक्षेत्रांची दैना पाहून जिजाबाईंच्या हृदयाला पिळ 'झगडणे आणि संघर्ष' हा त्यांच्या जीवनाचा पायाच होता. शिवबाच्या जन्मापासून प्रत्यक्ष जन्मदात्या पित्याशी वाद करतांना त्या डगमगल्या नाहीत. ही माता ह्या पुत्राच्या समई गरोदर असतांना घोड्यावर मांड ठेवून शिवनेरीच्या दिशेने घौडदौड करणारी ही माता, तीने स्वराज्य स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली असे म्हणावे लागेल. अस्मानी सुल्तांनी संकटाची बिकट वाट सगळीकडे असतांना ही धूरणधर माता किल्ले शिवनेरीवर विसावली आणि ह्या सद्गुनी पुत्राला जन्म देऊन 'शिवाई' देवीचा कृपाप्रसाद म्हणून शिवाजी नामकरण करून त्यास इतिहासाचे बाळकडू पाजले. पुण्याच्या लालमहालात प्रवेश केल्यावर पुणे भूमी सोन्याच्या नांगराणे नांगरून येथील आपल्या अस्तित्वाच्या पाऊलखुना त्यांनीच उमटविल्या असेच म्हणावे लागेल.

प्रसंग रांझ याच्या पाटलाचा असो त्यात न्यायनिवडा करण्याचे प्रशिक्षण मिळाले ती राजमाता जिजाईबाईकडूनच. न्यायासणासमोर आपलाच अधिकारी गुन्हेगार म्हणून आल्यावर कारवाई करण्याचे प्रशिक्षण मिळाले. निःस्पृह आणि निस्वार्थी आंबे तोडल्याचा व त्यावर उपाय म्हणून आयुष्यभर अर्धी बाहीचा शर्ट वापरण्याचे ब्रीद पाळणाऱ्या दादोजीची निवड ह्यात त्याच्या मुत्सद्देगिरीचा भाग जाणवतो. पतीच्या अनुपस्थितीत मुसलमानी राजवटिविरुद्ध बाला शिवाजी व मावळ्यांमध्ये 'स्वराज्य स्थापना' याचे बीज रोवून 'भारत स्वराज्याचे' महान स्वप्न पाहण्याचे योगदान देणारी ती माऊली म्हणजे, 'स्त्री क्षणकाळची पत्नी व अनंतकाळची माता असते.' हे शबदशा खरे करून त्यांनी आपल्या पत्राच्या कर्तृत्वात स्वतःचे योगदान दिले. हे तत्व लक्षात घेऊन स्वराज्यनिर्मितीचे भव्यदिव्य स्वप्न उराशी बाळींगले.

तोरणा गडावर स्वराज्याचे तोरण बांधल्यावर रायरेश्वराच्या प्रतिज्ञेने या नव्या युगाचा उदय घडवून आणायला प्रेरक ठरल्या त्या एकमेव जिजाऊ मासाहेब! म्हणतात त्याप्रमाणे, 'शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी.' हे वाक्य शिवराय सार्थ ठरवू शकले ते केवळ माँसाहेबांच्या करारी व निपक्षपाती स्वाभावाचा त्यांच्यात उतरलेला अंश म्हणूनच! नेताजी पालकारांचे धर्मांतर घडवून या विराच्या घरी स्वतः जाऊन सांत्वन करण्यात किंवा दूरदृष्टीने कोंढाण्याचे स्वराज्यातील महत्व ओळखण्यातच ह्या मातेचे योगदान होते. आग्रा सुटका प्रसंगानंतर बैराग्याच्या वेशात आलेल्या प्रतापरावं गुजर ह्यांना सोन्याचे कडे कबूल करून त्या देणाऱ्या राजमाता जिजाऊ होत्या, म्हणूनच हे भारतीय स्वराज्याचे तारू राज्यभिषेकाच्या काठावर पोहोचले.

पुण्यात राहण्यासाठी आल्यावर त्यांनी कसब्यात बुद्धाची स्थापना केली व जोगेश्वरी आणि केदारेश्वर यांचा जीर्णोद्धार केला. जिजाबाई शिवाजीच्या मनावर सतत एक गोष्ट बिंबवीत राहिल्या की, "हे राज्य आमचे नाही, इथे लोक कंगाल आहेत, विहारे पडली जात आहेत. गोरगरीबांना वाली उरलेला नाही, शिवबा, तु मोठा हो, यांचा पाळणवाला हो."

तत्काळीन राजकारणात आणि समाजकारणात जिजाबाई सतत लक्ष घालीत. जाती जमातीत व घराण्यांच्या न्यायनिवाड्याच्या बाबतीत त्या निपक्षपाती होत्या. संतमहंतानचा आणि विद्वानांचा त्या योग्य परमर्ष घेत असत. परिणामता संत तुकाराम यांसारखे आध्यात्मिक अधिष्ठान लाभले हा त्यांचाच दृश्य परिणाम होता.

अफजलखांनाचे संकट आणि सिद्धी जोहरणे पन्हाळ्याला दिलेला वेढा जे जिजाबाईंच्या जीवनातील पडलेले संकट होते. संभाजी व शिवाजी जगले आणि त्यातील शिवाजीवर हे अफजलखांनाचे संकट! पण अशाही स्थितीत मन कठोर करून त्यांनी शिवाजींना आशीर्वाद दिला.

शिवबा तु विजयी होशील!

पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकलेल्या शिवाजींना मुक्त करण्यासाठी स्वतःच युद्धावर निघाल्या होत्या. पण नेताजी पालकर यांनी त्यांना त्या गोष्टीपासून परावृत्त केले. या प्रसंगात त्यांची पुत्रप्रेमाची आर्तता आणि विलक्षण आवेश ह्या गोष्टी दिसून येतात. इ. स. १६६४ साली दोदिगिरीच्या अरण्यात शहाजी राजांना अपघात झाला आणि ते निर्विले, हा वज्रघात झेलून त्या सती जायला निघाल्या होत्या, पण शिवाजी राजांनी त्यांना विनवणि करून या निश्चयापासून परावृत्त केले. जिजाबाईंच्या अंगी विविध चांगले गुण होते. त्या कर्तबगार सर्व राज्यकारभार त्यांच्या स्वाधीन केला होता. जिजाबाई ह्या युगपुरुष घडविला जिने खास राज्याचे उभारले तोरण अदमास शिवनेरीच्या भुवरती, सह्याद्रीच्या कुशीत, उदयास आले एक अनमोल रत्न! उभारली भारतीय स्वराज्याची मल्ल फळद्रूप झाली जिजाऊंची स्वप्ने वेडी. तिच्या योगदानाची किती वरणावी महती तिच्या प्रत्येक कृतीतूनच झाली स्वराज्याची स्वप्ननिर्मिती!

🦚 🦚 🦚 *जिजाऊ : एक समाजसुधारक* 🦚 🦚 🦚

मातृत्वाचा उच्चतम आदर्श, स्वराज्याची राजमाता, स्वराज्याच्या मार्गदर्शिका, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई म्हणजे जिजाऊ. हे आपणा सर्वांनाच माहित आहे. परंतु या व्यतिरिक्त जिजाऊंनी समाजाच्या उन्नतीआड येणाऱ्या अनेक जुनाट रुढी नाकारून नवीन पायंडे घातलेत, समाजात नवीन विचार रुजवीला. जवळपास ४०० वर्षांपूर्वीच्या काळाचा विचार केला तर अनेक धार्मिक अंधश्रद्धा, वाईट रुढी, जातीभेद शिगेला पोहोचले होते. याविरुद्ध आवाज काढणे धर्मविरोधी कृत्य ठरवून धर्मातून-जातीतून वाळीत टाकल्या जायचे. अशा काळात जिजाऊंनी स्वतः पासून काही जुनाट रूढींना छेद देऊन सुधारणा केल्यात व त्या प्रजेच्या गळी सुद्धा उतरविल्या. प्रजेने त्या स्विकारल्या म्हणून ४०० वर्षाआधी होऊन गेलेल्या जिजाऊंना समाजसुधारक म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. कदाचित अनेकांना जिजाऊंना समाजसुधारक म्हणणं पटणार नाही. कारण जिजाऊ आणि समाजसुधारणा ही कल्पनाच आपण केलेली नाही. जिजाऊंनी केलेल्या अनेक सुधारणांपैकी आपण इथे त्यांच्या २-३ सुधारणाविषयक कार्यांचा उल्लेख केल्यावर जिजाऊ ह्या एक समाजसुधारक होत्या. असं आपण नक्कीच म्हणणार.

शापित भूमी नांगरली:- जिजाऊ व बालशिवबा सन १६४१ ला बंगलोर वरून पुण्याला आले. परंतु पुण्यात गावाचे व माणसाचे अस्तित्व नव्हते. आदिलशहाने पुण्यावरून गाढवाचा नांगर फिरवून लोखंडी पहार रोवून त्यास तुटलेली चप्पल, केरसुणी आणि फुटकी कवडी अडकवून पुणे बेचिराख केले होते. धर्मानुसार ही सर्व अशुभतेची प्रतिके आहेत. यामुळे अशा ठिकाणी पुन्हा कोणी वस्ती करण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा वंश निर्वंश होईल अशी धार्मिक समजुत पुरोहित वर्गाने घालून जनतेच्या मनात दहशत निर्माण केली होती. अशा ठिकाणी बालशिवबांना घेऊन जिजाऊ आल्या. त्यांनी धार्मिक दहशत वादाला भिक न घालता स्वतः त्यांनी लोखंडी प्रहार काढून फेकली. त्यामुळे लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. शिवबाच्या हातात सोन्याचा नांगर देऊन पुण्याच्या भूमीला नांगरून पुण्यभूमी केले. जिजाऊंच्या या धाडसाने लोकांच्या मनातील भीती जाऊन धैर्याने शौर्याने जागा घेतली. जिजाऊने हा शकून-

अपशकूनावर केलेला मोठाच लत्ताप्रहार होता. आदिलशहाने शापित केलेल्या पुण्याच्या (पुनवडी) भूमीला जिजाऊने पुणित केले. याप्रकारे जिजाऊने मध्ययुगीन काळात समाजसुधारणेचा एक पायंडा घातला. जिजाऊंच्या या कृतीमुळे झाले काय? तर लोकांच्या मनात असलेली पाप-पुण्याची भिती नाहीसी झाली. शुभ-अशुभ ही धार्मिक प्रतिके पुरोहितांनी लोकांना भिती दाखविण्याकरिता निर्माण केली आहेत. हे लोकांच्या मनात रुजविण्यात जिजाऊ यशस्वी झाल्यात. हाच जिजाऊंचा निर्भीडपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळवयातच शिवरायांना मिळाला. मावळ्याच्या अंगी नवी दृष्टी उतरविण्यास मदत झाली.

जातीपातिच्या पलीकडे:- ४०० वर्षांपूर्वी महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण देशाला जातीयतेने विळखा घातला होता. भटशाहीने निर्माण केलेल्या जातीयतेमुळे माणूस माणसात राहिलेला नाही. आज तंत्रज्ञांनाच्या युगातसुद्धा वेळोवेळी जातीयतेचे चटके सहन करावे लागत आहेत. ४०० वर्षाआधी काय परिस्थिती असेल याची कल्पना न केलेली बरी. अशा काळात जिजाऊ सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील अठरा पगड जातीच्या मुलांसोबत शिवरायांना खेळू देतात. शिवबाचे सवंगडी म्हणून त्यांना महालात प्रवेश देतात. एकाच पंक्तीत बसून त्यांना घास भरवितात. त्यांच्या हातात तलवार देऊन मनगट मजबूत करून त्यांच्या मनात स्वाभिमान निर्माण करून आत्मविश्वासाने लढण्याचे बळ देतात. हा जातीभेद नष्ट करण्याच्या दिशेने उचललेले त्या काळातील एक मोठच पाऊल म्हणावं लागेल. तानाजी मालुसरे, शिवा काशीद, मदारी मेहतर, संभाजी जाधव, ऐसाजी कंक, बाजीप्रभू देशपांडे, नुरखान बेग, दर्यासारंग, जोताजी केसकर, रायप्पा असे अनेक नावे घेता येतील. जे वेगवेगळ्या जातीधर्माचे होते. जिजाऊने स्वराज्यातील या मावळ्यांना (बौद्धांना) लेकरासारखे पोटाशी धरून माया लावून आईचे प्रेम दिले. स्वराज्याच्या पवित्र कार्यात सहभाग घेतला. हा जिजाऊने जातिजातीतीला भिती नष्ट करण्याच्या दृष्टीने सुधारणेचा उचललेला एक पाऊल होता. आज विज्ञानयुगातसुद्धा अनेक उच्च शिक्षित आई वडील आपल्या मुलांना या जातीच्या, त्या धर्माच्या मुलांनासोबत मैत्री करू नकोस. त्या भागतील मुलांसोबत खेळू नकोस. असे सांगून मुलांच्या मनात प्रत्यक्ष जातीभेदाचे बीज रोवण्याचे काम करणारे मायबाप बघितल्यावर जिजाऊंची त्या काळातील ही कृती किती महान आहे हे आपल्या लक्षात येईल. (आठवा शिवकाळापूर्वी संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांचा मनुवाद्यांनी केलेला छळ) उच्च शिक्षित आणि नौकरदार लोक तर शहरात फ्लॅट किंवा घर घेतांना शेजारी कोणत्या जाती धर्माचे लोक आहेत हे बघून घेतात. किंवा आपल्या शेजारी इतरांना घेऊ देत नाही. आणि टाईमपास करतांना म्हणतात आता कुठे जातीयता आहे?

धर्मांतर एक परिवर्तन:- स्वराज्याने चांगले बाळसे धरले होते तेव्हाचा प्रसंग. जिजाऊंच्या थोरल्या सुन सईबाइ यांचा भाऊ बजाजी निंबाळकर एका लढाईत मुस्लिम सरदाराच्या तावडीत सापडले. नंतर त्यास मुसलमान करण्यात आले. या बातमीने जिजाऊनां खूप वाईट वाटले. जिजाऊने शिवरायांसोबत चर्चा केली. जिजाऊने बाबाजी निंबाळकरांचे शुद्धिकरण करण्यास शिवरायांना सांगितले. (भारतीय [बौद्ध] धर्मात पुनः प्रवेश/घर वापसी) ज्या काळात शुद्धीकरणाची कल्पनासुद्धा सहन होत नव्हती. पुरोहित वर्गाने धर्म बुडाला म्हणून गहजब केला असता. अशा काळात जिजाऊ धर्मात पुनः प्रवेशाचा पायंडा घालण्याचा विचार करत होत्या. हे सनातण्यांच्या दृष्टीने खूप मोठे

पाप. हिंदू (भारतीय [बौद्ध]) धर्माचा विचार केल्यास कदाचित हिंदू (भारतीय [बौद्ध]) धर्म सोडून गेल्यानंतर पुन्हा (भारतीय [बौद्ध]) धर्मात प्रवेश देण्याची कदाचित ही पहिलीच वेळ असावी. आणि त्याची सुरुवात करणार होत्या जिजाऊ शिवरायांच्या हस्ते. जिजाऊ स्वतः शिखरशिंगणापूरला गेल्या. बजाजीला घेतलेला निर्णय सांगितला. बजाजीने जिजाऊंचे आभार मानले आणि त्यांच्या पायावर डोके ठेवले. शिखरशिंगणापूरच्या भूमितच बजाजीचे धुधीकरण करून हिंदू (भारतीय [बौद्ध]) धर्मातील एका नव्या सुधारणेला जिजाऊने सुरुवात केली. ज्या हिंदू (हिंदू म्हणजे ब्राम्हणी विकृतीकरण बौद्ध धम्माचे) धर्माणे स्त्रीला तुच्छ लेखले होते. पुढे शिवाजी महाराजांनी नेताजी पालकरांच्या बाबतीत हाच कित्ता गिरवीला. भारताच्या इतिहासात अनेक कर्तृत्ववान स्त्रिया झाल्यात जिजाऊ एवढी धोरणी, खंबीर, प्रगतीशील, पुरोगामी विचारांची महान स्त्री सापडणे कठीण. कारण ४०० वर्षांपूर्वी सनातणी कर्मठ महाराष्ट्रात शुद्धिकर नाचे कार्य करावयाचे धाडस कुणालाही झाले नसावे.

आज जिजाऊ असत्या तर:- काल-परवलाच नागपूर येथे भारतीय विज्ञान काँग्रेसचे अधिवेशन बोलविण्यात आले होते. त्यातील इंडियन विमेन्स काँग्रेसच्या चर्चासत्रात अवैज्ञानिक व अंधश्रद्धेला खतपांनी घालणारी मांडणी दोन स्त्रियांनी केली. एकीने हळदी कुंकवाचे महत्व सांगितले तर दुसरीने घराबाहेर रांगोळी काढल्याने दुष्ट शक्ती घरात येत नाही असे म्हणत अकलेचे तारे तोडले. वर्तमान काळात उच्च शिक्षित म्हणविणाऱ्यांचा मेंदू जर असा बुरसट विचार करून समाजात अंधश्रद्धा पसरवीत असेल तर सामान्यांचे काय? आज जिजाऊ नाहीत हे वास्तव आहे. परंतु त्या असत्या तर त्या विज्ञान काँग्रेस मधील शास्त्रज्ञांच्या मेंदूंना आग लावली असती. ज्या विचारांमुळे किंवा कार्यांमुळे अंधश्रद्धा वाढेल अशा विचारांना जिजाऊने कधीही जवळ फिरकू दिले नाही. त्यांनी विचारांच्या आणी प्रयत्नांच्या बळावर शिवबाचे आणि मावळ्यांचे (जनतेचे) मन, मेंदू आणि मंनगट सशक्त आणि मजबूत केले. म्हणूनच शिवाजी महाराजांचा दुसरा मुलगा राजाराम पालथा जन्माला आल्यावर त्यास शुभ अशुभ न मानता त्याच्या जन्माचे स्वागत केले. शिवाजी महाराजांनी शत्रूवर जेवढे म्हणून आक्रमन केले ते अमावसेच्या रात्री केले. ही सर्व प्रेरणा त्यांना जिजाऊंच्या विचारामुळे आली होती. आज गरज आहे, वर्तमानकालीन स्त्री पुरुषांनी जिजाऊंच्या विचार कार्याचे अनुकरण करण्याची.

जिजाऊने ४०० वर्षांपूर्वी ज्या सुधारणेचा, परिवर्तनाचा पायंडा घातला त्याचे कौतुक केल्याशिवाय रहावत नाही. त्यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांबरोबरच जातीजातीतील, घराघरातील होणारे भांडणे सोडविलीत. लोकांच्या हातांना काम देऊन लोकांच्या आर्थिक प्रगतीस मोठाच हातभार लावला. जिजाऊ स्वतः धर्मनिष्ठ, परंपराप्रिय होत्या परंतु अंधश्रद्धळूनव्हत्या, सनातणी विचारांच्या नव्हत्या, त्यांनी कायम नवविचारांचा स्वीकार करून प्रजेससुद्धा स्वीकारावयास लावला होता.

या देशात अनेक समाजसुधारक झालेत त्यामुळे परिवर्तनसुद्धा झालेत. परंतु एका राजगघराण्यातील राणीने, राजमातेने, समाजसुधारणा करणारे पात्र इतिहासात क्वचितच सापडणार. समाजसुधारणेचा जिजाऊंचा हा आदर्श

नंतरच्या राज्यकर्त्यांनी, समाजसेवकांनी गिरवीला असता तर भारत *"प्रगत भारत"* म्हणून याआधीच पुढे आला असता. *आज १२ जानेवारी राजमाता जिजाऊ यांची जयंती. त्यामुळे त्यांना मनाचा मुजरा.*

अनिल भुसारी, तुमसर, जिल्हा भंडारा. मो. क्र. ८९९९८४३९७८.

🦚🦚🦚 निच व्यक्ती कसा समजावा!!! 🦚🦚🦚

नेहमीपरमाणे गौतम बुद्ध भिक्षेसाठी बाहेर पडले. काही जण त्यांना अगदी आदर करीत असत. तर काही जण त्यांना काहीही बोलत असत. काही जण त्यांना आपणाहून काही ना काही देत असत. तर काही जण दूरुनच त्यांना हटकत असत. काही झाले तरी गौतम बुद्ध नेहमी शांत राहात असत. फिरता फिरता गौतम बुद्ध एका श्रीमंत व्यक्तीच्या घरी भिक्षा मागण्यासाठी गेले. गौतम बुद्धांना दारात पाहताक्षणी घरातील माणूस त्यांच्यावर खेकसला. अरे, माणसा तू माझ्याजवळ येऊ नकोस, असे ठणकावत त्यांनी गौतम बुद्धांना अपशब्द बोलले. महोदय, आपण जे अपशब्द माझ्याविषयी काढलेत, त्यातील नीच या शब्दाचा अर्थ आपणास ठाऊक आहे का, अशी विचारणा गौतम बुद्धांनी केली. गौतम बुद्धांची शांत आणि गंभीर मुद्रा पाहून तो माणूस गांगरला आणि म्हणाला की, मला माहिती नाही या अपशब्दांचे अर्थ. तुम्हीच सांगा.

महोदय, जो माणूस समोरच्या व्यक्तीशी शत्रूत्वाचा भाव मनात ठेवतो. ईर्ष्या करतो. कोणावरही विनाकारण रागावतो. अकारण अत्याचार करतो. हत्या करतो, तो माणूस नीच असतो. नीच ही माणसाची एक वृत्ती आहे, असे सांगत गौतम बुद्ध पुढे म्हणाले की, एखाद्या व्यक्तीकडून कर्ज घेतल्यानंतर ते फेडण्याची वेळ आल्यावर माणूस कांगावा करतो, तमाशा करतो, आपल्या शब्दाशी प्रामाणिक राहत नाही. मार्गस्थांना लूटण्याचे काम करतो. पालकांची सेवा आणि मोठ्यांचा आदर जी व्यक्ती करत नाही, ती व्यक्ती नीच असते.

गौतम बुद्ध त्या माणसाला समजावताना आणखी पुढे जाऊन म्हणाले की, जी व्यक्ती चुकीच्या मार्गाला लागते. अफरातफर करते. जी माणसे सदैव मोह-मायेत अडकलेली असतात. नेहमी दुसऱ्याची निंदा करतात. अशा व्यक्ती सर्वांत नीच असतात. जेव्हा विनाकारण, गरज नसताना समोरच्या व्यक्ती ओरडतो, त्याला अपशब्द बोलतो, तोच माणूस नीचपणाच करत असतो, असे गौतम बुद्धांनी सांगितले

वास्तविक पाहता असभ्य वर्तन हीच माणसातील नीच वृत्तीची दर्शक असते. ज्या माणसांमध्ये विवेक आणि धैर्य यांचा अभाव असतो, त्या व्यक्ती कधीही सर्वोच्च यशोशिखरावर पोहोचू शकत नाहीत. व्यक्ती जन्माने नाही, तर विचार, स्वभाव, वृत्ती, वर्तन आणि कर्म यांमुळे मोठा होत असतो. कुलीनतेच्या नावाखाली माणसांचा वारंवार अपमान करणे, अशी कृती त्या माणसाची नीच वृत्ती दर्शवत असते, असे सांगितले जाते.

गौतम बुद्धांनी सांगितलेल्या गोष्टी किती कालातीत आहेत, हेच याच काही गोष्टींवरून सिद्ध होते. आजच्या काळातही गौतम बुद्धांची शिकवण लागू पडते. आपला स्वार्थ जपण्यासाठी अनेक जण आजच्या घडीलाही यातील अनेक गोष्टी करत असता. लूट, अफरातफर, परनिंदा या गोष्टी तर अगदी सहज घडताना आपल्याला आपल्या आजूबाजूला दिसतात. गौतम बुद्धांची प्रेरणा घेऊन, त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालत राहिले पाहिजे. या गोष्टी अधात्मातून साध्य होऊ शकतात. आध्यात्मिक साधनेच्या माध्यमातून गौतम बुद्धांनी आपल्या आयुष्यात जे साध्य केले, त्यापैकी काही अंश आपण साध्य करू शकतो.






🦚🦚🦚 डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार 🦚🦚🦚

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे महाराष्ट्राच्या औरंगाबाद शहरातील विद्यापीठ आहे. मराठवाडा विभागातील हे सर्वात प्रमुख विद्यापीठ आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेरूळ-अजिंठ्यालगतच औरंगाबाद परिसरात एक मोठे शिक्षण, ज्ञानकेंद्र उभारण्याची योजना आखली होती. प्रामुख्याने आधुनिक शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजातील बहुसंख्यकांसाठी हे नियोजन होते. औरंगाबाद शहराजवळच्या भागाचे नागसेनवन असे नामकरण करून तेथे पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या मिलिंद महाविद्यालयाची स्थापना त्यांनी केली. याच परिसरात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २३ ऑगस्ट इ.स. १९५८ या वर्षी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले. पुढे नामांतराच्या लढ्यानंतर शरद पवार मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र शासनाने १४ जानेवारी १९९४

रोजी मराठवाडा विद्यापीठ याचे नाव बदलून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार केला गेला.

इतिहास:

आंध्र प्रदेश राज्यातील हैदराबाद येथे उस्मानिया युनिव्हर्सिटी संबंधित सर्व सूचीबद्ध मराठवाड्यामध्ये नऊ महाविद्यालये आहेत. मराठवाडा विभागात जनतेच्या मागणीसाठी विद्यापीठात २७ एप्रिल १९५७ रोजी एक विद्यापीठाची नियुक्ती करण्यात आली आणि अशा विद्यापीठाची स्थापना करण्याबाबतच्या शिफारशी प्रदान करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. महाराष्ट्राच्या राज्यपालाने ५ मे १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठ कायदा करारावर स्वाक्षरी केली. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु, २३ ऑगस्ट इ.स. १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे उद्घाटन औरंगाबाद येथे विद्यापीठ अस्थायी मुख्य इमारतीचे परिसरात केले. एस.आर. डोंगरेकरी हे पहिले कुलगुरू झाले. उस्मानिया विद्यापीठातून नव्याने स्थापन झालेल्या मराठवाडा विद्यापीठात खालील ९ महाविद्यालयांचे संलग्नीकरण करण्यात आले:

शासकीय कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद (इ.स. १९२३ साली स्थापन).

मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद (इ.स. १९५० मध्ये स्थापन)

पीपल्स कॉलेज, नांदेड (इ.स. १९५० मध्ये स्थापन)

सरकारी कॉलेज ऑफ एज्युकेशन, औरंगाबाद (इ.स. १९५४ मध्ये स्थापन).

मराठवाडा कॉलेज ऑफ ऍग्रीकल्चर, परभणी (इ.स. १९५६ साली स्थापन)

माणिकचंद पहाडे लॉ कॉलेज, औरंगाबाद (इ.स. १९५६ मध्ये स्थापन)

सरकारी मेडिकल कॉलेज, औरंगाबाद (इ.स. १९५६ मध्ये स्थापन)

योगेश्वरी विज्ञान महाविद्यालय, मोम्याबाद (इ.स. १९५६ मध्ये स्थापन)

जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर. जी. बगडिया कला, एस. बी. लखोटिया वाणिज्य आणि आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना (इ.स. १९५८ साली स्थापन)

नामांतर आंदोलन:

नामांतर आंदोलन हे १९७६ ते इ.स. १९९४ या दरम्यान महाराष्ट्रात घडलेले मागासवर्गीय बौद्ध चळवळीचे आंदोलन होते. औरंगाबाद येथील 'मराठवाडा विद्यापीठा' ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे ही 'सरकारी मागणी' या

आंदोलनाची होती. शेवटी सोळा वर्षाच्या संघर्षानंतर या विद्यापीठाचे नाव बदलून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामांतर नव्हे तर नामविस्तार करण्यात आला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रवेशद्वार, औरंगाबाद.

इतिहासः

१४ जानेवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नामांतर दिवस पण या नामांतराच्या दिवसाची वाट पाहण्यासाठी आंबेडकरवादी जनतेला १७ वर्ष संघर्ष करावा लागला. शिक्षण हे मागासवर्गीय समाजासाठी अन्य कोणत्याही भौतिक लाभांपेक्षाही सर्वाधिक महत्त्वाचा लाभ आहे. दबलेल्यानी पिचलेल्या मागासवर्गीय समाजाने शिक्षण घेतले तरच त्यांचा उत्कर्ष आहे व तेही सर्वोच्च शिक्षण, उच्च शिक्षण घेतले तरच ते प्रगतीपथावर जाऊ शकतात. अन्यथा त्यांचे जीवन असुरक्षितनी कष्टप्रदच राहील. उच्चशिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. उच्चशिक्षण हे बुद्धिजीवी वर्गाचे क्षेत्र असले तरी या क्षेत्रात गरीब व दुर्बल घटकातल्या माणसास संधी मिळायला हवी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्पष्ट मत होते. हजारो वर्षापासून शिक्षणापासून वंचित असलेल्या आणि निजामाच्या राजवटीत जे मागासलेपणाच्या यातना भोगत होते त्यांना शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी १९५० ला औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. मिलिंद महाविद्यालयाच्या पायाभरणी प्रसंगी श्री गोविंदभाई श्रॉफ आणि माणिकचंद पहाडिया यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ बाबासाहेबांच्या भेटीला आले होते. बाबासाहेबांशी बोलताना त्या शिष्टमंडळाने “आपण हे जे महाविद्यालय सुरू करीत आहेत ते या ठिकाणी चालेल का?” असा प्रश्न केला. त्यावेळी बाबासाहेब उद्गारले येथे फक्त एक महाविद्यालय उभारून चालणार नाही तर येथे एक विद्यापीठही उभारले जावे अशी माझी तीव्र इच्छा आहे आणि बाबासाहेबांच्या प्रयत्नाचे फलित म्हणून १९५८ साली मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाला नाव काय द्यावे हा प्रश्न समोर आला. तेव्हा महाराष्ट्र सरकारने नाव निश्चित करण्यासाठी एक समिती गठित केली. शासननियुक्त समितीने विचारार्थ घेतलेल्या व गाभीर्याने चर्चा केलेल्या नावांमध्ये मराठवाडा, औरंगाबाद, पैठण, प्रतिष्ठान, दौलताबाद, देवगिरी, अजिंठा, शालिवाहन, सातवाहन, अशी सर्व स्थळ व भूमी-राज्यवाचक नावे होती. व्यक्तींची फक्त दोनच नावे सुचविली होती-छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांचे. यातील शिवाजी महाराजांच्या नावाने आधीच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे पुढे १९६० साली स्थापन झाले, शिवाजी महाराजांचे उचित विद्यापीठीय स्मारक झाले पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने विद्यापीठीय स्मारक झाले नाही. म्हणून औरंगाबाद विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने ठराव २७ जुलै इ. स. १९७८ ला संमत करण्यात आला. महाराष्ट्रातील आंबेडकरवादी जनतेसह सर्वांनाच आनंद झाला. परंतु ह्याने काही लोकांचे पित्त खवळले. त्यांनी विद्यापीठाच्या नामांतराला कडाडून विरोध केला. या विरोधाला आंबेडकरी जनता मुळीच डगमगली नाही. नामांतराची लढाई पुढे जोमाने चालूच ठेवली. विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव मिळावे म्हणून अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या बलिदानाची पर्वा केली नाही. आंबेडकरी जनता आपल्या पित्याच्या (बाबासाहेबांच्या) नावासाठी वाटेल ते करण्यास तयार होती. नामांतराची लढाई ही दीन बहुजनांच्या अस्मितेची लढाई होती. ही चळवळ म्हणजे महाराष्ट्रातील आणि देशातील सर्वात मोठी लढाई होती. या लढ्यात कित्येक क्रांतिकारक शहीद झाले. कितीतरी युवक-युवतींना आपले प्राण गमवावे लागले. कित्येकांच्या घरादाराची राखरांगोळी झाली. कित्येक बहुजनांवर आया-भगिनीवर बलात्कार झाले तर काही गावांत बहुजन वस्त्यांवर बहिष्कार टाकण्यात आला. सार्वजनिक पाणवठ्यावर बहुजनांना बंदी करण्यात आली. कित्येक गावातून बहुजनांच्या आया-भगिनींच्या भरचौकातून उघड्या-नागड्या धिंडी काढण्यात आल्या. नामांतराच्या या काळामध्ये जातीयवादी नराधमांनी अत्याचाराची सीमा ओलांडली होती. पोलिसांनीही लहान बालके, स्त्री, वृद्ध, पुरुषांवर बेसुमार लाठीचार्ज केले तर काही वेळा बंदुकीचाही वापर केला. विद्यापीठ म्हणजे काय हेही ज्यांना धडपणे माहीत नव्हते त्या दीनदुबळ्या बहुजनांवर खेडोपाडी अमानुष अत्याचार करण्यात आले. आईचे लेकरू आईविना पोरके झाल्यासारखी बहुजन बांधवांची अवस्था झाली होती. एवढे होत असतानाही धाडसी भीमसैनिकांनी कधीच माघार घेतली नाही. फक्त बाबासाहेबांच्या नावासाठी बहुजन बांधवांनी अनेक अन्याय-अत्याचार, जुलूम सहन केले. गावोगावी, शहरात आणि खेड्यापाड्यापर्यंत नामांतराच्या आंदोलनाची ठिणगी पडलेली होती. जिकडे-तिकडे एकच नारा गुंजत होता "नामांतर झालेच पाहिज". नांदेडमध्ये दलित पैंथरच्या गौतम वाघमारे या कार्यकर्त्याने सरकार नामांतर करत नाही म्हणून स्वतःला भरचौकात जाळून घेतले. अखेरच्या श्वासापर्यंत एकच नारा होता, "नामांतर झालेच पाहिजे" बाबासाहेबांच्या नावासाठी त्याने आपल्या प्राणाचे बलिदान केले. परभणी जिल्ह्यातही पोचिराम कांबळे यांचे हात-पाय तोडण्यात आले. त्यांनाही जातीयवादी सैतानांनी जर्जर करून ठार मारले. जनार्धन मवाडे, संगीता बनसोडे, सुहासिनी बंसोड, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, चंदन कांबळे, दिलीप रामटेके, रोशन बोरकर असे कितीतरी बहुजन क्रांतिवीर नामांतराच्या लढ्यात शहीद झाले. जातीयवादी सरकार नामांतर करत नाही म्हणून दलित मुक्ती सेनेचे सरसेनापती आणि लॉंगमार्च प्रणेते प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी बहुजन समाजाची फौज जमा करून नागपूर ते औरंगाबाद असा लॉंगमार्च आयोजित करून "जिंकू किंवा मरू", "जळतील नाहीतर जाळून टाकतील" अशी आक्रमक भूमिका घेतली. लॉंगमार्च धील निष्पाप लोकांवर इंग्रजानाही लाजवेल अशा क्रूरपणे लाठीहल्ले केले. अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या, कित्येकांना तुरुंगात डांबले. या निष्पाप बहुजनांचा गुन्हा काय? तर आपल्या पित्याचे (बाबासाहेबांचे) नाव विद्यापीठाला द्यावे ही (सरकारी) मागणी. ज्यांनी

दिनदुबळ्या, पिचलेल्या आणि उच्चभ्रू समाजाने वाळीत टाकलेल्या समाजातील माणसाला माणूसपण मिळवून दिले, जगण्याचा हक्क दिला, त्या उत्तरदायित्वापोटी बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला द्यावे ही रास्त व न्यायपूर्ण मागणी गुन्हा ठरवून अमानुष वागणूक देणाऱ्यांचा निषेध केला पाहिजे. तत्कालीन मुख्यमंत्र्याला समजले की बाबासाहेबांची ही लेकरे बाबासाहेबासाठी प्राण द्यायलाही मागेपुढे पाहात नाहीत. जर यांच्या संयमाचा अंत झाला तर हेच लोक दुसऱ्यांचा प्राण घ्यायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. त्यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून एकच आवाज होता नामांतर–नामांतर... चारही बाजूने सरकारच्या नाड्या आवळल्या जात होत्या. त्यांच्यासमोर नामांतराशिवाय पर्याय उरला नाही. १७ वर्षाच्या कडव्या संघर्षानंतर शेवटी सरकारला माघार घ्यावी लागली व १४ जानेवारी इ.स. १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचा ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद’ असा नामविस्तार करण्यात आला. ज्या महामानवाने देशाची राज्यघटना लिहिली, मराठवाड्यात उच्च शिक्षणासाठी विद्यापीठ असावे ही सर्वप्रथम कल्पना मांडली त्या महापुरुषाचे नाव विद्यापीठाला देण्यासाठी १७ वर्ष संघर्ष करावा लागला. नामांतर झाले परंतु अर्धवट नामांतर झाले, ही खंत आजही भीमसैनिकांच्या मनात आहे. विद्यापीठाचे पहिले नाव 'मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद' असे होते. नामांतरानंतर "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" एवढेच झाले.

नामांतराची लढाई ही प्रतीकात्मक सामाजिक समतेची लढाई होती. १४ जानेवारी १९९४ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रवेशद्वार हे आंबेडकरी समाजाचे प्रेरणास्थान बनले आहे. दरवर्षी १४ जानेवारी यादिवशी आंबेडकरी जनता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या ‘प्रवेशद्वाराची’ ची मनोभावे पूजा करते. जणूकाही साक्षात आपण बाबासाहेबांपुढेच नतमस्तक होत आहोत या श्रद्धेने गेटपुढे नतमस्तक होतात.

नाममात्र शुल्कात उच्च शिक्षण देणारे देशातील हे पहिले विद्यापीठ आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेश, भागातील शेतकरी, शेतमजूर, दिंनदुबळ्या, कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक भूमी म्हणून विद्यापीठाने नाव लौकिक मिळविला व लाखो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देऊन त्यांच्या आयुष्याला आकार दिला.


इतिहासः

नामांतर आंदोलनाच्या इतिहासाचे वय ३५ वर्षाचे. २७ जुलै १९७८ मध्ये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव देण्याचा ठराव पारित झाला. हा आनंद आंबेडकरी अनुयायी अनुभवत असतानांच प्रतिगाम्यांच्या पोटातील पाण्याने कुटील डाव सोडला. सरकारच्या निर्णयाला जातीचा रंग दिला. आणि दिंनदुबळ्याच्या घरांची राखरांगोळी करण्यास सुरुवात केली. परंतु बाबासाहेबांच्या समतेच्या विचारांच "वार' प्यालेल्या कार्यकर्त्यानी गावखेड्यातील बांधवांचे धगधगते मरणतांडव बघीतले. आणि पेटून उठले कार्यकर्त्यांचे सुर्यास्त्र. डोक्याला निळे कफन बांधून ४ ऑगष्ट रोजी दीक्षाभूमीची माती माथ्यावर लावली. आणि चळवळीतील

नायकांनी पेटलेल्या आभाळातील एक गरुडझेप होती ती प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वातील "लॉगमार्च.' काढला गेला.

या लॉगमार्चमध्ये मामा सरदार, कवि. इ. मो. नारनवरे, सुरेश घाटे, बबन बोदांटे, जगदीश थुल, थॉमस कांबळे, जे. के. नारायणे, गोपाळराव आटोटे, नामदेवराव खोब्रागडे, दिलीप पाटील, नरेश वहाणे, भीवा बडगे, सरोज मेश्राम यांच्यासारखे लढाऊ कार्यकर्ते लढण्यासाठी सज्ज झाले होते. याशिवाय दक्षिण नागपूर येथे सुखदेव रामटेके यांच्या नेतृत्वातही एक लढा लढला होता. पोलिसांनी बहुजनांच्या जोगीनगर, भीमनगरात अश्रूधूर फेकले असताना ते कॅच पकडून पुन्हा पोलिसांकडे भिरकाणारे कार्यकर्ते आजही या नामांतर आंदोलनाचा इतिहास डोळ्यात साठवून ठेवला आहे.

नागपूरात चोहिकडे आंदोलन पेटले होते, पश्चिमचे आंदोलन ॲड. विमलसूर्य चिमणकर, उत्तरचे आंदोलन प्रा. रणजित मेश्राम, उपेंद्र शेंडे यांच्यापासून तर राजन वाघमारे यांच्यापर्यंत लढला गेला. माजी आमदार शेंडेचे उपोषण लॉगमार्चनंतरचा एक महत्त्वाचा टप्पा. दक्षिणेत भूपेश थुलकर, दादाकांत धनविजय, अमर रामटेके, सुधाकर सोमंकुवर, मधु दुधे, विलास पाटील, बाळु हिरोळे, सुनील लामसोंगे अशी असंख्य नावं घेता येतील. वर्धापन दिनाच्या पर्वावर नामांतराचा वणवा कार्यकर्त्यांच्या जणू बुबुळात पेरला असल्याचे दिसत आहे. आंदोलनाचे चित्र कार्यकर्त्यांनी वर्धापन दिनाच्या पुर्वसंध्येला चर्चेतून उभे केले. मराठवाडयात शिक्षणाची गंगा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आणली, औरंगाबाद शहरात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून, शैक्षणिक दृष्ट्या अप्रगत असलेल्या मराठवाडयाला प्रगत करण्याचं काम महामानवाने केले.आणि त्याच मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्याचा मुद्दा उपस्तीथ झाला तेव्हा, अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ या अविचारी माणसांनी विरोध केला, त्यांच्या या विरोधामुळे महाराष्ट्रातील तमाम आंबेडकरी जनता पेटून उठली व नामांतराची मागणी जोर धरू लागली, ठीक ठिकाणी मोर्चे, आंदोलने होवू लागले, नामांतराला विरोध म्हणून जातियवादी लोकांनी दिनदुबळ्यांनवर अन्याय, अत्याचार करण्यास सुरुवात केली, जाळपोळ करू लागले.



नामांतर शहीद स्मारक, नागपूर:

नामांतर शहीद स्मारक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर आंदोलनात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ उभारलेले स्मारक शिल्प आहे. नामांतर लढा हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव पूर्वीच्या मराठवाडा विद्यापीठाला देण्यासाठी इ. स. १९७८ ते इ. स. १९९४ या काळातील मोठ्या संघर्षानंतर यशस्वी झालेले आंदोलन होय. नामांतराला प्रामुख्याने हिंदू (उच्चभ्रू गुलाम) समुदायाकडून मोठ्या प्रमाणात विरोध झालेला आहे. दरम्यान १६ वर्षे संघर्ष, त्यात खून, यातना, बहुजन महिलांवर बलात्कार, जाळपोळ, वस्त्या पेटवणे, विषबाधा विहिरी, मालमत्ता नुकसान, बहिष्कार असे प्रकार उछक (उच्चभ्रू) (?) समुदायाकडून आंबेडकरी (आंबेडकरवादी) समुदायावर केले गेले. इ. स. २०१३ मध्ये, हा लढा यशस्वी झाला त्यानंतर १९ वर्षांनी नागपूर स्मारक कृती समितीने पुढाकार घेऊन शहिदांच्या स्मरणार्थ स्मारक उभारले.

पार्श्वभूमी:

भारतातील बहुजन हे हजारो वर्षापासून भारतीय जाती प्रणालीच्या तळाशी आहेत. हिंदू धर्मात चार वर्ण (चातुर्वर्ण्य) आहेत त्यात शूद्र-दलित सर्वात खाली आहेत. दलित हे अस्पृश्य मानले जात असत. त्यांच्या स्पर्शाने विटाळ होत जो सांसर्गिक असे. त्यांना घाणेरडी कामे करण्यास व्यवस्थेने भाग पाडलेले असे. त्यांना हिंदूंच्या मंदिरात (पूर्वीची विहारे त्यावर ब्राम्हणांचे अतिक्रमन) प्रवेश नसे त्यांना गावकुसाबाहेर राहावे लागत असे व वेगळ्या विहिरीतून पाणी भरावे लागत असे. इ. स. १९५० मध्ये अस्पृश्यता पाळणे कायद्याने बंदी असले तरी आजही भेदभाव सुरूच आहे.

परिसर:

विद्यापीठ परिसर ७२५ एकर (२.९३ चौ. किमी) पसरलेला आहे. हिल्स एक सुंदर पार्श्वभूमी प्रदान करतात. औरंगाबाद लेण्या विद्यापीठ परीसरातच आहेत. टेकडीच्या पायऱ्यावरील प्राचीन स्मारक सोनेरी महल (गोल्डन पॅलेस) हे कॅम्पसच्या मध्यभागी आहे, तर बीबी का मकबरा उत्तरेकडे आहे.

ग्रंथालय:

ज्ञान संसाधन केंद्र हे विद्यापीठाचे मुख्य वाचनालय आहे. विद्यापीठ लायब्ररी इ. स. १९५८ साली विद्यापीठ ग्रंथालय म्हणून स्थापन झाली. विद्यापीठ ग्रंथालयामध्ये काही जुन्या पुस्तके आहेत ज्यांचे वर्ष १६०० पर्यंत सर्व मार्ग आहेत. अलीकडे नॉलेज रिसर्च सेंटर ने नोएडास्थित कंपनीद्वारे वर्ल्ड ई-बुक लायब्ररीची सदस्यता घेतली आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांना ३,००,००० पेक्षा अधिक ई-पुस्तके जर्नलसह इतर दस्तऐवज मिळू शकतील.

शक्ती स्थळे:

विद्यापीठाच्या खालील प्रतीकांना विशेष महत्त्व आहे:

अजिंठा आर्क विद्यापीठाच्या मोटोसह त्याच्या पायावर लिहिलेले आहे. कमान हा पेंटिंग आणि शिल्पकला यांच्या कलेचा एक प्रतीक आहे जो अजिंठा गुंफेत त्यांच्या चरबीवर पोहोचला.

पुस्तकाचे विश्रांती घेण्यासारखे एक मुक्त पुस्तक, शिकण्याची प्रतिकृती.

[ज्वारी]च्या शेफाची शेती, मराठवाड्यातील लोकांची उपजीविका करण्याचे प्रमुख साधन.

मराठवाडयातील लोकांच्या प्रयत्नांचे सामर्थ्य दर्शविणारे दोन हत्ती.

प्रगती दर्शविणारे एक चक्र.

शस्त्रांचा डबा विद्यापीठाचे उद्दीष्टे आणि आदर्शांच्या उचित प्रतिनिधित्वानुसार समजला जाऊ शकतो, ज्यामध्ये प्रामुख्याने शेतीचा व्यवसाय करण्यावर भरवलेले लोक, समृद्ध सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि ज्ञान आणि शिकण्यावर लक्ष ठेवण्यासाठी दृढ निश्चय आणि आर्थिक आणि औद्योगिक प्रगती साध्य करण्यासाठी त्याच वेळी बोधवाक्य ज्ञानाच्या अवाचनीयतेची पुष्टी करते; अबाधित राहणारी गुणवत्ता म्हणजे स्वतः ज्ञान.

'घरात नाही पीठ, मागतात विद्यापीठ.' म्हणत होते. बाळासाहेब ठाकरे.

आज देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर एकूण १४ विद्यापीठ आहेत.

१. डॉ. बी. आर. आंबेडकर मुक्त विद्यापीठ, तेलंगणा. २. बाबासाहेब भीमरावं आंबेडकर बिहार विद्यापीठ, मुजफ्फरपूर. ३. आंबेडकर विद्यापीठ, दिल्ली. ४. डॉ. बी. आर. आंबेडकर सामाजिक शास्त्र विद्यापीठ, महू, मध्य प्रदेश. ५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, महाराष्ट्र. ६. डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठ, श्रीकाकुलम, आंधराप्रदेश. ७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, महाराष्ट्र. ८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्त विद्यापीठ, गुजरात. ९. डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थान, जालंधर, पंजाब. १०. तामिळनाडू डॉ. आंबेडकर विधी विद्यापीठ, चेन्नई. ११. बाबासाहेब भीमरावं आंबेडकर विद्यापीठ, लखनौ, उत्तरप्रदेश. १२. डॉ. भीमराव आंबेडकर विद्यापीठ, आग्रा, उत्तरप्रदेश. १३. डॉ. भीमराव आंबेडकर विधी विद्यापीठ, जयपूर, राज्यस्थान. १४. डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय विधी विद्यापीठ, सोनिपत, हरियाणा.

🦚 🦚 🦚 निर्वाण (निब्बाण) 🦚 🦚 🦚

निर्वाण म्हणजे मनाचे परिवर्तन पूर्णपणे थांबविण्याची अवस्था, मनाच्या पूर्ण विश्रांतीची अवस्था, इच्छा, लालसा व दुःखाच्या अभावाची अवस्था, भौतिक मनुष्य उत्पन्न करण्यास कारणीभूत होणाऱ्या प्रत्येक गोष्टींचा पूर्णपणे लोप

होण्याची अवस्था, निर्वाणप्रत पोहोचण्यापूर्वी मनुष्याचा सतत पुनर्जन्म होतो; जेव्हा तो निर्वाणप्रत पोहोचतो, तेव्हा त्याचा पुन्हा जन्म होत नाही. 'निर्वाण' म्हणजे मनाच्या विकारांपासून मुक्ती, निर्वाण स्थितीत राहून पुण्यशील असे सर्वश्रेष्ठ जीवन जगता येते.

तृष्णेचा निरोध होने म्हणजेच निर्वाण होय. संसारिक अज्ञान पुरुष इंद्रियांच्या विषयोपभोगात डुंबून आनंद मानतात. ते वारंवार जन्म घेतात, त्यांच्यामनात तृष्णामय विचारांची उथळपुथळ सुरु असते. जरा, मरण ह्याचे वारंवार दुःख भोगतात. परंतु ज्ञानी आर्यश्रावक इंद्रियांच्या सुखोपभोगापासून अलिप्त राहतात. त्यामुळे त्यांच्या 'तृष्णेचा निरोध' होतो आणि तृष्णेचा निरोध झाला की, उपादाणाचा निरोध होतो. उपादाणाच निरोध झाला की, भवचा निरोध होतो. भवचा निरोध झाला की, जन्म घेणे बंद होते, आणि पुनर्जन्माच्या निरोधाणे जन्म, जरा, मरण, शोक इत्यादी दुःखांचा निरोध होतो. अशा तऱ्हेने तृष्णेचा निरोध होने म्हणजेच निर्वाण प्राप्त होने आहे.

पुण्य करणारे, स्वीकारण्यास योग्य अशा धम्मालाच माणणारे, जाणून घेण्यास योग्य योग्य अशा धम्मालाच जाणणारे, अनुचित धर्माचा त्याग करणारे, योग्य धम्माचा अभ्यास करणारे व साक्षात्कार करण्याजोगा धम्माचा प्रत्यक्ष साक्षात्कार करणारेच 'निर्वाण' प्राप्त करतातं. थोडक्यात आर्य अष्टांगिक मार्गाचे अनुसरण करणाऱ्यांना निर्वाण प्राप्त होते.

निर्वाणानंतर मनुष्य जन्म मृत्यूच्या फेऱ्यापासून म्हणजेच तृष्णामय वैचारिक चक्रापासून मुक्त होतो. त्याचा तृष्णामय जीवनप्रवाह नेहमीकरिता बंद होतो आणि उपादानाचा एकदम अंत झालेला असतो. जेव्हा कुटदंताने भगवान बुद्धांना विचारले, 'निर्वाण कोठे आहे?' तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, जिथेजिथे नितीपर उपदेशांचे म्हणजेच आर्य अष्टांगिक मार्गाचे पालन अनुसरण केले जाते तिथेतिथे निर्वाण असते.'

निर्वाणप्राप्तीचा उद्देश समोर ठेवून कुशल कर्म करीत राहिल्याने कळांतराणे तृष्णा हळूहळू नष्ट होऊन मनुष्यास निर्वाणाची प्राप्ती होऊ शकते. पूर्णतः निस्वार्थीपणांचाच प्रतिशब्द म्हणजेच निर्वाण. 'मी', 'अहं' याचे सत्याला पूर्णपणे शरण जाने, म्हणजेच निर्वाण. ह्या पृथ्वीवर जिवंतपणीच प्रत्येकाला निर्वाणाची अवस्था प्राप्त होऊ शकते.

निर्वाण केवळ सुखाचीच अवस्था नसून तिच्यात दुःखाचा लवलेशही नसतो. खरे पाहता निर्वाण प्राप्त करण्याकरिता, निर्वाणाचा शोध घेण्याकरिता, दुःख भोगावे लागते. शरीराला व मनाला अंकित करून सर्व इंद्रियांवर ताबा मिळवावा लागतो. शाररिक व मानसिक बंधने तोडावी लागतात. त्यामुळे निर्वाणापूर्वीच्या अवस्थेत दुःख भोगावे लागले तरी, निर्वाणानंतर सुखच सुख मिळते.

शिलावर प्रतिष्ठित होऊन, मनाला अंकित केल्यावर मनुष्य कोठेही असो तो निर्वाणाचा साक्षात्कार करू शकतो. म्हणून 'शिल' हे निर्वाणाचे मूळ आहे. शिलाशिवाय निर्वाणाचा साक्षात्कार होऊ शकत नाही.

पुष्कळ विरोधक म्हणतात की, बौद्धधम्म शून्यवादी आहे. परंतु भगवान बुद्धांनी शून्यवादाचा उपदेश कदीही केला नाही. शून्यवादाचा अर्थ आहे, हे सारे विश्व, सर्वच साचेतन श्रुष्टि शून्यातून निर्माण झाली आणि त्यांचा विलयदेखील शून्यातच होईल.

परंतु भगवंतांनी सांगितले आहे की,

"सेय्यथापी भिक्खवे महासमुद्दो एकरसो लोणरसो| एकमेव खो भिक्खवे अयं धम्मो एकरसो विमुक्तिरसो||" (उदान)

अर्थ:- भिक्खूंनो! ज्याप्रमाणे महासागर एकरस असतो, म्हणजे संपूर्ण पाणी खारटच असते, त्याचप्रमाणे धम्मदेखील विमुक्ती रसमय आहे.

याचा अर्थ असा होतो की, धम्म ही आध्यात्मिक वस्तू आहे, आणि त्याचा उद्देश केवळ मुक्ती किंवा निर्वाण आहे. हे निर्वाण याच जन्मी मिळविल्या जाऊ शकते. निर्वाणाची स्थिती अत्यंत सुखमय असते. तिचे वर्णन करणे कठीण असते. तिला केवळ अनुभवानेच जाणता येऊ शकते. निर्वाण म्हणजे शून्यत्व नाही. त्याचा अर्थ अविद्येचा ऱ्हास होणे; राग, द्वेष, मोह यांचा नाश होणे; कामतृष्णा, भवतृष्णा आणि विभवतृष्णेचा नाश होणे.

अज्ञानी विरोधक म्हणतात की, बौद्धधम्म पूर्णप्रकारे निराशावादी आहे आणि दुःख भोगणे यातच पुरुषार्थ आहे अशी शिकवण देतो. परंतु हे साफ चुकीचे आहे. बौद्धधम्म हा सत्याला उघड करून सांगतो की, जगात दुःखच दुःख आहे, आणि त्यासोबत त्या दुःखापासून मुक्ती मिळविण्याचा मार्गदेखील दाखवितो. एवढेच नव्हे तर त्या मार्गावर चालणे हिच यशाची गुरुकिल्ली आहे. तो मार्ग आहे मनाच्या शुद्धीकरणाचा मार्ग. हाच मार्ग अष्टांगिक मार्ग होय.

भगवंतांनी स्पष्टपणे सांगितले की जगातील दुःखापासून सुटका मिळवून घेण्यास देहदंडांचा, तपश्चर्येचा किंवा अरण्यात निवास करण्याचा मार्ग चिकीचा आहे. भगवंतांनी माध्यममार्गाची शिकवण दिली देहदंडाला पूर्णपणे समर्पित न होता किंवा वासनामय आणि तृष्णामय मार्गाचा अवलंब न करता, मनास विकृतीपासून दूर ठेवीत आणि त्यावर यथार्थदृष्टीने अंकुश लावीत, अष्टांगिक मार्गाने गेल्याने दुःखापासून मुक्ती मिळू शकते.

भगवंतांनी ह्या गोष्टीला पूर्णतः उघड करून सांगितले की, दुःखाची उत्पत्ती कुन्या ईश्वराच्या प्रकोपामुळे होत नसते. दुःखे माणसाच्या स्वतःच्या अविज्ञयामुळे निर्माण होतात. माणसाला त्याच्या कर्मा कर्मांच्याअनुसार सुख किंवा दुःखाचा अनुभव येतो. आपल्या दुःखपासून मुक्ती मिळविण्याची गुरुकिल्ली त्याच्या स्वतःजवळच असते आणि निराश व्हायची अजिबात गरज नाही. या उपदेशाद्वारे भगवंतांनी मानवाच्या मनात एक नवीन आशा, नवीन अपेक्षा आणि नवीन भवितव्याचा संचार केला आहे. हा आशावादी दृष्टिकोन आहे.

आर्य अष्टांगिक मार्ग म्हणजेच माध्यम मार्ग. आर्य अष्टांगिक मार्गाचे अंतिम ध्येय म्हणजे निर्वाण होय. निर्वाणाचा अर्थ; रागद्वेषापासून मुक्ती, राध नावाचे स्थवीर भगवंतांकडे गेले, तेव्हा निर्वाणाचा उद्देश स्पष्ट करतांना भगवंतांनी सांगितले, श्रेष्ठ जीवन निर्वाणाश्रीत आहे. निर्वाण हेच लक्ष होय. आणि निर्वाण हेच उद्देश होय.

अविनाश पावर.

☸️ 🦚 🦚 🦚 ब्रिटिश वाईट होते काय? 🦚 🦚 🦚 ☸️

नरबळी

नरबळी जो की शूद्रांचा दिला जात असे. हे थांबविण्यासाठी ब्रिटिशांनी १८३० मधे कायदा केला.

ब्राम्हण न्यायाधीश बंदी

इ. स. १९१९ मधे इंग्रजांनी ब्राम्हणांना न्यायाधीश बनण्यास बंदी घातली होती, त्यांचे चारित्र्य न्यायिक नाही असे इंग्रजांनी सांगितले होते.

शासनामध्ये ब्राम्हण

राज्यकारभारावर ब्राम्हणांचे १००% नियंत्रण होते. ब्रिटिशांनी त्यांना २.५% वर आणून ठेवले.

संपत्ती अधिकार

इंग्रजांनी शूद्रांना १७९५ मधे कायदा ११ अन्वये मालमत्तेचा अधिकार दिला होता.

देवदासी प्रथा

देवदासी प्रथा ही इंग्रजांनीच बंद केली, पूर्वी शूद्र समाजातील मुली देवदासी म्हणून देवळात राहत होत्या, पांडा पुजारी त्यांच्यावर लहान वयातच बलात्कार करू लागले आणि त्यांच्यापासून जन्माला आलेल्या मुलाला हरिजन म्हणत.

नवविवाहीत शुद्धीकरण प्रथा

१८१९ पूर्वी जर एखादी शूद्र विवाहित असल्यास ब्राम्हण नवविवाहित जोडप्यांना शुद्ध करण्यासाठी ३ दिवस त्यांच्याकडे ठेवत असत, त्यानंतर ते त्यांना घरी पाठवत असत, ही प्रथा ब्रिटिशांनी १८१९ मधे बंद केली.

चरक पूजा

चरक पूजा ब्रिटिशांनी १८९३ मधे बंद केली. यामध्ये असे होते की जेव्हा पूल किंवा इमारत बांधली जाते तेव्हा बांधकामाच्या पायाखाली शूद्रांचा बळी दिला जातो.

गंगादान प्रथा

ब्राम्हण शूद्रांचा पहिला मुलगा गंगेला दान करायचे, कारण त्यांना माहित होते की, पहिला मुलगा बालवान होतो. म्हणूनच ते त्यांना गंगेत दान करायचे. ही प्रथा बंद करण्यासाठी ब्रिटिशांनी १८३५ मधे कायदा केला.

खुर्ची अधिकार

इंग्रजांनी १८३५ मधे शूद्रांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार दिला होता. याआधी शूद्रांना खुर्चीवर बसता येत नव्हते.

शिक्षणाचा हक्क

इंग्रजांनी सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. पूर्वीच्या शूद्र जाती (आजच्या ओबीसी, सससी, एसटी) आणि सर्व जातींच्या स्त्रियाना लिहिण्या वाचण्याचा अधिकार नव्हता.

शासकीय सेवामध्ये प्रतिनिधी

इंग्रजांनी भारत सरकारच्या कायद्याद्वारे शूद्र वर्णाच्या जातींना सरकारी सेवांमध्ये प्रतिनिधित्व देण्याची व्यवस्था केली.

त्यामुळे शूद्र/अतिशूद्र जातीचे हित लक्षात घेऊन इंग्रजांनी अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सुधारणा केल्या. पहिला भारत कायदा, दुसरा भारत कायदा, अखेरीस संविधान बनविण्यात इंग्रजांचा फार मोटा वाटा होता. महात्मा ज्योतिबा फुले यांनी तर इंग्रज शूद्र/अति शूद्रांसाठी मसीहा बनून आले आहेत. असे म्हटले आहे.

यामुळेच ब्राम्हणांनी ब्रिटिशांच्या विरोधात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ सुरु केली आणि शूद्र/अति शूद्रांना परत गुलाम करण्यासाठी १९२० मधे ब्राम्हण महासभा, १९२२ मधे हिंदू महासभा आणी १९२५ मधे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) ची स्थापना केली. त्यामुळे आजही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सांस्कृतिक चवळीमुळे ब्राम्हणांच्या श्रद्धा, परंपरा, विधी, सण, व्रत आणि धर्मग्रंथ यांचा समाजावर पूर्वीसारखाच परिणाम होत आहे. संवैधानिक लोकशाही व्यवस्थेमुळेच बहुसंख्य समान्यज्ञानी लोक दिसत नाहीत.

आज शूद्र (ओबीसी), अतिशूद्र (एससी), आदिवासी (एसटी) या शिक्षित लोकांचा असा विश्वास आहे की, मानवी बलिदान, पशुबळी, सतीप्रथा, देवदासी, नियोग प्रथा इत्यादी हिंदू (ब्राम्हण) सनातन धर्मातील जुन्या गोष्टी आहेत. ब्राम्हण आता आपल्या समाजाला फसवू शकत नाहीत.

असे सुशिक्षित लोक हे विसरतात की आजही अशा सुशिक्षितांना प्रत्येक देवडात दगडात देव दिसतो, गाय आईच्या रूपात दिसते, निर्मल बाबांच्या लाल हिरव्या चटणीत कृपा दिसते, आसाराम बापूंसारखे ढोंगी त्यांना संत मानतात, ब्राम्हण प्रत्येक संस्कार करतात, ज्योतिषावर विश्वास ठेवतात. ब्राम्हण जे उपाय सांगतात त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवतात, जे मागतात त्यापेक्षा जास्त देतात, तर विज्ञान (वैज्ञानिक) सुईपासयन विमानापर्यंत त्यामुळे आज विज्ञानाचे युग आहे, मानवाधिकार संविधानाने दिले आहेत असे मानणे, आता ब्राम्हण करू शकत नाही. मूर्ख बनणे त्यामुळे विशेषतः सुशिक्षितांनी चुकीच्या गैरसमजातं राहू नये; जगासाठी विज्ञानाचे युग असेल, पण आजही भारतासाठी ब्राम्हणांचे युग सुरु आहे. हिंदू धर्माच्या नावाखाली मागास समाज, गरीब समाजाची फसवणूक केली जात आहे, हिंदू धर्म म्हणजे ब्राम्हणी व्यवस्था हेच वास्तव आहे.

ज्या धर्मात समानता, मानवता आणि बंधुत्वाची भावना नाही तो धर्म नसून षडयंत्र आहे. हे जितक्या लवकर समजेल तितके तुमच्या आयुष्यासाठी चांगले होईल.

भंते पय्याकीर्ती, दूरध्वनी क्र. ८०१०९१४७४१.

🦚🦚🦚————————🦚🦚🦚

तिळगुळ घेताना-देताना, गोड-गोड बोलण्याचा अग्रह करताना आणि संक्रांतिच्या शुभेच्छा घेताना-देताना थोडासा विचार करा!!

———

● *काळा रंग हा अशुभ आणि निषेधाचे प्रतिक आहे. तेव्हा संक्रान्तीला धार्मिक उत्सव माननारे विवाहित स्त्रीया काळी साडी परिधान करून कुणाच्या विरोधात निषेध व्यक्त करतात?*

● *काळ्या रंगा विषयी काहीसा नकारात्मक भाव बाळगनारी स्त्री, मकर संक्रान्तीला अचानक उदार होवून काळ्या रंगाच्या प्रेमात का पडत असाव्यात?*

● *मकर संक्रान्ती सणा सारखं कोणत्या सणासुदीला किंवा शुभमुहुर्ताला काळे कपडे परीधान केले जाते का?*

● *एखादयावर "संक्रान्त येने" हा शब्दप्रयोग कोनत्या संस्कार संस्कृतीची जपवनूक करणारा आणि कोनत्या संस्कार आणि संस्कृतीच्या विरोधात आहे?*

● *सवास्न करन, वान लुटन, हळदी कुंकव करन हे मकर संक्रांन्तिच्या कोनत्या संस्कृती संघर्षात दडलेला आहे? हे जाणून घेणं, समजवून घेणं आणि इतरांना देखील समजून सांगणं आवश्यक आहे.*

बहुजन हो!! तो संघर्ष म्हणजे •••••

● *१४ जानेवारी १७६१ मंहमदशहा अबदाली विरुद्ध सदाशिवराव पेशवे आणि विश्वासराव पेशवे यांच्यात झालेली पाणिपतची तिसरी लढाई, पाणिपतच्या लढाईत अठरा पगड जाती, बारा बलुतेदार व एक लाख बहुजन धारातीर्थी पडले. तो १४ जानेवारीचा हा आजचा दिवस हरियाना येथील "काला आम" येथे दरवर्षी तामम लाखों बहुजन संघटित होऊन "शोकदिन" म्हणून पाळतात.*

● *आणि आम्ही महाराष्ट्रातले बहुजन लोक आज तिळगूळ घेऊन आणि देऊन, तोंड गोड करून आनंद उत्सव साजरा करतो.*

● *कारण महाराष्ट्रातील बहुजन समाज आपला स्वतःचा इतिहास वैदिक मनुवादि ब्राह्मणांच्या चष्म्यातून वाचतात आणि वैदिक मनुवादि ब्राह्मणांनाच्या संस्कार आणि संस्कृतीचे समर्थन करतात.*

● *पाणिपतच्या लढाईत अठरा पगड जाती, बारा बलुतेदार, वंचित बहुजनांच्या घरातील संक्रांतीच्या दिवसी १४ जानेवारी १७६१ ला एक लाख बांगड्या फुटल्या.*

तेव्हा बहुजनांनो विचार करा!!....

● *तुम्ही आम्ही मकर संक्रांतीच्या शुभेच्छा द्यायच्या का? आणि त्या शुभेच्छांचा स्वीकार तुंही, आम्ही करावा का?*

● *कारण जो समाज आपल्या "मुलांची मने" घडविण्याची जबाबदारी आपल्या शोषणकर्त्यावर अर्थात ब्राम्हणावर सोपवितो. तेव्हा शोषणकर्ते ब्राम्हण त्या "मुलांच्या मन आणि मेंदूला" अशी काही दिशा देतात की, ती मुल आपल्या पूर्वजांच्या "त्याग, बलिदान, व संघर्षाचा इतिहास विसरतात." शत्रू आणि मित्राची ओळख विसरलेली बहुजनांची मुल आपल्याच "शत्रूच्या (शोषणकर्ते ब्राम्हण) विजयाचा सोहळा साजरा करतात आणि मित्रावरच (बहुजन) घाव घालतात.*

"प्रश्न असा आहे की, असे का घडते?"

ह्या प्रश्नाचे उत्तर एकाच शब्दात आहे. *"बहुजनांचे बौद्धिक ब्राम्हणीकरण"*

*"बहुजनांचे बौद्धिक ब्राम्हणीकरण" माणसाचे मानसिक खच्चीकरण करणारी संकल्पना आहे. माणसाचे विचार बदलतात. जगण्याचे आचरण बदलते. आयुष्याकडे पाहण्याची दृष्टीच नव्हे तर दृष्टिकोन देखील बदलतो.

माणसाच्या जीवनातील हा बदल केवळ बदल नसून हा ब्राम्हणी रोग बनतो. जेव्हा हरोग माणसातून समाजात पसरतो तेव्हा...*

विचार करणारी बुद्धी नष्ट होते. विवेकशिलता नसत होते. स्वतःचे विचार आपले राहत नाही. जे ब्राम्हण सांगतील ते डोळे बंद करून जसेच्या तसे मान्य केले जाते. माणूस डोळे असून आंधळा आणि जीभ असून मुका होतो. माणसासारखा माणूस जाणावरासारखा गुलाम होतो.

जेव्हा आपली बहुजनांची मुल शोषणकर्त्यांचा (ब्राम्हण) विजयाचा सोहळा साजरा करतात तेव्हा बहुजन महापुरुषांचे *चरित्रहणन करण्याचे, विकृतिकन करण्याचे* ब्राम्हणी समाजाचे धाडस वाढते.

शिवाजी महाराजांच्या जन्म तारखेचा वाद घालणे. संभाजी महाराजांचे चरित्र हणन करणे. शाहू महाराजांची घसरगुंडी सांगणे. जेम्स लेंनच्या माध्यमातून माता जिजाऊंची बदनामी करणे. हे जेव्हा घडविले जाते आणि बहुजन प्रतिक्रिया देत नाही असे होते तेव्हा असे सिद्ध होते की, *बहुजनाच्या मन आणि मेंदूचे ब्राम्हणीकरण झालेले आहे.*

(टिप) मित्र हो!! *मी पाठविलेल्या तमाम पोस्ट बहुजन शिक्षित, उच्च शिक्षित जाती, जंजातीच्या बहुजनांच्या मनात खूप काही किंतु-पण-परंतु विचार येतील, पण तुम्ही जो काही विचार कारलं तो आमच्या बहुजन महापुरुषांच्या विचारधारेच्या अनुरूप करा! कारण, आम्ही बहुजन विचारधारेला "अनुरूप विचार" करतो आणि त्या विचारधारेला "अनुसरून आचरणही" करतो. कारण ब्राह्मणींइतिहासाला आम्ही जाणतो, म्हणूनच आम्ही ब्राम्हणी इतिहास मानत नाही. जो खरा इतिहास आहे, तो आज नाही तर उद्या सत्यरूपात समोर येईलच व तो येतो आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर असं म्हणतात की; "जी व्यक्ती, जी जात, जो समाज आपला इतिहास विसरतो, ती व्यक्ती, ती जात, तो समाज आपला नवीन इतिहास घडवू शकत नाही."*

१४ जानेवारी १७६१ च्या लढाईत "काला आम" येथील तमाम अठरा पगड जातीचे अलुतेदार व बलुतेदार, वंचित बहुजन शाहिद विरांना विनम्र अभिवादन.

तेव्हा, *ओबीसी-मराठा जागा हो!! शिवराय-भीमराय यांच्या विचारांचा धागा हो!!!*

कारण, *सत्य असत्याशी मन केले ग्वाही! मानियले नाही बहुमता||* "Know the truth as truth and untruth as un truth." संत तुकाराम महाराज.

--१४ जानेवारी *मकर संक्रांतिच्या* निमित्ताने--

पेशवे काळात नेमके असे काय बदलले की "मोगलाई" नामशेष करायची सोडून मराठे स्वतः "पेशव्यांचे रक्षणकर्ते" बनले?

१६८९ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांची निघृण हत्या ब्राह्मण आणि मोगल यांच्या *अनैतिक युतीमुळे* करण्यात आली. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांच्या अकाली मृत्यू (१७००) नंतर *संभाजी महाराजांचे पुत्र शाहू महाराज* १८ वर्षे (१६८९ - १७०७) शाहू औरंगजेबाच्या कैदेत होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ते मराठ्यांचे छत्रपती झाले. १७१३ साली सातारच्या शाहु महाराजांनी *कोकणातील श्रीवर्धन येथील बाळाजी विश्वनाथ भट यांना पेशवेपदी नेमलं*. बाळाजी विश्वनाथ भटाने शाहू महाराजांच्यामर्जीत राहून शाहु महाराजांकडे शब्द टाकून *हरी भानू* यांना *फडणवीशी* दिली. भानू घराणं आणि पेशव्याचं भट घराणं कोकणातील बाणकोटच्या खाडी या दोन्ही घराण्यांशी संबंधित आहे. खाडीच्या उत्तरेस भट घराण्याचं 'श्रीवर्धन' आणि दक्षिणेस भानू घराण्याचं 'वेळास' त्यामुळे अनेक वर्षांपासून दोघांच्या पिढ्यांच नातं होतं. हरी भानू यांच्या निधनानंतर *बाळाजी* (बळवंत) आणि त्यांच्या मृत्यूनंतर *जनार्दन फडणवीस* झाले. जनार्दन व रखमाबाई यांच्यापोटी *१७४२ ला नाना फडणवीस यांचा सातारा येथे जन्म झाला.

पेशवाईचा म्हणजेच ब्राह्मणांचा कालखंड

-इ.स. १७१३ ते इ.स. १८१८......

शाहू महाराज आणि *ताराबाई* यांच्या मध्ये बाळाजी विश्वनाथ भट यांनी पध्दतशीर पणे भांडण लावून *संभाजी दुसरा* (राजाराम-राजसबाईचा मुलगा) यामध्ये स्वराज्यसत्तेच विक्रेंद्रीकरण घडवून आणल्याने बाळाजी विश्वनाथ भटाच्या षडयंत्रामूळे *सातारा आणि कोल्हापूर अश्या मराठ्यांच्या २ गाद्या निर्माण झाल्या.* बाळाजी विश्वनाथ भटाचे षडयंत्र यशस्वी झाल्याने इ. स. १७१३ मधे तो मुख्य पेशवा झाला आणि तेव्हापासूनच मराठा छत्रपतींच्या हाती नाममात्र सत्ता राहून सर्व राजकीय सत्ता पेशव्यांच्या ताब्यात आली. पेशव्यांनी मराठा राज्याची राजाधानी सातार बदलून ती पुण्यास करण्यात आली. म्हणूनच *ब्राम्हणी इतिहासकार बाळाजी विश्वनाथला मराठा सत्तेचा दुसरा संस्थापक असे म्हणतात.*

बाळाजी विश्वनाथ भट नंतर *पहिला बाजीराव* (इ. स. १७३०-४०) हा पेशवेपदी आला. या पहिल्या बाजीरावाच्या शौर्याबद्दल तर इतिहासकार फारच उदो उदो करतात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर शौर्य आणि धाडस यासाठी पहिल्या बाजीरावाचा क्रम लागतो. असे ब्राम्हणी इतिहासकार लिहितात.

ब्राम्हणी इतिहासकार लिहितात की, *४० वर्षात ४७ लढाया जिंकणारा एकमेव पहिला बाजीराव पेशवा होता.* परंतु हे ब्राम्हणी इतिहासकार जाणीवपूर्वक हेतूपुरस्पर बिसरतात की, *अवघ्या ९ वर्षाच्या कारकिर्दीत तब्बल १४० लढाया जिंकणारे छत्रपती संभाजी महाराज होते.* ब्राम्हणी इतिहासकार पहिल्या बाजीरावाविषयी लिहितात की, *दिवसाला तीस-पस्तीस कोसांची घिड्यावरून दौड.* (१ कोस = २ मैल, १ मैल = १.६ किमी.) मारणे ही केवळ *अशक्यप्राय गोष्ट* करणारे पहिले बाजीराव पेशवे होते परंतु हे वैदिक मनुवादी ब्राम्हण इतिहासकार *१२ आघाड्यावर दिवसाची

२० तास घोडदौड करून १-२ नव्हेतर तब्बल १२ आघाड्यावर शत्रुशी एकाएकी झूंज घेणारे संभाजीराजे होते हे मात्र सांगत नाहीत.* पहिल्या बाजीरावाविषयीं कदाचित असे लिहून छत्रपती शिवाजी महाराजांइतकी लोकप्रियता पहिल्या बाजीरावालाही मिळेल असे ब्राम्हण इतिहासकाराला वाटत असेल. पण एक गोष्ट समजून घ्यायला हवी ती म्हणजे पहिल्या बाजीराबापर्यंतच मराठा स्वराज्य होते नंतर त्याचे रूपांतर पेशवाईत झाले.

पहिल्या बाजीरावाच्या मृत्युनंतर त्याचा मोठा मुलगा *बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब* (इ. स. १७४०-६१) हा पेशवेपदी असता याच दरम्यान म्हणजे इ. स. १७४८ मध्ये छत्रपती शाहूंचा मृत्यू झाला. त्यामुळे संपूर्ण मराठ्यांची सत्ता ही नानासाहेब पेशव्यांच्या हाती आली. (*याचा अर्थ असा होतो की, पेशवे ठरवतील तिच पूर्व दिशा, मराठे ठरवतील ती नव्हे.*) नानासाहेब पेशव्यांच्याच काळखंडात दोन महत्वाच्या घटना घडल्या...

१) *अटक येथील प्रदेशावर विजय* (१७५८) २) *पानिपत लढाईमध्ये पराभव* (१७६१)

या दोन घटनांच्या विशेषणावरून ब्राम्हण इतिहासकारांचा पक्षपातपणा लक्षात येतो. कारण इ. स. १७५८ मधे नानासाहेब पेशव्यांचा कनिष्ठ भाऊ रघुनाथरावाने इंदूरच्या मल्हारराव होळकरांच्या मदतीने अटक किल्यावर जरीपटका फडकावून विजय मिळवीला. या विजयाचे वर्णन करण्यासाठी ब्राम्हण इतिहासकारांनी इतिहासामधे एक म्हण प्रचलित केली... *"पेशव्यांनी अटकेपार झेंडे लावले".*

काही हरकत नाही रघुनाथरावाच्या नेतृत्वाखाली विजय मिळवीला म्हणून इतिहासकारांनी अगदी सत्य इतिहास समाजासमोर आणण्यासाठी या म्हणीचा उपयोग केला आहे.

परंतु अवघ्या ३ वर्षानंतर म्हणजेच इ. स. १७६१ मधे नानासाहेब पेशव्याच्याच चुलतभाऊ सदाशिवराव याच्या नेतृत्वाखाली पानिपतचे युद्ध झाले. पानिपतच्या लढाईत पेशव्यांना पराभव पत्करावा लागला. हा पराभव आपला नसून मराठ्यांचा आहे, हे सांगण्यासाठी ढोंगी ब्राम्हण इतिहासकारांनी आणखी एक म्हण प्रचलित केली....

"मराठ्यांचे पानिपत झाले."

अशाप्रकारे या दोन घटनांचे विश्लेषण ब्राम्हण इतिहासकाराने त्यांच्या सोईचे केले आहे. *विजयाचे श्रेय स्वतःच्या नावावर घेतले आणि पराजय मात्र मराठ्यांच्या नावावर खपवीला.* आमचे एवढेच म्हणणे आहे की, *पेशव्यांनी अटकेपार झेंडे लावले असतील तर पानिपतही पेशव्यांचेच झाले आणि मराठ्यांचे पानिपत झाले असेल तर अटकेपार झेंडेही मराठ्यांनीच लावले.* याला म्हणतात वस्तुनिष्ठ इतिहास लेखन करणे. परंतु वस्तुनिष्ठ इतिहास लेखन करेल तो ब्राम्हण कसला....

परंतु प्रश्न हा आहे की, *राज्य पेशव्यांचे आणि पानिपत मराठ्यांचे कसे?* पानिपत कुणाचे झाले? असा प्रश्न विचारला की, पहिलीच्या मुलापासून ते पद्विधर तरुणापर्यंत सर्वजण एकच उत्तर देतात की, मराठ्यांचे पानिपत

झाले. परंतु यामधे आपल्या मुलांचा किंवा त्या तरुणांचा दोष नाही. कारण त्यासाठी जबाबदार आहे ती ब्राम्हणी शिक्षण व्यवस्था आणि ब्राम्हण इतिहासकार वी. का. राजवाडे, अ. रा. कुलकर्णी, सेतू माधवराव पगडी, पांडुरंग सदाशिव पिसुरलेकर, व्ही. टी. गुऱ्हे, के. एन. चिटणीस, शं. ना. जोशी, वा. कु. भावे, सरदेसाई इत्यादी इतिहासकारांनी मराठ्यांचा इतिहास लिहित असतांना मराठ्यांचे पानिपत झाले हा विचार इतिहासामध्ये जाणीवपूर्वक रुजवीला. परंतु तर्कसंगत चिंतन केले असता आणि इतिहासाचा एक चिकित्सक अभ्यासक या नात्याने विचार केल्यास आपणांस ही गोष्ट सिद्ध करता येईल की, *पानिपत हे मराठ्यांचे झाले नसून पेशव्यांचे झाले आहे.*

———————————

संग्रहित: एम. एन. सोनावणे, पुणे.

🦚 🦚 🦚 *संक्रांत हा बौद्ध महिलांचा सण आहे का ❓ * 🦚 🦚 🦚

भारतात सर्वत्र हिंदू स्त्रिया मकर संक्रांत हा सण सौभाग्याचा सण म्हणून साजरा करतात. अजूनही बौद्ध स्त्रियाही हिंदू स्त्रियांचे अनुकरण करत आहेत.

नागवंशीय असलेल्या संख्यासुराचा अत्यंत क्रूरपणे संक्रांत आणि किंक्रात नावाच्या दोन ब्राह्मण मुलींनी निर्दयपणे वध केला. ह्या दोघी सख्या बहिणी होत्या. त्या नाचगाण्यात फार तरबेज होत्या. संख्यासुराचा वध करण्याचा ब्राह्मणांनी कट रचिला. संक्रांत आणि किंक्रात यांच्या वाढदिवसानिमित्त राजा संख्यासूराला आमंत्रित केले. त्या दोन्ही बहिणींचे गायन आणि नाच पाहून संख्यासुर अतिशय आनंदित झाला. न्रुत्य पाहून तर संख्यासुर गुंग होऊन देहभान विसरला. या संधीचा फायदा त्या दोन बहिणीनी घेतला. त्या दोघीनी अगोदरच कोपऱ्यात ठेवलेले भाले उचलले आणि दांडपट्टा खेळतात त्याप्रमाणे भाले घेऊन संख्यासुरांच्या सभोवताली नाच करीत एकीने पोटातून पाठिकडे भाला खुपसला. दुसरीने पाठीतून पोटात खुपसला. दोघीनी रक्तामध्ये बोट बुडवून एकदुसरीला टिळा लावला. तेव्हांपासून हिंदू स्त्रिया एकमेकीला ▯ सौभाग्याचा सण म्हणून कुंकू लावतात. कुंकू हे संख्यासूराच्या रक्ताचे चिन्ह आहे. तुम्हाला कोणालाहाही शुभेछा देण्याची गरज नाही या संस्कृतीशी बौद्ध भगीनींचा तिळमात्र संबंध नाही पिढ्यान पिढ्याचे अज्ञान आता थांबवा म्हणुन बाबासाहेब नेहमी म्हणायचे इतिहास वाचाल.... तर वाचाल नाहीतर हा मनुवाद तुम्हाला खड्डात गाडल्या शिवाय रहाणार नाही... कृपया हा मेसेज ।संक्राती पर्यंत प्रत्येक बौद्ध भगीणी पर्यंत पोहोचला पाहीजे.

जय भिम 🙏 🙏

🦚 🦚 🦚 समरण : वीर हुतात्मा पोचीराम कांबळे यांचे 🦚 🦚 🦚

मरीबा चिमणाजी कांबळे आणि कोंडाबाई या दांपत्याच्या पोटी नांदेड जिल्ह्यातील टेंभुर्णी ता. नायगाव खैरगाव येथे पोचीराम कांबळे यांचा जन्म झाला. धुरपता, पारू, पंचा आणि सुरेखा अशा तीन बहिणी आणि सटवाजी व चिमणाजी असे दोन भाऊ मिळून एकूण सहा भावंडे पोचीरामाला होते.

पोचीराम दिसायला गोरागोमटा, सुंदर असा नाकेलसा तरुण. सहा साडेसहा फूट उंच, पिळदार शरीरयष्टीचा भरदार छाती असलेला देखणा मर्द गडी होता. कंधार तालुक्यातील काटकळंबा येथील धोंडाबाईंशी त्याचा विवाह झाला. प्रचलित जाती व्यवस्थेमुळे शाळेत जाऊन शिक्षण घेता आले नसले तरी प्रत्यक्ष जीवनाच्या शाळेत तो शिकलेला होता. गावातील राजकारणात सक्रिय सहभाग असल्याने गावकऱ्यांनी त्याला ग्राम पंचायत सदस्य म्हणून निवडून दिले होते.

नांदेड जिल्ह्याच्या लोहा-कंधार परिसरात राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी अनेक कीर्तने केली होती. त्यांच्या कीर्तनांतून प्रेरणा घेऊन पोचीराम कांबळे यांनी सामाजिक क्रांतीसाठी पुढाकार घेतला.

टेंभुर्णी गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्यासाठी पोचीराम कांबळे यांनी पुढाकार घेतला. टेंभुर्णी गावात बौद्धांची घरे कमी आणि मातंगांची घरे जास्त होती. पोचीराम कांबळे हा दोन्ही जात समूहांचा एकमेव पुढारी होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव असल्यामुळे पोचीराम मुळातच स्वाभिमानी आणि बंडखोर होता. अन्याय, अत्याचार आणि गावपातळीवरील शोषण त्याला सहन होत नव्हते. एखाद्या शेतकऱ्याने गरीब मजुराचे पैसे बुडविल्याचे कळताच तो त्याला बोलायला जात असे. गोरगरिबांची बाजू घेऊन तो बड्या बड्यांशी पंगा घेत असे. चंदर आणि बाबू या आपल्या दोन बच्छाड्यांना जागविण्यासाठी पोचीराम जिवतोड मेहनत करित होता.

पोचीराम कांबळे म्हणजे टेंभुर्णी परिसरात अन्यायाच्या विरुद्ध एक चालते बोलते बंड होते. तो बंडखोर होता; स्वतःहून मात्र कुणाच्याही वाटेला जात नव्हता. त्याचे भांडण सत्यासाठी, न्यायासाठी होते. म्हणूनच या परिसरातील गोरगरीबाच्या गळ्यातील तो ताईत बनला होता. अनेक भांडखोर जवायांना वटणीवर आणून त्याने अनेक लेकीबाळींचे संसार उभे केले होते. सतत चारचौघात बसल्या उठल्यामुळे आणि आंबेडकरी विचार अवगत झाल्यामुळे त्याच्यामध्ये एक प्रकारचा निडरपणा आलेला होता.

गांवात आणि परिसरात भिमजयंती सुरु केल्यामुळे परिसरातील गावगुंड त्याच्यावर जळत होते. अनेक जमिनदारांना आणि गवगुंडांना त्याने वठणीवर आणले होते. गोरगरिबांना गायरान आणि सिलिंगची शेतजमीनही त्याने मिळवून दिली होती. गावकी सोडायला लावून विमुक्तीतांची गुलामीतून मुक्तता केली होती.

अशातच १९७७ साली मराठवाड्यात नामांतराची चळवळ सुरु झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४८ साली स्वतः औरंगाबादमधे येऊन सर्वांना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली होती.

त्यामुळेच औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले होते. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांचे नामांतर होत असतानांच मराठवाड्यातील पुरोगामी जनतेने या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नाव द्यावे ही मागणी केली.

२८ जुलै १९७८ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन तरुण तडफदार मुख्यमंत्री शरद पवार यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये नामांतराचा ठरावं मांडून तो मंजूर करून घेतला. दुसऱ्या दिवसी सणातनी वृत्तीच्या वृत्तपत्रांनी नामांतर ठरावाच्या विरोधात लोकांना भडकविणाऱ्या बातम्या पहिल्या पानावर प्रसारित केल्या आणि मराठवाड्यात वंचितांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार सुरु झाले. सरकार आपल्या परीने शांतता राखण्याचे प्रयत्न करीत होते. मात्र वृत्तपत्रांच्या मध्यमातून वंचितांच्या विरोधामधे मोठी शक्ती कार्यरत झाली होती. गायरान जमिनी धरल्यामुळे आणि गावकीची काम सोडल्यामुळे आधिच बिथरलेले संवर्ण वंचिंतांवर नामांतराच्या नुमित्ताने तुटून पडले. गावागावातील वंचितांच्या झोपड्या जालन्यात आल्या. अनेक ठिकाणी वंचितांच्या विहिरींमध्ये पाण्यात विष मिसळण्यात आले. घाण टाकून पाणी नसविण्यात आले. वंचितांवर बहिष्कार टाकले गेले. दंगल शांत करण्यासाठी आलेल्या पोलिसांवरही हिंसक जमावाणे बेछुट हल्ले करण्यात आले. त्यात लातूर जिल्ह्यातील जळकोट येथे गोविंद भुरेवार या पोलीस अधिकाऱ्याला नामांतर विरोधकांनी घेरून जाळून टाकले. अनेक वंचित स्त्रियांवर अत्याचार करण्यात आले. काही ठिकाणी बालकही आगीत होरपळून मृत्यू पावली. वंचितांना पळता भुई थोडी झाली.

शरद पवार सरकारणे घेतलेल्या विद्यापीठ नामांतर ठरावाच्या विरोधात सर्वत्र आगडोंब उसळलेला असतांनाच ४ ऑगस्ट १९७८ रोजी नांदेड जिल्हातील टेंभुर्णी गावात पहाटेच वंचितांची घरे पेटविण्यात आली.

ज्या वंचितांच्या उद्या झोपड्या जाळल्या जाणार आहेत, याची पूर्वकल्पना मिळाली होती; ते बिचारे आदल्या दिवसीच गाव सोडून परागंदा झाले होते. पोचिरामलाही त्यांच्या हितचिंतकाणी सावध केले होते. सासुरवाडीला निघून जा असे त्याला सांगण्यात आले होते. मात्र अन्याय सहन न करणाऱ्या पोचिरामाला असे पळपुटे धोरण रुचणे शक्य नव्हते.

"कुणीही गाव सोडून पळून जाऊ नका. सरकार आपल्या बाजूने आहे. भिऊ नका, तर सामना करा." असे आव्हाहन करीत रात्रभर पोचिराम वंचित वस्तिमध्ये फिरत होते. मात्र जीवाच्या आकांताने टेंभुर्णी गांवातील वंचीत पोचिरामाचे काही एक न एकता रातोरात पळून गेले होते. पहाटे ठरल्याप्रमाने संपूर्ण वंचित वस्ती रॉकेल टाकून पेटवून देण्यात आली. काही वंचीतांची घरं दगडी होती. ती पक्की बांधकामं दारूगोळा लावून उडवून देण्यात आली. संपूर्ण वस्ती पेटल्यानंतर जमाव पोचिरामाला शोधित होता.

रात्री गावातच एका घरात मुक्कामाला असलेला पोचिराम पहाटे बाहेर पडला. मित्रांनीच दगा दिला. त्याला घराबाहेर पडण्यास भाग पाडले. पोचिराम बाहेर पडताच त्याच्यामागे परिसरातील पाच सहा गावांचा जमाव धावू लागला. पोचिराम निर्भय होता. त्याला आता मरणाचेही भय राहिले नव्हते. गावागावातील वंचितांच्या पेटलेल्या वस्त्या पाहत

पोचिराम बेभान होऊन धावीत होता. परकोटीच्या अन्यायाने त्याचे मन पेटून उठले होते. हातात लाठ्या-काठ्या घेऊन गावगुंड त्याच्या मागे धावत होते आणि तो पुढे चालत होता. टेंभूर्णीचा शिवार ओलांडल्यानंतर चौकी महाकाया या गावाच्या शिवरात हल्लेखोरांनी पोचिरामाला घेरले. त्याच्यावर दगडांचा वर्षाव केला. अमानुषपणे लांबूनच दगडांनी मारून त्याला घायाळ केले आणि मग पकडले. चारशे पाचशेच्या जमावापुढे एकटा पोचिराम धैर्याने उभा राहिला. "अरे, बायकांसारखे का मारता? मर्दासारखे समोर या आणि एकदाच माला मारून टाका."

जमाव चेकाळला होता. त्यातील एकाने विचारले होते, "पोच्या, जय भीम बोलशील का?" पोचिरामणे उत्तर दिले, "होय, जय भिम..!"

जमाव सुडाने पेटला होता. पोचिरामाला पाच पंचवीस जणांनी पकडून हालहाल करून मारले. शेवटच्या घावापूर्वीही त्याला विचारले, "बोल, जय भिम बोलशील का.... नाही म्हटलास तर जीवदान देतो." पण शेवटच्या श्वासापर्यंत पोचिराम निर्भयपणे जय भिम म्हणत राहिला.

हल्लेखोरांनी पोचिरामाला अर्धमेल्या अवस्थेत फासावर टाकले. जमावतील काहींनी शेजारच्या शेतातील विहिरीवरील मोटेची लाकडं आणली आणि त्या सरणावर पोचिरामाला टाकून आग लावली. पोचीराम अमर झाला. सत्यासाठी, न्यायासाठी त्याने आपल्या प्रणांची आहुती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव विद्यापीठाला देण्यात यावे, यासाठी झालेल्या अपूर्व आंदोलनातील पहिला हुतात्मा पोचिराम कांबळे ठरला...!

सतरा वर्षे सातत्याने नामांतर आंदोलन सुरु होते. त्यात अनेकांच्या झोपड्या जळाल्या. अनेकांना परागंदा व्हावे लागले. या आंदोलनास शेवटी आठ्ठावीस हुतात्म्यांच्या बलिदानानंतर यश आले. औरंगाबाद येथील विद्यापीठास महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळाले. पण तेही अपूर्ण ही खंत आजही आहेच. भारतरत्न विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर बिद्यापीठ, औरंगाबाद; असे पाहिजे होते.

आज नामांतर शहीद हुतात्मा पोचीराम कांबळे यांचा स्मृतिदिन... त्यांच्या असीम त्यागाचे, शौर्य आणि समर्पणाचे स्मरण करूया. हुतात्मा पोचिराम कांबळे यांना विनम्र अभिवादन. जय भीम!

संकलन: मारोती कसाब.

🦚🦚🦚 भिमाबाई रामजी आंबेडकर 🦚🦚🦚

जन्म:- १४ फेब्रुवारी १८५४; आंबेटेंभे, ता. मुरबाड. मृत्यू:- २० डिसेंबर १८९६.

भिमाबाई रामजि आंबेडकर या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या यांच्या आई व रामजी आंबेडकर यांच्या पत्नी होत्या. त्यांचे वडील लक्ष्मन मुरबाडकर हे आधी मराठा पलटणीत व नंतर १०६ सॅपर्स अँड मायनर्स मधे सुभेदार होते.

इ. स. १८६७ मधे वयाच्या १३ व्या वर्षी भीमाबाईचा विवाह १९ वर्षीय रामजी आंबेडकर यांच्याशी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथे झाला.

इ. स. १८६६ च्या सुमारास रामजी इंग्रजी सैन्याच्या १०६ सॅपर्स अँड मायनर्स तुकडीत शिपाई म्हणून भरती झाले. भीमाबाईंचे वडील मुरबाडचे राहणारे होते व ते इंग्रजी सैन्यात सुभेदार या पदावर होते.

रामजी व भीमाबाई या दामपत्यांना १८९१ पर्यंत चौदा अपत्य झाली होती. त्यापैकी गंगा, रमा, मंजुळा व तुळसा या चार मुली जिवंत राहिल्या होत्या. मुलांपैकी बाळाराम, आनंदराव व भीमराव ही तीन मुले जिवंत होती. भीमराव सर्वात लहान व चौदावे अपत्य होते. रामजी ज्या पलटणीत होते ती पलटण इ. स. १८८८ मधे मध्य प्रदेशातील महू येथे लष्करी तळावर आली होती. येथे सुभेदार रामजींना नॉर्मल स्कुलचे मुख्याध्यापक पद मिळाले होते. या काळात रामजी व भीमाबाईंच्या पोटी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू या लष्करी छावणी असलेल्या गावी झाला. भीमराव हे रामजी आंबेडकर व भीमाबाई यांचे १४ वे व अंतिम अपत्य होते. बाळाचे नव 'भिवा' असे ठेवण्यात आले, तसेच त्यांची भीम, भीमा व भीमराव ही नावेही प्रचलित झाली. आंबेडकरांचे कुटुंब हे त्याकाळी अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे होते आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील आंबडवे या गावचे होते. अस्पृश्य असल्यामुळे त्यांच्यासोबत नेहमी सामाजिक, आर्थिक भेदभाव केला गेला. इ. स. १८९४ मधे सुभेदार रामजी आंबेडकर इंग्रजी सैन्यातील मुख्याध्यापक पदाच्या नौकरी वरून निवृत्त झाले आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या मूळ गावाजवळील दापोली या गावातील 'कॅम्प दापोली' वस्तीत परिवारासह राहू लागले. इ. स. १८९६ मधे रामजींनी आपल्या कुटुंबासह दापोली सोडली व सातारा येथे राहिले. या वर्षी त्यांनी कबीर पंथाची दिक्षा घेतली. २० डिसेंबर इ. स. १८९६ मधे मस्तकशूळ या आजाराने भीमाबाईचे निधन झाले. त्यावेळी भीमराव ५ वर्षांचे होते.

भीमाबाईंच्या सन्मानार्थ मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कार दिला जातो.

🎉 🎉 माता भीमाबाई आंबेडकर यांच्या जन्मदिनी त्यांना त्रिवार अभिवादन. 🎉 🎉 💐



☸️ 🦚 🦚 🦚 माता-पिता दिवस 🦚 🦚 🦚 ☸️

आज चंदवारो (सोमवार) माता-पिता दिवसानिमित्त सर्वांना मंगल सदिच्छा.

माता पिता याचे विश्लेषण

माता:

माता नेहमी स्त्रिलिंग अर्थात महिला असते जे की आपल्याच सारखी आकृती आणि गुणानुसार पुत्राला जन्म देते आणि आपल्या पुत्राचे पालन पोषण करते आपल्या पुत्राला दुःखी बघू शकत नाही.

कोणतीही माता आपल्या मुलांना उपासी ठेवून आनंदी राहू शकत नाही.

जसे की काल्पनिक माता दुर्गा, काली, सरस्वती, संतोषी इत्यादीच्या नावावर महिला उपवास ठेवतात की माता आनंदी होईल म्हणून. ह्या माता कुण्याचं प्रकारे माता नाहीत. हे केवळ ब्राम्हणांचे प्रतिके (दुकानातील वस्तू) आहे आणि ब्राम्हणांच्या कमाईचे माध्यम आहे.

यासाठी आपल्याला केवळ एकच माता मानायला पाहिजे काल्पनिक मतांना पूजल्याने असली मातेचा अपमान होतो. चुकी मातांचीच आहे ज्यांनी स्वतःच नकली मतांना माता आहे म्हणून मुलांना सांगितले. यासाठी असली माता वृद्धाश्रमात राहायला मजबूर आहे. आणी ब्राम्हणांद्वारे निर्मित नकली मातांना शिकले सवरले मूर्खासारखे पूजतात.

पिता:

पित्याचे काही गुण पुत्रात जरूर मिळतात जसे की हात, पाय इत्यादी. पशुंमध्ये पित्याचे एवढे महत्व नाही कारण की पित्याची जबाबदारी जास्त नाही परंतु मानवामध्ये पित्याला मुलांच्या पालन पोषणामध्ये महत्वपूर्ण भूमिका असते पिताच मुलांचे रक्षक आणि त्यांचे शिक्षण, स्वास्थ्य आणि रोजगाराची जबाबदारी निभावतो.

पित्या व्यतिरिक्त राम, कृष्ण, हनुमान, शंकर, साई, इत्यादी कुनीपण जबाबदारी निभावत नाही आणि नाही कधी एक रुपया देऊ शकत. हे सर्व ब्राम्हणाद्वारे निर्मित काल्पनिक दुकानदारीच्या वस्तू आहेत.

यासाठी आपल्याला आपल्या पित्याला सम्मान द्यायला पाहिजे. पित्याची जबाबदारी ही ब्राम्हणाद्वारे निर्मित काल्पनिक आणि विनाकारण भगवाणांसारखी जसे की राम, कृष्ण, शंकर, गणेश, हनुमान, साई इत्यादी आपल्या मुलांनपासून दूर ठेवा. तसेच खऱ्या सामाजिक ज्ञानासाठी तथागत बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीमाई फुले यांच्या विचारांना शिकवा तेव्हाच माता पित्याला खरा सम्मान मिळू शकतो.

बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी बौद्ध धम्म दिक्षा ग्रहण करते वेळी आपल्याला २२ प्रतीज्ञा दिल्या त्या पुढीलप्रमाणे;

२२ प्रतिज्ञा

१. मी ब्रम्हा, विष्णु महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

२. मी राम, कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

३. मी गौरी, गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देव देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

४. देवाने अवतार घेतला, यावर माझा विश्वास नाही.

५. बुद्ध हा विष्णूचा अवतार होय; हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो/मानते.

६. मी श्राद्धपक्ष करणार नाही, पिंडदान करणार नाही.

७. मी बौद्ध धम्माच्या विरुद्ध-विसंगत कोणतेही आचरण करणार नाही.

८. मी कोणतेही क्रियाकर्म ब्राम्हणाच्या हातून करवून घेणार नाही.

९. सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो/ मानते.

१०. मी समता स्थापण्याचा प्रयत्न करीन.

११. मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.

१२. मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.

१३. मी सर्व प्राणीमात्रावर दया करीन व त्यांचे लालन पालन करीन.

१४. मी चोरी करणार नाही.

१५. मी व्यभिचार करणार नाही.

१६. मी खोटे बोलणार नाही.

१७. मी दारू पिणार नाही.

१८. प्रज्ञा, शील आणि करुणा या बुद्ध धम्माच्या तीन तत्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.

१९. मी माझ्या जुन्या मनुष्य मात्राला असमान व निच मानणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग करतो/करते व बौद्ध धम्माचा स्वीकार

करतो/करते.

२०. तोच सद्धम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.

२१. माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो/मानते.

२२. मी इत:पर बुद्धाच्या शिकवणी प्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो/करते.

देशातून जातीयवादाच्या बिमारीला समुळं नष्ट करण्यासाठी आणि आंबेडकरवादी सरकार बनविण्यासाठी आपल्याला आणखी दोन प्रतिज्ञा घेण्याची गरज आहे. त्या पुढीलप्रमाणे;

१. मी कधीपण कुण्याही हिंदू मंदिरात जाणार नाही आणि नाही कधी ब्राम्हण आणि ढोंगी बाबांना दान देणार नाही.

२. मी कधीही कुण्याही पार्टीच्या मनुवादी (हिंदू धर्म मानणाऱ्या) उमेद्वाराला मतदान करणार नाही.

नमो बुध्दाय, जय भिम, जय मूळनिवासी, सर्वांचे मंगल कल्याण होवो, सर्वांची दुःखातून मुक्तता होऊन सर्व सुखी होवोत!!!

🌳🌳🌳 बोधीवृक्ष आणि बोधीवृक्ष नष्ट करणारा ब्राह्मण शशांक राजा. 🌳🌳🌳

ह्यू-एन-त्संगने बोधीवृक्षाला पंचांग प्रणिपात केला. दुःखाश्रू ढाळीत आणि हुंदके देत तो म्हणाला, 'जेव्हा तथागत बुद्धांना अनुत्तर बोधी मिळाली तेव्हा ह्या भवचक्रात मी कोणत्या परिस्थितीत होतो, हे मला माहीत नाही. पण आता ह्या मूर्तीपूजेच्या काळात मी येथे आलो आहे. माझ्या अकुशल कर्माच्या व्याप्तीबद्दल मला आता जाणीव झाली आहे, म्हणून मला दुःख होत आहे.

तो पुढे म्हणतो, अलिकडच्या काळात शशांक या ब्राह्मण राजाने बुद्ध धम्माचे फार नुकसान केले. शशांक राजाची राजधानी कर्णसूवर्ण (बंगाल) होती. द्वेषाने पेटून त्याने विहारांचा नाश केला. बौद्ध भिक्खूंची कत्तल घडवून आणली. तो क्रूर आणि हिंसक होता. बोधिवृक्षाला मुळापासून खणून काढण्यासाठी जमिनीतून पाणी लागेपर्यंत त्याने तेथे खणले. परंतु त्या वृक्षाचा मुळांच्या शेवटपर्यंत तो जाऊ शकला नाही. मग त्या वृक्षाला संपूर्णपणे नष्ट करण्यासाठी त्याने त्या जागेवर उसाचा रस शिंपडला आणि त्याला आग लावली. त्या वृक्षाचा काहीही मागमूस राहू नये अशी त्याची इच्छा होती.

काही महिन्यानंतर जेव्हा मगधाचा राजा पूर्णवर्मा ह्याने ही बातमी ऐकली, तेव्हा त्याला फार दुःख झाले. दिर्घ निश्वास टाकून तो म्हणाला, शहाणपणाचा सूर्य मावळल्यानंतर, बुद्धाचा हा वृक्ष सोडल्यास दुसरे काहीच उरले नाही आणि आता त्यांनी तो सुध्दा नष्ट केला. आध्यात्मिक जीवनाचा आता कोणता आधार राहिला आहे? नंतर त्याने पंचांग प्रणिपात करून एक हजार गाईच्या दुधाने त्या वृक्षाची मुळे धुतली. लवकरच तो वृक्ष दहा फूट उंच झाला. परत तो तोडला जाईल अशी भीती वाटून त्या वृक्षाभोवती त्याने चोवीस फूट उंचीची एक भक्कम भिंत बांधली. त्या वृक्षाच्या भोवती आता वीस फूट उंच भिंत आहे.

शशांक ब्राम्हण राजाने बोधिबृक्षाचा नाश केल्याबर ही मूर्ती फोडण्यासाठी तो तेथे आला होता. पण ह्या मूर्तिचे मैत्रिमय स्वरूप पाहिल्यावर काय करावे ह्याचा तो निश्चय करू शकला नाही. आपल्याबरोबर असलेल्या लोकांसह तो तसाच परत निघाला. वाटेत तो त्याच्या एका अधिकाऱ्याला म्हणाला, 'आपण बुद्धाची मूर्ती काढून टाकून, तेथे महेश्वराची मूर्ती बसविली पाहिजे.' त्या अधिकाऱ्याला अशा तऱ्हेची आज्ञा मिळाल्यावर तो फार घाबरला आणि मनात म्हणाला, 'मी जर बुद्धाची मूर्ती नष्ट केली, तर अनेक कल्पे मला दुःख भोगावे लागेल. आणि राजाच्या आज्ञेचे मी पालन केले नाही तर तो मला हालहाल करून ठार मारील. शिवाय, तो माझ्या कुटुंबाचा नाश करील. मी आज्ञेचे पालन केले तरी आणि नाही केले तरी, कुठल्याही परिस्थितीत मला दुःख भोगावे लागेल.'

विचारांती, बौद्ध धम्मावर विश्वास ठेवणाऱ्या एका माणसाला त्याने मदतीसाठी बोलावून घेतले. त्या माणसाच्या मदतीने त्या अधिकाऱ्याने बुद्धाच्या मूर्तिसमोर विटांची एक भिंत बांधली. बुद्धाची मूर्ती राहिल्यामुळे त्याने तेथे एक दिवा तेवत ठेवला. नंतर त्याने भिंतीवर त्या महेश्वर देवाचे एक चित्र काढले. अशातऱ्हेने काम संपल्यावर त्याने राजाला खबर दिली. ते ऐकल्यावर राजा गर्भागळीत झाला. त्याच्या अंगावर फोड आले आणि त्याचे मास झडू लागले.

नंतर थोड्याच दिवसात तो मेला. शशांक ब्राम्हण राजा मेल्यावर त्या अधिकाऱ्याने बुद्धासमोर बांधलेली ती भिंत पाडली. आत बुद्ध मूर्ती जशीच्या तशी होती. ती मूर्ती इतकी सुंदर आहे की, जणू काही ती एखाद्या अतिमानवी शक्तीने बनविली आहे! ती अंधाऱ्या खोलीत ठेवली आहे. तिथे दिवे आणि मशाली जळत ठेवल्या जातात. पण त्या मूर्तीच्या प्रतिकात्मक पवित्र खुणा पाहण्याच्या असतील, तर त्या खोलीत जाऊन कोणी पाहू शकनार नाही. सकाळच्या वेळी एका मोठ्या आरशाच्या सहाय्याने आत प्रकाश टाकून मूर्तीची ती प्रतिके पाहता येणे शक्य आहे!

या मूळ बोधिवृक्षाची फांदीपासून वाढविलेली बोधिवृक्ष युरोप, आशिया खंडातील अनेक देशांत आहेत.



* 🦚 🦚 🦚 "फाल्गुन पौर्णिमा" 🦚 🦚 🦚 *

बोधीसत्व सिद्धार्थ गौतमाच्या गृहत्यागाला सात वर्षे होऊन गेली. शुद्धोधन राजाला आपल्या मुलाविषयी सविस्तर माहिती अजूनही निट समजली नव्हती. परंतु सिद्धार्थ गौतम सम्यक सम्बुद्ध झाले असून त्यांनी भिक्षु संघाची प्रस्थापना केली. तो संघाचा आणि जगाचाही शास्ता झाला आहे. सध्या सम्यक संबुद्ध बिंबिसार राजाने दान दिलेल्या वेळूवन विहारात रहात आहेत. हि वार्ता शुद्धोधनाला समजली. राजाने एका राजदूताला भगवान बुद्धाकडे त्यांना कपिलवस्तुला घेऊन येण्यासाठी पाठविले. तो भगवान बुद्धाकडे गेला आणि पुन्हा परत आला नाही. तो भिक्षु झाला. राजाने पुन्हा दोन-तीन दूतांना पाठविले. पण ते सुद्धा भिक्षु झाले.

बोधीसत्व सिद्धार्थ गौतमाच्या बालमित्राला राजाने भगवान बुद्धाला निमंत्रण देण्यासाठी पाठविले. कालुदायी राजगृहाला आला तेव्हा भगवान बुद्ध वेळूवनात रहात होते, तेथे तो गेला. परंतु भगवंतांचे प्रवचन ऐकून तोही शिष्य झाला. भिक्षु झाला आणि भगवान बुद्धाला त्यांच्या शिष्यगणांच्या सह कपिलवस्तुला घेऊन आला.

कालुदायीच्या विनंतीला भगवान तथागतांनी मान दिला. शाक्यांनी निर्माण केलेल्या न्यग्रोध विहारात भगवान बुद्ध राहिले. कपिलवस्तुतील जनतेला अनेकवेळा उपदेश केला. एकदा भिक्षा मागत भगवान बुद्ध

शुद्धोदनाच्या वाड्यात गेले. यशोधराने तथागातास पाहून ओळखले आणि राहुलला म्हणाली, "राहुला! तो तेथे बसलेला श्रमण तुझा पिता आहे. त्याच्याकडे जा आणि वारसा हक्क माग!" राहुल धावतच गेला आणि भगवान बुद्धासमोर येवून उभा राहिला. भगवान तथागत आसनावरून उठले आणि न्यग्रोध विहारात गेले. राहुल देखील त्यांच्या मागोमाग गेला आणि बोलू लागला, "बाबा, मला माझा वारसा हक्क द्या! देयभाग द्या!"

भगवंताने सारीपुत्राला बोलावून घेतले आणि सांगितले की, हा राहुलकुमार माझ्याकडे वारसा मागत आहे. तेव्हा तु याला प्रवज्जा देऊन श्रामणेर कर. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी राहुलाला श्रामणेर दीक्षा दिली. भगवंतांनी याच पौर्णिमेच्या दिवशी कपिलवस्तुतील लोकांना शाक्यांना महासमय सुत्ताचा उपदेश केला व तथागातांचा सावत्र भाऊ म्हणजेच महाप्रजापती गौतामिचा पुत्र नंद याला सुद्धा फाल्गुन पौर्णिमेलाच श्रामणेर दीक्षा दिली.

भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर दोन-अडीचशे वर्षांनी सम्राट अशोकाने बौद्ध धम्माला राजधम्म म्हणून घोषित केले आणि सर्व प्रकारच्या प्राण्यांच्या हत्येवर बंदी आणली.

ई. सं. पूर्व १८५ ला पुष्यमित्राने बौद्धांचा राजा बृहद्रथाची हत्या करून शुंग साम्राज्याची स्थापना केली. हि घटना फाल्गुन पौर्णिमेलाच घडली.

भारतीय संस्कृती हि मुळातच नाग संस्कृती होय. या संस्कृतीने पुढे बौद्ध संस्कृतीचे रूप धारण केले. नाग वंशीय साम्राज्याच्या मालिकेत सम्राट अशोकाचे साम्राज्य हे प्रमुख आणि वैभवशाली साम्राज्य म्हणून ओळखले जाते. ते बौद्ध संस्कृतीचे वैभवशाली प्रतिक म्हणून गणले जाते. सम्राट अशोकाच्या (ई. स. पूर्व २७४ ते २३२) साम्राज्यात महाराष्ट्राचा समावेश होत होता. याचा पुरावा सापडतो. सम्राट अशोकाच्या आठव्या आणि नवव्या धम्माज्ञेचे शिलालेख, शिलाखंड ठाणे जिल्ह्यातील सोपारा येथे सापडले आहेत. सोपारा हि मौर्यांची राजधानी होती.

नागपूरच्या भूमीत अशोका विजयादशमीच्या दिवशी १४ ऑक्टोबर, १९५६ ला धम्मदीक्षा समारंभात डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की, भारतात बौद्ध धम्माचा प्रसार जर कोणी केला असेल, तर तो नाग लोकांनी केला. नाग लोक आर्यांचे भयंकर शत्रू हेते. आर्य व अनार्य यांच्यामुळे तुंबळ युद्धे झाली. आर्य लोकांनी नागांना जाळून टाकल्याचे दाखले, पुरावे सापडतात.

फाल्गुन पौर्णिमेला नागवंशीय बौद्धांच्या राजपुरुषांना जिवंत जाळले. आर्यांनी नागवंशीयांचा फार छळ केला. तसेच यज्ञ करून त्यात नागवंशीयांना जिवंत जाळले.

! जय भिम ! !! जय भारत !! !!! नमो बुद्धाय !!!

🦚🦚🦚🌹माघ पौर्णिमा (माघमासो) 🌹🦚🦚🦚

माघ पौर्णिमेचे महत्व

१) पहिली घटना : विहाराचा शोध. २) दुसरी घटना : तथागतांनी केलेली आपल्या महापरिनिर्वाणाची घोषणा. ३) तिसरी घटना : तथागतांच्या भिक्षा पात्रांची भेट. ४) चौथी घटना : आनंद श्रमणाचे परिनिर्वाण.

माघ पौर्णिमेच्या आपणा सर्वांना मंगलमय सदिच्छा. नमो बुद्धाय! जय भिम!! 💐💐💐

🔘 *माघ पौर्णिमा (माघमासो)*

====================

आज शनिवार दिनांक २७ *फेब्रुवारी २०२१ रोजी माघ* *पौर्णिमा आहे.* *त्या निमित्ताने-*

* 🌕 माघ पौर्णिमेचे महत्व-*

तथागत भगवान बुद्धांची महापरिनिर्वाणाची घोषणा-

बौद्ध धम्मात माघ पौर्णिमा ही *तथागतांच्या* *महापरिनिर्वाणाच्या घोषणेकरिता माघमासो* प्रसिद्ध आहे. भगवान बुद्ध आपल्या धम्माचा उपदेश करीत ४५ वर्षे पायी फिरत होते. त्यांचे वय ८० वर्षे झाले होते. अशा वेळी त्यांचा मुक्काम वैशाली नगरीत होता. वैशाली नगरी हे महाविराचे जन्मस्थान आहे. परंतु भगवान बुद्धांनी वैशालीच्या जनतेची हृदये जिंकली होती. भगवान बुद्धांचा संघ आणि स्वतः तथागत चापल चैत्य विहारात विश्रांती घेत होते. एक दिवस तथागतांनी अग्रेसर सेवक आनंद याला जवळ बोलावले आणि सारंद्रय चैत्य विहारात चालण्यास सांगितले. भंते आनंद यांनी सर्व भिक्षूंना तथागतांचा आदेश सांगितला. त्याप्रमाणे सर्व भिक्षू संघासहित सारंद्रय चैत्य विहारात आले. भिक्षू संघ विहारात बसले असता भंते आनंद तथागतांना विनंती करतात की, संघासाठी आपण उपदेश करावा. तथागत सर्व भिक्षूंना म्हणाले, 'मी येत्या ३ महिन्यांनी देहत्याग करणार आहे. येत्या वैशाखी पौर्णिमेला माझे परिनिर्वाण होणार आहे.' त्या दिवशी माघ पौर्णिमा होती. तथागत म्हणतात, 'मी दिलेल्या शिकवणुकीनुसार आपण धम्म प्रसार करावा. लोकांना उपदेश करावा. यापुढे धम्मच तुमचा मार्गदाता राहणार आहे.' भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाण घोषणेमुळे माघ पौर्णिमा ही महापरिनिर्वाण घोषणा दिन म्हणून प्रसिद्ध आहे. याला "पुण्यस्मरण" असे म्हणतात.* *या* *माघ पौर्णिमेला बुद्ध विहारात* *सर्व उपासक-* *उपासिका जमतात.

वंदना* *सूत्रपठण, पूजापाठ करतात धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात येते. संपूर्ण जगात ही पौर्णिमा मंगल दिन* *म्हणून* *पाळली जाते. असे या माघ* *पौर्णिमेचे महत्त्व आहे.*

॥ भवतु सब्ब मंगलं ॥ *सर्वांचे मंगल होवो!*

माघ पौर्णिमेच्या मंगलमय *शुभेच्छा!**

🌷 🍀 🌷 🍀 🌸 🍀 🌺 🍀

* 🦚 🦚 "माघ पौर्णिमा" 🦚 🦚 *

बौद्ध धम्मात माघ पौर्णिमा हि तथागतांच्या महापारीनिर्वानाच्या घोषणेकरिता प्रसिद्ध आहे.

भगवान तथागतांनी ऐंशीव्या (८०) वर्षात पदार्पण केले. शरीर थकले आणि क्षीण झाले. भगवान आपल्या अंतिम प्रवासाला निघाले. त्यावेळी ते राजगृहाच्या गृधकुट पर्वतावर रहात होते. भगवंतांचा शेवटचा प्रवास तेथूनच सुरु झाला. आनंदाला घेऊन ते भिक्खू संघासोबत अम्बलीठ्ठीकेला गेले. थोड्याच अवधीमध्ये भगवंत नालंदा येथे गेले. नालंदाहून मगध देशाच्या राजधानीमध्ये पाटलीग्राम येथे ते गेले. पाटलिहून कोटी येथे गेले आणि पुढे नादिका या ठिकाणी भगवंत गेले. या प्रत्येक गावामध्ये काही दिवस थांबून भगवान तथागतांनी प्रवचने दिली.

नादीकेहून भगवंत वैशालीला गेले. वैशालीला दुष्काळ पडला होता. त्या कालखंडात वैशालीच्या लोकांनी भगवान तथागातास निमंत्रण दिले. त्यांचे निमंत्रण स्वीकारून भगवंत नगरात आले. योगायोग असा कि, नैसर्गिक वातावरणात ढगाळ परिस्थिती निर्माण झाली आणि पाऊस सुरु झाला व दुष्काळ संपला.

वैशालीच्या जनतेने भगवान तथागतांचे अतिशय भव्य स्वागत केले. नंतर भगवंत वर्षावासाकरिता वेळूवनात गेले आणि इतर भिक्षुंना वैशालीतच वर्षावासासाठी राहण्यास सांगितले.

वर्षावासानंतर भगवंत पुन्हा वैशालीला आले. माघ पौर्णिमेच्या दिवशी येथील सर्व भिक्षुंना सारंद्रय चैत्यगृहात एकत्र केले आणि आनंदाला सर्वांच्या समोर संबोधित केलेलं कि, आनंद! भगवान तथागताने आतापर्यंत मानवाच्या दुःखमुक्तीचे संपूर्ण ज्ञान दिलेले आहे. तथागातांचे शरीर थकले आहे. आनंद! आजपासून तीन महिन्यांनी तथागतांचे महापरिनिर्वाण होणार आहे. हि आयु विसर्जनाची घोषणा भगवंताने केली.

भगवान कुटागार शाळेमध्ये रहात असतांना वैशालीच्या जवळपास असणाऱ्या सर्व भिक्षुंना एकत्रित केले. त्यांना तथागतांनी आपली शेवटची धम्मदेसना दिली. भगवंत म्हणाले, मी बोधीपक्षीय धम्माचा उपदेश दिलेला आहे. तो भिक्षुंनो उत्तमप्रकारे ग्रहण करा. त्यावर चिंतन, मनन करा. भावना करा. जेणे करून हे आपले लाभलेले जीवन पवित्र व मंगल होईल. त्यामुळे आपले कल्याण होईल आणि परमसुखाचा लाभ होईल.

या माघ पौर्णिमेला बुद्धविहारात सर्व उपासक/उपासिका जमतात. वंदना सूत्र पठण, पूजापाठ करतात. धम्मप्रवचनाचे आयोजन करतात. संपूर्ण जगात हि पौर्णिमा मंगल दिन म्हणून पाळली जाते. असे या माघ पौर्णिमेचे महत्व आहे.

सर्व बौद्ध उपासक/उपसिकांना पौर्णिमेच्या मंगलमय शुभेच्छा.... सर्वांचे मंगल होवो, कल्याण होवो...

! जय भीम ! !! जय भारत !! !!! नमो बुद्धाय !!!

🦚 🦚 🦚 संघाला दिलेले दान महान फलदाई 🦚 🦚 🦚

एके समई भगवान बुद्ध सम्यक संबुद्ध होऊन, कपिलवस्तू नगरीला आले होते. त्यांचा निवास न्यूग्रोधारामामधे होता. महाप्रजापती गौतमीने आपल्या स्वहाताने सुतकातून दोन नवीन शाली विनल्या. त्या घेऊन ती भगवान बुद्धाकडे गेली. भगवंताला अभिवादन करून बाजूला बसली. भगवंताची जिज्ञासूपणे कुशलतेविषयी वियाचारपूस केली. 'कुशलक्षम' विचारले आणि म्हणाली, "भगवान! या दुशाली जोडीला मी स्वतः सुतकातून विणले आहे. तन-मन-धनपूर्वक विणले आहे. या शाली आपणास समर्पण करित आहे. स्विकार करावा." तथागत दुशालीकडे पाहत म्हणाले, "महाप्रजापती गौतमी! आपण या शाली भिक्खू संघास अर्पण करावयात. संघाला जे दान मिळते ते मलाही मिळते. मला देण्यापेक्षा संघास दिल्यास महान पुण्य मिळेल. यामुळे संघ पूजीत होईल आणि मी सुद्धा." "तथागत! आपण याचा स्विकार करावा." महाप्रजापतीने आग्रह केला.

"गौतमी या शाली संघास द्याव्या." तथागत. "भंते! मी आपणासाठी बनविल्या आहेत, संघांसाठी नाहीत." महाप्रजापती. "गौतमी! संघास दे." तथागत. गौतमीने तीन वेळा दुशाली स्वीकारण्याविषयी तथागतास विनंती केली, तथागताने तीनही वेळा संघास देण्यास सांगितले. परंतु आनंद भगवंताजवळ बसलेला होता. तो भगवंतास म्हणाला, "महाप्रजापती गौतमीने आणलेल्या शाली भगवंतांनी स्वीकाराव्यात." भगवान बुद्धाने आनंदाकडे पाहिले. "भंते! गौतमी आपली क्षीरदाई होती. पोषिका आहे. दूध पाजणारी आई आहे. मावशी आहे. आपणावर परोपकार करणारी आहे. आपल्यामुळे ती आहे. मिथ्याचारापासून अलिप्त. असत्य वाचेपासून मुक्त झाली आहे. प्रमादापासुन अलिप्त झाली आहे." आनंद.

भगवंतांनी आपल्या आईकडे (मावशी) पाहिले. "भंते! आपल्यामुळे ती श्रद्धामय झाली आहे. तिला धम्माची ओढ लागली आहे. संघामधे श्रद्धेने प्रसिद्ध पावली आहे. आर्यकांत, शिलयुक्त झाली आहे. श्रेष्ठ कुळात शिलसंपन्न झाली आहे." आनंद. "आनंद, व्यक्तिगत दानापेक्षा संघाला दान दिल्याने महान फलदाई होते. लाभते." भगवान बुद्ध आनंदाला म्हणाले. "का बरे भंते?" आनंदाचा उत्सुक प्रश्न. पुण्य. "आनंद! संघाची ती प्रधानता आहे." तथागत. "भगवान! यावर आपण सविस्तर सांगावे." "आनंद! चार प्रकारचे दान परिशुद्ध असते." तथागत. "कोणत्या प्रकारचे?" आनंदाचा प्रश्न. "आनंद! दान दिल्याने दांनदात्याची परिशुद्धी होते, दान घेणाऱ्याची नाही. काही दानाने दान घेणाऱ्याकडूनही परिशुद्धी होते, दानदात्याकडून नाही. काही दान दायकाकडून परिशुद्धी होत नाही आणि दान घेणाऱ्याकडून परिशुद्धी होत नाही. दान देणारा शिलवान आणि कल्याणकारी धम्मात निपुण व पुण्यवान असेल तर त्याचे दान परिशुद्ध होइल. दान घेणारा दुशील वर्तनाचा अधम्मी असेल तर त्याचे दान परिशुद्ध होत नाही. आनंद, दान दायकाकडून परिशुद्धी होत असते, दान स्वीकारणाऱ्याकडून नाही." तथागत. "कशाप्रकारे दान दिल्याने दांन दात्याची शुद्धी होत नाही किंवा दान स्वीकारणाऱ्याची होत नाही." आनंद. "जेव्हा दांनदाता दुशील, अधम्मी असेल, त्याच प्रमाणे दान घेणारा भिक्खुही दूराचारी, अधम्मी असेल तेव्हा दान परिषुद्धी होत नाही." तथागत. "कशाप्रकारे दांनदात्याची परिषुद्धी होते आणि दान घेणाऱ्याचीही होते." आनंद. "दांनदाता शिलवान, कल्याण धम्मामधे निपुण असतो आणि दान घेणारा भिक्खुही शिलवान कल्याण धम्मामधे कुशल असतो, तेव्हा दान हे परिशुद्ध होते. या चारप्रकारे दानाची परिशुद्धी आहे. संघ माझा औरस पुत्र आहे. संघाला दिलेले दान महान फलदाई आहे. कल्याणकारी आहे. दानाने दुःखातून मुक्ती मिळते." तथागत पुढे म्हणाले, "ही दुशाल जोडी मला न देण्यापेक्षा संघाला देणे श्रेयस्कर आहे." आनंद आणि महाप्रजापती गौतमी भगवान बुद्धाचे कथन ऐकून प्रसन्न झाले.

🦚🦚🦚 बुद्ध धम्मग्रंथ त्रिपिटक साहित्य परिचय:

"त्रिपिटक" हे बुद्ध धम्माचे साहित्य आहे, ज्याचे तीन मुख्य भाग आहेत.

१. सुत्त पिटक, २. विनय पिटक, ३. अभिधम्म पिटक

या तिन्ही पिटकांमध्ये अनेक ग्रंथ आहेत.

त्याच्या माहितीसाठी तपशील देणे आवश्यक आहे जेणेकरून धम्मात प्रवेश करणाऱ्या नवीन उपासकांना आणि उपासिकांना योग्य माहिती मिळू शकेल.

🧐 सुत्त पिटक:

सुत्त पिटकांतर्गत ५ ग्रंथ आहेत-

१. दीघनिकाय, २. मज्झिम निकाय, ३. संयुत्त निकाय, ४. अंगुत्तर निकाय, ५. खुद्दक निकाय

😳 खुद्दक निकाय:

खुद्दक निकाय अंतर्गत १५ ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत.

१. खुद्दकपाठ, २. धम्मपद, ३. उदान, ४. इतिवुत्तक, ५. सुत्तनिपात, ६. विमानवत्थु, ७. पेतवत्थु, ८. थेरगाथा, ९. थेरीगाथा, १०. जातक, ११. निद्देस, १२. पटिसम्भिदामग्ग, १३. अपदान, १४. बुद्धवंश, १५. चरियापिटक

😳 विनय पिटक:

विनय पिटकांतर्गत ५ ग्रंथ आहेत.

१. महावग्ग, २. चुल्लवग्ग, ३. पाचित्तिय, ४. पाराजिक, ५. परिवार

😳 अभिधम्म पिटक:

अभिधम्म पिटकांतर्गत सात ग्रंथ आहेत.

१. धम्मसंगिणी, २. विभंग, ३. धातुकथा, ४. पुग्गलपञ्ञति, ५. कथावत्थु, ६. यमक, ७. पट्ठान

हे सर्व साहित्य वाचणे, समजून घेणे आणि त्यांचे पालन करणे ही साधी गोष्ट नाही. परंतु तुमच्याकडून शक्य तितक्या महत्त्वाच्या शिकवणी घेणे फायदेशीर आहे.

"त्रिपिटकमध्ये बुद्ध आणि त्यांच्या प्रमुख बौद्ध भिक्खूंच्या शिकवणी आहेत.

__ भंतेजी पय्याकिर्ती साभार

🦚🦚🦚 इतिहासाची दिवाळखोरी-काल्पनिक चाणक्य 🦚🦚🦚

शालेय किंवा विद्यापीठीय स्तरावर अनेक वेळा आपण वाचले असेल की धनानंद राजाने केलेल्या अपमानाचा बदला म्हणून चाणक्य नावाच्या ब्राह्मणाने चंद्रगुप्त मोरियाला योग्य ते शिक्षण देऊन, त्याला राज्य स्थापन करून दिले. म्हणजेच चाणक्य हा चंद्रगुप्त मोरियाचा गुरू होता!

पुढे असेही लिहिले आहे की चाणक्यामुळे मोरियांची सत्ता वाढली आणि चंद्रगुप्त मोरिय एक दिग्विजयी राजा झाले. अशीही मान्यता आहे की चाणक्य हा सम्राट अशोकांचा देखील गुरू होता!

भारतात आमच्या शिवाय इतर कुठलीही संस्कृती श्रेष्ठ नसून, आम्हीच इथले करते धरते आहोत असा समज इथल्या काही लोकांचा आहे! त्यामुळे इतर संस्कृतीतील अनेक संदर्भ "ह्यांनी" हवे तसे बदलले आणि लिहिले देखील. त्याच बरोबर अनेक शतकांचा प्रचार केल्यामुळे लोकांच्या मनात हे "श्रेष्ठत्वाचे" चित्र रंगविले गेले आहे.

वर्तमान काळात नवीन संशोधन होत असल्यामुळे, या लोकांनी स्वतःच्या काल्पनिक नायकांचे अथवा संस्कृतीचे ओढून ताणून जे श्रेष्ठत्व दाखविले होते, त्यांचे पितळ आता उघडे पडत आहे!

चाणक्य बद्दल जी काही माहिती मिळते ती त्याने लिहिलेली तथाकथित "अर्थशास्त्र", "चाणक्य नीती" हे ग्रंथ, ११ व्या शतकात हेमचंद्र याने लिहिलेला "स्थाविरावली चरित्र" ग्रंथ, विशाखादत्तने ८ व्या शतकात लिहिलेले "मुद्राराक्षस नाटक" आणि "महावंस" मधील एक पुसटसा संदर्भ.

आता खरा प्रकार पाहू यात-

असे सांगितले जाते की चाणक्याने जेव्हा चंद्रगुप्तला शिकवायला सुरुवात केली तेव्हा चाणक्य जवळपास ४० वर्षाचा होता तर चंद्रगुप्त ११ वर्षांचा. पुढे असेही सांगितले जाते की राजकुमार अशोक १४-१५ वर्षाचा असताना, चाणक्याचे निधन झाले. आता जर आपण चाणक्य, चंद्रगुप्त, बिंदूसार आणि अशोक यांच्या वयाचे calculation गणना केली तर लक्षात येईल की, चाण्यक्य वयाच्या १७५ किंवा २०६ व्या वर्षी मरण पावला! जगातल्या इतर कुणीच प्राचीन प्रवासी किंवा इतिहासकाराने या दीर्घायू व्यक्तीची दखलं घेऊ नये? किती हा द्वेष ना! मुळात एखादी व्यक्ती एवढ्या वर्षांचे आयुष्य जगली असेल याचा ना कुठला पुरावा ना कुठला दस्तएवज!

ग्रीक इतिहास्कार मेगेस्थिनीसने भारतातील अनेक आचार्य, राजे, तत्वज्ञानी, मंत्री यांच्याबद्दल लिहिले आहे. मेगेस्थिनीसने चंद्रगुप्त मोरियांच्या पटलीपुत्राचे वर्णन केले आहे, मोरिय सेनेचे, त्यांच्या प्रशासणाचे वर्णन केले आहे, संपूर्ण भारताचे वर्णन केले आहे, मात्र चाण्यक्याबद्दल एक चुकार शब्द देखील नाही! जर चाण्यक्य एवढे मोठे व्यक्तिमत्व होते तर त्यांचा साधा उल्लेख नाही?

समजा क्षणभर चाण्यक्याचे अस्तित्व मान्य केले तर त्याच्या संभाषणाची भाषा काय असेल? त्याच्या तथाकथित लिखाणावरून तो संस्कृतमध्ये बोलत असावा असे वाटते, पण चादरगुप्तांच्या काळात तर पाली प्राकृत भाषा सर्वदूर प्रचलित होती! संस्कृत भाषा तर त्या काळात तयार पण झाली नव्हती, मग या दोघांचा संवाद कोणत्या भाषेत होत असेल?

वर नमूद केलेले ग्रंथ पाहुयात- अर्थशास्त्र आणि चाण्यक्यनीती हे ग्रंथ आर्थिक आणि राजकीय किंवा शासकीय पद्धतीचे काही विचारांचे संकलणं आहे, मात्र हे चाण्यक्याने लिहिले आहे याचा कुठलाही लिखित अथवा ऐतिहासिक पुरावा मिळत नाही.

काही अभ्यासकांच्या मते, अर्थाशास्त्र ग्रंथ हा विष्णुगुप्तने लिहिला असावा कारण काही भागांच्या शेवटी लेखक म्हणून ते नाव आले आहे! तर काहीजण म्हणतात की, लेखक विष्णुगुप्त असून त्यांचे गोत्र चाण्यक्य होते! म्हणजे लेखकाने जरी फक्त विष्णुगुप्त असे स्वतःचे नाव लिहिले असले तरी त्यांचे गोत्र चाणक्य होते असा ह्यांच्या जावायाचा शोध आहे! कारण ओढून ताडून चाणक्याचे नाव यायला हवे!

मुद्राराक्षस हे नाटक ८ व्या शतकात लिहिले गेले आहे. या नाटकात इतिहास कमी आणि काल्पनिकता भरपूर आहे त्यामुळे यातील प्रसंग कुठल्याही अर्थाने ऐतिहासिक म्हणता येणार नाहीत.

स्थाविरावलीचरित्र हे काव्य हेमचंद्रानी ११ व्या शतकात जैनांच्या इतिहासासाठी लिहिले मात्र त्यात चंद्रगुप्ताचा पुसटसा उल्लेख येतो आणि चाणक्य हा त्यांचा समकालीन होता असे लिहिले आहे.

आता ऐतिहासिक संदर्भ पाहुयात-

चंद्रगुप्त मोरिय आणि विष्णुगुप्त मोरिय हे दोघे सक्खे भाऊ होते. चंद्रगुप्त हा अतिशय महत्वाकांक्षी व शूर योद्धा होता तर त्याचा भाऊ, विष्णुगुप्त हा कणखर प्रशासक व दूरदृष्टीचा होता. राज्य चालविण्यासाठी दोघांचे गुण एकमेकांना पूरक होते. या दोघांनी मिळून धनानंदचा पराभव केला आणि राज्य स्थापन केले. नंतर राज्याचा विस्तार वाढवत एक अखंड भारत राज्य स्थापन केले! याचे एक महत्वाचे प्रमाण म्हणजे सम्राट अशोकांचे पुत्र, बौद्ध आचार्य महेंद्र यांनी श्रीलंकेत असतांना (इ. स. पू. ३ रे शतक) लिहिलेली "उत्तर विरहट्ट" ही कथा. या कथेचे भाषांतर आयु. सिद्धार्थ वर्धन सिंह यांनी केले आहे.

या कथेमध्ये पाली भाषेमध्ये चंद्रगुप्त व विष्णुगुप्त मोरिय यांचे वर्णन करतांना म्हटले आहे-

"आदिच्चा नाम गोतेन साकिया नाम जातिया मोरियानं खातियानं वंसजातं सिरिधरं चंद्रगुप्तो ति पज्जातं विन्हूंगुप्तो ति भातुको ततो"

अर्थ: सूर्यासारख्या तेजस्वी घराण्याचा, शाक्य गणात जन्मलेल्या, मोरिय वंशाच्या क्षेत्र रक्षकांमधील सिरी चंद्रगुप्त आणि त्यांचा भाऊ विष्णुगुप्त हे प्रज्ञासंपन्न होते.

जेव्हा ही कथा भारतामध्ये, १० व्या शतकात, संस्कृत भाषेमध्ये भाषांतरीत करण्यात आली त्यावेळेस हे पद कसे लिहिण्यात आले ते पह-

"मोरियानं खतियानं वंशे जातम सिरिधरं चंद्रगुप्तो ति पज्जातं चाणक्यो बाम्हणो ततो"

म्हणजे पाली भाषेमधून संस्कृत भाषेमध्ये भाषांतर करत असतांना मोठ्या चलाखीने विष्णुगुप्तच्या ऐवजी चाणक्य ब्राम्हण हे नाव घालण्यात आले आणि आता त्याचा अर्थ असा करण्यात आला की, मोरिय वंशाने जरी राज्य स्थापित केले असले तरी त्यामागे प्रज्ञासंपन्न चाणक्य ब्राम्हणाचा हात होता!

म्हणजेच चादरगुप्त मोरिय याचा शुरपणा आणि त्याचे बंधू विष्णुगुप्त यांचे कर्तृत्व शून्य आणि सगळा विचार किंवा डोकं हे फक्त ब्राम्हण चाणक्याचेच! हेच ते ऐतिहासिक तथ्यांचे रूपांतरण! हिच ति सांस्कृतिक दिवाळखोरी! आपल्याला हवं तेवढेच बदलून त्याचा जोरदार प्रचार करायचा.....

जेव्हा नंतर चाणक्याच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले तेव्हा मग असे म्हणण्यात येऊ लागले की, विष्णुगुप्तचेच नाव चाणक्य अथवा कौटील्य होते! आणि हे नाव त्याला त्याच्या गोत्रावरून पडले! पण त्याला पुरावा काय?

जर विष्णुगुप्त आणी चंद्रगुप्त हे सक्खे भाऊ होते आणि ते प्रज्ञावान व शूर होते असा त्यांचा पणतु म्हणजे आचार्य महिंद्र स्वतः लिहित असेल, तर तो इतिहास बदलणारे "हे" कोण?

याचे कारण स्पष्ट आहे- मोरिय वंश म्हणजे चंद्रगुप्त मोरिय ज्यांनी अखंड भारताचे राज्य स्थापन केले, त्यांना हे श्रेय न देता, एका ब्राम्हणाला द्यायचे होते. आणि म्हणूनच, "काल्पनिक चाणक्य ब्राम्हण" निर्माण करण्यात आला! मात्र जेव्हा चाणक्याचे अस्तित्वं धोक्यात येऊ लागले, तेव्हा लगेच विष्णुगुप्तच्या नावाच्या मागे साळसुदपणे चाणक्य किंवा कौटील्य लावले आणि ते त्यांचे गोत्र होते असे सांगितले!

जर चंद्रगुप्त मोरियांचे गोत्र खरोखरच चाणक्य किंवा कौटील्य असते, तर आचार्य महिंद्र यांनी तसे नमूद केले नसते का?

हिच आहे त्यांची सांस्कृतिक दिवाळखोरी... ऐतिहासिक पुराव्यांची मोडतोड करून स्वतःच्या श्रेष्ठत्वाचा टेंबा मिरविण्याचा... असाच प्रकार या तथाकथित इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काल्पनिक गुरु विषयी लिहितांना केला होता!

म्हणूनच खऱ्या संस्कृतीचा अभ्यास, संशोधन, लिखान आणि प्रचार महत्वाचा आहे...

अतुल मुरलीधर भोसेकर.

💐 🦚 🦚 🦚 बौद्ध धम्म हाच खरा सणातन धम्म आहे बौद्ध धम्माच्या प्रतिक्रियेतच अन्य धर्मांची निर्मिती झाली! 🦚 🦚 🦚 💐

बौद्ध धम्म हाच खरा सणातन धम्म आहे बौद्ध धम्माच्या प्रतिक्रियेतच अन्य धर्मांची निर्मिती झालेलि आहे!

तथागत बुद्धांच्या वेळी वैदिक नावाचा कोणताही धर्म अस्तित्वात नव्हता, तथागत बुद्धांच्या नंतर ब्राम्हण साहित्यकारांनी ब्राम्हण संप्रदाय अथवा ब्राम्हणी पंथालाच वैदिक धर्माचे नाव दिले आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार, बोधिसत्व, महामानव बाबासाहेब डॉ. भीमरावं रामजी आंबेडकर यांनी संपूर्ण भारताच्या इतिहासाची व्याख्या केवळ एका शब्दात केली आहे, त्या संदर्भात बाबासाहेब म्हणतात की, "भारताचा इतिहास हा आणखी काही नाही, केवळ बौद धम्म तसेच ब्राम्हणवाद यांच्यामध्ये चालणाऱ्या संघर्षाचा इतिहास आहे."

तथागत बुद्धांच्या वेळेपासूनच हे ब्राम्हण लोक आपले वेगळे अस्तित्वं बनवून राहत होते, यासाठी इतिहासात ब्राम्हणी पंथ तसेच ब्राम्हणी संप्रदायचे वेगळे उल्लेख मिळत आहेत. तथागत बुद्ध आणि चक्रवर्ती सम्राट अशोकाच्या शासनकाळाच्या मधे या देशात श्रमण संस्कृती अस्तित्वात होती, श्रमण संस्कृतीच्या विरुद्ध ब्राम्हणी संस्कृतीची आपापसात लढाई चालली होती, त्याच लढाईला ब्राम्हण साहित्यकारांनी अत्यंत चालाकीने, सफाईने वैदिक संस्कृती आणि श्रमण संस्कृतीची लढाई असे म्हटले आहे.

तथागत बुद्धांच्या काळात अखंड जंबूद्विपात एक पण धर्म अस्तित्वात नव्हता, तथागत बुद्धांनीच सर्वप्रथम मानवाच्या कल्याणासाठी धम्माची स्थापना केली आहे. धम्माचीच नकलं धर्म आहे, ब्राम्हणी संस्कृती तसेच ब्राम्हणांचा इतिहास बौद्ध साहित्य/बौद्ध पात्र यांना चोरून, त्यांची नकलं करून बनविले आहे, यासाठी ब्राम्हण जे म्हणतात की, वैदिक धर्म हा अत्यंत जुना (पुरातन) आहे, यामधे काही ऐतिहासिक तत्थ्य उपलब्ध नाही. ब्राम्हण लोक बुद्धाशी प्रतिवाद करायला घाबरत होते, कारण बुद्ध हे स्वतः महाज्ञांनी होते, बुद्धांनी ब्राम्हण लोकांना खूप वेळ पराजित केले होते, ज्याच्या ऐतिहासिक साक्षी (पुरावे) आजपण मिळत आहेत.

☸️☸️🦚🌷 संघ आणि त्याची संघटना 🌷🦚☸️☸️

🔷 भगवंताच्या अनुयायांची दोन वर्गात विभागणी होत असे भिक्खू आणि गृहस्थ अथवा उपासक.

🔷 संघ ही भिक्खूची संघटना उपासकांची संघटना नव्हती.

🔷 बौद्ध भिक्खू हा मुख्यतः परिव्राजक असे परिव्राजक ही संस्था बौद्ध भिक्खूच्या संस्थेहून जुनी आहे.

🔷 प्राचीन परिव्राजक म्हणजे कौटुंबिक जीवनाचा त्याग करून इतस्ततः परिभ्रमण करणाऱ्या लोकांचा समुदाय.

🔷 आचार्य आणि दार्शनिक यांच्या साहचर्यात यावी त्यांची प्रवचने ऐकावी आणि नितीशास्त्र तत्त्वज्ञान सृष्टी गूढवाद इत्यादी विषयांवर त्यांच्याशी चर्चा करावी जेणेकरून सत्य ज्ञान मिळवावे हा त्यांच्या परिभ्रमणाचा हेतू असे.

🔷 काही प्राचीन परिवाजरक दुसरा गुरू मिळेपर्यंत एका गुरूपाशी राहात तर काही कोणालाही गुरू न मानता एकटेच राहत असत.

🔷 ह्या प्राचीन परिव्राजकांच्या वर्गात स्त्री परिव्राजकही असत त्या कधी पुरुष परिव्राजका बरोबर राहात तर कधी स्वतंत्रपणे राहात.

🔷 ह्या प्राचीन परिव्राजकांच्या संघ नसे वर्तनाचे नियम नसत ज्या ध्येयासाठी झटायचे असे ध्येयही त्यांच्या समोर नसायचे.

🔷 भगवंतांनीच प्रथम आपल्या अनुयायांचा संघ अथवा भ्रातृभावाने एकत्र आलेल्या समुदाय बनविला आणि त्यांच्या वर्तनुकीचे नियम आणि त्यांच्या ज्या ध्येयाची साधना करून ते प्राप्त करून घ्यायचे जे त्यांच्या पुढेही ठेविले.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 बाबासाहेबांचा ड्रेसिंग सेन्स.....

परदेशात शिक्षण आणि तिथल्या समाजाच्या राहणीमानाचा बाबासाहेबांवर चांगला प्रभाव होताच, पण बाबासाहेब मुळातच विद्वान आणि बारकावे टिपणारे व्यक्ती असल्याने त्याकाळचे इतर नेते आणि बाबासाहेब यांच्यातला फरक तुम्हाला नक्कीच कळेल. त्यावेळी भारतात काही मोजके लोक जगभरातली ट्रेंडींग फॅशन किंवा कपड्यांच्या बद्दल खास जागरूक असत त्यात मुख्यत्वे बॅ. जिना, बाबासाहेब, नेहरू ही मंडळी होती त्यात सुटिंग बद्दल जिना आणि बाबासाहेब वेगळे वाटायचे...

तर फक्त उंची कपडे घातले झालं असं नसतं पाश्चिमात्य देशात ड्रेसिंग बद्दल काही एटीकेट्स आहेत. आपल्याकडे आज ही उच्चशिक्षित लोकांना हा बेसिक नियम समजत नाही. तुम्ही ब्रिटनच्या रॉयल फॅमिलीचे फंक्शन बघितले असतील किंवा हॉलिवूडचे अवॉर्डस पाहिले असतील. त्यात तुम्ही एक गोष्ट कॉमन पहाल ती म्हणजे ड्रेस कोड सूट असतात पण त्यात त्याच्या सोबत काही प्रथाही आहेत.

म्हणजे सूट घालून बसताना कधीच बटन्स लावायचे नसतात. बसताना बटन ओपन. तुम्ही उभे राहिल्यावर बटन लावायचे जेम्स बॉण्ड बघा कसा उभा राहिला की आधी कोटाचे बटन लावतो.. बाबासाहेब त्याकाळी हे सगळे बारकावे जाणून होते. ते अनेक फोटोत बघा बसताना त्यांच्या सुट्स चे बटन ओपन आहेत.

ह्यात पण बाबासाहेबांचा आजून एक अँगल पाहायला मिळतो, तो म्हणजे बाबासाहेबांना पेहरवाच्या बद्दल बारकावे माहीत असून पण त्यांनी त्यावरून इतरांना कधी दुखावले नाही. किंवा तुम्ही चुकीच्या पद्धतीने

ड्रेसिंग करता असे हिनवले नाही. उलट त्यांच्या सोबत आपण वेगळे वाटू नये म्हणून ते स्वतः कधी कधी बसताना कोटाचे बटन लावत. हे कसे तर तुम्ही बाबासाहेबांचे त्यांचे वैयक्तिक किंवा इतर भेटीच्या ठिकाणचे फोटो पहा त्यात ते बसतांना कधीच कोटाचे बटन लावणार नाहीत, पण जेव्हा सरकारी कामकाजाचे फोटो असेल तेव्हा ते कोटाचे बटन लावतात. कारण बाकीच्या इतर लोकांनी फोटोसाठी कोटाची सगळी बटनणे लावलेली असत...

बाबासाहेब जे सुट घालत असत त्यात सुरुवातीला "युनिव्हर्सिटी स्टाईल" सुट असत. नंतर "डबल ब्रेस्टेड" (ह्यामध्ये सुटला दोन्ही साईड बटन असत.) आपण ज्याला थ्री पीस म्हणतो त्याला खरं तर "बेल व्हेटेड वेस्ट" असं नाव आहे. ज्या कोटवर बाबासाहेब एक कॅप घालायचे, स्टिक हातात घ्यायचे तो "हेरिंगबोन कोट" त्या काळात भारतात स्ट्रिप (लाईन वाली पॅन्ट) कोण घालत नसे पण तो फॅशन मधील नवीन ट्रेंड होता असा बाबासाहेबांचा फोटो आहे. त्यात वरती प्लेन कोट आहे पण पॅन्ट वर लायनिंग आहेत. जॅकेट प्रकारातील कोटसुद्धा बाबासाहेब घालत ते ओपन असतात. ते व्हाईट किंवा ऑफ व्हाईट कलरचे कोट तुम्ही पाहू शकता...

बाबासाहेब एवढे वेल ड्रेस असायचे की तुम्ही विचार करू शकत नाहीत. त्यांची टाय कधीच कॉलरच्या खाली तुम्हाला लूज दिसणार नाही. कट टू कट एकदम गळ्याला स्पर्शनारी टाय असणार. तुम्ही बाबासाहेबांच्या अनेक फोटोंना झूम करून बघा त्यांची टाय जिथून चालू होते बो असतो त्याच्या खालचा भाग हा आत गेलेला दिसेल (खड्डा पडलेला) नंतर वर उठलेला भाग दिसेल. टाय नोटिंगच्या ह्या प्रकाराला "विंडसर" किंवा "केल्व्हीन" म्हणतात. तसेच ते फोर इन हँड प्रकारची टायसुद्धा घालत. ड्रेसिंग बद्दल एवढे लहान लहान बारकावे बाबासाहेबांनी आत्मसाद केले होते...

आजच्या जगात कपड्यावरून माणसाची किंमत केली जाते हे सत्य आहे. बाबासाहेबांनी त्या काळी उंची कपडे घालून "हम किसीसे कम नाही." कदाचित असाच संदेश दिला असेल. आज मागासवर्गीय समाजातील अनेक लोक अशाच पद्धतीने सुटाबुटात उंची कपडे घालून बाबरतात हे सगळं बाबासाहेबांची देण आहे. तुमचे पैसे, तुमचे स्टेट्स, शान, मजबूती यात तुमचं काहीच नाही. हे सगळं नाबासाहेबांच आहे. म्हणूनच म्हणतात, "तुम्ही खाता त्या भाकरीवर... नाबासाहेनांची साही हाय रं..."





💎 सप्त बोध्यांगे

तथागत बुद्धांनी सांगितलेल्या ३७ बोधीपक्षीय धम्मापैकी सप्त बोध्यांगे एक भाग आहे.

१) चार स्मृती प्रस्थान

२) चार सम्यक प्रधान

३) चार ऋद्धिपाद

४) पाच इंद्रिय

५) पाच बल

६) सप्त बोध्यांगे

७) आर्य अष्टांगिक मार्ग

३७ गुणांच्या अभ्यासाच्या प्रारंभाने साधकासाठी बोधिसत्वाच्या रुपात बुद्धत्व प्राप्तीची यात्रा अथवा मार्गाचे प्रवेशद्वार असे म्हटले आहे.

बोधी म्हणजे परम ज्ञान, उच्चतम ज्ञान, शुद्ध ज्ञान साधकाला बोधी प्राप्त करून घेण्यासाठी सप्त बोध्यांग एक बंग आहे. त्याला ३७ बोधी पक्ष म्हणतात किंवा चार आर्यसत्य जाणारा मार्ग असेही म्हणतात.

१) स्मृतह बोध्यांग

स्मृतह बोध्यांग म्हणजे जागृकता, आठवण, क्षण, प्रतिक्षण जागृत राहणे. स्मृती ही मानसिक सावधतेचे दुसरे नाव आहे, शारीरिक श्रम करताना विवेकपूर्ण स्मृती जागृत ठेवणे याला स्मृती बोध्यांग असे म्हणतात.

२) धम्म विचय बोध्यांग

सत्य इच्छा, सत्य मार्गावर आरुढ होण्याची, उभे राहण्याची हिंमत ठेवून धम्म मार्गावर आरूढ होण्याची श्रद्धा निर्माण होते, नेहमी सत्य मार्गाचा ध्यास असणे, सत्यापासून दूर न होता आपले जीवन व्यतीत करणे म्हणजे धम्म विचय बोध्यांग होय.

३) वीर्य बोध्यांग

उत्साही, शक्तिवान, धैर्यवान राहणे म्हणजे विर्य बोध्यांग होय. धम्म अभ्यासात नेहमी उत्साहित असणे, सतत धम्मकार्य करण्यास तत्पर राहणे, चांगल्या कामाविषयी नेहमी उत्साहित असणे म्हणजे वीर्य बोध्यांग होय.

४) प्रीती बोध्यांग

एकाग्र चित्ताचा आनंद मानणे, आपुलकी बाळगणे म्हणजे प्रीती बोध्यांग होय. ध्यान, सुविचाराचा, अविचाराचा जो प्रतिभाव उत्पन्न होतो त्यालाच प्रीती बोध्यांग म्हणतात. प्रीती म्हणजे आनंद, उत्साह, मनाला शुद्‌ध निर्मळ ठेवल्याने सुखाची अनुभूती होते.

१) सामान्य सुखाच

९८७६५४३२१०

९८७६५४३२१०